# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डीचे अधिकृत मासिक



दिवाळी १९८८

# श्री साईलीला

श्री साईबाबा संस्थान
शिरडीचे अधिकृत मासिक

संपादक

**श्री. रा. द. बन्ने**

कार्यकारी अधिकारी श्रीसाईबाबा संस्थान शिरडी

—: कार्यकारी संपादक :—

श्री. सदानंद चेंदवणकर

## दिपावली विशेषांक

वर्ष ६७ वे | किंमत ५ रुपये | अंक ८ व ९

**दूरध्वनी ४१२२५६१**

- कार्यालय -

"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई- ४०० ०१४.
वार्षिक वर्गणी रु. १०/– (ट.ख. सह) किरकोळ अंक २ रु. फक्त.

**श्री साईबाबांच्या संदेशाचा जगभर प्रसार करणे हे**
**श्री साईलीलाचे मुख्य उद्दिष्ट आहे.**



# रघुनाथ सावित्री साईनाथ भजनमाला

६३

आम्ही गीत गावें तुम्ही तें ऐकावें । वर्तनीं आणावें तरी हित ॥
प्रपंची तारक एक गुरुनाम । तेणें आत्माराम तुष्ट होतो ॥
कर्तुमकर्तुम आहे ज्याची शक्ति । निकटींची भक्ति लागे तया ॥
दास म्हणे नव्हे व्यर्थची हे बोल । रक्षो विश्वपाल तुम्हां आम्हां ॥

६४

माझी एकतारी किती सौख्य देते । वेळीं कामा येते भजनाचे ॥
अंगी गुण मोठा असुनी निर्जीव। भाविक मानव वंदिताती ॥
जेथे हरिभक्त प्रभुनाम गाती । ऐकती महती हिची तेव्हां ।
दासी म्हणे देवा वाटे समाधान । करितां स्तवन प्रेम तुझें ॥

६५

बोलते चालते आम्ही हे मानव । अंगी प्रेमभाव आढळेना ॥
दांभिकपणाचें नित्याचें वर्तन । देव त्या कोठून लाभणार ॥
काम क्रोध मोह यांत जे पोहती । न मिळे त्यां शांती कधीं काळीं ॥
आपुलाले दोष आपण पहावे । अभ्यासी लावावे बोल कां ते ॥
"तूं तूं" करितांना आयु गमाविलें । अग्नीसी वाहिलें शरीर तें॥
सोडा ठकपण सोडा आपस्वार्थ । जोडा परमार्थ दास म्हणे ।

## दिवाळी शुभ चिंतन

ही दिपावली व नूतन वर्ष आमच्या सर्व साईभक्तांना, वाचकांना, लेखक-कवींना, हितचिंतकांना सुखाचे, समृद्धीचे, ज्ञानवृद्धीचे व भरभराटीचे जावो, ही दिपावली या मंगल सणप्रसंगी शुभ कामना.

— का. संपादक

**या मासिकात प्रकाशित झालेल्या लेखांतील**
**मतांशी संपादक सहमत आहेतच असे नाही.**


# दिपावली विशेषांकाचे- मानकरी

## अनुक्रमणिका


| क्र. | लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. | क्र. | लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. अरुण अंदे | ९ | २६ | श्री. मधुसुदून सावंत | ३७ |
| २ | श्री. मनोहर देशपांडे | ११ | २७ | सौ. अमिता कानडे | ३८ |
| ३ | सौ. निभा सामंत | १२ | २८ | श्री. मु. ब. निंबाळकर | ३९ |
| ४ | सौ. सुनिता मोकाशी | १२ | २९ | सौ. रश्मी सावंत | ४४ |
| ५ | श्री. रविंद्र सुपेकर | १३ | ३० | श्री. अरुण कल्याणकर | ५१ |
| ६ | कु. अभिजीता साळोखे | १४ | ३१ | सौ. रजनीदेवी घर्वे | ५३ |
| ७ | श्री. पी. एम. पाटील | १६ | ३२ | सौ. अंजली पाटेकर | ५४ |
| ८ | डॉ. रेखा कुलकर्णी | १७ | ३३ | श्री. संजय कुंभार | ५६ |
| ९ | श्री. ना. म. गोकरणकर | १९ | ३४ | श्री. रमाकांत वेंगुर्लेकर | ५७ |
| १० | सौ. अनुराधा कदम | २० | ३५ | सौ. स्मिता घरत | ६० |
| ११ | श्री. भास्कर जोशी | २१ | ३६ | श्री. शरद राणे | ६० |
| १२ | श्री. के. के. थिटे | २२ | ३७ | रोहिणी सावंत | ६१ |
| १३ | श्री. स. व्यं. कुलकर्णी | २३ | ३८ | श्री. अरुण शिंदे | ६२ |
| १४ | श्री. वि. पुं. सवाईकर | २४ | ३९ | सुजाता वेर्णेकर | ६३ |
| १५ | सौ. श्यामल पंडित | २५ | ४० | श्री. किशोर कदम | ६३ |
| १६ | सौ. देवयानी जोशी | २६ | ४१ | सौ. प्रमिला आजगावकर | ६४ |
| १७ | सौ. स्मिता अणवेकर | २७ | ४२ | श्री. जी. एस. पाटील | ६५ |
| १८ | श्री. महादेव देसाई | २७ | ४३ | श्री. गणेश नाईक | ६६ |
| १९ | सौ. लक्ष्मी जांधव | २९ | ४४ | सौ. सुजाता कदम | ६७ |
| २० | श्री. श्यामसुंदर हेजिब | ३० | ४५ | श्री नानासाहेब ढोबळे | ६८ |
| २१ | सौ. सोनिया अग्रवाल | ३२ | ४६ | श्री. भारत नगरकर | ६९ |
| २२ | श्री. विवेक ठाकूर | ३२ | ४७ | सौ. मंदाकिनी पाटकर | ७० |
| २३ | श्री. विनोद कोटावार | ३४ | ४८ | श्री. का. गो. जोशी | ७१ |
| २४ | सौ. स्नेहलता धामणकर | ३५ | ४९ | कु. निर्मला मोरे | ७२ |
| २५ | सौ. वैशाली हिंदळेकर | ३६ | ५० | श्री. मधुसूदन सामंत | ७३ |

| | | |
|---|---|---|
| ५१ | सौ. सुगंधा कुर्डेकर | ७४ |
| ५२ | श्री. हरिश्चंद्र लोखंडे | ७५ |
| ५३ | श्री. लक्ष्मण कदम | ७६ |
| ५४ | लीलाताई गोलतकर | ७७ |
| ५५ | सौ. प्रमिला वखारे | ७८ |
| ५६ | चारुलता हेर्लेकर | ८० |
| ५७ | श्री. श्याम बरत | ८० |
| ५८ | श्रीमती सुशिलाबाई निंबाळकर | ८१ |
| ५९ | सौ. दिपा गोखले | ८३ |
| ६० | श्री. प्रकाश उपडे | ८३ |
| ६१ | श्री. गुरुनाथ पन्हाळकर | ८४ |
| ६२ | शशीकला नाईक | ८५ |
| ६३ | श्री. उल्हास पाडळकर | ८५ |
| ६४ | सौ. मानसी रिसबूड | ८६ |
| ६५ | श्री. प्रभाकर गोडबोले | ८७ |
| ६६ | सौ. अश्विनी चिपकर | ८७ |
| ६७ | सौ. नलिनी डे | ८८ |
| ६८ | श्री. मधुकर सावंत | ८९ |
| ६९ | सौ. नीता देशपांडे | ९० |
| ७० | श्री. दत्ताराम कोरगांवकर | ९१ |
| ७१ | सौ. कांता ओलेकर | ९२ |
| ७२ | सौ. माया सावंत | ९३ |
| ७३ | सौ. सुषमा वझे | ९४ |
| ७४ | श्री. मिलिंद वैऊडे | ९५ |
| ७५ | श्री. शं. ग. सारंगधर | ९७ |
| ७६ | सौ. अर्चना पाटकर | ९९ |
| ७७ | कु. प्रसन्न सातपुते | १०० |
| ७८ | सौ. शामा कर्णिक | १०१ |
| ७९ | सौ. राधिका मोरे | १०३ |
| ८० | सौ. प्रमिला पालेकर | १०३ |
| ८१ | सौ. सुशिलाबाई गांवकर | १०४ |
| ८२ | श्री. भगवानवेलजी शेठ | १०५ |
| ८३ | श्री. प्रल्हाद माळी | १०७ |
| ८४ | श्री. धनंजय कुलकर्णी | १०९ |
| ८५ | श्री. गंगाधर गायकवाड | १११ |
| ८६ | सौ. रेखा माहिमकर | ११२ |
| ८७ | सौ. निर्मला राजे | ११३ |
| ८८ | श्री. विजय हजारे | ११४ |
| ८९ | श्री. द्वारकानाथ मार्तोंडकर | ११६ |
| ९० | श्री. वि. द. चिंदरकर | ११८ |
| ९१ | सौ. विभावरी राणे | ११९ |
| ९२ | श्री. दिलीप लांडे | १२१ |
| ९३ | श्री. विनय निरखे | १२२ |
| ९४ | सौ. सरोजिनी मुळये | १२५ |
| ९५ | सौ. माया सावंत | १२७ |

## संपादकीय



# हे भगवन्, साईनाथ ~ तमसो मा ज्योतिर्गमय

दिवाळी हा आम्हा हिंदूंचा सण. सणांचा राजा जर कोणता असेल तर तो दिपावली. भारतवर्षात हा सण सर्वत्र सर्व धर्मिय कमी, जास्त प्रमाणात साजरा करतात. सर्वत्र आनंदी वातावरण असते. अशी दिवाळी प्रतिवर्षी येते आणि दिव्या-बत्यांच्या रोषणाईने व अन्य प्रकारे म्हणजे पणत्या, मेणबत्या लावून आपण ती यथाशक्ती साजरी करतो. दिवाळीच्या चार-पाच दिवसात घराघरातील व कोनाकोपऱ्यातील अंधःकार नाहीसा करून तिथे प्रकाश ज्योती पेटविण्यात आपण दंग झालेले असतो. दीपावली म्हणजे जिकडे तिकडे दिव्यांचा लखलखाट आणि काळोख अंधःकाराचा नायनाट. सगळीकडे प्रकाशाचे साम्राज्य पसरवून दिवाळी येते अन् जाते. परंतु त्यामुळे आपल्या अंतःकरणात एखादा प्रकाशकिरण शिरलाय का याचा शोध आपण कधी काळी घेतला आहे काय?

"अंतरिचा ज्ञानदिप मालवू नको रे" असे आमचे संत साधु पुरुष सांगत आले आहेत. मग संत चूडामणी भगवान श्रीसाईबाबा याला अपवाद कसे असू शकतील! साईनाथांची तर दिव्याबत्त्यांच्या रोषणाईवर भारी श्रद्धा होती. शिरडीत आल्यावर त्यांनी जो पहिला नेत्रदीपक चमत्कार करून सर्वच भक्तांचे भाविकांचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतले, तो म्हणजे आपल्या निवासस्थानी - मशिदमाईत - तेलाशिवाय केवळ पाण्याच्या सहाय्याने पणत्या पेटविण्याचा होय.

श्री साईबाबा पणत्या पेटविण्यासाठी रोज रोज तेल मागायला येतात. त्यांचे काय आपण देणे-बिणे लागतो अशा विचाराने तेलाचे दान करणाऱ्या सर्वांनी त्या दिवशी त्यांना तेल देण्याचे चक्क नाकारले. पण याचा परिणाम काय झाला! श्रींच्या पणत्या पेटायच्या राहिल्या नाहीत. त्या पेटल्याच. काळोख नाहीसा करून तेथे प्रकाशाचे साम्राज्य सुरू करण्याची बाबांना भारी हौस. दिवे पेटवून प्रकाशमय वातावरण करून जनतेच्या मनातील काळोख, किल्मिष त्यांना दूर करून टाकायचे होते. श्रीसाई प्रकाशाचे पुजारी होते. त्यांना लोकांची अंतःकरणे पणत्यांच्या रूपाने पेटवायची होती. दुकानदार व्यापाऱ्यांनी तेल देण्याचे नाकारले म्हणून ते त्यावेळी डगमगले नाहीत. डगमगतील कशाला! या जगात वाट्टेल ते करण्याचे सामर्थ्य त्यांच्या ठायी होते. त्यांना जे दुःख झाले ते व्यापाऱ्यांच्या ठायी वास करणाऱ्या अज्ञानांधकाराचे. अज्ञानाचा नाश करून त्या ठिकाणी ज्ञानाची स्थापना करण्यासाठी बाबांचा अवतार होता.

या जगात प्रत्येकाच्या अंतरात भगवंताच्या - परमात्म्याच्या रूपाने ज्ञानज्योत सदा सर्वकाळ पेटत आहे. परंतु तिच्यावर अज्ञानाचा पडदा ओढला गेल्यामुळे अंतरात काळोख पसरलेला आहे. अंतरातील तो दिवा आपण पेटता ठेवावा. आपण सदासर्वकाळ जागृत रहावे. तो दिवा कधीच मुळीसुद्धा मालवू नये. आपणास प्रकाशाकडे जावयाचे आहे. काळोखात चाचपडत न वावरता प्रकाशातच निरंतर वावरावयाचे आहे, स्वतः प्रकाशमान होऊन इतरांनाही प्रकाश द्यावयाचा आहे. व जन्मा आलियाचे सार्थक करावयाचे आहे. याचीच आठवण करून देण्यासाठी दिवाळी सारख्या सणाची योजकता प्राचीन काळापासून करण्यात आलेली असावी. श्रीसाईनाथांसारखे सतपुरुष वेळोवेळी अवतीर्ण होऊन पणत्या पेटविण्याच्या रूपाने आपल्याला वरील आठवण वा जाणीव करून देतात व पणत्या पेटविण्याच्या रूपाने आपल्याला दिव्य संदेश देऊन जातात.

श्रीसाईबाबा शिरडीत पणत्या पेटविण्याच्या रूपाने दिवाळी साजरी करीत असत. या प्रसंगाची आठवण साईभक्तांना दिवाळीसारख्या सणवार प्रसंगी येणे अगदी साहजिक आहे. सर्वासर्वांना प्रकाश देणे, अज्ञानांधकार नाहीसा करणे हे बाबांचे परमकार्य कर्तव्य होते. आणि म्हणून केवळ पणत्या पेटविण्याच्या रूपानेच नव्हे तर परोपरीने जनतेच्या, आपल्या भक्तांच्या अंतरातील ज्ञानदीप ते पाजळीत होते. हळूवार हाताने त्याची वात ते पुढे पुढे सरकवीत होते. प्रत्येकाने स्वतःला ओळखण्याचा प्रयत्न करावा; झोपी न जातां जागृत रहावे, सर्वांकडे एकात्मतेच्या दृष्टीने पहावे, दुजाभाव वा द्वेषभाव सोडावा हीच त्यांची शिकवण होती.

काळोखाला, अंधःकाराला पायाखाली तुडवीत प्रकाशाकडे धाव घेणे व सतत प्रकाशातच वावरणे यातच आपली इतिकर्तव्यता आहे. वेदकाळापासून सारे ऋषीमुनी व संत साधु महंत आपणाला सांगत आले आहेत व परमेश्वराला प्रार्थित आले आहेत की "तमसो मा ज्योतिर्गमय". हे भगवंता साईनाथा! मला सभोवार पसरलेल्या काळोखातून प्रकाशाकडे घेऊन जा. माझा अज्ञानरूप अंधःकार नाहीसा कर. सदासर्वकाळ मला ज्ञान सूर्याच्या प्रकाशात तळपू दे, वावरू दे.'

भक्तवाचकांनो, किती मोलाचे मागणे आहे हे. दरवर्षी येणारी दिवाळी काय किंवा सद्गुरू साईनाथांसारखे दिव्य सतपुरुष काय हीच दिव्य मागणी आपल्यापुढे ठेवून जातात आणि ही मागणी किंवा हा दिव्य संदेश झेलणे व तो आचरणात आणण्यासाठी झटणे यातच आपले जीवन साफल्य आहे नाही का!

— जय साईराम

# लेखक—कवींस निवेदन

श्री साईलीला मासिकाकरिता साहित्य पाठविताना लेखक—कवींनी पुढील गोष्टींची दक्षता घेणे आवश्यक आहे.

* श्री साईलीलात प्रसिद्धी करिता आलेल्या अनुभव व कवितांचे प्रमाण वाजवी पेक्षा अगदी खूपच झाल्याने यापुढे कोणत्याही प्रकारचे काव्य किंवा अनुभव पुढील सूचना मिळेपर्यंत पाठवू नये.

* श्री साईलीलात बालसाईभक्तांसाठी दोन पृष्ठे आरक्षित केलेली आहेत. ह्या सदराकरिता बालसाईभक्तांना आकलन होईल अशा भाषाशैलीत माहितीपूर्ण, वैचारिक लेख अपेक्षित आहेत. बालसाईभक्तांनीही अशा स्वरुपाचे लिखाण पाठविल्यास अवश्य स्वागत होईल.

* श्री साईबाबांच्या पूर्वकालीन व समकालीन संतांची शिकवणूक यांचा परामर्श असलले, श्री साईबाबांचे तत्वज्ञान विशद करणारे, विविध धर्मांच्या तत्वज्ञानाची चर्चा करणारे व समयसुचकता असलेले लेख पाठविल्यास त्यांचा प्राधान्याने विचार करण्यात येईल. अभ्यासपूर्ण, तर्कशुद्ध, मीमांसक व वैचारिक स्वरुपाच्या लेखांचा श्री साईलीलात अंतर्भाव करण्यात येईल.

* श्री साईलीलात "ग्रंथ परिचय" हे सदर चालविण्यात येते. धार्मिक, आध्यात्मिक, तत्त्वज्ञान विषयावरील प्रकाशित होणारी पुस्तके त्या प्रकाशक—लेखकांनी संपादक, श्री साईलीला, ८०४ बी, खोदादाद सर्कल जवळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, दादर, मुंबई-४०० ०१४. येथे पाठविल्यास त्या पुस्तकांचा परिचय "ग्रंथ परिचय" ह्या सदरात करून देण्यात येईल.

* श्री साईलीलाकरिता साहित्य पाठविताना ते सुवाच्य अक्षरात डाव्या बाजूस पुरेसा समास सोडून, दोन ओळींच्या मध्ये पुरशी जागा ठेवून लिखाण असावे, ते पाठपोट असू नये, शक्यतो टंकलिखित असावे. लेखनासाठी वापरण्यात येणारा कागद जीर्ण—विजीर्ण—टाकाऊ असू नये.

* हयात असलेल्या संतांविषयीचे लेख पाठवू नयेत.

* अनुभव आल्यास श्री साईलीलात प्रसिद्धीस देईन, अशा प्रकारचा नवस साईभक्त करीत असल्याचे आमच्याकडे येत असलेल्या अनुभवांवरुन आढळून आलेआहे. साईभक्तांनी वरीलप्रमाणे नवस केल्याने आम्ही मात्र अडचणीत येतो. प्रत्येक अनुभवाला श्री साईलीलात स्थान देणे केवळ अशक्य आहे. ज्याच्या त्याच्या दृष्टीने त्याला आलेला अनुभव हा विस्मयकारकच असतो. आणि श्री साईबाबांवर मन:पूर्वक निष्ठा ठेवून त्यांच्या तत्वज्ञानाचे आचरण केल्यास, त्यांच्या कृपाप्रसादाचा साईभक्तांना निश्चितच अनुभव येईल, यात प्रत्यवाय नाही. परंतु अनुभव आल्यास श्री साईलीलात प्रसिद्धीस देईन वगैरे प्रकारचा नवस कृपया कुणीही करु नये.

* श्री साईलीलाकरिता साहित्य पाठविताना, ते अंतर्देशीय पत्रावर — पोस्ट

कार्डवर असू नये

तरी श्री साईलीलाला अधिकाधिक दर्जेदार स्वरुप देण्याकरिता श्री साईलीला लेखकांचे सहकार्य अपेक्षित आहे.

## श्री साईलीला सभासदांस निवेदन

● श्री साईलीला संबंधी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार करताना श्री साईलीलाच्या जुन्या सभासदांनी त्यांच्या श्री साईलीला सभासद क्रमांकाचा पत्रात उल्लेख करावा.

● श्री साईलीला वेष्टनावर वर्गणी केव्हा संपत असल्याचा महिना व वर्ष नमूद केलेले असते, त्या प्रमाणे वर्गणी संपण्यापूर्वी किमान एक महिना अगोदर आपली वर्गणी भरावी.

● पत्त्याल बदल झाल्यास मुंबई कार्यालयाला त्वरित कळवावे, पिन कोड सहित पूर्ण पत्ता लिहावा.

● आपल्या पत्त्यात काही दुरुस्ती सुचवायची असल्यास, पत्ता अपूर्ण लिहिला जात असल्यास त्याविषयी त्वरित मुंबई कार्यालयाच्या निदर्शनास आणावे.

● श्री साईलीला मासिकाचे नवीन सभासद होऊ इच्छिणाऱ्या व वर्गणी संपलेल्या जुन्या सभासदांनी आपली वर्गणी श्री साईबाबा संस्थान, शिरडी, मुंबई कार्यालय, साईनिकेतन, ८०४ बी, खोदादाद सर्कल जवळ, दादर, मुंबई-४०००१४. येथे प्रत्यक्ष/मनिऑर्डरद्वारे भरावी. चेक पाठवायचा झाल्यास तो "श्री साईबाबा संस्थान शिरडी" या नावावर असावा. मनिऑर्डर कोणत्या कारणासाठी करीत आहात, त्याचा उल्लेख मनिऑर्डरवर करणे आवश्यक आहे. "संदेश के लिए स्थान" आणि "भेजनेवाले का नाम व पूरा पता" असे नमूद केलेले असते, त्या दोन्ही ठिकाणी सभासदांनी आपले नाव व पूर्ण पत्ता लिहावा.

**श्री साईलीला पुढील अंक जानेवारी १९८९ मध्ये**

श्रीसाईलीलाचा हा दिवाळी अंक नोव्हेंबर-डिसेंबरचा जोड अंक असल्याने वेगळा डिसेंबरचा अंक प्रसिद्ध होणार नाही. यानंतर पुढील अंक १ जानेवारी १९८९ रोजी प्रकाशित होईल, याची वाचक - वर्गणीदारांनी नोंद घ्यावी.

— का. संपादक

# बाबांची अतर्क्य लीला

– श्री. अरुण ना. अंदे
कामाठीपुरा, मुंबई.

त्या दिवशीचा प्रसंग आठवला की अजूनही अंगावर भयग्रस्त रोमांच उभे राहतात. परंतु त्याच क्षणी त्या प्रसंगात आम्ही अनुभवलेल्या बाबांच्या अतर्क्य लीलेची आठवण होते आणि मन कसं अगदी भरुन येतं.

तो दिवस २ सप्टेंबर १९८६ चा. माझे वडील श्री. नारायण अंदे नेहमीप्रमाणे "अंबिका सिल्क मिल्स लि."मध्ये तिसऱ्या पाळीला कामावर गेले होते. ते तिथे वायंडर म्हणून काम करतात. दि. २ सप्टेंबरला तिसऱ्या पाळीला रात्री कामावर गेल्याने, ते दि. ३ सप्टेंबरला सकाळी ७ वाजता सुटण्याच्या १५ मिनिटे अगोदर अंबिका मिलची पाण्याची टाकी पॉवर हाऊसवर पडून भयंकर स्फोट झाला आणि त्याखाली असलेली इमारत जमिनदोस्त झाली.

ही घटना माझ्या लहान भावाने येऊन मला कामावर सांगितली, तेव्हा माझ्या पायाखालची जमीनच सरकल्याचा भास मला झाला. काय झालं असेल, काय नाही, या भयाने मी चिंतित झालो होतो. भीतीचं एकच मोहोळ माझ्या मनात थैमान घालत होतं. काय करावे, तेच मला काही सुचेना. त्याच मनोवस्थेत धावतपळतच मी मिल जवळ पोहोचलो.

अग्निशामक दलाचे जवान आत मध्ये अडकलेल्या कर्मचाऱ्यांना प्रयत्नांची पराकाष्ठा करुन बाहेर आणत होते. परंतु अद्याप माझ्या वडिलांना बाहेर काढण्यात आले नव्हते. नेमके काय झाले असेल, या शंकेने माझ्यावर गर्भगळीत होण्याची पाळी आली. माझ्या आईने तर अश्रू ढाळायला सुरुवात केली. संबंधित अधिकाऱ्यांकडे, कर्मचाऱ्यांकडे चौकशी केली असता, वडील आत बसलेले आहेत, जास्त काही दुखापत झालेली नाही, विशेष काळजी करण्याचे कारण नाही, अशी आमची समजुत घालण्यात येत होती. मी त्यावेळी पार घाबरुन गेलो होतो. स्फोट होऊन जवळ जवळ सहा तास लोटले होते, तरी वडिलांचे नेमके काय झाले, हे निश्चित कळायला मार्ग नव्हता. मी साईबाबांची मनातल्या मनात करुणा भाकू लागलो. त्यांची प्रतिमा नजरे समोर आणून त्यांना, वडिलांना वाचवा म्हणून विनवू लागलो.

आणि नेमक्या त्याच वेळी १५ फूट खोल मातीच्या ढिगाऱ्यातून माझ्या वडिलांनी दिलेला आवाज त्यावेळचे महापौर श्री. दत्ताजी नलावडे यांच्या कानावर पडला. बाबांनी ह्या प्रसंगात आपल्या अस्तित्वाची दिलेली ही पहिली प्रचिती.

अग्निशामक दलाच्या जवानांनी लगेच त्वरा केली आणि तिकडील मशिन्स व मातीचे ढिगारे झपाझप उकरण्यास सुरुवात केली. आणि तब्बल सहा तासानंतर महत्प्रयासांनी माझ्या वडिलांना मातीच्या ढिगाऱ्यातून बाहेर काढण्यात आले. पाहतो तर काय? वडिलांच्या पायाचे हाड मोडले होते आणि मशिनखाली डावा हात दबला

गेल्याने त्या ठिकाणी खूप सूज आली होती. वडिलांची मानसिक, शारीरिक परिस्थिती अगदीच विकलांग झाली होती.

अग्निशामक दलाने त्यांना क्षणाचाही विलंब न करता सरकारी रुग्णालयात दाखल केले. परंतु साईबंधुंनो, सरकारी रुग्णालयात काय व्यवस्था असते, याची माहिती आपल्याला असेलच!

पण म्हणतात ना, साई तारी त्याला कोण मारी? अचानक मिलच्या व्यवस्थापनातील काही अधिकारी व कामगार संघटनेचे पुढारी तेथे आले आणि त्यांनी सांगितले की, तुमच्या वडिलांना मालकाने जसलोक रुग्णालयात नेण्यास सांगितले आहे. पैशाची काळजी करु नका. सगळी व्यवस्था होईल. जसलोकमध्ये तुमचे वडील लवकर बरे होतील. त्यांचे हे उद्‌गार ऐकून आम्हाला हायसे वाटले. साईबाबाच जणू ह्या मोठ्या माणसांच्या रुपाने प्रसंगाला धावून आले.

सरकारी रुग्णालयात दाखल करण्यापूर्वीच वडिलांना जसलोकला हलविण्यात आले. जसलोकमध्ये "क्ष" किरण व इतर वैद्यकीय तपासणी झाल्यानंतर शस्त्रक्रिया करायची की नाही, ते ठरविण्यात येईल, असे तेथील डॉक्टरांनी वर्तविले. वडिलांची अवस्था अगदी चिंताजनक होती. त्यांच्या अंगात लहान लहान दगड व मातीचे कण घुसले होते. आणि जो डावा हात मशीनखाली दबला गेला होता, तो दोन हाताएवढा सुजला होता.

साईनामाचा जप सतत माझ्या मुखी चालू होता. मी साई सूर्याकडे कळवळून प्रार्थना केली, बाबा, माझ्या वडिलांना ह्या घोर संकटातून सुखरुप बरे करा. बरे झाल्यावर त्यांना मी शिरडीला तुमच्या चरणी घेऊन येईन. बाबा, कृपा करा, माझ्या विनंतीचा स्वीकार करा!

साई बंधुंनो, एवढा भार मी साईवर टाकला मात्र आणि चिंतेने व्याकूळ झालेले मन कसं अगदी हलकं फुलकं झाल्यासारखं वाटू लागलं. म्हणतात ना, ज्याच्या मागे साईश्वर उभा । त्याला नाही भीती जगा ।

वडील रुग्णालयात असताना मी बाबांची उदी रोज वडिलांच्या कपाळावर लावत होतो, त्यांना खायला देत होतो, त्याचप्रमाणे उदीची पुडी त्यांच्या उशीखाली ठेवून दिली.

वडील रुग्णालयात असताना हा एक माझा नित्याचा क्रम होता. आणि दिवसा गणिक साईबाबांच्या कृपेने वडिलांच्या प्रकृतीत सुधारणा होत गेली आणि वडील बरे होण्यास कमीत कमी सहा महिने लागतील, ही कल्पना खोटी ठरली. चक्क एकेचाळीसाव्या दिवशी वडील अगदी ठणठणीत बरे होऊन घरी परतले. ही सर्व बाबांच्या कृपेची किमया.

त्यानंतर वडील, आई व पत्नीला घेऊन मी शिरडीला गेलो. अगदी भारल्या मनःस्थितीत बाबांच्या चरण कमलांवर मस्तक ठेवले. त्या दयाशील, कृपावंत विश्वकर्त्याकडे पहाता पहाता डोळ्यांत अश्रू उभे राहिले. आनंदाश्रू. बाबांच्या

अतर्क्य लीलेची किमया पाहून ओसंडणारे ते आनंदाश्रू तसेच ओघळू दिले बाबांचे गाणे गुणगुणत-

धन्य ती साई माऊली
असता पाठीशी साई माऊली
पळेल दु:खाची साउली.

# मागे जे जो त्यास ते ते लाभे

**– श्री. मनोहर देशपांडे**
पत्रकार, सहसचिव,
पानसरे महाविद्यालय, अर्जापूर,
कुंडळवाडी, नांदेड.

श्री साईबाबांच्या वचनावलीत "जाणा येथे आहे सहाय्य सर्वांस । मागे जे जो त्यास ते ते लाभे" या वचनाचा प्रत्यय नुकताच मला आला.

मे ८८ मध्ये मी माझे मित्र श्री. रमेश नुनेवार यांच्या औषधी दुकानात बसलो असता, त्यांनी मला श्री साईबाबा संस्थान कडून त्यांना आलेली श्री साईबाबांची सुंदर दैनंदिनी दाखवली. श्री. रमेश नुनेवार हे साईभक्त मंडळाचे सदस्य आहेत व त्यांची बाबांवर अपार श्रद्धा आहे. मी देखील साईभक्त मंडळाचा सदस्य आहे. त्यांनी दैनंदिनी दाखविल्या नंतर माझ्या मनात विचार आला की, इतकी सुंदर व बाबांची छबी असलेली दैनंदिनी आपणास मिळाली तर...

अशी दैनंदिनी विकत मिळत नाही, हे समजले. मन त्या दैनंदिनीवर खिळून होते. परंतु त्यांच्याकडेही एकच दैनंदिनी असल्यामुळे मागणी करणेही उचित वाटले नाही.

परंतु सर्वांच्या ईच्छापूर्ती करणाऱ्या कृपाळू बाबांनी माझे मनोगत ओळखले असावे. काय चमत्कार झाला आणि आठ दिवसांच्या आत माझ्या पत्त्यावर रजि. पोस्टाने ती दैनंदिनी मला मिळाली. खरोखरच बाबांनी आपली वचनपूर्ती केली. दयाळू बाबांना शतशः प्रणाम. बाबांची अशीच कृपादृष्टी नेहमी असावी, ही प्रार्थना.

# गेलेला आवाज परत आला

– सौ. निभा अ. सामंत
बोरीवली, मुंबई.

जून १९८५ च्या पहिल्या आठवड्यात माझा आवाज बसला. मला बोलताना खूपच त्रास होऊ लागला. सुरुवातीला सर्दी पडशामुळे असेल, म्हणून यावर बरेच घरगुती मग डॉक्टरी उपाय झाले. आवाज तसाच. इ.एन.टी. स्पेशालिस्ट, ॲलर्जी स्पेशालिस्ट, स्पीच थेरपी वगैरे सर्व उपाय केले. ॲलर्जी स्पेशालिस्टने सांगितले की, तुम्हाला अमुक तमुक पदार्थांची (दोन पानी यादी) ॲलर्जी आहे. त्यामुळे स्वरतंतूंना सूज येते व आवाज बंद होतो. म्हणून एक दिवस आड अशी वॅक्सीन्स जवळ जवळ १॥ (दीड) वर्ष घेतली. सुधारणा अगदीच अल्प. पुन्हा त्रास वरचेवर व्हायला लागला. मग परत दुसऱ्या इ.एन.टी. सर्जनना दाखविले. त्यांनी ऑपरेशन करावे लागेल, असे सांगितले. हे ऑपरेशन अत्यंत नाजूक असते. मी घाबरुन गेले व श्री साईबाबांना शरण गेले. हे जे काही संकट आहे, त्याचे निवारण करा, अशी मी साईबाबांना विनंती केली. डॉक्टरांच्या औषधांपेक्षा उदीवरती पूर्ण विश्वास ठेवून मी रोज ती सेवन केली व माझा आवाज पूर्वी सारखा पूर्ववत झाला.

माझी मुलगी तेव्हा दीड वर्षाची होती व तिच्याबरोबर रोज बोलावे लागत असे. डॉक्टर सांगायचे की, बोलणे एकदम बंद, घशाला विश्रांती हवी. श्री साईबाबांच्या उदीचा महिमा मी ऐकून होतेच व मला स्वतःला उदीचा ताबडतोब गुण आला.

जरी हे शरीर गेलो मी टाकून,
तरी मी धावेन भक्तांसाठी.

असेच श्री साईबाबांचे कृपा आशीर्वाद माझ्यावर व माझ्या कुटुंबावर सतत राहू दे, अशी मी श्री साईच्या चरणी प्रार्थना करते.

# श्रद्धा सबुरी

– सौ. सुनिता सुरेश मोकाशी
भवानी पेठ, सातारा

आम्ही १९८४ ला शिर्डीला गेलो होतो. तेथून आल्यापासून तो आजपर्यंत साईबाबांचा आमच्यावर सतत वरदहस्त आहे. एक ना दोन अनेक संकटांतून साईबाबांनी आमचे रक्षण केले आहे व सतत ते आमच्या पाठीशी आहेत.

माझी थोरली मुलगी शाळेत जोडी-साखळी खेळताना दगडी भिंतीवर जोरात आपटली. अगदी डोळ्याजवळच जखम झाली. सबंध फ्रॉक रक्ताने माखला होता. डोळ्यावर हात धरलेला व शाळेचा शिपाई रिक्षातून तिला घरी घेऊन आला. सोबत

सगळा वर्ग आला होता. मी तर एकदम घाबरुनच गेले. क्षणभर तर मला काहीच सुचेना. परंतु देव्हाऱ्यातील साईबाबांची उदी तिला लावली व दवाखान्यात घेऊन गेले. तो गुरुवारच होता. डॉक्टरांनी सांगितले, थोडक्यात बरे, नाहीतर डोळाच गेला असता. अगदी डोळ्यानजिक असलेल्या त्या जखमेवर ड्रेसिंग करुन डॉक्टरांनी तिला घरी पाठविले.

आमच्या घरातील सर्वांचाच साईबाबांवर विश्वास आहे. प्रत्येक कामाला जाताना आम्ही उदी लावल्याशिवाय बाहेर पडत नाही.

दुसरे एक उदाहरण म्हणजे, माझ्या पतीची बदली जुन्नरला खूप लांब झाली. दोघी मुली १०/११ वीला. मधेच शाळा सोडून कसे जाणार? शाळेत प्रवेश मिळणेही किती अवघड. एक ना धड अनेक प्रश्न आ वासून उभे. झोप उडाली. शेवटी बाबांवर भार टाकून आम्ही निवांत राहिलो. म्हणालो, त्यांनाच काळजी. पती तर रजा काढून घरी बसले होते. अशात आठ दिवसांत बदलीची रद्द ऑर्डर आली. आम्हाला फार आनंद झाला. ही तर श्री बाबांची किमया.

# विघ्नहर्ता श्री साई

— श्री. रविंद रामचंद सुपेकर
देवास, मध्य प्रदेश.

"जरी हे शरीर गेलो मी टाकून,
तरी मी धावेन भक्तांसाठी ।"

हे ब्रिदवाक्य श्री साईंनी दिनांक ३ ऑगस्ट १९८७ रोजी आम्हाला खरे करुन दाखविले.

मी, माझी पत्नी सौ. माणिक, माझी वडील बहिण व मेहुणे केशरी ट्रॅव्हल्स कंपनी बरोबर २९ जुलै १९८७ रोजी अमरनाथ-वैष्णवदेवी यात्रेस निघालो.

दिनांक ३ ऑगस्ट १९८७ रोजी सोमवारी सकाळी बालतहून अमरनाथाच्या दर्शनास पहाडाची चढण सुरु केली. ह्या प्रवासात आम्ही एकंदर ११० जण होतो. चढण फार कठीण होत होती. रस्ता अरुंद व अगदीच निमुळता होता. दर्शनाचा हुरूप व सहयात्रींच्या उत्साहात दुपारी २ वाजेतो प्रवास निर्विघ्न पार पडतो. परंतु अचानक ढग येऊन बर्फाचा पाऊस व अत्यंत सोसाट्याचा वारा सुरु होतो. त्या स्थितीत माझ्या पत्नीस व मेहुण्यास घोडे करुन आम्ही पुढे पाठवतो व माझ्या बहिणी समवेत मी माझा प्रवास पुढे चालू ठेवतो. मुखाने 'श्री साई व हरि ॐ तत्सत्'चा जप व 'जय बाबा अमरनाथ' हे चालू असते.

पत्नीस घोडे करुन दिले, तेव्हा पत्नीचा धीर इतका खचला होता व प्रकृतीने इतकं नकरात्मक उत्तर दिलं होतं की, ती मला म्हणाली, माझी काळजी आता

सोडा, मुलांना तुम्ही आहातच. तिला मी धीर देऊन घोडे करुन दिले आणि मी व बहिण चढण चढत असता श्री बाबांना म्हटले की, बाबा, हे काय, तुमचा हात डोक्यावर असताना असे का व्हावे? हा बर्फाचा पाऊस थांबव व सर्वांना सुखरुप खाली नेऊन सोड. श्री अमरनाथाचे प्रत्यक्ष रौद्र रुप व सुस्म्य नैसर्गिक रुप दोन्ही तू इथे दाखविले, तरी आता पुढे जाण्याची गरज राहिली नाही. आम्हाला सुखरुप खाली पोहोचवा, अशी कळकळीची प्रार्थना केली.

आणि काय आश्चर्य! दोन मिनिटांत बर्फाचा पाऊस, वारा थांबला व लख्ख उन पडलं.

आता पुढे तंबू आढळतात, जिथे माझी पत्नी व मेहुणे घोड्यांवर पुढे जाऊन आमची वाट पहात असतात. तेथे आत पोहचल्यावर आढळते की तंबू मधे माझी पत्नी, मेहुणे व मेहुण्यांच्या इतर मित्रांची तब्बेत फारच गंभीर झालेली आहे व गारठ्याने कोणाचे तोंड वाकडे झाले आहे, तर कोणी रडत आहे, तर कुणाचे शब्द फुटत नाहीत.

तंबू मधे सर्वांना गरम पाणी व चहा पाजून सर्वांचे थोडे मन स्थीर-स्थावर करुन, सर्वांना घोडे करुन देऊन सायंकाळी सहाला आम्ही सर्व सुखरुप खाली येऊन पोहचतो.

आज देखील त्या आठवणीने अंगावर काटा उभा राहतो व श्री बाबांच्या प्रेमाच्या अनुभूतीने डोळ्यांतून पाणी वाहण्यास सुरुवात होते.

## श्रद्धा-सबुरी माझ्या जीवनाची शिदोरी

**– कु. अभिजीता अ. साळोखे**
रविवार पेठ, कोल्हापूर.

मला आलेला बाबांचा महाअनुभव मागील वर्षीच्या दिपावलीच्या लक्ष्मीपूजनाच्या वेळेचा आहे. ''श्री साईनाथ सगुणोपासना'' या बाबांच्या आरतीसंग्रहामधील मध्यान्ह आरतीच्या वेळी जी प्रार्थना म्हटली जाते, त्यातील ''काशी स्नान जप प्रतिदिवशी, कोल्हापूर भिक्षेसी निर्मळ नदी तुंगा जलंप्राशी'' ही जी पद्यरचना आहे, त्यातील भिक्षेसाठी बाबांच्या पदस्पर्शाने पवित्र झालेले आणि पाच नद्यांचा संगम झालेले कोल्हापूर माझे गाव. आम्ही सर्वजण निस्सीम साईभक्त. त्यातल्या त्यात माझे वडील पूर्णतः साईमय झालेले. मला आलेला अनुभव असा की, लक्ष्मीपूजनाच्या दिवशी माझी आई प्रतिवर्षाप्रमाणे घरातील सर्व दागदागिने काढून पूजेसाठी देवीसमोर ठेवून यथासांग पूजा करीत असते. त्याप्रमाणे तिने सर्व दागिने घेतले होते आणि माझ्या आजीने मला दिलेली पंधराशे रुपयांवर जास्त किंमत असलेली सोन्याची साखळी पण तिने पूजेसाठी मागून घेतली. दिपावलीचे चार दिवसांत

आनंदाचे वातावरण असते, त्यामुळे मी माझ्या मैत्रिणींसमवेत ते दिपावलीचे चार दिवस मजेत घालविले. लक्ष्मीपूजनानंतर तिसऱ्या दिवशी मी माझ्या आईजवळ सोन्याच्या साखळीची मागणी केली. आईने मला सांगितले की, जो दागिन्याचा डबा आहे, त्यामध्ये सर्व दागिने ठेवले आहेत. मी तो डबा सर्व शोधून पाहिला, पण मला माझी सोन्याची साखळी मिळेना. परत कपड्याचे कपाट नी बॅग सर्व शोधून पाहिल्या, पण माझी साखळी मिळेना. माझा जीव रडकुंडीला आला. माझ्या आईला ती सर्व हकिगत सांगितली. तिनेही दागिन्यांचा डबा, कपाट, बॅगा सर्व ठिकाणी कसून शोधले, पण माझी साखळी तिलाही सापडली नाही. काही वेळानंतर माझ्या आईला समजून चुकले की, लक्ष्मी पूजनाच्या वेळी जी फुले वाहिली होती, त्या सर्व फुलांच्या ढिगाऱ्यामधून कदाचित ती गेली असावी. कारण लक्ष्मीपूजनानंतर दुसऱ्या दिवशी माझ्या आईने पूजेसाठी वाहिलेली फुले आणि इतर पूजेचे साहित्य सर्व गोळा करुन माझ्या वडिलांच्याकडे नदीच्या पात्रात सोडण्यासाठी दिले होते. हे सर्व आठवल्यानंतर आम्हा दोघींना रडू कोसळले. ही सर्व हकिगत माझ्या वडिलांना आम्ही दोघींनी सांगितली. माझ्या वडिलांनी ती फुले व पूजेचे साहित्य ज्या नदीत टाकले होते, त्या पंचगंगा नदीचा पूल अंदाजे शंभर ते सव्वाशे फूट उंचीचा होता व त्या पुलावरुन ते पूजेचे साहित्य व फुले टाकली व त्यातूनच कदाचित साखळी गेली व ती मिळण्याची आशाच आम्ही सोडून दिली. हकिगत ऐकल्यानंतर माझ्या वडिलांनी मला बाबांना मनोभावे शरण जाण्यास सांगितले आणि कळवळून प्रार्थना करण्यास सांगितले की, बाबा, मला माझी सोन्याची साखळी मिळू दे! मिळाल्यानंतर आमच्या इथल्या साईमंदिरात जाऊन मोठा हार व पेढे तुम्हाला ठेवीन. थोड्याच वेळाने माझे वडील बाबांचे नामस्मरण करीत साखळी शोधण्यासाठी गेले. ज्या ठिकाणावरुन त्यांनी पूजेचे साहित्य टाकले होते, त्या ठिकाणी त्या पूलावर त्यांनी कसून शोधून पाहिले, पण शेवटी ते निराश मनाने घरी परत येण्यासाठी निघाले, पण त्यांचे पाऊल पुढे पडेना! मन असे सांगू लागले की, मागे परत व डाव्या बाजूने चालू लाग. त्याप्रमाणे माझे वडील परत मागे फिरले व डाव्याबाजूने चालू लागले. तो काय आश्चर्य! थोडे पुढे गेल्यानंतर कठड्याच्या एका भोकामधून एका दगडावर अगदी कडेला जशी एखादी वस्तू अलगत अंथरुन ठेवतात, त्या प्रमाणे ती सोन्याची साखळी जशीच्या तशी त्या पूलाच्या कठड्यावर अंथरुन ठेवलेली दिसली. माझ्या वडिलांनी हळूवारपणे त्या भोकातून ती साखळी अलगदपणे उचलून घेतली आणि अश्रूपूर्ण नयनांनी बाबांच्या नामस्मरणाचा मनामध्ये जयघोष करीत घरी आणली. तब्बल तीन दिवसांनी त्यावेळी त्या पुलावरुन जोरदार वारे वाहात असताना ती सोन्याची साखळी जशीच्या तशी अलगदपणे त्या पुलावर माझ्या वडिलांना मिळाली, हा केवढा मोठा साईंचा चमत्कार! त्यावेळी साखळी काढून घेताना वडिलांचा हात थोडासा जरी बाजूला लागला असता, तरीसुद्धा ती साखळी पाण्यामध्ये धक्क्याने पडली असती. पण तसे न होता ती सोन्याची साखळी माझ्या वडिलांना बाबांच्या

कृपेमुळे जशीच्या तशी व्यवस्थित परत मिळाली. ह्या घडलेल्या साईलीलेमुळे अश्रूपूर्ण नयनांनी मी श्री साईपुढे कितीतरी वेळा नतमस्तक झाले. शेवटी हा अनुभव लिहित असताना दाटून आलेल्या अंत:करणाने माऊलीपुढे कोटी कोटी प्रणमा करते आणि त्या माऊली जवळ कळकळीची प्रार्थना करते की, अशीच तुझी माया, कृपाछत्र आणि लाख मोलाचा आशीर्वाद आम्हा सर्वांवर आणि सर्व साईभक्तांवर सतत राहो!

# जो जो मज भजे जैसा जैसा भावे

**— श्री. पी. एम. पाटील**
कणकवली, सिंधुदूर्ग.

माझा १० वर्षांचा चुलतभाऊ चि. विवेक हा अभ्यासात फारच मंद असल्याने व घरात आई वडिलांचे ऐकत नसल्याने मी त्याला माझे नोकरीचे ठिकाणी घेऊन आलो होतो. सदर गावी गावातील वृद्ध माणसे वगळता बहुतेक सर्वजण आंघोळीसाठी नदीवर जात असत. मी माझे बरोबर चि. विवेकला आंघोळीला नदीवर घेऊन जात असे. परंतु तो दिवस उजाडला. त्या दिवसाची अजूनही आठवण झाली की भीतीने अंगावर शहारे उभे राहतात.

तीन वर्षापूर्वीचा रामनवमीचा दिवस होता तो. त्या दिवसापासून विवेकची सकाळी ७ ची शाळा सुरु झाली. त्यामुळे तो सकाळी आंघोळ न करताच शाळेत गेला. मार्च महिना हा कार्यालयीन वित्तीय वर्षाचा शेवटचा महिना असल्याने मी व माझा धाकटा भाऊ सकाळी आठ वाजताच ऑफीसला गेलो होतो. बहिण कपडे धुण्यासाठी नदीवर गेली होती. १० वाजता शाळा सुटल्यानंतर विवेक दप्तर तसेच टाकून बहिण नदीवर गेली असल्याचे आईकडून समजताच तसाच तडक नदीवर गेला. त्याला पोहता येत नव्हते. त्यामुळे तो नदीमध्ये एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी चालतच जात असे. असाच तो नदीत चालत जात असता नदीतील कोंडीत (खोल खड्ड्यात) बुडाला. बहिणीची त्याच्याकडे पाठ असल्याने तिच्या काही हे लक्षात आले नाही. पाण्याचे दुर्भिक्ष असल्याने एक मुलगी पाण्यासाठी नदीवर येत असता तिने एक मुलगा पाण्याचे वर एकदा येऊन खाली गेला व परत वर आला नसल्याचे पहिले व माझे बहिणीजवळ येऊन, तुमच्या विवेक सारखा मुलगा मी आता पाण्यात बुडाल्याचे पाहिल्याचे सांगितले. त्याबरोबर बहिणीने ओरड केली. त्याचवेळी एक बैलगाडीवाला बैलांना पाणी पाजण्यासाठी नदीवर आला होता. त्याला ही गोष्ट समजताच त्याने नदीत उडी मारली परंतु त्याच्या हाताला काही विवेक लागला नाही. बहिण तर जोरातच रडू लागली. एवढ्यात ही बातमी घरी आमचे आईलाही

कोणीतरी सांगितली. तिलाही दोन बायकांनी धरुन नदीवर आणले त्यामुळे नदीवर गलका अधिकच वाढला. जवळचे घरातील "गायर" उपसणाऱ्या मुलाने हा गलका ऐकला, तेव्हा तो त्वरित त्या ठिकाणी धावत गेला व क्षणाचाही विलंब न लावता त्याने नदीत उडी घेतली. त्याच्या हाताला विवेकचे डोके लागले. त्याने त्याचे केस धरुन उचलण्याचा प्रयत्न केला. परंतु एव्हाना विवेक छाती पर्यंत वाळूत रुतला होता. त्यामुळे एकट्याला वर काढणे कठीण झाले. शेवटी त्याने वर येऊन आपले चुलत भावाला मदतीला घेऊन विवेकला कसेबसे वरती काढले. साईबाबांचे कृपेमुळे विवेक खाली बुडत असताना भीतीने त्याची दातखिळी बंद झाल्याने त्याचे पोटात थोडेसे पाणी गेले ते श्वासावाटेच. शेवटी डॉक्टरी उपायाने विवेक संध्याकाळी शुद्धीवर आला. आता तो पूर्ण बरा आहे. अशा प्रकारे साईबाबांनी आम्हाला फार मोठ्या संकटातून वाचविले.

# बाबांच्या वचनाचे प्रत्यंतर

**– डॉ. रेखा कुलकर्णी**
कोथरुड, पुणे.

माझे वडील श्री साईबाबांचे निस्सीम भक्त आहेत. कोणत्याही नवीन उपक्रमाची सुरुवात, कोणतीही खरेदी ते कटाक्षाने गुरुवारीच करतात. मग त्या दिवशी अमावास्या असू दे किंवा पौर्णिमा. घरात कोणी आजारी पडले तरी आधी उदी लावा आणि मग औषध द्या, असा त्यांचा सल्ला असतो. त्यांच्या रोजच्या दिनक्रमाची सुरुवातही साईबाबांच्या आशीर्वादानेच होते. श्री साईबाबांच्या विषयी अढळ श्रद्धा असल्यामुळे अनेक संकटांतून ते सहिसलामत बाहेर पडले आहेत. त्यांच्या अशा अनेक अनुभवांपैकी हा एक अनुभव!

१९७६ सालची गोष्ट. पवई आय. आय. टी. मध्ये माझा भाऊ शिकत होता. त्याला भेटून पैसे देण्यासाठी माझे वडील आपल्या एका जवळच्या मित्राला बरोबर घेऊन गुरुवार दि. ७ ऑक्टोबर १९७६ ला स्कूटरवरून मुंबईला गेले. मुळातच धाडसी स्वभाव असल्यामुळे असे प्रवास करण्याची त्यांना दांडगी हौस. मुंबईला पोहोचल्यावर डॉकयार्ड येथे राहणाऱ्या एका मित्राला भेटून आणि रविवारी दुपारी तुमच्याकडे जेवण करून पुण्याला जाऊ, असे सांगून ते पवईला निघाले. शिवडीजवळ महानगरपालिकेच्या सेवकांनी पाण्याच्या नळाच्या दुरुस्तीसाठी खोदकाम केले होते. त्यामुळे तेथे तांबड्या मातीचा गुळगुळीत रबडा झाला होता. स्कूटरचा वेग अत्यंत कमी असूनसुद्धा त्या चिखलात स्कूटरने एकदम गिरकी घेतली आणि वडील दूर फेकले गेले. १-२ मिनिटे त्यांची शुद्ध हरपली. शुद्धीवर आल्यावर त्यांनी प्रथम पाहिले की, बोटात बाबांची सोन्याची अंगठी सुरक्षित आहे की नाही?

(त्यांच्या उजव्या हाताच्या बोटात नेहमी साईबाबांची अंगठी असते.) ती सुरक्षित होती. भावाला देण्यासाठी घेतलेले पैसेही व्यवस्थित होते. फक्त उजव्या मनगटाजवळ आणि डोळ्यांच्या खाली बराच मुका मार बसला होता. गंमत अशी की, त्यांच्या मागे बसलेल्या मित्राला आणि स्कूटरला साधा ओरखडाही उठला नव्हता. एक क्षणभर त्यांच्या मनात विचार चमकून गेला की, मागून एखादे वाहन वेगात आले असते तर...? पण, 'जाको राखे साईयाँ मार सके ना कोय', हेच खरे!

पुढे रविवारी ठरल्याप्रमाणे मित्राकडे पाहुणचार घेऊन ते ३-३० वाजता पुण्याला येण्यास निघाले. चौक गावापाशी आल्यावर स्कूटरचे मागचे चाक पंक्चर झाले. पण बरोबर स्टेफनी होती. त्यामुळे ताबडतोब चाक बदलून ते पुढील प्रवासास लागले. मैल-दोन मैल पुढे जातात तो काय, पुन्हा मागचे चाक पंक्चर. आता मात्र कठीण होते. थंडीचे दिवस, अंधार पडू लागलेला, पुढचं काही दिसत नव्हते, जवळपास गाव नाही की वस्ती नाही, पेट्रोल पंप नाही, गॅरेज नाही. पंक्चर झालेली स्कूटर ढकलत नेण्याशिवाय दुसरा पर्यायच नव्हता. हे किती जिकिरीचे काम आहे, हे ज्याने अनुभव घेतला असेल त्यालाच कळेल. त्यातून आधीच्या अपघातामुळे दुखावलेला उजवा हात अधिकच दुखू लागला होता. काय करावे त्यांना काहीच सुचेना. आता साईकृपेशिवाय कोणी तारणार नाही असे वाटल्यामुळे ते साईबाबांचा धावा बोलू लागले.

एवढ्यात गस्त घालणाऱ्या पोलिसांची एक जीप आली. सगळी हकिगत ऐकल्यावर ते म्हणाले, हा भाग फार धोक्याचा आहे. इथे दुरुस्ती करून घेऊ नका. एखादा ट्रक थांबवा आणि खोपोलीलाच पंक्चर काढून घ्या. वडिलांना असा सावधगिरीचा इशारा देऊन ते निघून गेले.

खोपोली अजून नऊ मैल लांब होती. मदतीची काहीच चिन्हे दिसत नव्हती. बाबांवर भरोसा ठेवून येणाऱ्या प्रत्येक ट्रकला थांबविण्याचा प्रयत्न चालू होता, पण एकही ट्रक थांबत नव्हता. इतक्यात एक ट्रक अगदी समोर येऊन थांबला. ट्रक ड्रायव्हरने हिंदीत चौकशी केली. सर्व परिस्थिती समजल्यावर तो म्हणाला, "तुमची स्कूटर आमच्याच कंपनीची आहे. (तो ट्रक नवीन बजाज स्कूटर वाहून नेणारा होता.) मी तुम्हाला पुण्याला पोहोचवतो." इतक्यात मघाशी भेटलेले पोलिसही जीप रिकामी करून परत आले. कारण त्यांना माहीत होते की, तिथे कोणतीही मदत मिळणे अवघड आहे. पण वडिलांची सोय झालेली पाहून ते निघून गेले.

ड्रायव्हरने क्लिनरला स्कूटर ट्रकमध्ये ठेवायला सांगितले आणि वडिलांना आणि त्यांच्या मित्राला पुढे केबिनमध्ये बसवून ट्रक सुरू केला. हे दोघेजण ट्रकमध्ये बसले खरे, पण मनात धाकधुक होती. गाडी सुरू झाल्यावर ड्रायव्हर म्हणाला, हे पोलिस तुम्हाला त्रास देतील म्हणून आपण खोपोलीला थांबायचे नाही. वडील म्हणाले, "तुम्ही म्हणाल तसं." खोपोलीहून घाटात मध्यावर आल्यावर ड्रायव्हरने ट्रक थांबवला आणि विचारले, "तुम्हाला नक्की कुठे जायचंय." आता मात्र वडील चांगलेच हादरले. मनात शंका-कुशंकांचे काहूर माजले. नक्कीच ड्रायव्हरच्या मनात काही काळं बेरं

आलं असणार! आणि ती जागा अशी होती की, कितीही ओरडलं तरी मदतीला कोणीही आलं नसतं. वडील म्हणाले, "आम्हाला पुण्यालाच जायचंय." ड्रायव्हर म्हणाला, "तुम्हाला पुण्याला पोचायला आपल्याला १२ तरी वाजतील. मग तुम्ही पंक्चर कुठे काढणार? सगळं बंद असेल. तुम्हाला सकाळपर्यंत थांबावं लागेल. त्यापेक्षा लोणावळ्याला माझ्या ओळखीचा एक 'आण्णा' आहे, त्याचं दुकान २४ तास चालू असतं. मी तुम्हाला तिथे सोडतो. त्याच्याकडे पंक्चर काढून तुम्ही १ वाजेपर्यंत पुण्याला पोचाल". वडिलांनी त्याच्या म्हणण्याला संमती दिली. (कारण दुसरा काही इलाजच नव्हता.) ठरल्याप्रमाणे त्याने लोणावळ्याला 'आण्णा'च्या दुकानासमोर ट्रक उभा केला. स्कूटर खाली काढली आणि आण्णाला लवकर पंक्चर काढून देण्याची विनंती केली आणि तो ट्रकमध्ये जाऊन बसला. वडिलांनी त्याला चहा घेण्याची विनंती केली. काही बक्षिसी देऊ केली, पण त्याने घेण्यास स्पष्ट नकार दिला. वडिलांनी त्याला विचारले, "आपण कुठून आलात?" "मैं इंदौर से आया हूँ" असं उत्तर देऊन तो निघूनही गेला. वडील आश्चर्यचकित होऊन पहातच राहिले. त्यांच्या मनात आले, कुठं इंदौर, कुठं लोणावळा. ट्रक ड्रायव्हरच्या रुपाने बाबाच नक्की भक्ताच्या मदतीला आले. दुसरा एखादा ट्रक ड्रायव्हर असता तर तो पैसे घेतल्याशिवाय गेला असता?

"जो माझ्याकडे पाही, त्याकडे मी पाही", बाबांच्या या वचनाचेच हे प्रत्यंतर नाही का?

# सर्वज्ञ तूं साईनाथा । सर्वांच्या हृदयांतरी ॥

**– श्री. ना. म. गोकरणकर**
वेंगुर्ला, सिंधुदूर्ग.

दिनांक १६ ऑक्टोबर १९८७ ची माझ्या आयुष्यातील ती एक भयानक रात्र. समर्थ साईमाउलीने या ना त्या रुपाने संकटाची सूचना दिली नसती, तर काय घडले असते, हे ती कृपाळू साईमाउलीच जाणे. साईंच्या अनेक लीला मी आजपर्यंत साईलीला मासिकांतून वाचत आलो व ऐकत होतो. त्याचा प्रत्यक्ष अनुभवही अनुभवला होता. पण हा पुढील अनुभव म्हणजे साईनाथांच्या साक्षात्काराचा हृदय हेलावून सोडणारा असाच आहे.

सोळा ऑक्टोबरच्या संध्याकाळी चार वाजताची वेळ. आमचे एक शेजारी आपले शेतातून घरी निघाले असता सहज म्हणून वाटेत दोन कुंपणाचेमधे कोपऱ्यात पडचणीचे जागी असलेल्या माडाचे झाडाचे बुंध्यावर त्यांनी नजर टाकली. बुंध्याच्या मुळ्या उसकल्याचा संशय आला म्हणून अगदी जवळ जाऊन बारकाईने त्यांनी पाहिले असता, काही मुळ्या (पाळे) उमटल्याचे दिसले. झाडाच्या दक्षिणेच्या

दिशेला सुमारे ५० फूटांवर आमचे घर. झाड सुमारे ८० वर्षांपूर्वीचे व ७० फूट लांबीचे होते. त्या गृहस्थांनी माझ्या भावजयीला बोलावून प्रत्यक्ष दाखविले व ते निघून गेले. भावजयीने झाडाच्या मालकाला बोलावून घेऊन दाखविले असता, "घाबरु नका तसा माड कोसळणार नाही, तरी सावधगिरी म्हणून उद्या झाड तोडणाऱ्याला बोलावून तोडून घेतो" असे सांगून ते निघून गेले.

संध्याकाळी सात वाजताचे दरम्यान शेजारचे ते गृहस्थ आमचे घरी येऊन मालक काय म्हणाले, याची चौकशी करुन त्यांनी असा सल्ला दिला की, झाडाचा नक्की भरवंसा कुणी सांगावा. तुम्ही कोणीही झाडाचे बाजूने झोपू नका. थोडे दूर झोपा. सावधगिरी असलेली बरी, असे सांगून निघून गेले. रात्री झोपावयाची वेळ होताच नेहमी पाळण्यात झोपणाऱ्या सहा महिन्याच्या मुलीसह मोठ्या मुलांना घेऊन बायको नेहमीच्या जागी न झोपता मधल्या खणात (खोलीत) थोड्या दूर जागी झोपली. भावजय व भावाची मुले बाहेरच्या खोलीत झोपली. सर्वजण गाढ झोपेत असता रात्री दिड वाजताचे दरम्यान माडाचे ते झाड घराचे उत्तरेच्या छपरावर मधोमध कोसळले. जोराचे आवाजाने घरातील सर्व माणसे झोपेतून खडबडून जागी झाली. भीतीमुळे कोणाला काय बोलावे हे समजेना. लहान मुले रडू लागली.. झाड पडलेचा आवाज ऐकून पूर्व सूचना देणारे इसम व इतर शेजारी धावत आले. घरातील माणसांची विचारपूस करुन सर्वांना धीर दिला. १५ वर्षे व १० वर्षे वयाच्या दोन मुली नेहमी ज्या जागी झोपत असत त्याचे बरोबर वर माडाचा शेंडा पडून नारळ, कौलांचे व रिपांचे तुकड्यांचा खच पडला. माझी बायको चार वर्षांचा मुलगा लहान मुली यांच्या अंथरुणा भोवती नारळ गडगडत गेले. लहान मुलीच्या पाळण्यात अर्धा कौलाचा एक तुकडा पडला. एकंदर परिस्थितीचा विचार करता प्रसंग कुणाच्याही अंगावर शहारे आणणारा असाच होता. मला ही हकिगत जेव्हा माझ्या नोकरीचे गावी समजली तेव्हा विश्वव्यापक साईमाऊलीला मनोमन हात जोडून नतमस्तक झालो. भक्तहो, ज्याला साईतारी त्याला काळाचीही भीती नाही. माझी परमकृपाळु साईमाऊली त्या गृहस्थाचे रुपाने धांव घेऊन घरच्यांना आगामी संकटाची सूचना देऊन सावध करणे, ही बाबांचीच लीला नाही का?

## प्रचिती

– सौ. अनुराधा कदम
एम. ए., मानसशास्त्र
सेनापती बापट मार्ग, पुणे

गेल्या नोव्हेंबरमध्ये सतत तीन रात्री मला असे स्वप्न पडले की, आमच्या घराची दारे संपूर्णतः उघडी पडलेली आहेत. स्वप्नानंतर मी खडबडून जागी होई व लागलीच

पतीला उठवून दरवाजे बंद आहेत, याची खात्री करून घेई. माझ्या पतीचा स्वप्न इ. प्रकारांवर मुळीच विश्वास नाही. त्यामुळे त्यांनी माझी अशी समजूत घातली की, हे बघ, रोज रात्री झोपताना तुझ्या मनात घराची दारे बंद केलीत ना, असा विचार असतो व त्यामुळेच तुला अशा प्रकारची स्वप्ने पडतात.

त्यानंतर चार दिवसांनी आम्ही काही कारणामुळे तीन-चार तास पुणे शहरात गेलो. तेवढ्या वेळात आमच्या घरी चोरी झाली. अगदी स्वप्नात दिसत होती, तशीच घराची दारे उघडी होती. सामान अस्ताव्यस्त पडले होते, विस्कटाविस्कट झाली होती. चोरट्यांनी बरीच उलथापालथ केली होती. तिजोरी फोडण्याचा प्रयत्न झाला होता. एकूणच घराचे दृश्य अत्यंत भयावह दिसत होते.

मी माझ्या ईश्वरावर श्री साईमाऊलीवर हवाला ठेवून होते. कारण तिजोरीतच सर्व दागिने, मौल्यवान वस्तू, पैसे होते. साईकृपेने सर्व गोष्टी सुरक्षित होत्या. चोरट्यांना तिजोरी फोडता आली नाही. घरातील किरकोळ गोष्टी गेल्या, पण सर्व मौल्यवान वस्तू सुरक्षित होत्या. — हा तर साईबाबांचा कृपाप्रसाद नव्हे का!

# साई तारी त्याला कोण मारी

**— श्री. भास्कर गो. जोशी**
बोरीवली (पूर्व), मुंबई.

गेल्या रामनवमीची गोष्ट. आम्ही उभयता पती-पत्नी उत्सवाकरिता शिरडीला गेलो होतो. आमचा मुलगा रामनवमीच्या दिवशी साईदर्शनाकरिता शिरडीस गेला व दुसऱ्या दिवशी परत आला. आम्ही काला आटोपून २८ मार्चला बोरीवलीला परत आलो. २९ तारखेला आमचा एक नोकर कामावर आला व त्याने माझ्याजवळ एक पत्र दिले. ते फाटलेल्या स्थितीत होते. तो म्हणाला, आमच्या कॉलनीतील एका स्नेह्याने ते पत्र त्याला दिले व बजावून सांगितले की, हे पत्र जोशांना दे व तुला जमत नसेल तर मी स्वतः त्यांना देईन, कारण त्यातील मजकूर महत्त्वाचा आहे. आमच्या नोकराने सांगितले, काही काळजी करु नका. मी त्यांना ते जबाबदारीने देईन. त्याने मला ते पत्र दिल्यानंतर मी ते वाचून पाहिले तर त्यात माझ्या मुलाला १ एप्रिलला बलसाडला नोकरीला मुलाखतीकरिता बोलाविले होते. श्री साईबाबा आपल्या भक्तांना कशी मदत करतात ते यावरुन कळून येते.

हकिगत अशी की, आमच्या घरापासून साधारण १०० मीटर अंतरावर काही लहान मुलांना चुरगळलेल्या व फाटलेल्या स्थितीत एक उघडे पत्र मिळाले होते. त्याच्यावरील पाकिट फाडून फेकून दिले होते. ती मुले नवीन इंग्रजी शिकत असलेली असावीत, कारण ती अक्षर अक्षर जोडून ते पत्र वाचून पहात होती. त्याचवेळी आमचे स्नेही त्या मुलांच्या जवळून जात होते. त्यांना काय वाटले कुणास

ठाऊक, कुतुहलाने त्यांनी मुलांना विचारले, काय वाचता आहात? बघू द्या. मुलांनी ते पत्र आमच्या स्नेह्यांच्या हातात दिले. त्यांनी वाचून पाहिले तर काय! ते माझ्या मुलाला बलसाडला १ एप्रिलला मुलाखतीला बोलावल्याचे पत्र होते. त्यांनी मुलांना विचारले, हे पत्र तुम्हाला कुठे मिळाले. त्यांनी सांगितले, येथेच रस्त्यावर पडलेले मिळाले. लगेच स्नेही माझ्या घरी आले, तो घराला कुलूप, कारण त्याचवेळी आम्ही शिरडीस होतो. आमचा नोकर ओट्यावर बसला होता. त्याला त्यांनी ते पत्र दिले. प्रश्न असा होता की, हे पत्र रस्त्यावर गेलेच कसे? पोस्टमन पत्रे वाटीत असताना चुकून रस्त्यात पडले, की आमच्या घराला कुलूप बघून त्याने दाराला अडकवून ठेवले व वाऱ्याने उडून रस्त्यावर आले? खरोखर साईबाबांची लीला अगाध आहे. ते आपल्या भक्तांचे नेहमी रक्षण करीत असतात. माझा मुलगा पत्राप्रमाणे मुलाखतीला जाऊन आला. जुलैच्या पहिल्या आठवड्यात दुसरी मुलाखत झाली व मुलगा गुरुपौर्णिमेला आला, तो त्याला नोकरी मिळाल्याची आनंदाची बातमी घेऊन. आम्ही ताबडतोब साईबाबांना पेढे ठेवले व प्रार्थना केली की, बाबा! तुम्ही असेच सदैव आमच्या पाठीशी असा. पहिली मुलाखत होऊन तब्बल ४ महिन्यांनी, म्हणजे ५ ऑगस्टला तो नोकरीवर रुजू झाला. व श्रद्धा–सबुरीचा प्रत्यय आम्हाला आला. ते पत्र मुलांच्या हाती पडले नसते, माझे स्नेही त्या बाजूने गेले नसते व त्यांनी कुतुहलाने मुलांना विचारुन पत्र आमचे नोकराचे हाती दिले नसते, तर माझा मुलगा मुलाखतीला जाऊ शकला नसता व चालून आलेली चांगली नोकरी गमवावी लागली असती. बाबांचे आमच्यांवर अनंत उपकार आहेत. खरोखरच साईतारी त्याला कोण मारी!

# कलियुगातील सार्थ संजीवनी - श्रीसाईनाम

– ॲड. के. के. थिटे
बी. एस्‌सी., बी. एड्., एम्.ए., एलएल्.एम्.
संपादक, साप्ताहिक समाजहितचिंतक,
शिवाजीनगर, पुणे.

दत्तावतार श्री साईबाबांचा महिमा अवर्णनीय आहे. मी गेली आठ वर्षे श्रीसाईभक्ती नित्यनियमाने करीत आहे. मला साईलीलेचे कित्येक विलक्षण व अद्‌भुत अनुभव आले आहेत.

श्री साईबाबांची मनोभावे भक्ती केली तर "शरण मज जो आला, तो वाया नाही गेला" या बाबांच्या वचनाची सार्थता पटल्याशिवाय राहात नाही. बाबांच्या मनन चिंतनातून स्फुरलेल्या विचारांतूनच मी १) न्यायशुल्क २) दिवाणी कायद्याचा वाटाड्या ३) फौजदारी कायद्याचा मार्गदर्शक ४) नोटिसांचे अंतरंग ही कायद्याची पुस्तके लिहिली. त्यापैकी "दिवाणी कायद्याचा वाटाड्या" या पुस्तकाची पुणे

विद्यापीठाने तृतीय वर्ष एल्एल्बी च्या अभ्यासक्रमासाठी संदर्भ ग्रंथ म्हणून वापरावयास शिफारस केली आहे.

माझी श्रीसाईभक्ती जसजशी दृढ होत गेली, तसतसे माझे मनोरथ विनासायास सिद्ध होऊ लागले. बाबांची भक्ती तन-मन-धनाने केल्यास त्या भक्तास किंवा साधकास त्यापासून निश्चितच फायदा होतो, परमार्थ मार्गातील खाचखळगे त्याला समजू-उमजू शकतात. बाबा त्यांची अनन्यभावे भक्ती करणाऱ्यास निश्चितच दु:खमुक्त करतात, त्याचे कल्याण करतात, यात यत्किंचित शंका नाही. बाबांची वचने किती सार्थ आहेत, याचा प्रत्यय त्यांच्या भक्तांनी श्रद्धायुक्त भक्ती करून अनुभवातीत, असे सांगितल्यास त्यात अतिशयोक्ती होणार नाही. म्हणूनच म्हणावेसे वाटते की, हे भक्तिमार्गातील साधकांनो, अजूनही वेळ गेलेली नाही. तुम्ही साईबाबांना शरण जा व आपले कल्याण करून घ्या. नाहीतर जन्ममरणाच्या फेऱ्यात गटांगळ्या खात राहाल व त्यात सुखाच्या हिरवळीऐवजी दु:खच वाट्यास येईल.

# श्री सद्गुरुंचा अनुग्रह

**– श्री. स. व्यं. कुलकर्णी**
एम.ए.
रिटा. ' कलेक्टर,
माळी कॉलनी, कोल्हापूर.

ही घटना सुमारे दोन वर्षा मागील आहे. ती रात्र रविवारची म्हणजे उजाडत्या सोमवारची पहाटे पावणे पाच-पाचची वेळ. नेहमी प्रमाणे मी उठून पुन्हा अंथरुणावर पडलो. यावेळी सहसा झोप लागत नाही. पण त्या दिवशी डोळा लागला असावा.

एका भव्य प्रशस्त व मोठ्या लांबरुंद अशा आश्रमात खास बनविलेल्या सुंदर अशा सिंहासनावर श्रीसद्गुरु विराजमान झालेले होते. अंगावर नेहमीची भरजरी हिरवी चादर व डोक्यावर गहिरा मुकूट होता. श्री आसनावर आलकट पालकट मांडी घालून बसले होते. काही अंतरावर भक्त मंडळींची येजा सुरु होती. श्रींच्या समोर मात्र मी व माझी पत्नी (मृत) असे दोघेच हात जोडून उभे होतो. मी श्रींना साष्टाग दंडवत घालून श्रींचे समोरं बसलो व म्हणालो. "देवा, आपण अशी मांडी घालून बसला तर मी पादसंवाहन कसे करु?" त्यावर श्रींनी दोन्ही पाय जुळवून पुढे केले व मी पादसंवाहन करू लागलो. त्यावेळी माझा आनंद पोटात मावेना, तो डोळ्यांवाटे वाहू लागला. त्याच दिवशी श्री साईलीलेचा अंक आला होता व त्यात श्री. खापर्डे यांचे डायरीतील उल्लेख आठवला. त्यांनी लिहिले होते, "श्रींचे वय इतके झाले तरी पाय किती मऊ व मुलायम आहेत." मला वाटले की, आज ७० वर्षानंतर सुद्धा श्रींचे पाय तितकेच मऊ व मुलायम आहेत. पुढे मी म्हणालो, "देवा

याजन्मी या हाताने या चरणांचे संवाहन करीन, हे केवळ अशक्य कारण आपण समाधी घेतल्यानंतर ४ वर्षांनी मी जन्मास आलो. परंतु देवा तुझी लीला अगाध. हेही तू माझ्या हातून घडवितोस, ही तुझी कृपा अशीच माझ्यावर असूं दे." पुढे म्हणालो, "चांदोरकरांसारख्या महाभागाने–" येथेच श्रींनी माझे वाक्य तोडले व म्हणाले "तो फार चांगला होता रे" मी पुढे बोलू लागलो, "बाबा, आपल्या पोथीत या चरणसंवाहनाचे माहात्म्य"– पुन्हा श्रीबाबांनी एथेच थांबविले व म्हणाले, "पोथी फार चांगली आहे की नी? तू वाचतोस ना?" "होय मी रोज वाचतो." यावेळी लगेच मनात आले, मी श्रींबरोबर खोटे बोलतोय, कारण त्याच दिवशी काही कारणाने मी पोथी वाचली नव्हती. पुढे श्री बोलले "ही पोथी की नी फार चांगली आहे– तू रोज नेमाने वाचीत जा."

यावर मी जागा झालो. बराच वेळ गहिंवर आवरत नव्हता. माझा आवाज ऐकून मुले जागी झाली. त्यांच्या समवेत श्रींची आरती केली. यास कोणी काही म्हणो, मी अनुग्रह साक्षात्कार समजतो.

# साई तारी त्याला कोण मारी

**– श्री. वि. पुं. सवाईकर**
उल्हासनगर, ठाणे.

उल्हासनगर येथील एका दोन खोल्यांच्या भाड्याच्या घरात आम्ही रहात होतो. महिना जून १९८४ चा होता. पाऊस सारखा धो sssधो पडत होता. घरात माझी ३ वर्षे वयाची मुलगी मधल्या खोलीतील पलंगावर थोडा वेळ खेळत होती व पत्नी पुढील खोलीत काम करीत होती. मुलगी सारखी तिच्या आईला म्हणायची, मी पलंगावर खेळणार नाही. परंतु तिच्या आईने तिला बळजबरी बसविण्याचा प्रयत्न केला. तरीही मुलीने हट्टच धरला, मी पलंगावर बसणार नाही. ती बाहेर येते, तोच मधल्या खोलीचे वासे ताड्कन तुटले आणि वरचे छप्पर खाली आले. त्या वेळेस इतक' जोराचा आवाज झाला की, आजूबाजूचे सर्व लोक धावून आले आणि पाहतात तो काय, मधल्या खोलीचे संपूर्ण छप्पर कोसळले आणि ते नेमके पलंगावरच. संपूर्ण पलंग मोडला, ज्या पलंगावर माझी पत्नी मुलीला बळजबरी बसविण्याचा प्रयत्न करीत होती. तात्पर्य हे की, मुलीला साईने बुद्धी दिली की, तू येथून उठ किंवा साईच तिला बाहेर घेऊन गेले. आम्हा दोघांची साईबाबांवर नितांत अपरंपार श्रद्धा आहे आणि म्हणून त्यांनीच आम्हाला ह्या भयंकर प्रसंगातून वाचविले. त्यांचे शतशः आभार.

# साई जयाचे पाठी

– **सौ. श्यामल अरुण पंडित** एम.ए.
आयसोलेशन हॉस्पिटल रोड, कोल्हापूर.

लहानपणापासूनच मला बाबांची भक्ती करण्याची प्रेरणा मिळाली. माझ्या आजोळी बाबांची दगडावर बसलेली प्रतिमा मी पहात असे. पुण्याला स्वारगेटजवळ असलेल्या बाबांच्या मंदिरात दर गुरुवारी माझ्या मामांबरोबर जात असे. तेव्हापासून बाबांविषयी एक आदराची, आपुलकीची भावना निर्माण झाली. पण मध्यंतरी बाबांचा मला थोडा विसर पडला. मी बाबांना काही काळ विसरले. पण त्यांनी मला पुन्हा आपल्याकडे ओढून आणले. आता मात्र आमच्या घरी आम्ही सर्वजण बाबांची भक्ती करतो. संसारातील अनेकप्रश्न, संकटे आणि दु:खे बाबांवरील श्रद्धेमुळे आम्ही सहन करु शकलो. त्यांच्या कृपेची प्रचिती वारंवार आल्याशिवाय रहात नाही. त्यांचे आम्हाला आलेले अनेक अनुभव सांगणे शक्य नाही. पण माझा मुलगा आजारी असताना बाबांना मी बोलले होते, त्याला बरे वाटू दे व नोकरी मिळू दे. त्याप्रमाणे त्यांच्या कृपेने मुलाला बरे वाटले व नोकरीही लागली.

काही दिवसांपूर्वी सायंकाळी मी नेहमीप्रमाणे बाबांची आरती करत होते. आरती संपून रामरक्षा म्हणत असताना पोटातून एक्दम कळ येऊन छातीपर्यंत गेली. अंगाला मुंग्या आल्या, डोळ्यापुढे अंधारी आली. वाटले काहीतरी होणार. बाबांची उदी लावली, प्रार्थना केली व डॉक्टरकडे गेलो. डॉक्टरांनी ब्लडप्रेशर चेक केले, ई.सी.जी. काढला. सर्व काहीं सर्वसाधारण होते. हे सर्व चालू असताना बाबांचे नामस्मरण सतत चालू होते. बाबा आपल्या पाठीशी आहेत, हा एकच विश्वास होता. सर्व रिपोर्ट नॉर्मल आल्यामुळे व डॉक्टरांनी घाबरण्याचे कारण नाही, असे सांगितल्याने बाबांच्या कृपेची आणखी एक प्रचिती आली. साईकृपेने माझी प्रकृती बरी झाली. त्यांच्याच कृपेने मी आज ठीक आहे.

आज पर्यंत बाबांनीच सर्व संभाळले आहे. यापुढेही त्यांची कृपा आमच्यावर व बाबांच्या असंख्य भक्तांवर व्हावी, ही साईचरणी प्रार्थना करते.

# कल्पवृक्षाची सावली

– **सौ. देवयानी चंद्रशेखर जोशी** एम. ए.
बुधवार पेठ, पुणे.

आमच्या घराण्यामध्ये गेली २५-३० वर्षे श्री साईबाबांची सेवा आहे, भक्ती आहे. मी व माझ्या पतींनीही ती परंपरा पुढे चालू ठेवलेली आहे. आणि आजपर्यंत खरोखरीच वेगवेगळ्या संकटातून श्री साईराम आम्हास वाचवीत आलेले आहेत.

आमचा घरचा दुग्धव्यवसाय आहे. माझे पती वकिली व्यवसाय करतात. मागील वर्षी जून-जुलैमध्ये आम्ही खूपच आर्थिक अडचणीत आलो होतो. नित्याचे सर्व व्यवहार चालूच होते, पण पैशाची विवंचना काही सुचू देत नव्हती. शक्यतो गुरुवारी आम्ही पुण्यातील स्वारगेट जवळील श्रीसाईबाबांचे मठात जातो, तसे गेलो होतो. तेथील श्रीसाईभक्त व व्यवस्थापक श्री. लोंबर बंधू हे आम्हास नेहमीच मार्गदर्शन करीत आलेले आहेत. माझ्या पतींनी आपली अडचण त्यांचेजवळ बोलून दाखविली, तेव्हा त्यांनी श्री साईबाबांची उदी दिली व रोज रात्री बाबांचे स्मरण करून आपली अडचण सांगण्यास सांगितले. सात दिवसांनी म्हणजे पुढच्याच गुरुवारी माझ्या पतींना श्रीसाईबाबांनी स्वप्नात दर्शन दिले व द्वारकामाईचे दाराशी उभे राहून प्रवेशद्वारापाशी पणत्या लाव, असे सांगितले.

आम्ही त्याच्या पुढच्याच शुक्रवारी शिर्डीस पोहोचलो व श्रीबाबांनी दाखविलेल्या ठिकाणी तिन्ही सांजेस पणत्या लावल्या, इतर ठिकाणीही लावल्या. बाबांनी दाखविलेल्या ठिकाणी वारा व पाऊस दोन्हीही चालू असूनही त्या पणत्या शांतपणे तेवत होत्या. नंतर दोन दिवस राहून आम्ही पुण्यास परतलो. त्यानंतर आठवड्याचे आतच केलेल्या कामांचे पण बुडती खाती धरले होते,असे पैसे अचानकपणे घरी आले. तसेच काही नवीन कामेही ताबडतोब आली. अशा रीतीने श्रीसाईबाबांनी मदतीसाठी हाक दिल्याबरोबर पंधरा दिवसात संकट निवारण केले. म्हणून श्रीसाई म्हटल्यावर म्हणावेसे वाटते –

श्रीसाई भक्तांची माऊली।
कल्पवृक्षाची सावली।

# साईबाबांची कृपा

**– सौ. स्मिता अणवेकर**
बार्शी, सोलापूर.

मला एक चांगला सुदृढ मुलगा व्हावा, अशी माझी इच्छा होती. मी दर शुक्रवारी साईबाबांचे पुस्तक वाचत असे. माझ्या मनात मुलगा झाला, तर तो शुक्रवारी व्हावा, असे वाटत होते. त्याचप्रमाणे तो शुक्रवारी जन्मला. त्याचे नाव साईश असे ठेवले. दोन आठवड्याने अचानक माझा पाय सुजला. मला चालता येईना. सूज वाढतच गेली. पायाने उभे राहता येईना. डॉक्टर म्हणाले, आता काही ईलाज नाही. पाय काढावा लागेल. रोज त्या पायाला मी साईबाबांची उदी लावू लागले. दीड महिन्यानंतर थोडे चालू लागले. आता तो पाय पूर्ववत बरा झाला आहे.

एप्रिल महिन्यात साईशच्या पायाला मोटर अपघात झाला. पाय सुजला व पायाच्या आत पू झाला. एक्सरे काढले. पायाच्या हाडाला इन्फेक्शन झाले होते. घरात सगळे नाराज झाले. डॉक्टर म्हणाले, ऑपरेशन करावे लागेल. आम्ही साईबाबावर सगळा हरिभार टाकला, आता तूच माझी लाज राख साई. एक्सरे घेऊन माझे पती पुण्याला डॉक्टरकडे गेले. ते म्हणाले की, मुलाला आताच्या आता ताबडतोब घेऊन या. नाराज होऊन ते एका साईभक्ताच्या घरी गेले. त्यांनी सारे काही त्यांना सांगितले. तिने सात दिवसांचे औषध व साईबाबांची उदी दिली. ती घेऊन येताना बाहेर पिंपळाच्या झाडावर बसलेला एक पक्षी ओम् साईराम असे तीन वेळा म्हणाला. औषध घेतल्याने सात दिवसाने माझा मुलगा हळूहळू पाय टेकू लागला. आता तो चांगला पळतो, खेळतो व उड्या देखील मारतो. ही सर्व साईबाबांची लीला नव्हे का?

# साईच आमुचा वाली

**– श्री. महादेव सयाजी देसाई**
चंदनवाडी, मुंबई.

रविवार, २३ नोव्हेंबर १९८६ हा दिवस आठवला की श्री बाबांचे अचाट सामर्थ्य डोळ्यासमोर उभे रहाते. खरोखरच तो दिवस म्हणजे आमच्या आयुष्यातील घातवार ठरणार होता, पण म्हणतात ना, "साई तारी त्याला कोण मारी"

त्याचे असे झाले की त्या दिवशी २३ नोव्हेंबरला आम्ही तिघे मित्र वज्रेश्वरी-गणेशपुरीला जाणार होतो. त्या दिवशी पहाटे मी लवकर उठलो. आंघोळ

आटोपली व अंगाभोवती टॉवेल गुंडाळून स्नानगृहाबाहेर पडणार, तोच कडाडकड असा केवढा तरी मोठा आवाज झाला. जणुकाही बिल्डिंगच कोसळली. पहातो तर काय, आमच्या घरातील भिंतीचे वरच्या बाजूला असलेले भले मोठे लाकडी कपाट कोसळून पडले होते. त्या कपाटात सामानही भरपूर होते. कपाटातील कपडे, पुस्तके, बॅगा व इतर बरेच सामान, तसेच कपाटाच्या दरवाजांच्या फुटलेल्या काचा इतस्ततः विखरुन पडल्या होत्या.

जे कपाट पडले, त्या कपाटाच्या खाली एक मोठी अभ्रय आहे व त्याखाली आमचा देव्हारा आहे. तसेच त्या खाली माझा मोठा भाऊ झोपलेला होता आणि त्याच्या बाजूलाच दोन फुटांवर पलंगावर माझे आई-वडील झोपलेले होते. ते कपाट पडले त्याच्या थोड्याच अंतरावर सिलिंग फॅन व ट्युबलाईट होती. आणि ज्या भिंतीला कपाट होते त्याच्या बाजूला भिंतीला कपाटाखाली श्री बाबांची आशीर्वाद देणारी दुसरी एक मोठी काचेची प्रतिमा लावलेली होती.

ज्या वेळी कपाट पडले, त्यावेळी पहाटे ४.३५ झाले होते. कपाटाखाली माझा मोठा भाऊ व आई-वडील झोपलेले होते, परंतु कपाट अगदी त्यांच्या मधोमध पडले व आई-वडील, भाऊ यापैकी कोणालाही जरासुद्धा लागले नाही. तसेच कपाटापासून जवळच असलेला सिलिंग फॅन व ट्युबलाईट यांचेसुद्धा जराही नुकसान झाले नाही. आणि ज्यावेळी पहाटे ४.३५ ला कपाट पडले त्यावेळी आणखीन केवळ काही क्षणांचाच विलंब झाला नसता, तर माझाही कपाळमोक्ष झाला असता, कारण माझ्या नित्याच्या सवयीप्रमाणे मी स्नान केल्यावर ताबडतोब देवापुढे जाऊन पहिल्या प्रथम देवाला नमस्कार करुन देवावर हळद-पिंजर वहातो. परंतु त्यापूर्वीच केवळ काही क्षण अगोदर कपाट कोसळल्यामुळे मीसुद्धा सहिसलामत राहिलो. अन्यथा माझा कपाळमोक्षच झाला असता, कारण आमचा देव्हारा बरोबर कपाटाच्या खालीच आहे.

खरी कमाल तर पुढेच आहे. कारण जे कपाट पडले त्या कपाटाखाली बाजूच्या भिंतीला असलेल्या साईबाबांच्या मोठ्या तसबिरीचे तुकडे-तुकडे झाले. हाय रे दैवा! खरोखर धन्य धन्य ती माझी साई-माऊली जिने आम्हा सर्वांचे मृत्यू स्वतःवर घेतले आणि आम्हाला मृत्यूच्या दाढेतून वाचविले.

खरोखरच बाबांची लीला अगाध आहे. बाबांनी म्हटलेच आहे की, 'जया मनी जैसा भाव, तया तैसा अनुभव'. आपण जर श्री बाबांची मनोभावे, अंतःकरणपूर्वक भक्ती केली तर आपल्याला कलीकाळाचेही भय उरणार नाही.

श्री बाबांनी आपल्या अचाट सामर्थ्याची एवढी मोठी प्रचिती दाखविल्यानंतर मी मनात कोणत्याही प्रकारची भीती न बाळगता माझ्या पुढील प्रवासाला (गणेशपुरी-वज्रेश्वरी) मित्रांबरोबर आनंदाने निघून गेलो, कारण मला माहीत होते की, श्री बाबा आपल्या सदैव पाठीशी असताना अशी हजारो संकटे आली, तरी त्यांची तमा बाळगण्याचे कारण नाही.

# कळवळ्याचा धांवा ऐकला, साई माझ्या हाकेला पावला

– सौ. लक्ष्मी ना. जाधव
गोरेगाव (पूर्व), मुंबई.

माझी एकुलती एक मुलगी चि. आशालता वय वर्षे १०, एके दिवशी शाळेतून लवकर घरी परत आली, ती रडतच. मी तिला रडण्याचे कारण विचारले असता, तिने स्वतःला थुंकीतून रक्त पडत असल्याचे सांगितले. मी तिचा दात पडला असेल, असे समजून तिला मिठाच्या पाण्याने गुळण्या करायला लावल्या. परंतु एवढे करून देखील तिच्या थुंकीतून रक्त पडणे थांबेना. आता मात्र माझी पाचावर धारण बसली. कारण एका थुंकण्यातच तिचे बरेचसे रक्त जाई. आम्ही सर्वजण फारच घाबरुन गेलो. कारण आता आशाला प्रत्येक ५-१० मिनिटांच्या अंतराने रक्ताची ओकारी येऊ लागली. आम्ही आमच्या डॉक्टरांचे मत घेतले. त्यांनी लगेच औषधोपचार सुरु केले, पण काहीच गुण दिसून येईना. डॉक्टरांनी लगेचच आम्हाला मुंबईतील एका मोठ्या हॉस्पिटलमध्ये आशाला दाखल करण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणे आम्ही आशाला हॉस्पिटलमध्ये दाखल केले.

जवळ-जवळ एक महिन्याचा कालावधी संपत आला. या अवधीत त्या हॉस्पिटलच्या नामांकित तज्ञ अशा डॉक्टरांनी आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा केली, परंतु यश येणे दूरच, साधा फरकही दिसेना. आमच्या तर तोंडचे पाणीच पळाले.

तुम्ही म्हणाल, अनुभवात अजूनपर्यंत बाबांचा उल्लेख कसा नाही? पण साईसच्चरितात म्हटल्याप्रमाणे, जोपर्यंत बाबांना तुमची आठवण होत नाही, तोपर्यंत तुम्ही बाबांचे नसतातच जणू. पण एकदा का बाबांना तुमची आठवण झाली की, मग एखाद्या चिमणीच्या पायात जसा दोर अडकवून आपण अगदी सहजतेने तिला आपल्याकडे खेचतो, अगदी त्याचप्रमाणे बाबा तुम्हाला आपल्या पायापाशी खेचत आणतात. आणि एकदा का पायापर्यंत गेलात, पायावर डोके ठेवलं की, जडला ऋणानुबंध. मग तुम्ही आणि साई केव्हाच विभक्त होऊ शकणार नाही. याचप्रमाणे, बाबांना आमची आठवण झाली असावी. आमच्या चाळीत सौ. मयेकर नावाच्या थोर साईभक्त रहात असत. त्यांच्या भक्तीवर प्रसन्न होऊन स्वतः साई आपल्या पाऊलांच्या कृपेने त्यांच्या घरात वास करुन आहेत. याच थोर साईभक्त रात्री बारा वाजता हॉस्पिटलात आशा झोपलेली असताना आशाच्या स्वप्नात आल्या. त्यांना स्वप्नात पहाताच आशा खाटेवरुन खाली उतरुन झोपेतच हॉस्पिटलच्या दरवाजाकडे धावत सुटली. मी तेव्हा आशाच्या सोबतीला हॉस्पिटलमध्येच रहात असे. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे मी भांबावून गेले. हॉस्पिटलच्या कर्मचाऱ्यांनी आशाला धरले. मी तिला याबद्दल विचारले असता तिने तिच्या स्वप्नात सौ. मयेकर उर्फ काकी आल्याचे सांगितले. मी दुसऱ्या दिवशी लगेचच घरी

येऊन काकींची भेट घेतली. त्याना सर्व परिस्थिती इत्यंभुत कथन केली. त्याही कळवळल्या. त्यांनी लगेच बाबांसमोर गाऱ्हाणे मांडले व म्हणाल्या, हे साईनाथा, एवढा लहानसा जीव कळवळत असताना आपण असे शांत का बसलात? आपणास माझी हीच विनंती की, आपण आशाला लवकरात लवकर बरे करावे. आशा जर लवकर बरी झाली, तर मी स्वत: एक वर्ष पूर्ण होण्याआधी तिला शिरडीस आपल्या पायांपाशी आणीन. मी देखील बाबांना कळकळीने विनविले की, "बाबा, माझी ही एकुलती एक मुलगी आहे. तिला तारणे किंवा मारणे केवळ आपल्याच हाती आहे. तेव्हा साई माझ्या मुलीच्या मरणांतिक वेदना व हाल थांबवा." बस् एवढेच. मला तर एवढेच वाटते की, आम्हा दोघींची ती हाक जरूर बाबांच्या कानावर गेली व बाबा धावून आले, रोगनिवारणासाठी.

काकींनी मला उदी दिली व आशाला पाण्यातून पाजण्यास सांगितले. तसेच एक उदीचे पाकीट तिच्या उशाखाली ठेवावयास दिले. आता आम्ही उदी आणि बाबांवरच भार ठेवला. बाकीची सर्व औषधे व उपाय बंद केले. बाबांनी कृपा केली हळूहळू थुंकण्यातून रक्त पडण्याचे थांबले, ते आतापर्यंत, कायमचेच. आहे की नाही साईलीला.

# श्री साईनी मनीची इच्छा पुरविली

**— श्री. श्याम सुन्दर हेजिब**

बाराबंकी, उत्तर प्रदेश.

आम्हांला आलेले हे अनुभव सन १९८४ चे आहेत. त्यावेळेस आम्ही सपरिवार श्रींच्या दर्शनासाठी शिरडीक्षेत्री गेलो होतो. सायंकाळचे वेळी आम्ही पोचलो व लगेच श्रींच्या दर्शनास गेलो. बरोबर एक शाल श्रींना अर्पण करावयास घेतली. त्यावेळेस मनात ही इच्छा झाली की आपण ही शाल अर्पण केल्यावर श्रींचा कृपाप्रसाद म्हणून परत न्यावी. पण त्यावेळेस आम्हास हे माहीत नव्हते की, अर्पण केलेली शाल आता परत देत नाहीत व शालींचा लिलाव होतो. आम्ही रांगेत उभे असता संस्थानच्या एका व्यक्तीने आम्हास सांगितले की, ही शाल कार्यालयात नोंदवून घ्या. पण मी ज्यावेळेस त्या कार्यालयात गेलो त्यावेळी ते कार्यालय बंद झाले होते व मला सांगण्यात आले की, शाल आता श्रींना आज अर्पण करता येणार नाही, उद्या करावी. आम्ही निराश झालो व रांगेत तसेच उभे राहिलो. ज्यावेळेस आमचा दर्शनाचा नम्बर आला तेव्हा पुजाऱ्याने विचारले की, शालीची नोंदणी केली का?

आम्ही अर्थातच नाही म्हटले. श्रींच्या स्फुरणामुळेच ते आम्हास म्हणाले की, आजकालच्या संस्थानच्या नियमानुसार ही शाल अर्पण करता येणार नाही, पण आम्ही अर्पण करतो व ती तुम्ही परत न्या, कारण शाल आम्हाला ठेवता येणार नाही. आम्ही श्रींच्या किमयेने अगदी भारावून गेलो, कारण ती शाल आम्हाला आमच्या मनाप्रमाणे "प्रसादरुपाने" परत मिळाली होती.

दुसरा अनुभव असा की, श्री शिरडीस सत्यनारायणपूजा करावी, असा आमचा निर्णय पूर्वीपासूनच होता, पण दुसरे दिवशी उशीरा उठल्यामुळे आम्ही तिकिटासाठी सुमारे ७.३० ला रांगेत उभे राहिलो. अर्थातच तिकिट मिळणार नाही, अशी भीती पण वाटत होती. शिरडी क्षेत्राची वारी करणाऱ्यांस माहीतच आहे की, रुद्राभिषेक व श्री सत्यनारायण तिकिटाकरिता केव्हापासून रांग लागते ते. आम्ही विचार करीत होतो की, जर तिकिट मिळाले नाही, तर मनातील इच्छा अपूर्ण राहील कारण दुसरे दिवशी आमचा परतण्याचा बेत होता. पण श्री साईंच्या दरबारी आलेल्याला ते मनातील इच्छा पूर्ण झाल्याशिवाय परत कसे पाठवतील! आम्हांला सत्यनारायणाकरिता तिकिट मिळाले व लगेच श्री सत्यनारायणाची तिकिटे संपली, असा बोर्ड लावण्यात आला. पुन्हा एकदा आम्ही श्रींच्या कृपाशीर्वादाने भारावून गेलो.

तिसरा अनुभव असा की, आमची श्री साईप्रसादगृहामध्ये जेवण्याची फार इच्छा होती. पण शेवटचे तिकिट मिळाले असल्याने पुजेचा नम्बर तर दुपारी १ ते २ या वेळेचा होता व प्रसादगृह तर १.३० ला बंद होणार होते. आम्हांला वाटले की यावेळेस आम्हाला प्रसादाचे भाग्य लाभणार नाही. पण श्री साईंची किमया पहा. मी व सौ. १२ चे सुमारास असेच पूजा कशी होते, हे पहावयास वर गेलो असता, आम्हांला पुजेला बसा म्हणण्यात आले, कारण त्यावेळचे तिकिट घेतलेले एक गृहस्थ वेळेस हजर नव्हते. अर्थातच श्री साईंनी आम्हांकरवी श्री सत्यनारायण पूजा वेळेस करवून प्रसाद सेवन करण्याची संधी दिली. एका पाठोपाठ एक असे आम्हास त्यावेळेस आलेल्या अनुभवांनी आम्ही भारावून गेलो व नकळतच आम्ही श्रींच्या चरणी नतमस्तक झालो.

# शरण मज आला...

– सौ. सोनीया अग्रवाल
नवापूर, धुळे.

माझ्या लहान मुलाला तो ११ महिन्याचा असताना 'डायरिया' झाला. तेव्हा त्याला धुळे येथे नेण्यात आले. काही केल्या उलट्या, जुलाब थांबेनात. आमच्या तोंडचे पाणी पळाले. श्री साईबाबांचा धावा सुरु केला. बाबांचे पुढे धरणे धरले. मुलाला सतत बाबांची उदी लावत राहिले. साईनामाचा जप सुरु केला. मनापासून बाबांची प्रार्थना केली, बाबा! तुम्हीच तारणार आहात. मुलाला लवकर बरे करा. एके दिवशी मुलाची प्रकृती पहिल्यापेक्षा गंभीर झाली. थोड्या थोड्या वेळात बाबांची उदी त्यांच्या तोंडात टाकत राहिले आणि बाबांवर विश्वास टाकला. बाबांनी हाकेला ओ दिली. ६ व्या दिवशी मुलाच्या प्रकृतीस थोडा आराम होत गेला. बाबांच्या कृपेने सर्व ठीक झाले.

# साईकृपा

– श्री. विवेक नारायण ठाकूर
माहिम, मुंबई.

आज मी जे काही लिहायला जिवंत आहे तो बाबांच्या कृपेने.

मी तसं बघायला गेलो तर विज्ञान विषयाचा विद्यार्थी होतो. देवाबद्दल एवढी आत्मियता वाटत नव्हती. निसर्गात घडणाऱ्या प्रत्येक घटनांची शास्त्रीय कारणे लावून मी माझ्या मनाचे शंका निरसन करीत असे. त्यामुळे माझ्याकडे भगवंताबद्दल म्हणावी तशी श्रद्धा नव्हती. नंतर मला बाबांचे अत्यंत ज्वलंत अनुभव आले की, आता माझे सर्व जीवन हे साईमय झालेले आहे.

माझे बी.एससी.चे तृतीय वर्ष होते. माझा अभ्यास व्यवस्थित झालेला होता. पेपर चांगलेच गेले होते. परीक्षेचा निकाल लागायच्या अगोदर मला एका कंपनीमध्ये सुपरवायझरची नोकरी लागली होती. परंतु नियतीच्या मनात काय होते कोण जाणे! मी परीक्षेमध्ये नापास झालो. परीक्षेचा निकाल लागल्यानंतर पंधरा दिवसांनी अशी घटना घडली की, माझे जीवन उध्वस्त झाले. तो दिवस मंगळवार होता. माझी प्रकृती जरा बरी नव्हती म्हणून मी भावाला पाय चेपायला सांगितले. त्यानंतर मी कॉटवर पडून होतो आणि अचानक माझा घसा एकाएकी दुखू लागला. घशाला खाताना त्रास होत नव्हता, पण वेदना सहन होत नव्हत्या. घसा एकदम

दाबल्यासारखे होई. नाक व कपाळावर दाब पडे. आजारपण कमी व्हायची चिन्हे काही दिसत नव्हती. चार पावलं चालणं जमत नव्हतं. ॲलोपथिक, होमीओपथिक, आयुर्वेदीक डॉक्टर झाले, पण फरक काही पडत नव्हता. तरीही माझे मन साईकडे ओढ घेत नव्हते. मी ज्योतिषाकडं बघितलं. त्यांनी ग्रहमान शांत करायला सांगितले. त्याप्रमाणे विधी केले, पण फरक पडला नाही. आता तर मी फार हताश झालेलो. मी देवाकडे मागणं घातलं की, बाबा एक तर मला बरा तरी कर, नाहीतर मरण तरी दे. मी जगण्याची आशाच सोडली होती. वडिलांची कंपनी बंद पडलेली होती. त्या आजारपणात माझ्यासाठी जवळजवळ पंधरा हजार रुपये खर्च झाले. त्या काळात माझ्या वडिलांनी मला फुलासारखे जपले. ज्या वयात मी मदत करायची, त्यावेळी मी घराला कर्जबाजारी करु लागलो होतो. त्यामुळे मला माझे जीवन तुच्छ वाटू लागले. मी आता भगवंताला पूर्णपणे शरण गेलो होतो. मी असाच सकाळी वैतागून बाहेर पडलो तो सरळ बहिणीच्या घरी गेलो. माझी बहिण माटुंग्याला जरीवाला चाळीत राहते. बहिणीने मला त्यांच्या वाडीतील एका साईभक्ताकडे नेले. त्यांना तिथे सर्व बाबा म्हणून हाक मारतात. घरात एक प्रकारची प्रसन्नता वाटत होती. बाबांची तेजस्वी मूर्ती होती. पंधरा ते वीस लोक त्यांच्याकडे आपली गाऱ्हाणी घेऊन आले होते. त्यांनी मला जवळ बोलावले. मी त्यांना व्यवस्थित आजारपणाबद्दल सांगितले. त्यांनी मला बाबांचे नाव घेऊन विभूती दिली. मी तेव्हापर्यंत देवळात गेलेलो, देवाला पाया पडलेलो, परंतु साईबाबांना कधी पाया पडलो नव्हतो. त्या घरात बाबांचा फोटो होता. एका ठिकाणी लिहिलेलं होतं "सबका मालीक एक है।"

मी वडिलांबरोबर घरी गेलो. ती विभूती घसा जिथे दाबला जात होता, तिथे लावली व सांगितल्याप्रमाणे उतारा केला. असेच तीन ते चार दिवस गेल्यावर असा काही चमत्कार घडला की, माझा घसा दुखायचा बंद झाला. जो आजार डॉक्टरी उपायाने बरा होत नव्हता, तो विभूतीने बरा झाला. मी बाबांच्या कृपेने आजारातून बरा झालो.

बाबांची भक्ती करताना श्रद्धा हवी, त्याचबरोबर सबुरीसुद्धा पाहिजे.

मी नंतर बहिणीबरोबर शिरडीला गेलो व बाबांना गाऱ्हाणे घातले की, बाबा मी ह्या परीक्षेला बसतोय, अडचणी दूर कर व यश दे. बाबांच्या कृपेने फारशी तयारी नसतानाही मी चांगल्या मार्कांनी पास झालो.

# साईबाबांनी वाचविले

**श्री. विनोद कोटावार**
आदिलाबाद, आंध्रप्रदेश.

मी दि. १० डिसेंबर १९८६ ला बाबांच्या दर्शनासाठी आदिलाबादहून रेल्वेने सकाळी निघालो. सोबत माझा मित्र व एक कॉन्ट्रॅक्टर पण होते. रात्री १२ वा. शिर्डीस पोहोचलो. दर्शन झाले नाही. सकाळी म्हणजे ११ डिसेंबरला अभिषेक केला. ज्यावेळी मी श्री. बाबांना फुलांचा हार घालून नमस्कार करण्यास वाकलो, त्यावेळी एकदम माझ्या उजव्या डोळ्यास बाबांचा उजवा पाय लागला. पुन्हा मी नमस्कार केला. पण मनात शंका उत्पन्न झाली, माझ्याने काहीतरी चूक झाली असेल म्हणून मला बाबांनी दूर लोटले. नंतर मी चार वाजता पुन्हा बाबांना हार घातला व बाहेर येऊंन उभा राहिलो. माझ्या मित्राने मला एक हार आणून दिला व म्हणाला, मी बाबांच्या दर्शनासाठी गेलो असता, पुजाऱ्याने दोन हार दिले. काय चमत्कार! मी जो हार बाबांना घातला तोच हार मला परत आला. आता तर माझ्या मनात एकच गोष्ट घुटमळत होती, नक्कीच बाबा माझ्यावर रागावलेले दिसतात. नंतर आम्ही रात्रौ रेल्वेने परत आदिलाबादला आलो. माझी नोकरी उटनूरला असल्याकारणाने मी उटनूरला गेलो. थोड्याच दिवसात म्हणजे ८ जानेवारीला मला स्कूटरसाठी ॲडव्हांस मंजूर झाले होते. मी माझा मित्र करीमनगर येथे स्कूटर आणण्यासाठी १० जानेवारीला सकाळी गेलो. स्कूटर शोरुम मधून घेतली व परत निघालो. सायंकाळचे ६ वाजत होते. एका हॉटेलात उतरलो. पुन्हा प्रवास सुरु. आकाश थोडे ढगाळलेले होते. परंतु त्याकडे दुर्लक्ष करुन आमचा प्रवास चालूच होता. पण ५–६ कि.मी. आलो असू नसू एकदम पावसाला सुरवात झली. आम्ही ओलेचिंब झालो. पुढचे काहीच दिसत नव्हते. आम्ही परत त्याच हॉटेलमध्ये येऊंन स्कूटर तिथेच ठेवली, आणि बसने उटनूरला आलो. सकाळी मी जाऊन स्कूटर आणली. तो दिवस म्हणजे ११ जानेवारी, बरोबर एक महिना. हा दिवस म्हणजे माझा पुनर्जन्म! मी ह्याच दिवशी उटनूर ते आदिलाबादला स्कूटर घेऊन निघालो ३५ कि.मी. अंतर मागे पडले. आता फक्त १५ कि.मी. अंतर शिल्लक होते एकाएकी काय झालं बाबांस माहीत, मी स्कूटरवरुन खाली पडलो. मी शुद्धीवर नव्हतो. मला एका माणसाने उचलले. रस्त्याच्या बाजूला खाली झोपविले. तिथे आदल्या दिवशी पावसाने साचलेले पाणी होते. त्याच्याजवळ असलेला टॉवेल त्याने माझ्या तोंडात टाकले. स्कूटर उचलून बाजूला ठेवली. माझे तोंड, हात पाय रक्ताने माखलेले होते. मी शुद्धीवर येईपर्यंत त्याने दोन तीन बसेसना थांबविण्याचा प्रयत्न पण केला. पण व्यर्थ! जेव्हा मी शुद्धीवर आलो, माझे मलाच कळले नाही, काय झाले ते. माझ्या बोटात बाबांची अंगठी आहे. त्याच्याकडे मी पाहिले. बस! अचानक एक मोटार सायकलस्वार येऊन माझ्या जवळ थांबला. मी त्याला जवळच्या

रुग्णालयात नेण्यास सांगितले. तो फक्त चला, एवढा एकच शब्द बोलला. मी मोटार सायकलवर बसलो. १० कि.मी. पुन्हा मागेच आलो. त्याने मला दवाखान्यासमोर नेऊन उतरविले आणि लगेच निघूनही गेला. ती व्यक्ती कोण होती? बाबांनीच त्याला पाठविले असेल. डॉक्टरांनी तात्पुरता इलाज केला, व म्हणाले, आदिलाबादला गेल्यावर टाके बसवून घ्या, जखम फार आहे. मी त्यांच्याकडे आरसा मागितला. त्यांनी तर नकार दिला, पण माझ्या आग्रहामुळे घरात जाऊन त्यांनी आरसा आणून दिला. त्यात मी पाहतो तर काय, बाबांच पाय माझ्या ज्या डोळ्यांस लागला, नेमके त्याच ठिकाणी १ ते १। इंच लांब खाच पडली होती, आणि डोळ्याच्या खालच्या बाजूला चिंचेच्या दाणाएवढा खड्डा पडला होता. मला एकदम घडलेला प्रसंग व तारीख आठवली. लगेच बाबांचे स्मरण केले व दवाखान्याबाहेर आलो. बससाठी बस स्थानकाकडे वळलो. पुन्हा बाबांनी माझ्यावर उपकार केले. आमच्याकडची एक जीप येऊन माझ्याजवळ थांबली. आणि त्याच्यात बसून आदिलाबादला आलो. दवाखान्यात जाऊन सर्जनला दाखविले. त्यांनी तपासणी केली. फ्रॅक्चर वगैरे काहीच झाले नाही, पण चार पाच ठिकाणी मार लागला होता. त्यांनी भुवईवर व डोळ्याखाली एकूण सात टाके लावले. आणि मी तेवढ्या मोठ्या जखमेवर बाबांची उदी टाकीत होतो. फक्त आठच दिवसात माझी जखम भरुन निघाली. मी स्वस्थ झालो. मी दर दोन दिवसांनी त्या रस्त्यावरुन जातो, तेव्हा मला तेच दृश्य दिसते. त्या भयंकर घोर प्रसंगातून बाबांनीच मला वाचविले.

# बाबांनी वाचवले

**– सौ. स्नेहलता म. धामणकर**
गुहागर, रत्नागिरी.

माझी बहिण माझ्या घरी आली होती. त्यावेळी लाईट गेला होता. ती भाजी चिरत असताना विंचवाने दंश केला. ती इतकी घायाळ झाली होती की, तिच्या जीवाची तिला खात्री नव्हती की, यातून ती जगेल म्हणून. ती स्वतःच्या मुलांची आठवण काढून म्हणायला लागली की, माझ्या मुलांचं आता काय होईल? तरी मी व माझ्या मुलाने तिला धीर देऊन औषधोपचार सुरु केले, पण आम्हाला माहीत होते की, आम्ही किती औषधे केली तरी आमचे कृपाळू साई शिवाय आधार नाही.

आम्ही आमच्या साईबाबांवर भरोसा ठेवून विंचू दंश झालेल्या भागावर बाबांची विंभूती लावली व तिला पाण्यातून पिण्यास दिली. त्याबरोबर तिला लगेच शांतता लाभली व दुसऱ्या दिवशी तिची तब्येत पूर्णपणे बरी झाली.

# श्री साईकृपेने दृष्टी परत आली

**– सौ. वैशाली हिंदळेकर**
दादर (प.), मुंबई.

माझ्या वडिलांच्या डोळ्यातील मोतीबिंदूच्या शस्त्रक्रियेच्या वेळी घडलेला हा चमत्कार. दोन वर्षापूर्वीची गोष्ट. एका सुप्रसिद्ध डॉक्टराकडे माझ्या वडिलांच्या डोळ्यातील मोतीबिंदूची शस्त्रक्रिया ठरली. परंतु त्यांच्या देखरेखीखाली त्यांच्या शिकाऊ डॉक्टरने ती शस्त्रक्रिया केली. शस्त्रक्रिया व्यवस्थित पार पडली. वडिलांना रुग्णालयातून घरीपण आणले. डोळ्यावरची पट्टी सोडण्यास अजून १०/१२ दिवसांचा अवधी होता. तोपर्यंत औषध व गोळ्या चालूच होत्या. पट्टी सोडल्यानंतर अधुन मधून ड्रेसिंगसाठी जावे लागत असे. अशा तऱ्हेने दोन महिने गेले परंतु त्यांना स्पष्ट दिसत नव्हते. डोळ्यासमोर पूर्ण अंधार दिसत आहे, असे ते सांगत. आम्हाला त्यांची शस्त्रक्रिया यशस्वी झाली की नाही, याबद्दल शंका येऊ लागली.

अखेर एक दिवस डॉक्टरांनी आपल्या दादर येथील कन्सल्टिंग रुममध्ये, जेथे अत्याधुनिक उपकरणे आहेत, त्या मशीनवर डोळ्याची तपासणी केली. परंतु त्यांच्या चेहऱ्यावरील निराश भाव पाहून आम्ही घाबरुन गेलो. त्यांनी आम्हाला सांगितले की, आता यांना दिसण्याची शक्यता फारच कमी आहे. हे ऐकून आम्ही गर्भगळीतच झालो. परंतु आम्हा पती-पत्नीची साईबाबांवर पूर्ण श्रद्धा असल्यामुळे, आम्ही सर्व भार बाबांवर टाकला. घरी आल्यावर श्री साईबाबांच्या मूर्तीसमोर हात जोडून बाबांना मनःपूर्वक प्रार्थना केली की, या म्हातारपणी जर त्यांना दिसेनासे झाले, तर त्यांचे हाल किती होतील? ते स्वतःची कामे स्वतः कसे करु शकतील? ते आता पर्यंत तुमची पोथी वाचत होते, ते आता दृष्टीशिवाय कसे वाचू शकतील? तेव्हा तुम्हीच त्यांना पोथी वाचण्यासाठी दृष्टी द्या. तुमच्या शिवाय त्यांना दृष्टी कोण देणार, अशी प्रार्थना करुन, आम्ही सर्व भार त्यांच्यावरच टाकला.

दुसऱ्या दिवशीची गोष्ट. सकाळी श्री बाबांच्या फोटोला माझे पती हार घालीत होते. त्यावेळी माझ्या वडिलांनी त्यांना हाक मारुन सांगितले की, मला साईबाबांचा फोटो दिसत आहे. तेव्हा त्यांनी वडिलांच्या डोळ्यासमोर एक, दोन, तीन अशी अनुक्रमे बोटे दाखवून विचारले, तर त्यांनी बरोबर आकडे सांगितले. संध्याकाळी त्यांना डॉक्टरांकडे नेले. डॉक्टरांनी सुद्धा त्यांची पुन्हा परीक्षा घेऊन आश्चर्य व्यक्त केले. त्यांनी "काय चमत्कार आहे" असे उद्गार काढले. आम्ही हा चमत्कार श्री साईबाबांनीच केला असल्याचे त्यांना सांगितले. आता ते दररोज श्री साईबाबांची पोथी नियमाने वाचतात. दृष्टी हिनांना दृष्टी देणाऱ्या श्री साईनाथाला आमचे कोटी कोटी प्रणाम!

# वडिलांच्या श्राद्धदिनी बाबांचा उदीप्रसाद

- श्री. मधुसूदन गोपाळ सावंत
एम्.ए., बी.एड्.
मुलुंड (पूर्व), मुंबई.

गेली सुमारे आठ वर्षे आमच्या मुलुंडच्या ब्लॉकचे काम रखडलेले होते, ते यंदाच श्रीसाईकृपेने पूर्ण झाले व आम्ही कुटुंबिय आमच्या नवीन वास्तूत मुलुंड येथे रहावयास आलो.

पितृपक्षात नवमीला माझ्या वडिलांची श्राद्ध तिथी असते. यंदा त्यांच्या पुण्याईने नव्या प्रशस्त जागेचे आमचे स्वप्न साकार झाले. त्यामुळे नवमीला पद्धतशीरपणे ब्राह्मण बोलावून महालयाचा कार्यक्रम आप्तमंडळीस बोलावून मी आयोजित केला. कार्यक्रम आयोजित करताना आलेल्या अडचणी श्री बाबांच्या इच्छेने दूर झाल्या.

तत्पूर्वी यंदाच्या श्रावण महिन्यात आमच्या नवीन ब्लॉकमध्ये श्रीसाईसच्चरिताचे पारायण मी पूर्ण केले व श्रीसाईसंस्थान, शिरडी येथे २१ रु. दक्षिणा मनिऑर्डरने पाठवून दिली. परंतु त्या पैशांची पावती मला बरेच दिवस पोष्टातून आली नव्हती. त्यानंतर काही दिवसांनी अकलूज, जि. सोलापूर येथील संकल्पित साईमंदिराच्या निधीसाठी तेथील ट्रस्टने श्रीसाईनाथांचे दहा रंगीत आकर्षक फोटो प्रत्येकी १० रु.नी विकण्यासाठी माझ्या नावे पोष्टाने पाठविले. श्रीसाईसच्चरिताच्या पारायणानंतर श्रीसाईंचे हे सुंदर फोटो माझ्याकडे येणे, हा मला श्री बाबांचा अनुग्रहच वाटला व मन आनंदाने भरुन आले. दोन फोटो माझ्या संग्रही ठेवून व आठ मित्रमंडळींना विकत घ्यायला लावून फोटोंची किंमत १०० रुपये अकलूजच्या ट्रस्टला मनिऑर्डरने मी पाठवून दिले.

बुधवार ता. १६ सप्टेंबर, नवमीला आयोजित केल्याप्रमाणे माझ्या पूज्य वडिलांच्या श्राद्धनिमित्त पिंडदान इ. विधी आटोपल्यावर आमच्या जेवणाच्या पंक्ती बसावयाच्या होत्या. इतक्यात बरेच दिवस पोष्टात खोळंबून राहिलेली मनिऑर्डरची पावती शिरडीसंस्थानकडून श्रीसाईंच्या उदी व प्रसादासह पोष्टमनने झोलीत टाकली. आश्चर्य म्हणजे अकलूज ट्रस्टकडची मनिऑर्डरपावतीही सोबतच होती! महिन्यापेक्षा अधिककाळ पोष्टात रखडलेली पावती उदी-प्रसादासह कै. आबांच्या श्राद्धदिनी नेमकी आली, हे पाहून आमच्याकडील कार्याला श्री बाबांनी आशीर्वाद दिला, असे मनोमन वाटले व डोळ्यात आनंदाश्रू आले.

# मागे पुढे उभा राही सांभाळीत

**– सौ. अमिता कानडे**
दादर (प.), मुंबई.

देव तरी कैसा विलक्षण । सौख्य भोग त्या एकही क्षण । आपले होऊ ने दी स्मरण । नवल विंदान । मग तयाच्याचि जै येई मना । संकटे परंपरा धाडितों नाना । करवून घेई आपल्या स्मरणा । "नारायणा धांव" म्हणवी ॥

वरील ओळी "साईसच्चरित" मधून घेतल्या आहेत. परमेश्वर आपले स्मरण संकट पाठवून करुन देतो. मी चातुर्मासात व्यंकटेश स्तोत्र वाचण्याचा नियम घेतला होता. याच काळात मी एक दिवशी बहिणीकडे बोरीवलीला गेले. रात्री व्यंकटेश स्तोत्र वाचायचे राहून गेले. झोपल्यावर थोड्या वेळाने दाढ ठणकायला लागली, तेव्हा व्यंकटेश स्तोत्राची आठवण झाली. व्यंकटेश स्तोत्र म्हटल्यावर, वेळेला ३–४ गोळ्या घेऊन न थांबणारी दाढ एका गोळीत जादू सारखी थांबली आणि साईबाबांच्या कृपेने नियमात खंड पडला नाही.

गोष्ट शिर्डी मुक्कामाची आहे. चार दिवस राहायचे, या विचाराने आम्ही (मी, माझे पती, मुलगा, सासू-सासरे) शिर्डीला गेलो. माझा मुलगा लहान असल्यामुळे नेहमी लागणारी सर्व औषधे बरोबर घेतली होती.

एक दिवस राहिल्यावर संध्याकाळी माझ्या मुलाचा एक डोळा लाल होऊन दुखायला लागला. दर दोन मिनिटांनी डोळ्यात खुपतंय, आग होतेय, म्हणत तो रडत होता. मला काय करावे कळेना? कारण डोळे येण्यावर कोणतेच औषध माझ्याकडे नव्हते. त्या दोन तासात मला आपल्याला लौकर घरी परतावे लागणार, असे वाटले. पण शेवटी रात्री विचार केला की, बाबांची इच्छा काय असेल त्याप्रमाणे होईल. म्हणून रात्री शेजारतीच्या अगोदर मी द्वारकामाईत गेले. तेथील उदी घेऊन कपिलच्या डोळ्यांना लावली आणि बाबांना म्हटले, मला शिरडीत २-४ दिवस राहून आपली सेवा करायची आहे. कपिलचा डोळा बरा झाला, तरच हे शक्य आहे. आपण तेवढी कृपा करुन, त्याचा डोळा लवकर बरा करावा, असे म्हणून मी समाधी मंदिरात गेले. रात्रीची आरती चालू होती. आरती संपेपर्यंत मुलाला घेऊन मी तिथेच उभी राहिले. कपिल मधून मधून डोळा ठणकत आहे, म्हणून रडतच होता. त्याला मी सांगितले की, बाप्पा तुझा डोळा बरा करणार. आणि आरती होईपर्यंत तेथे मी थांबले. आरती संपण्याच्या अगोदर माझा मुलगा मला म्हणाला, आई, बाप्पांनी माझा डोळा बरा केला. आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे, ४–५ तास सतत रडणारा मुलगा रात्री अगदी आरामात झोपला सुद्धा.

असे एक ना अनेक वेळा उदीमुळे आलेले आजार बरे झाले आहेत.

# माझे दक्षिणादान आणि त्याचे फळ

– ले. कर्नल मु. ब. निंबाळकर (निवृत्त)
बंड गार्डन रोड, पुणे.

बाबा देहधारी असताना दर्शनाला आलेल्या माणसांकडून दक्षिणा मागत असत, हे सर्व साईभक्तांना ठाऊकच आहे. त्यावेळी काही लोकांना जरी बाबांची ही सवय त्रासदायक वाटली तरी बरेच भक्त की ज्यांनी बाबांचे महानत्त्व ओळखले होते ते असल्या मागण्याने स्वतःला धन्य मानीत असत आणि ती मागणी कितीही अडचणीत आणणारी असली तरी आनंदाने पुरी करीत असत.

बाबांना स्वतःला पैशाची जरूर नव्हती. पोटासाठी भिक्षा मिळतच होती. चिलमीच्या तंबाखूसाठी किंवा धुनीच्या फाट्यांसाठी थोडेसे पैसे पुरे होते. परंतु बाबा तर भक्तांकडून एकेवेळी ५०-१०० रुपयेही मागत असत. बाबांनी स्वतःच या मागणीचे कारण सांगितले आहे:–

मी काय कोणाचे घेईना फुकट। मागे न मी सर्वांसरसकट।
फकीर जयासी दावी बोट। तयासींच गोष्ट दक्षिणेची ॥१३०॥
तोही फकीर जयाचा ऋणी। तयासींच ही करी मागणी।
दाता देऊनि करी पेरणी। पुढे संवगणी करावया ॥१३१॥

– अध्याय ३५

हेमाडपंतांनीही बाबांच्या दक्षिणेची मीमांसा करताना आणखी सांगितले आहे की, बाबा दक्षिणा मागून भक्तांचा पैशाचा लोभ काढून टाकून त्यांची चित्तशुद्धी घडवून आणीत असत:–

तरी लोभप्रधान नर। लोभगर्तेतून काढावया वर।
भक्तहितेच्छा ओढवी कर। कृपासागर साईनाथ ॥१४२॥
हे तो सर्व प्राकृत भक्त। सर्वथैव प्रपंचासक्त।
दक्षिणादाने शुध्दचित्त। व्हावेत हे मनोगत बाबांचे ॥१३४॥

– अध्याय १४

एवढेच नव्हे तर पुढे हळूहळू भक्तांचे वैराग्य वाढवून त्यांना भक्तिज्ञान प्रदान करण्याची बाबांची ही युक्ती होती, असे हेमाडपंतांनी श्रुतीचा आधार सांगून व प्रजापतींनी आपल्या देव, दानव व मानव अपत्यांना केलेल्या एकाक्षर 'द'च्या उपदेशाची कथा सांगून वाचकांना आणखी पटविलेली आहे.

'यज्ञेन दानेन तपसा' ही श्रुति। आत्मज्ञानोत्सुकाप्रती।
दक्षिणाप्रदान साधन युक्ती स्पष्ट वचनोक्ति सांगते ॥१३५॥
भक्त स्वार्थी वा परमार्थी। दोघांसी व्हावी इष्टप्राप्ति।
तरी दक्षिणा निजगुरुप्रती। निजहितार्थी द्यावी की ॥१३६॥
प्रजापतीही देवा दैत्या। मानवांसकट तीन अपत्यां।

ब्रह्मचर्यवास संपता। उपदेश मागतां हेचि वदे ॥ १३७॥

— अध्याय १४

भक्तिज्ञानवैराग्यहीन। ऐसा जो भक्त तो अति दीन।
तयास प्रथम वैराग्यी स्थापून। भक्तिज्ञान मग देती ॥ १३७॥
करविती जे दक्षिणाप्रदान। तीच वैराग्याची खूण।
पुढे भक्तिपंथास लावून। ज्ञानप्रवीण करवीत ॥ १३८॥

— अध्याय ३५

हे सर्व श्रीसाईसच्चरितात नेहमी वाचून मला वाटावयास लागले की आपण किती अभागी? आपणाला आता असे भाग्य कसे मिळेल? बाबा आपणाजवळ दक्षिणा कशी मागणार आणि आपण ती देऊन आपले प्रापंचिक व पारमार्थिक कल्याण कसे साधून घेणार?

पुढे विचार करता करता याबद्दल मला काही उपाय सुचले व माझी खालील कार्यवाही तयार झाली —

१) शिरडीस गेल्यावर तेथे किंवा श्रीसाईसच्चरिताचा सप्ताह केल्यावर येथून श्रीबाबांच्या चरणी मी यथाशक्ती दक्षिणा ठेवत पाठवत होतोच. आता एखादी आनंदाची घटना कुटुंबात घडली किंवा स्वतःला अकल्पित विशेष धनप्राप्ती झाली तर बाबांसाठी शिरडीस त्यातील काही रक्कम पाठवू लागलो.

२) दक्षिणेप्रमाणे अन्नदानाचे महत्त्व बाबांनी उपदेशाने व कृतीने भक्तांना वारंवार पटविले होतेः—

आल्या गेल्याचा आदर करी। तृषितां जल भुकेल्या भाकरी।
उघड्यास वस्त्र बसाया ओसरी। देता श्रीहरि तुष्टेल ॥ १४९॥

— अध्याय १९

हल्लीच्या काळात यासाठी योग्य याचक शोधणे जड जाते. पूर्वीप्रमाणे ब्राह्मण पूजेला किंवा श्राद्धतिथीला शिधा येऊन घेऊन जाण्यास तयार नसतात आणि सच्छील व निर्लोभी ब्राह्मणही सापडत नाही. फ्लॅटपद्धतीमुळे दारावर अन्नासाठी अतिथी भिकारी येऊ शकत नाही. एखाद्यामंदिरात जमलेल्या भिकाऱ्यांना अन्नदान वस्त्रदान करावयाला जावे तर आरडाओरड व दंगा करून अंगाला इतके झोंबतात की सर्व टाकून पळून जाण्याची पाळी येते. म्हणून मी मार्ग काढला की काही उत्तम कारभार असलेल्या अंधशाळा, अपंगगृहे, अनाथाश्रम (मदर टेरेसांसारख्यांच्या) शोधून काढून त्यांना कै. वडिलांच्या व मातोश्रींच्या श्राद्धदिवशी व कुटुंबांतील आनंदाच्या प्रसंगी प्रेरणा होईल तेव्हा यथाशक्ती देणग्या पाठवू लागलो.

३) वरील कृतीला एक मात्र अपवाद अनुभवाने आचरला गेला. घरातून निघताना किंवा एखाद्यामहत्वाच्या कामाला जाताना वाटेत पहिला भिकारी भेटेल त्याला मी काही तरी भीक हमखास देऊ लागलो. अनुभवाने असे पटले की तो अपात्र वाटल्यावरून जर मी भीक नाकारली तर माझे कार्य यशस्वी होत नसे. म्हणून मी

त्याला बाबाच आले आहेत असे समजून १०-२० पैसे देत आलो व माझे कार्य हमखास यशस्वी होऊ लागले.

४) गेली ६-७ वर्षे मी श्रीसाईलीला (मराठी व इंग्रजी), श्रीसाईप्रसाद, भालचंद्र, रोहिणी वगैरे मासिकात श्रीसाईबाबांवर व इतर आध्यात्मिक आणि सामाजिक विषयांवर सातत्याने लिहित असतो. मानधनाची अपेक्षा नाही परंतु लेखन साहित्याचा व पोस्टाचा झालेला खर्च छंदाकरिता म्हणून वगळला तरी ज्ञानार्जनासाठी ग्रंथ विकत घेण्यास विशेष खर्च होऊ लागला. पण पुढे पुढे माझ्या लक्षात येऊ लागले की ज्ञानार्जन करून ते आपण साईभक्तांना समजावून सांगण्याचा प्रयत्न करतो म्हणजे ही साईसेवाच नाही का? मग हा सर्व खर्च म्हणजे साईबाबांना अर्पण केलेली दक्षिणाच नाही का? असे विचार आल्यावर मी १००-२०० रुपयांचे ग्रंथही खुषीने विकत घेऊ लागलो.

वरील सर्व कार्यवाही जसजशी कृतीत येत गेली तसतसे मला जाणवू लागले की माझे मन समाधानाच्या अवर्णनीय आनंदात तरंगू लागले, धनाचा लोभ हळूहळू कमी होऊ लागला आणि आश्चर्य म्हणजे या सर्व कार्यांसाठी पैसाही कोठून तरी येऊ लागला. दिवसेंदिवस माझ्या देणग्यांची दानाची रक्कम आपोआप वाढत गेली आणि त्यांना दिलेल्या दक्षिणेबद्दल बाबांनी वारंवार उच्चारलेले शब्द पटले:-

''दक्षिणेलागीं ज्याने मजला। असेल एक रुपया दिधला।.
दशगुणें मज तया मोबदला। द्यावा लागला मोजून ।। १२९।।

— अध्याय ३५

करी जो मज जीव की प्राण। ऐसी याचीच मज वाण।
तो देता मज एक गुण। देतो मी शतगुण तयासी ।। ९५।।

— अध्याय १४

याला पुष्टी म्हणून मला आलेले दोन अनुभव खाली देत आहे.

कित्येक वर्षांपूर्वी शिरडी येथे बाबांची पंचधातूची मूर्ती मी खरेदी केलेली आहे. तिच्यावर रोज पुरुषसूक्ताने, अष्टोत्तरशतनामावलीने व महिम्नस्तोत्राने मी अभिषेक करीत असतो. २६ मार्च १९८२ च्या गुढीपाडव्या आधी एक वर्षापासून माझ्या मनात तीव्र इच्छा होती की या मूर्तीला शिरडीसारखाच सोन्याचा मुकुट करून घ्यावा. दोन तीन वेळा पुण्यातील प्रसिद्ध सराफ गाडगीळ यांचेकडे जाण्याचा प्रयत्न केला. परंतु प्रत्येक वेळी दुकान बंद सापडले. नंतर कळले की सर्वच दागिन्याचे दुकानदार संपावर होते - सरकारने सोन्याच्या दागिन्यावर विक्रीकर अवाजवी रीतीने वाढविला होता म्हणून. शेवटी कंटाळून मला वाटले की बाबांना माझा विचार पसंत नसावा. त्यांना अंगावर आपल्या फाटक्या कफनीची आणि डोक्यावर मळक्या फडक्याचीच गोडी - म्हणून मी नाद सोडला तरी पण मनात खुटखुट राहिलीच. पैशाकरिता तर आपण या बहाण्याने आपली अशी समजूत करून घेतली तर नसेल ना? मला आठवले:-

सद्वृत्तीची उठतां लहर। तीच निर्धारीं वाढवावी ॥ १६४॥
त्याच वृत्तीचा परिपोष। होतां होईल अति संतोष।
बुद्धिही पावेल विकास। होईल मनास प्रसन्नता ॥ १६५॥

— अध्याय १९

मग यावर्षी (१९८२) पुन्हा प्रयत्न करण्याचे ठरविले. १२ मार्च, गुरुवार रोजी गाडगीळांकडे गेलो आणि काय आश्चर्य! ते (दाजीसाहेब) म्हणाले, पुढच्या गुरुवारी १९ तारखेस तुम्ही या. मी कारागीराला बोलावून ठेवतो. १९ तारखेस मी गेल्यावर कारागीर भेटला व स्वतःचे दुकानावर घेऊन गेला. तेथे त्याचा कामगार होता. त्याला मी आपली मूर्ती आणि श्रीसाईलीलेवरचे बाबांचे मुकुटासह चित्र दाखविल्याबरोबर त्याने अत्यंत आनंदाने व उत्साहाने चटकन् मुकुटाचे डिझाईन काढून दाखविले. समोर शोभेसाठी लाल खडा बसविण्याची सूचना केली आणि पुढच्या गुरुवारच्या आत तयार करुन देतो म्हणाला. खरोखरीच बुधवारी (ता. २५) मी पुन्हा गेलो तेव्हा मुकुट तयार होता आणि त्याने तो मूर्तीवर नीट बसवूनही दिला. (त्यानंतर हा कामगार शोधूनही पुन्हा मला भेटला नाही.)

आता सोन्याचा प्रश्न आला. मुकुटाचे वजन १ ग्रॅम ९०० मिलीग्रॅम झाले. माझेजवळ कै. मातोश्रींची बांगडी होती.ती मोडून एवढे सोने द्यावयाचे मी ठरविले होते. पण सौभाग्यवतीने आपली स्वतःची आंगठी मोडावयाची सूचना केली. आंगठीचे वजन केले तेव्हा मोती फुकट जाऊन सोन्याची घट वजा करून २ ग्रॅम (म्हणजे जवळजवळ मुकुटाच्या वजना एवढेच) सोने होईल, असे तो कारागीर म्हणाला. मजुरी वेगळी, परंतु इतक्यात त्याला काय बुद्धी झाली कोण जाणे त्याने ती हातात घालून पाहिली आणि त्याला ती आवडली. "मी स्वतःच ही विकत घेतो व ३ ग्रॅम सोने (१ ग्रॅम जास्त) तुम्हाला देतो" असे तो म्हणाला. मला खरेच वाटेना. मी लगेच कबूल झालो आणि दुसऱ्या दिवशी गुढीपाडवा आणि गुरुवार असल्याने त्या दिवशी मुकुट न्यावयाचे ठरविले.

दुसऱ्या दिवशी गाडगीळांकडे गेलो आणि त्यांना तयार मुकुट व कारागीराने सौभाग्यवतीच्या आंगठीबद्दल दिलेले सोने दाखविले. त्यांनी सर्व वस्तूंचे वजन करून हिशोब केला आणि मला १ ग्रॅम सोन्याची नवी वेढणी तर दिलीच पण २ ग्रॅमातील शिल्लक राहिलेल्या १०० मिलीग्रॅम सोन्याची किंमत १६ रुपये ५० पैसे झाली. त्यातून मजुरीचे फक्त १० रुपये कापून घेऊन उलट मला रु. ६-५० परत दिले. बाबांनी किती छान तऱ्हेने मला खर्च तर नाही, उलट गुढीपाडव्याचे दिवशी १ ग्रॅम सोन्याची वेढणी आणि वर रु. ६-५० बक्षिस देऊन रामनवमीला (२ एप्रिलला) त्यांना सोन्याचा मुकुट चढविण्यांची माझी कित्येक दिवसांची हौस पुरी केली!!

माझा दुसरा अनुभव साहित्य प्रकाशनाचा आहे. शिरडी येथे बाबांच्या आरतीच्या वेळी म्हटले जाणाऱ्या संस्कृत भाषेतील "श्रीसाईनाथ महिम्न स्तोत्रम्"चे मी केलेले इंग्रजी भाषांतर गरखल (हिमाचल प्रदेश) येथून निघणाऱ्या "साई महिमा" या त्रैमासिकाच्या जून १९८४ अंकात प्रसिद्ध झाले होते. ते फार आवडल्यावरुन मुंबईच्या एका छापखान्याच्या मालकानें माझी परवानगी घेऊन ३००० प्रती छापून शिरडी येथे भक्तांना वाटण्यासाठी ठेवल्या. त्यावरुन मलाही कल्पना सुचली की आपणही असे काहीतरी स्वखर्चाने करावे. म्हणून मी "श्रीसाईबाबांचीच भक्ती का करावी याची ११ कारणे" हे पत्रक तयार केले व छापून घेण्याचे ठरविले. माझ्या एका ओळखीच्या छापखान्याच्या संचालकाला ते दाखविले आणि १००० प्रतीबद्दल खर्चाचा अंदाज विचारला. त्यांनी ते फक्त कागद व छपाई याचाच खर्च लावून नफा न घेता छापून देऊ म्हणाले. माझ्या इच्छेप्रमाणे बाबांच्या चित्राचा ब्लॉकही करुन देण्याचे त्यांनी कबुल केले. आश्चर्य म्हणजे छापखाना माझ्या घरापासून बराच दूर असूनही त्यांनी रिक्षाने येऊन प्रूफ तर दाखविलेच पण पुन्हा येऊन सर्व प्रतीही अगदी वेळेवर आणून दिल्या, आणि मी जेव्हा बील मागितले तर ते म्हणाले "काही नाही. ही सर्व आमची साईचरणी सेवा". झाले माझा थोडा फार खर्च करण्याचा मनोदय तसाच राहिला!

पुढे बडोद्यास गेलो असताना हेच पत्रक गुजराती भाषेत छापून बडोदे, सुरत व अहमदाबाद येथील साईमंदिरात वाटण्याची मला इच्छा झाली, परंतु तेथेही तोच अनुभव. छापखान्याच्या मालकाने पैसे घ्यावयाचे नाकारले. पुढे काही दिवसांनी श्रीसाईसच्चरितातून 'गुरु'बद्दल सर्व ओव्या निवडून काढून मी स्वत:करिता २५७ ओव्यांची 'गुरुगीता' तयार केली होती ती प्रकाशित करण्याचे ठरविले. मागे मी तयार केलेली "अष्टोत्तरशत नामावली, श्रीसाईनाथ महिम्नस्तोत्र व मंत्रपुष्पांजली" ही पुस्तिका संस्थानकडून छापण्यास खूपच विलंब झालेला होता. म्हणून ही "श्रीगुरुगीता" छापण्याची योजना धाडसाची व खर्चाची असूनही मी हाती घेण्याचे ठरविले. २००० प्रतीसाठी रु. २७००/- खर्च होणार होता. माझी आर्थिक परिस्थिती चांगली असली तरी सतत महागाई वाढणाऱ्या काळात एका निवृत्त सरकारी कर्मचाऱ्यास (त्यातल्या त्यात अर्धी पेन्शन अंश राशी केलेल्यास) ही रक्कम स्वत: एकदम खर्च करणे जरा अवघडच होते, परंतु बाबांच्या कार्यासाठी माझे मन सहज तयार झाले. बाबांच्या कृपेने वेळेवर ती रक्कम जमवताही आली आणि जानेवारी १९८६ मध्ये या पुस्तिकेचे प्रकाशनही झाले. प्रती विकताना नफा मिळविण्याचा हेतू नव्हताच म्हणून किंमत फक्त २ रुपये ठेवली आणि मी व सौभाग्यवतीने स्वत: काही उत्साही साईभक्तांच्या मदतीने काही प्रती शिरडी, पुणे व इतर ठिकाणी मंदिरात बसून विकल्या. मी खर्चलेल्यापैकी १००० रुपये परतही मिळाले. परंतु पुढे राहिलेली रक्कम परत मिळविण्याची इच्छाही नष्ट झाली आणि फक्त प्रचार करण्याचेच ध्येय बाकी राहिले. पैसे परत मिळाले तर मिळाले, नाही तर नाही. काही निवडक

साईभक्तांना फुकट भेटही देण्यास सुरुवात केली आणि बाबांनी चमत्कार केला. या वर्षाच्या (१९८७) सुरवातीला कल्पना नसताना केन्द्र सरकारकडून अंशराशी (commute) केलेली माझी अर्धी पेन्शन दरमहा परत मिळू लागली आणि थकबाकीचे रु. ७०००/- जमा झाले. थोड्या दिवसांनी पुन्हा फोर्थ पे कमिशनच्या रिपोर्टवरुन. सरकारने माझ्या पेन्शनमध्ये आणि महागाई भत्त्यात दरमहा भरघोस वाढ केली आणि आणखी रु. ४००० थकबाकीचे मला मिळाले. तसे पाहिले तर केन्द्र सरकारच्या सर्वच निवृत्त कर्मचाऱ्यांना हा लाभ मिळाला. परंतु मला हा लाभ मी बाबांच्या कार्यासाठी रु. २७००/- खर्च केल्यानंतर बरोबर एका वर्षानेच त्याचे चौपट रक्कम (११०००) माझे पदरी पडून दरमहा पेन्शनमध्ये रुपये पाचशेच्यावर वाढ झाली हा माझ्यावरचा बाबांचा खास अनुग्रहच मी मानतो.

सेवा कधीही जाई ना व्यर्थ।
पुरवील तो स्वार्थ आणि परमार्थ ॥ १५॥

— अध्याय ४५

# साई समर्थ

— सौ. रश्मी मदन सावंत
गोरेगाव (प.), मुंबई.

नित्य मी जिवंत जाणा हेची सत्य, नित्य घ्या प्रचिती अनुभवे ।
जरी हे शरीर गेलो मी टाकून तरी मी धावेन भक्तांसाठी ॥

खरोखर बाबांच्या ह्या वचनात एखाद्याचे संपूर्ण आयुष्यच बदलून टाकणारा चमत्कार आहे. तसे माझे आतापर्यंतचे आयुष्य अनेक अडीअडचणींवर मात करण्यातच गेले आहे. देवाचे अस्तित्व मानत होते, परंतु देव तत्परतेने भक्ताच्या हाकेला कसा धाऊन येतो, ह्याचा अनुभव नव्हता. त्यामुळे जीवनाविषयी अतिशय निराशामय दृष्टीकोन झाला होता. त्यातच १९८७च्या फेब्रुवारी महिन्यात माझ्या सव्वा पाच वर्षाच्या एकुलत्या एका मुलाचे आजारपण सुरु झाले आणि अतिशय कठीण प्रसंगांची मालिकाच सुरु झाली. सुरुवातीस तो खेळताना पडू लागला, परंतु खेळताना मुलांचे पडणे म्हणजे तो एक खेळण्याचाच भाग असतो, असे आम्ही समजत होतो. नंतर तो चालताना पडू लागला. नंतर तर त्याला घरातल्या घरातसुद्धा चालायला जमेना, तो अतिशय अशक्त दिसू लागला. त्याचे खेळणे, हसणे, बोलणे, खाणे-पिणे कमी कमी होऊ लागले. शेवटी शेवटी तर बसवल्यावर सुद्धा लहान मुलासारखा तोल जाऊन पडू लागला. तेव्हा आम्ही घाबरुन त्याला

माझा दुसरा अनुभव साहित्य प्रकाशनाचा आहे. शिरडी येथे बाबांच्या आरतीच्या वेळी म्हटले जाणाऱ्या संस्कृत भाषेतील "श्रीसाईनाथ महिम्न स्तोत्रम्"चे मी केलेले इंग्रजी भाषांतर गरखल (हिमाचल प्रदेश) येथून निघणाऱ्या "साई महिमा" या त्रैमासिकाच्या जून १९८४ अंकात प्रसिद्ध झाले होते. ते फार आवडल्यावरून मुंबईच्या एका छापखान्याच्या मालकानें माझी परवानगी घेऊन ३००० प्रती छापून शिरडी येथे भक्तांना वाटण्यासाठी ठेवल्या. त्यावरुन मलाही कल्पना सुचली की आपणही असे काहीतरी स्वखर्चाने करावे. म्हणून मी "श्रीसाईबाबांचीच भक्ती का करावी याची ११ कारणे" हे पत्रक तयार केले व छापून घेण्याचे ठरविले. माझ्या एका ओळखीच्या छापखान्याच्या संचालकाला ते दाखविले आणि १००० प्रतीबद्दल खर्चाचा अंदाज विचारला. त्यांनी ते फक्त कागद व छपाई याचाच खर्च लावून नफा न घेता छापून देऊ म्हणाले. माझ्या इच्छेप्रमाणे बाबांच्या चित्राचा ब्लॉकही करून देण्याचे त्यांनी कबुल केले. आश्चर्य म्हणजे छापखाना माझ्या घरापासून बराच दूर असूनही त्यांनी रिक्षाने येऊन प्रूफ तर दाखविलेच पण पुन्हा येऊन सर्व प्रतीही अगदी वेळेवर आणून दिल्या, आणि मी जेव्हा बील मागितले तर ते म्हणाले "काही नाही. ही सर्व आमची साईचरणी सेवा" झाले माझा थोडा फार खर्च करण्याचा मनोदय तसाच राहिला!

पुढे बडोद्यास गेलो असताना हेच पत्रक गुजराती भाषेत छापून बडोदे, सुरत व अहमदाबाद येथील साईमंदिरात वाटण्याची मला इच्छा झाली, परंतु तेथेही तोच अनुभव. छापखान्याच्या मालकाने पैसे घ्यावयाचे नाकारले. पुढे काही दिवसांनी श्रीसाईसच्चरितातून 'गुरु'बद्दल सर्व ओव्या निवडून काढून मी स्वतःकरिता २५७ ओव्यांची 'गुरुगीता' तयार केली होती ती प्रकाशित करण्याचे ठरविले. मागे मी तयार केलेली "अष्टोत्तरशत नामावली, श्रीसाईनाथ महिम्नस्तोत्र व मंत्रपुष्पांजली" ही पुस्तिका संस्थानकडून छापण्यास खूपच विलंब झालेला होता. म्हणून ही "श्रीगुरुगीता" छापण्याची योजना धाडसाची व खर्चाची असूनही मी हाती घेण्याचे ठरविले. २००० प्रतीसाठी रु. २७००/- खर्च होणार होता. माझी आर्थिक परिस्थिती चांगली असली तरी सतत महागाई वाढणाऱ्या काळात एका निवृत्त सरकारी कर्मचाऱ्यास (त्यातल्या त्यात अर्धी पेन्शन अंश राशी केलेल्यास) ही रक्कम स्वतः एकदम खर्च करणे जरा अवघडच होते, परंतु बाबांच्या कार्यासाठी माझे मन सहज तयार झाले. बाबांच्या कृपेने वेळेवर ती रक्कम जमवताही आली आणि जानेवारी १९८६ मध्ये या पुस्तिकेचे प्रकाशनही झाले. प्रती विकताना नफा मिळविण्याचा हेतू नव्हताच म्हणून किंमत फक्त २ रुपये ठेवली आणि मी व सौभाग्यवतीने स्वतः काही उत्साही साईभक्तांच्या मदतीने काही प्रती शिरडी, पुणे व इतर ठिकाणी मंदिरात बसून विकल्या. मी खर्चलेल्यापैकी १००० रुपये परतही मिळाले. परंतु पुढे राहिलेली रक्कम परत मिळविण्याची इच्छाही नष्ट झाली आणि फक्त प्रचार करण्याचेच ध्येय बाकी राहिले. पैसे परत मिळाले तर मिळाले, नाही तर नाही. काही निवडक

साईभक्तांना फुकट भेटही देण्यास सुरुवात केली आणि बाबांनी चमत्कार केला. या वर्षाच्या (१९८७) सुरवातीला कल्पना नसताना केन्द्र सरकारकडून अंशराशी (commute) केलेली माझी अर्धी पेन्शन दरमहा परत मिळू लागली आणि थकबाकीचे रु. ७०००/- जमा झाले. थोड्या दिवसांनी पुन्हा फोर्थ पे कमिशनच्या रिपोर्टवरुन. सरकारने माझ्या पेन्शनमध्ये आणि महागाई भत्त्यात दरमहा भरघोस वाढ केली आणि आणखी रु. ४००० थकबाकीचे मला मिळाले. तसे पाहिले तर केन्द्र सरकारच्या सर्वच निवृत्त कर्मचाऱ्यांना हा लाभ मिळाला. परंतु मला हा लाभ मी बाबांच्या कार्यासाठी रु. २७००/- खर्च केल्यानंतर बरोबर एका वर्षानेच त्याचे चौपट रक्कम (११०००) माझे पदरी पडून दरमहा पेन्शनमध्ये रुपये पाचशेच्यावर वाढ झाली हा माझ्यावरचा बाबांचा खास अनुग्रहच मी मानतो.

सेवा कधीही जाई ना व्यर्थ।
पुरवील तो स्वार्थ आणि परमार्थ ॥ १५॥

— अध्याय ४५

# साई समर्थ

— सौ. रश्मी मदन सावंत
गोरेगाव (प.), मुंबई

नित्य मी जिवंत जाणा हेची सत्य, नित्य घ्या प्रचिती अनुभवे ।
जरी हे शरीर गेलो मी टाकून तरी मी धावेन भक्तांसाठी ॥

खरोखर बाबांच्या ह्या वचनात एखाद्याचे संपूर्ण आयुष्यच बदलून टाकणारा चमत्कार आहे. तसे माझे आतापर्यंतचे आयुष्य अनेक अडीअडचणींवर मात करण्यातच गेले आहे. देवाचे अस्तित्व मानत होते, परंतु देव तत्परतेने भक्ताच्या हाकेला कसा धाऊन येतो, ह्याचा अनुभव नव्हता. त्यामुळे जीवनाविषयी अतिशय निराशामय दृष्टीकोन झाला होता. त्यातच १९८७च्या फेब्रुवारी महिन्यात माझ्या सव्वा पाच वर्षाच्या एकुलत्या एका मुलाचे आजारपण सुरु झाले आणि अतिशय कठीण प्रसंगांची मालिकाच सुरु झाली. सुरुवातीस तो खेळताना पडू लागला, परंतु खेळताना मुलांचे पडणे म्हणजे तो एक खेळण्याचाच भाग असतो, असे आम्ही समजत होतो. नंतर तो चालताना पडू लागला. नंतर तर त्याला घरातल्या घरातसुद्धा चालायला जमेना, तो अतिशय अशक्त दिसू लागला. त्याचे खेळणे, हसणे, बोलणे, खाणे-पिणे कमी कमी होऊ लागले. शेवटी शेवटी तर बसवल्यावर सुद्धा लहान मुलासारखा तोल जाऊन पडू लागला. तेव्हा आम्ही घाबरुन त्याला

ताबडतोब बालरोगतज्ञ डॉक्टरांकडे घेऊन गेली. डॉ. अतिशय हुशार असल्यामुळे त्यांनी ताबडतोब अंदाजे निदान करुन सांगितले की, ह्याच्या लहान मेंदूमध्ये (जो सर्व शरीराचे संतुलन करतो) काहीतरी बिघाड झाला असावा. तेव्हा त्यांनी तातडीने Brain Scanning करण्यास सांगितले. ताबडतोब दुसऱ्या दिवशी सकाळी त्याचे Brain Scanning केले व संध्याकाळी मालाडच्या मनिषा नर्सिंग होममध्ये त्याला दाखल केले. कारण Scanning मध्ये त्याच्या छोट्या मेंदूखाली एक गाठ होती आणि ती T.B.ची असल्याचे डॉक्टरांनी इतर सर्व तपासण्यांवरुन नक्की करुन त्याला T.B.ची सर्व औषधे चालू केली. दिवसाला एक इंजेक्शन, २/३ प्रकारची औषधे आणि ९ ते १० गोळ्या, असा दोन महिन्यांचा उपचार चालू केला. दहा दिवस हॉस्पिटलमध्ये राहून नंतर घरी आलो, परंतु औषधे तितकीच चालू होती. बिचारा अतिशय कंटाळून गेला, त्या औषधांना, इन्जेक्शनना आणि गोळ्यांना. थोडासा फरक पडला, पण पूर्णपणे मोकळा चालू फिरु शकत नव्हता. पॅरॅलिसीस झाल्याप्रमाणे त्याचा उजवा पाय, उजवा हात शक्तीहीन झाले व चेहऱ्याची डावी बाजू डोळा, तोंड, नाक वगैरे वाकडे झाले होते. त्यामुळे एकंदर त्याच्याकडे पाहून काळजीच वाटत होती. त्यामुळे मी सर्वार्थाने निराश झाले होते.

तसे पाहता माहेरी लहानपणापासून बाबांची रोज पूजा अर्चा होत असे. वडील अत्यंत धार्मिक. परंतु साधारण ७१ साला पासून माहेरच्या दुर्दैवाच्या फेऱ्याला सुरुवात झाली आणि परिस्थिती अशी होत गेली की, हळूहळू त्याच वेळेस साईबाबांची भक्ती करणेपण कमी कमी होऊ लागले, आणि आम्ही एकाकीपणे नशिबाच्या फेऱ्यात भरडले गेलो. माझ्या लग्नानंतर (१९८१) इथे सासरच्या देव्हाऱ्यात बाबांची तसवीर असूनसुद्धा कधी मनोभावे हात जोडण्याचीसुद्धा इच्छा झाली नाही. तसेच घरी येणाऱ्या साईलीला मासिकालासुद्धा हात लावावासा वाटला नाही. परंतु मार्च महिन्याच्या (१९८७) शेवटी आमच्या सोसायटीतील सर्वांनी स्वतंत्र बस ठरवून एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यात शिर्डीला जाण्याचे ठरवले. ताबडतोब घरातील ४ जण जाण्यास तयार झाले. परंतु मुलगा पूर्णपणे बरा झालेला नव्हता. त्या सबबीवर मी जाण्याचा विचारसुद्धा केला नव्हता. परंतु विचार करण्यास महिन्याचा अवधी होता आणि अकस्मात सुमारे दोन आठवड्यांनी एके संध्याकाळी सर्वजण गप्पा करत असताना, मनात आले की घरातील सासूबाई व इतर ३–४ जण आहेत, सर्व शेजारील ओळखीचीच माणसे आहेत व मुलाचा औषधांचा कोर्ससुद्धा योगायोगाने जाण्याच्या दिवसापर्यंतच संपत होता व तब्येतसुद्धा साधारण सुधारत होती, तेव्हा त्याला घेऊन बाबांकडे जायचेच आणि तोच क्षण माझे सर्व आयुष्य बदलून टाकणारा सोन्याचा क्षण ठरला. कारण त्या क्षणापासून बाबांच्या दर्शनाची ओढच लागून राहिली. बस प्रवास झेपणार नाही म्हणून आधी नकार देणाऱ्या माझ्या पतीलासुद्धा येण्यास जमले. ता. २५–४–८७ रोजी आम्ही

मुलासह बाबांच्याशिरडीला सुखरुप पोहोचलो आणि बाबांचे डोळे भरुन दर्शन घेतले. सर्व क्लेश, दुःख पार पळाले. बाबांच्या कृपेने दुसऱ्या दिवशी सकाळी अभिषेक घालण्यास तसेच सत्यनारायणाची पूजा घालण्याससुद्धा हे तयार झाले, तेव्हा आनंदाने माझे मन भरुन आले. संध्याकाळी शिरडी सोडताना मात्र डोळ्यांतील अश्रूंना खंड नव्हता. मुलाला प्रवासाचा अजिबात त्रास झाला नाही, नंतर त्याची प्रकृतीसुद्धा सुधारल्योसारखी वाटली.

आणि इकडे माहेरच्या घरची परिस्थिती भयंकरच बिकट झाली. ७२ वर्षांचे वडील काविळीने अत्यंत आजारी आणि ३९ वर्षांचा (गेली पंधरा वर्षांपासून) मनोरुग्ण असलेला माझा एकुलता एक मोठा भाऊ, की ज्याला आता आणखी एखादा दिवससुद्धा घरात ठेवणे अत्यंत धोक्याचे होते. तेव्हा मेच्या मध्यावर त्याला ठाण्याच्या मेंटल हॉस्पिटलमध्ये नव्याने ॲडमिट करण्यासाठी मी केलेली सकाळी धडपड आणि त्यावेळेस अपरिचित अशा लोकांनी मला बहीण मानून केलेली अनमोल मदत ह्यात निश्चित बाबांचा हात होता. त्यानंतर लगेच पुढील आठवड्यात (ता. २१–५–८७), वडील अतिशय सिरीयस झाले व त्यांना तातडीने हॉस्पिटलमध्ये दाखल करावे लागले. त्यावेळी सुद्धा ज्या प्रकारे बाबांनी माझी पाठराखण केली व त्या महाकठीण प्रसंगांना तोंड देण्याची हिम्मत दिली, ते पाहून बाबा आपल्या भक्तांच्या अल्पभक्तीनेसुद्धा त्यांच्या आर्त हाकेला कसे धाऊन येतात व आपल्या वचनाची साक्ष पटवतात, ह्याचा अजब साक्षात्कार झाला. काविळीमुळे वडिलांच्या लीव्हरला भयंकर सूज आली होती आणि त्यांच्या मुळच्या अशक्त प्रकृतीमुळे आणि मुलाच्या मानसिक त्रासामुळे, ते सर्व त्यांच्या सहनशक्ती पलिकडचे होते. प्रकृती खालावतच गेली आणि २७.५.८७ रोजी डॉक्टरांनी मला स्पष्टच सांगितले, ते कदाचित उद्याचा दिवस पाहू शकणार नाहीत. ता. २७ म्हणजे वैशाख महिन्याची अमावास्या होती. तेव्हा माझ्या वडिलांसारख्या अत्यंत धार्मिक माणसाला अशा दिवशी मृत्यू येऊ नये, असे वाटत होते. तोंडाने कायम बाबांचा धावा चालूच होता. अखेरीस त्याच दिवशी रात्री १० वाजून ३० मिनिटांनी त्यांची प्राणज्योत मालवली. परंतु बाबांच्या आधारामुळे पोरकेपणा जाणवला नाही. आणि चमत्कार म्हणजे मागाहून काही दिवसांनी भटजींकडून समजले की, वडील गेले, त्या वेळे आधी सुमारे पावणे दोन तास आधी अमावास्या संपून प्रतिपदा सुरु झाली होती. अत्यंत शुभ तिथीला माझे वडील साईचरणी विलीन झाले होते. बाबांच्या ह्या अजब लीलेला काय म्हणू!

ह्या भावाच्या आणि वडिलांच्या धावपळीमध्येच १५ मे रोजी माझ्या मुलाच्या अंगावर कांजण्या दिसू लागल्या. त्या इतक्या की शरीरावरचा १/२ इंच भागसुद्धा मोकळा नव्हता. त्यामुळे परत त्याला अशक्तपणा आला. इथे मुलाचे आजारपण व माहेरी कर्ते माणूस दुसरे कोणी नाही, फक्त ६० वर्षांची म्हातारी आई व एक लहान

बहीण. त्यामुळे वडिलांच्या मृत्यूनंतरची सर्व जबाबदारीची कामे पार पाडणे, ही माझी बरीच तारेवरची कसरत झाली. मुलाला पुन्हा Balancing Problem झाला. परत डॉक्टरकडे खेपा मारल्या. त्यांच्या म्हणण्यानुसार कांजण्यांमुळे गाठीच्या जागी परत सूज आली असावी. ती कमी करण्यास परत नवीन गोळ्या-औषधे. दरम्यान मुंबईतील ह्या विषयात श्रेष्ठ समजल्या जाणाऱ्या तीन डॉक्टरांचे मत घेतले. सर्वांनी सांगितले की, बाहेरील औषधानेच व्यवस्थित होईल. जून महिन्यात कसाबसा तीन दिवसच शाळेत गेला परंतु अतिशयच अशक्त झाला. औषधे तर चालू होती पण प्रकृतीमात्र बिघडत चालली होती. परत शाळा बंद झाली. जुलैच्या शेवटी त्याची अतिशय दुखणारी, खराब झालेली दाढ काढण्याचे निमित्त झाले. उलट्या सुरु झाल्या. तोंडातून अखंड लाल गळू लागली. खाणेपिणे बंद झाल्यातच जमा झाले. लघवी-संडाससुद्धा बंद व्हायची वेळ आली. संपूर्ण दिवस ग्लानीतच पडून राहिला. त्यामुळे ४–८–८७ रोजी डॉक्टरकडे नेले असता, त्यांनी त्याची परिस्थिती पाहून त्याला परत हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यास सांगितले. तेव्हा रात्री साडेदहा वाजता त्याला हॉस्पिटलमध्ये दाखल केले. त्याला गिळण्यास त्रास होत होता व पोटात काहीच नव्हते, त्यामुळे त्याला नाकातून नळी घालून थोडे दूध दिले व औषधे दिली. हॉस्पिटलच्या नियमामुळे आम्ही दोघे रात्री थांबू शकत नव्हतो, म्हणून मी थांबले व माझे पती रात्री साडे अकराला घरी निघून आले. सुमारे बाराच्या सुमारास सिस्टरने Oxygen Cylinder आणला आणि मी भयंकर घाबरले व घरुन ह्यांना परत बोलावण्यासाठी विचारु लागले. सिस्टरने तशी काही आवश्यकता नाही, असे सांगितले. तेव्हा मी एकटीच त्यांच्याजवळ बसून राहिले. ती रात्र भयाण काळरात्र असेल, ह्याची कल्पनाच नव्हती. पहाटे सव्वा-तीनच्या सुमारास त्याचा श्वासोच्छवास एकदम मंद होऊन, त्याला एक मोठी उलटी झाली. त्याने डोळे पूर्ण फिरविले. हात पाय वाकडे केले. हात पाय संपूर्ण थंड आणि काळे निळे पडले होते आणि ओठ पांढरे फटक. दोनतीन मिनिटाच्या अंतराने त्याला परत परत काळपट मातीच्या रंगाच्या उलट्या होऊ लागल्या आणि हृदय जवळ जवळ बंदच पडले होते. ते पाहून मी गर्भगळीतच झाले. आकांताने बाबांचा धावा चालू केला. ताबडतोब रात्रपाळीचे दोन शिकाऊ डॉक्टर्स आणि एक सिस्टर ह्यांनी धावपळ करुन वेगवेगळी साधने आणून त्याचे Heart pumping करुन पुन्हा चालू केले. डॉक्टरांनी घाबरुन मला घरुन सर्व माणसांना बोलावण्यास सांगितले. महत्प्रयासाने फोन लागला. घरुन कोणी येईपर्यंत माझ्या मनाची काय अवस्था झाली असेल, त्यांची सर्वांना चांगलीच कल्पना आली असेल. परंतु बाबा माझ्या सोबतीला आहेतच, असे सारखे वाटत होते. दरम्यान त्या दोन डॉक्टरांच्यासुद्धा तोंडचे पाणी पळाले होते. त्यांनी मुख्य डॉक्टरांना फोन करुन विचारले असता, त्यांनी ताबडतोब पेशंटला मोठ्या हॉस्पिटलला हलविण्यास सांगितले. परंतु अशा अवेळी ती सोय होईपर्यंत वेळ लागणारच. दरम्यान माझे पती आणि मोठे दीर आले.

त्यांनी ताबडतोब औषधे आणण्याची व्यवस्था केली. पुन्हा एकदा पम्पींग करावे लागले. डॉक्टरांना काहीच आशा उरली नाही. फटाफट इंजेक्शन वगैरे दिली. माझे पती मन घट्ट करुन, काहीही निकाल लागेल, तो सहन करण्याची तयारी ठेव वगैरे सांगू लागले. परंतु माझ्या मनाच्या अगदी आतल्या कप्प्यात पुरेपूर खात्री होती की, असे वाईट काहीच घडणार नाही. तेवढ्यात तो शुद्धीवर आला. डोळे उघडून बघू लागला. वडिलांना, काकांना पाहून हाका मारु लागला. तेव्हा आम्ही सर्व चकीतच झालो. डॉक्टरसुद्धा चक्रावून गेले. जो मुलगा ५–१० मिनिटांपूर्वी जन्ममृत्यूच्या सीमारेषेवर होता, तो इतका व्यवस्थित शुद्धीवर येऊन हाका मारु शकतो, हा एक चमत्कारच होता. त्या रात्री मी माझ्या डोळ्यासमोर मृत्यूला माघारी फिरताना पाहिले. खरोखर बाबांच्या आशीर्वादापुढे कळीकाळालाही काहीही करता येत नाही, हा अतिशय अजब साक्षात्कार झाला आणि मी पूर्णपणे निर्धास्त झाले.

त्यानंतर त्याला कायम ऑक्सिजनवर ठेवण्यात आले. त्याच्या योग्य इलाजासाठी तातडीने मोठ्या सुसज्ज हॉस्पिटलमध्ये हलविणे आवश्यक होते. तेव्हा शुक्रवार ता. ७.८.८७ रोजी त्याला ॲम्ब्युलन्समध्ये घालून प्रथम माटुंगा येथील नॅशनल हॉस्पिटल येथे आले व तेथे त्याचे Brain Scanning करुन पुढे दुपारी १.३० ते २ च्या सुमारास हरकिसनदास हॉस्पिटलमध्ये बाबांच्या सोबतीने दाखल झालो. बाबांच्या कृपेचा योगायोग पहा. ताबडतोब २.३०च्या सुमारास आम्हाला हवे असलेले डॉ. वेंगसरकर, न्यूरोसर्जन देखील ताबडतोब भेटले. त्यांनी सर्व जुने केस पेपर्स व त्याच दिवशी सकाळी काढलेल्या C.T. Scan च्या फिल्म्स् (रिपोर्टस् आलेलेच नव्हते) पाहून तातडीने दुसऱ्याच दिवशी माझ्या मुलाचे डोक्याचे ऑपरेशन करण्याचा निर्णय घेतला. परंतु डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार ती गाठ अतिशय आतल्या बाजूला होती व ती ते पूर्ण काढू शकले नसते. तसा प्रयत्न केला तर मेंदूसारख्या नाजूक भागातील कुठलाही भाग व त्यायोगे शरीराचा कुठलाही भाग किंवा कार्य कायमचे बिघडून गेले असते. तेव्हा फक्त बायोप्सीसाठीच ऑपरेशन करण्याचे ठरले.

शनिवारी दुपारी (ता. ८–८–८७) १.३० च्या सुमारास अत्यंत गलीतगात्र झालेल्या माझ्या मुलाला त्यांनी ऑ. थि. मध्ये नेले. सारखे माझ्या डोळ्यासमोर असे दिसत होते की तो ऑपरेशन टेबलवर आहे. आजूबाजूला डॉक्टर्स, सिस्टर्स व त्याच्या मस्तकापाशी आपल्या आशीर्वादाचा शुभहस्त कायम त्याच्या मस्तकी ठेऊन शांत मुद्रेने बाबा उभे आहेत. ह्यावेळी बाबा आपल्या लीलेचा चमत्कार दाखवतीलच, असा विश्वास मनात होता. त्यामुळे जी गाठ काढण्यास डॉक्टरसुद्धा खुद्द घाबरत होते, त्यांनी त्याचा ७५ टक्के भाग यशस्वीरित्या बाहेर काढला. निव्वळ साकळलेले रक्तच होते, ट्यूमर नाही. इतक्या मोठ्या ऑपरेशनमध्ये त्याला रक्त

देण्याचीसुद्धा जरुरत लागली नाही. आणि आश्चर्य म्हणजे, संध्याकाळी सातच्या सुमारास त्याला स्ट्रेचवरुन बाहेर आणत असतानाच, मला त्याच्या बाजूला उभी असलेली पाहून त्याने डोळे उघडून 'आई' म्हणून हाक मारली. तेव्हा माझ्या डोळ्यांतून घळाघळा अश्रू वाहू लागले. गंमत म्हणजे ऑपरेशन पूर्वी त्याच्या गळ्यात घातलेली साईबाबांची छोटी पुतळी (मानेच्या जागी ऑपरेशन असल्यामुळे दोरी कापलेली) त्याच्या स्ट्रेचरवरच त्याच्या डोक्याजवळच व्यवस्थित ठेवलेली होती. (जी ऑपरेशनच्या गडबडीत कुठेही गहाळ होऊ शकली असती). म्हणजे बाबांनीच त्याला सुखरुप ऑ. थि. बाहेर आणल्याची ती ग्वाही होती. तेथून त्याला ICU मध्ये ताबडतोब नेण्यात आले.

ICU मध्ये अतिशय गंभीर अवस्थेतील, वेगवेगळ्या मोठमोठ्या वैद्यकीय उपकरणांना नळ्यांच्या सहाय्याने जोडलेले प्रौढ पेशंट व त्यात माझा हा पावणेसहा वर्षांचा मुलगा एका नाकपुडीत ऑक्सिजनची नळी, दुसरीत फिडींग पाईप, हाताला सलाईन, युरीन पाईप, छातीवर कार्डियोग्रामच्या तीन पिन्स्, डोक्याला मानेच्या बाजूला मोठ्ठे बँडेज, जेथे असह्य वेदना अशा अवस्थेत वेळोवेळी दिली जाणारी औषधे आणि इंजेक्शन्स वगैरे जे काही त्याने सहन केले, तेव्हा नक्कीच त्याच्या शरीरात बाबांचे वास्तव्य होते. व त्यांनीच त्या छोट्या जीवाला सर्व शांतपणे, अजिबात तक्रार न करता, न चिडता, न रागावता सहन करण्याची शक्ती दिली, ह्याबाबत दुमत नाही. तो लहान असल्यामुळे मला किंवा त्याच्या वडिलांना कायम त्याच्याजवळ बसण्याची परवानगी ICU च्या स्टाफने दिली. त्यामुळे कायम त्याच्या कपाळी उदी लावणे, मुखात घालणे, बाबांची पुस्तके वाचणे, त्याला गोष्टी सांगून रिझवणे करीत दिवस घालवू लागले. त्याला जरुर पडेल म्हणून आणलेले प्रचंड मशीन बाबांच्या कृपेने परत घेऊन जावे लागले. तेव्हा डॉ. सुद्धा चकीत झाले. त्याची सुधारणा तर फारच झपाट्याने होऊ लागली. तो व्यवस्थित शुद्धीवर येऊन बोलू लागला. ७–८ दिवसांनी हळूहळू त्याच्या सर्व नळ्या वगैरे काढून टाकल्या. तो हळूहळू खाऊ पिऊ लागला.

परंतु Pathalogical Laboratory मधून अजून Biopsy चा रिपोर्ट आला नव्हता. तोपर्यंत डॉ.च्या म्हणण्यानुसार धोका पूर्णपणे टळलेला नव्हता. कारण सर्जनच्या म्हणण्याप्रमाणे तो प्रकार कॅन्सरचाच असण्याची दाट शक्यता होती. परंतु मला खात्री होती की तसे काहीच नसणार आणि खरोखरच ता. १८-८-८७ रोजी त्याचा रिपोर्ट आला, तो पूर्णपणे स्वच्छ. आनंद गगनात मावेना. त्याच दिवशी त्याला ICU मधून बाहेर काढून वॉर्डमध्ये नेण्यात आले. तेथील मोकळ्या वातावरणात तो झपाट्याने सुधारु लागला. परंतु डॉ.च्या म्हणण्यानुसार जो ट्यूमरचा २५ टक्के भाग बाहेर काढला नव्हता, तो काढण्यासाठी

रेडिओथिरेपीची जरुरत होती. त्यासाठी त्याला ३० दिवस रोज बॉम्बे हॉस्पिटल येथे घेऊन जावे लागले. तेथेसुद्धा नवल असे की, जेथे खुद्द हा उपचार देतात तेथे एक मोठ्ठी खोली, एक महा प्रचंड गोल फिरणारे मशीन व फक्त पेशंट एकटाच आत. परंतु बाबांची सोबत असल्यामुळे माझा मुलगा कशालाच घाबरणारा नव्हता. पहिल्या दिवशीसुद्धा अजिबात न घाबरता न रडता मोठ्या धिटाईने त्याने हे सोपस्कार घ्यायला सुरुवात केली व तेथील ऑपरेटर्स, डॉक्टर्स व इतर पेशंटसुद्धा आश्चर्यचकीत झाले. आणि बाबांच्या अगाध लीलेमुळे माझ्या डोळ्यांतून मात्र आनंदाश्रू वाहू लागले. कारण तो जर रडला घाबरला असता, एकटा आत गेला नसता तर त्याला सकाळपासून उपाशीपोटी ठेऊन गुंगीचे इंजेक्शन देऊन मगच ती ५ मिनिटांची ट्रीटमेंट द्यावी लागली असती. व नुकत्याच आजारातून निघणाऱ्या मुलाला रोज सकाळी ११ ते १२ पर्यंत उपाशी ठेवणे म्हणजे सुद्धा एक दिव्यच होते. तेव्हा बाबांची लीला अगाध, अगम्य हेच खरे.

हा उपचार चालू असताना दरम्यान (१ महिन्याच्या वास्तव्यानंतर) हरकिसनदास हॉस्पिटलमधून अनंत चतुर्दशीच्या दिवशी डिसचार्ज मिळाला. तेव्हा घरी आल्यावर माझ्या मुलाला झालेला आनंद शब्दात पकडणे कठीण आहे.

असो,यथावकाश ही Radiotheropy ची ट्रीटमेंट सुद्धा पूर्ण झाली व त्याच्यात त्यामुळे खूपच सुधारण झाली आणि ह्या सर्वांना पूर्ण विराम देण्यासाठी दि. ५ ऑक्टोबर रोजी नॅशनल हॉस्पिटलमध्ये Angiogram म्हणून एक अत्याधुनिक चिकित्सा झाली की, ज्यामुळे असे कळून आले की त्याची ती उरलेली गाठसुद्धा पूर्णपणे नाहीशी झाली आहे, ती परत कधीच वाढू शकणार नाही व भविष्यात पुन्हा कधीही त्याचे दुखणे परत उद्‌भवणार नाही. त्यामुळे मुलाच्या आजारपणाच्या, सर्व चिंतेच्या, काळजीच्या ह्या काळ्याकुट्ट कालखंडावर पडदा पडला.

आता बाबांच्या कृपेने माझा मुलगा पूर्णपणे बरा झालेला आहे, व्यवस्थित खेळतो, बागडतो, शाळेतसुद्धा जातो, अभ्यास करतो. बाबांचा वरदहस्त त्याच्या माथी असल्याची इतकी भक्कम खात्री झाल्यामुळे मी आता त्याच्या भावी आयुष्याबद्दल अजिबात काळजी करीत नाही. कारण आपली सर्वांचीच काळजी घेण्यास बाबा समर्थ आहेत. त्यांचा हा महिमा वर्णन करण्यास सर्वच ठिकाणी माझे शब्द आणि लेखणी तोकडी पडली आहे. ह्या अनुभवांखेरीज रोजच्या जीवनातसुद्धा इतके लहान-मोठे अनुभव येतात की आता मी जीवनाविषयी पूर्ण आशावादी बनले आहे. बाबांच्या चरणी अभेद्य विश्वास आहे, आणि मनाची जी काही सबूरी आहे,ती तशीच कायम राहो,ही बाबांच्या चरणी प्रार्थना. ह्या सर्व कठीण काळामध्ये ज्या मित्रवर्गाने, नातेवाईकांनी आणि अनंत अनपेक्षित अशा व्यक्तींनीसुद्धा जे अनमोल सहाय्य केले, धीर दिला, त्या सर्वांवर बाबांची अखंड कृपा राहो, व आमच्या हातून अन्य दु:खपिडितांची सेवा होवो, हीच बाबांच्या पायाशी नम्र प्रार्थना.

# श्री साईंची अपरंपार माया

**- श्री. अरुण बाळकृष्ण कल्याणकर**
वरळी, मुंबई.

श्री साईबाबा यांचा रामनवमी उत्सव श्री. मोहिते बाबा यांच्या कृपा आशीर्वादाने वरळी साई मंदीरामध्ये साजरा होतो. सुप्रसिद्ध श्री पै महाराज यांचे प्रवचन आयोजित केले होते. सद्‌गुरु महाराज यांनी साई म्हणजे आई व बाबा. साईबाबा म्हणजे आईवडील असा खुलासा आपल्या प्रवचनातून केला व त्याचा प्रत्यय अनुभवास आला.

श्री साईबाबांची भक्ती, उपासना आमच्या घरात लहानपणा पासून होते. आमचे आई-वडील सन १९३८ पासून बाबांच्या सेवेत आहेत.

माझी मुलगी कुमारी पिंकी, ५ वर्षे ही लहानपणापासून आजारी होती. हृदयातील मुख्य नळी अरुंद असल्याने तिला खूप दम लागायचा व शरीर एकदम निळे पडायचे. दिवसातून एक ते दोन वेळा तिला दम (श्वास) जोरात लागायचा. खूप वैद्यकीय चाचण्या केल्या, औषधे केली, पण तिला आराम पडत नसे. दम लागला म्हणजे ती डोळे फिरवायची. घरात रडारड. दवाखान्यात न्यावे तर ऑक्सिजन शिवाय औषध नाही. अशावेळी बाबांची उदी तोंडात टाकली की, थोड्या अंतराने दम कमी व्हायचा. तिला थोडे समजायला लागल्यापासून मी तिला घेऊन बाबांच्या आरतीस गेल्याशिवाय रहात नसे. देवळात तिला दम लागला की, सर्व साईभक्त दिलासा देत व बाबांची करुणा भाकत असे माझे साईबाबा (आईबाबा).

तिला तपासणी उपचारार्थ मी बेतूल (म.प्र.) व वेल्लूर (मद्रास) येथे घेऊन गेलो. शस्त्रक्रिये शिवाय पर्याय नाही, असे तज्ञ सांगत. तिचे वजन कमीत कमी १० किलो हवे, तर ऑपरेशन होईल, असे सांगत. खर्च अवाढव्य. मी साध्या नोकरीत. तीन मुले. शिवाय गरीबी. पण बाबांचा महिमा फार.

एकदा पिंकीला खूप ताप आला. ताप उतरत नव्हता. औषधांनी काही गुण नाही. सर्व चिन्ताग्रस्त अवस्थेत. मी बाबांचा धावा करत बसलो. दम लागत होता. एवढ्यात एक साईभक्त कु. वन्दना मार्तोडकर ह्या घरी आल्या व त्यांनी स्वतः आपल्या हातांनी बाबांची उदी पिंकीला लावली. मला म्हणाल्या बॉम्बे हॉस्पिटलला घेऊन जा. आता बाम्बे हॉस्पिटल म्हटले तर माझ्या सारख्या गरीब माणसाच्या छातीत धस्स झाले. पूर्वी एकवेळा तपासणी करून आणल होते. तरी बाबांचे नाव घेऊन त्वरित डॉ. चोखाणीसाहेब यांच्या चर्चगेट येथे दवाखान्यात गेलो त्यांनी

तपासणी करुन त्वरित ॲडमिट करा, असा सल्ला दिला. पिंकीला घेऊन बॉम्बे हॉस्पिटल येथे गेलो, तर प्रवेश शुल्क व इतर एक हजार रुपये भरा,असे सांगण्यात आले. पैसे नाहीत. मुलगी डोळे फिरवते. काय करावे? तडक पिंकीला तेथेच आईजवळ ठेवून व्यवस्थेसाठी घरी आलो. येताना बाबांकडे न विसरता गेलो. घरी येतोच, तर माझ्या सहकाऱ्यांनी न मागताच १०००/- रुपये काढून दिले. मोठे आश्चर्य वाटले. लगोलग पैसे भरले. पिंकीला प्रवेश मिळाला. पुढे खर्चाचे काय? शेजारी लोक सांगत, खूप खर्च येतो. शस्त्रक्रिया फार अवघड आहे. हृदय बाहेर काढतात. भीती वाटत होती. माझ्या ऑफिसला कळविले व इतर मित्रांनी खूप सहकार्य देवून रक्कम जमा झाली. शस्त्रक्रिया होण्याआधी कॅथेट्रॉइप करण्यात येते. नलिकेद्वारे हृदय पाहण्यात येते. सदर छोटी शस्त्रक्रिया सकाळी झाली. ऑपरेशन थिएटर मध्ये पिंकी बेशुद्ध पडली. सर्व डॉक्टर घाबरले. अनेक यंत्रे-ऑक्सिजन चालू होते. बाबांच्या रुपात डॉ. चोखाणीसाहेब मदत करत होते. दिवसभर पिंकी कोमात होती. जशी जशी रात्र होऊ लागली, तब्येत जास्त खालवत चालली. ठिक रात्रौ ११.०० वाजता सर्व आटोपते आले. पिंकीला आय सी सी रुममध्ये ठेवले होते. डॉक्टर सोमय्या धीर देत होते. एवढ्यात डॉ. महेशकुमार यांनी मला औषध आणावयास पाठविले. मी रॉयलमध्ये औषध आणावयास गेलो, तोच मागे वॉर्डबॉय धावत आला व म्हणाला, आता औषधाची गरज नाही, तुम्ही वर चला. मी रडत रडत वर जाण्यास निघालो,तर डॉक्टर खाली येत होते. मला पाहून ते काही तरी बोलले पण मला काही सुचत नव्हते. पत्नी रडत होती. मी तडक आय सी सी रुममध्ये गेलो. नर्सने जावू दिले. तर पिंकीचा चेहरा पांढरा पडला होता. नाका-तोंडात नळ्या लावलेल्या होत्या. मान एकीकडे वळली होती. मला बाबांच दिसत होते. मी नर्सला विनंती केली. तिने नळी काढली. मी खिशातील उदी काढून व बाबांचे नाव घेऊन तिच्या सर्वांगाला लावली व तोंडात टाकली. बाहेर पत्नी छाती बडवत होती. धीर देणारा बाबांशिवाय कोणी नव्हता. पण चमत्कार झाला. रात्रौ १२.०५ मि.ला पिंकी थोडी हलली. पुन्हा डॉक्टर मंडळींची धावपळ झाली. मोठे तज्ज्ञ आले. सकाळी ५ वाजता पिंकीची हृदयक्रिया पूर्ववत झाली. सर्वांना खूप आश्चर्य वाटले. विश्वास बसत नव्हता. दुसऱ्या दिवशी पिंकीच्या हृदयावर सकाळी शस्त्रक्रिया झाली. रक्त त्या ग्रुपचे मिळत नव्हते. साईभक्त श्री. प्रदीप घोगे व श्री. सदाशिव धरणे साहेब यांचे सहकारी येवून बिना मोबदला त्या ग्रुपचे रक्त देऊन गेले. पुढे पिंकी एवढ्या मोठ्या शस्त्रक्रियेतून सहिसलामत सुखरुप घरी आली. आणताना प्रथम तिला बाबांकडे नेले व मग घरी आणले. सर्व साईभक्त माझ्या साईबाबांचा जयजयकर करु लागले. धन्य साईबाबा व धन्य ती उदी, पुनर्जन्म देणारी. बाबा सांगत तो श्रद्धा आणि सबुरी हा संदेश खरा ठरला. बॉम्बे हॉस्पिटल सारख्या ठिकाणी शस्त्रक्रिया होऊन एक नवा पैसा देखील स्वतःचा खर्च झाला नाही. केवढी बाबांची कृपा!

# श्रद्धेचे फळ

– सौ. रजनीदेवी घर्वे
महाड, रायगड.

''जो जो ठेवी बाबांवरी श्रद्धा
सफल होतील त्याच्या मनोकामद॥

अठ्ठावीस वर्षांपूर्वीची ही गोष्ट. बाबांनी आम्हाला आपल्या पायाशी कसे ओढून घेतले आणि साई भक्तीच्या मार्गाला लाविले, त्याची त्या बाबांची ही कथा. माझे पती टायफॉईडने फार आजारी होते. अठ्ठावीस वर्षांपूर्वी महाडसारख्या खेडेगावात फारसे उपचारही होत नव्हते. तरीही तिथल्या एका डॉक्टरांचे औषध चालू होतेच. पण ताप काही उतरत नव्हता. तसे डॉ. चितळे हे अनुभवी, वयोवृद्ध आणि निष्णांत होते. अगदी शर्थीचे प्रयत्न करूनही त्यांच्या हाताला गुण येत नव्हता. त्यामुळे डॉक्टरांनीही आशा सोडली. सतत पंधरा दिवसांच्या तापाने त्यांची प्रकृती संपूर्ण ढासळून गेली. मी खूप घाबरले, पण करणार तरी काय? शेवटी डॉक्टरांच्या सल्ल्याने आम्ही दुसऱ्या डॉक्टरांशी संपर्क साधण्याचा विचार केला. सारा भरवसा परमेश्वरावर ठेवला. आता काही करणे आमच्या हातात राहिले नव्हते.

''योगायोगच माणसाचे जीवन घडवित असतात. माझे थोरले बंधू श्री. शांताराम जाधव हे त्यावेळी नुकतेच श्रीसाईबाबांचे शिर्डीला जाऊन आले होते. त्यांना ह्यांच्या आजारासंबंधी समजताच ते श्रीसाईंची प्रतिमा, प्रसाद व उदी घेऊन लगेच घरी आले. त्यातील थोडी उदी त्यांनी माझ्या पतीच्या मस्तकी लावण्यास सांगून, थोडी पाण्यातून प्यायलाही दिली. मी उदीची पुडी त्यांच्या उशाला ठेवली. त्यांनी बाबांचा प्रसाद खावा, अशी माझी इच्छा होती. पण ते काहीही खाण्याच्या परिस्थितीत नव्हते. बाबांची प्रतिमा मात्र झोपल्या झोपल्या त्यांना दिसेल आणि बाबांना ते दिसतील, अशी समोर ठेवली. संपूर्ण शरणागत होऊन मी बाबांना हात जोडून म्हटले, ''बाबा, आता मला तुमच्याशिवाय कोणाचाच आधार नाही. आपल्या ह्या लेकीचं कुंकू तुम्हीच अखंड ठेवा. सर्वस्व तुमच्याच हातात आहे.''

मी पुन्हा पुन्हा बाबांना हात जोडीत होते. कारण आता आमच्या हातात काहीच नव्हते. सारा विश्वास आता बाबांवर. घरातील सर्वच जण निराश झाले होते. यशाची आशा मावळली तरी माझी बाबांवरील श्रद्धा अजिबात ढळली नव्हती. आता भले बुरे जे काही करतील ते फक्त बाबा!

''श्रद्धेचे जे फळ देईल सुकाळ
प्रेम सुख मिळे अवघा काळ।

माझं माहेर म्हणजे बाबांचे घर. तिथे रोजच बाबांचा जप-जाप्य, पूजा-अर्चा, प्रार्थना, आरती चालू असते. जणू बाबांचं शिर्डी संस्थान. सर्वच जण साईपायी रमलेले. बाबांना तरी आपल्या माहेरवाशिणीचे दु:ख बघवेल काय? माझ्या एका सौभाग्यासाठी माहेरचे असंख्य हात बाबांना जोडले गेले. सारं पुण्य, सारी सेवा पणाला लावली गेली.

त्याच दिवशी तापाच्या ग्लानीत असताना ह्यांना आपल्या सर्वांगावर उदी धुपाचा अधूनमधून शिडकावा केल्याचा भास होऊ लागला. उदी-धुपाच्या सुगंधाने मन प्रसन्न होऊ लागले. आणि त्या सुगंधाने शरीरात एक प्रकारची अनामिक शक्ती संचारू लागल्याचा भास होऊ लागला.

त्यांनी लगेच मला व माझ्या सासू-सासऱ्यांना घडत असलेली घटना सांगितली. म्हणाले, "बाबांच्या कृपेने माझा ताप रात्रीत नक्कीच उतरेल. श्री बाबांचा वरदहस्त माझ्यावर असून मला सारखी उदी अत्तराचा सुगंध येत आहे. त्यामुळे मला अतिशय प्रसन्न वाटत आहे. तुम्ही आता मुळीच भिऊ नका. माझी केस डॉक्टर साईबाबांच्या हाती मी सोपवली आहे. असा धन्वंतरी असता भिण्याचे काय कारण?"

त्याचक्षणी माझ्या सासूसासऱ्यांनी बाबांना नवस केला की, ह्यांचा ताप उतरला, तर तुझ्या समाधीच्या दर्शनास पाठवीन.

आणि योगायोग म्हणजे बाबांच्या कृपेने रात्री बारानंतर ह्यांचा ताप आपोआप उतरला, अगदी घाम वगैरे न येता. आम्हाला समजले सुद्धा नाही. डॉक्टर तर दुसऱ्या दिवशी चकितच झाले. त्यांना काय ठावे, माझा डॉक्टर तिकडे शिर्डीत बसून काय काय करतोय ते. बाबांची लीलाच अगाध. बाबांच्या प्रेमाने मी अगदी भारावून गेले.

थोड्याच दिवसात हे पूर्ण बरे झाल्यावर आम्ही शिर्डीला जाऊन बाबांचे आणि समाधीचे दर्शन घेतले. त्यावेळी बाबांच्या अकरा वचनांची मला पूर्ण प्रचिती आली. पुन्हा पुन्हा ती अक्षरे माझ्या मनात घोळू लागली –

माझ्या समाधीची पायरी चढेल
दु:ख हे हरेल सर्व त्याचे।"

---

# ही तर श्री साईंची कृपा

**– सौ. अंजली सुरेश पाटेकर**
मांहिम, मुंबई.

शरण मज आला आणि वाया गेला ।
दाखवा दाखवा ऐसा कोणी ॥

माझे परमपूज्य वडील हे श्री साईंचे भक्त होते. त्यांना आयुष्यात बाबांनी अनेक अनुभव दाखविले. अनेक आपत्तींना तोंड देत अखेर त्यांना यशाचे शिखरही

दाखविले. त्यांना आपल्या जीवनात अनेक यातना, त्रास भोगावा लागला. परंतु ते साईंचे परम भक्त असल्यामुळे व त्यांनी आपल्या ठिकाणी लोभ, मोह, मत्सर, द्वेष, अहंकार यांना कधीच थारा न दिल्यामुळे साईकृपेने त्यांना जीवनात यशस्वी होता आले.

ते प्रत्येक शुभकार्य करण्यापूर्वी बाबांचा आशीर्वाद घेऊन येत. साईलीला मासिक वाचण्याचा योग मला त्यांच्याचमुळे आला.

घरात वडील साईभक्त ह्यामुळे नकळत माझ्या अंगी भक्ती ही बाणली गेली होती. परंतु ३१ ऑक्टोबर १९८७ रोजी त्यांचे दु:खद निधन झाले. ते दु:ख आमच्या आयुष्यातील पहिले दु:ख. शब्दात सांगणे कठीणच. आमच्या घरात न भरुन येणारी हानी होती ती.

वडिलांच्या स्मृतीप्रित्यर्थ मी ही साईलीला मासिकाची वर्गणी भरुन सभासद झाले. त्यानिमित्त मी दादर येथील साईनिकेतन मध्ये गेले होते. त्या ठिकाणी गेल्या गेल्याच माझे मन प्रफुल्लीत झाले. नकळत माझ्या डोळ्यात अश्रू दाटून आले. त्या दिवशी माझे मन साईमय झाले होते. त्याच आनंदात मी घरी आले. येताना मनाशी निश्चय केला, यापुढे दर गुरुवारी बाबांच्या फोटोला हार घालून बाबांची पूजा करायची.

दुसरा गुरुवार आला. महिना अखेर होता! माझ्या मुलांच्या स्कॉलरशिपच्या परिक्षेचे रु. १०० शाळेत भरावयाचे होते. मुलगा सारखा पैसे भरण्यासाठी पाठी लागला होता. मी त्याला म्हटले, मी तुझ्या बाईंना प्रत्यक्ष भेटून सांगेन, असे बोलून मी त्याची कशीबशी समजूत काढली व त्याला शाळेत पाठवून दिले. माझ्या डोळ्यांपुढे मोठा प्रश्नच होता. त्यातच बाबांच्या फोटोला हार घालण्यासाठी देखील पैसे नव्हते. काय करायचे ते सूचत नव्हते. माझे लक्ष अचानक रद्दीपेपरकडे गेले. त्यादिवशी रद्दीपेपर विकून बाबांच्या फोटोला हार घातला. मन:पूर्वक बाबांची पूजा केली. बाबांना हात जोडून विनवणी केली की, बाबा मी इतका नेटनेटका संसार करुनसुद्धा माझ्या संसारात इतकी विवंचना, तुटवडा का? तुम्हीच आमचे रक्षणकर्ते आहात. तुम्हीच यातून मार्ग काढा, असे हात जोडून बाबांना सांगितले. त्या दिवशी संध्याकाळी माझे पती कामावरुन घरी आले नाहीत. म्हणून मी चौकशी केली तर कळले की त्यांना संध्याकाळी देखील ड्युटी आहे. ते सरकारी ऑफिसमध्ये स्टाफ कार ड्रायव्हर आहेत. रात्री ते उशिरा घरी आले म्हणून सकाळी ते उठल्यावर मी त्यांना सांगितले की, आजतरी मुलाच्या स्कॉलरशिपच्या परिक्षेचे पैसे भरायला पाहिजे. आणि काय आश्चर्य! रात्री ह्यांनी उशिरापर्यंत परदेशी पाहुण्यांसाठी ड्युटी केली होती. त्यांनी ह्यांना जाताना ३०० रुपये बक्षिसादाखल दिले होते. बाबांना आदल्या दिवशीच मनापासून श्रद्धेने मारलेली हाक बाबांनी ऐकलेली होती. जणू तो परदेशी पाहुणा बाबांच्याच रुपाने आला व भक्ताला संकटात पाहून मदत करुन गेला. मला फार आनंद झाला. दुसऱ्याच दिवशी मी शाळेत पैसे भरुन बाजारात

गेले व बाजारातून किरकोळ खरेदी करुन घरी आले. पैशांचे पाकिट स्वयंपाकघरा मधील फळीवर ठेवले. संध्याकाळी माझा मुलगा अमित हा शाळेतून आल्यावर पैसे मागू लागला. मी त्याला म्हटले, स्वयंपाकघरातील फळीवर पैशाचे पाकिट आहे, त्यातून घे. तो सांगत आला, आई पैशाचे पाकिट तेथे दिसत नाही. मला देखील आश्चर्य वाटले. कारण दिवसभर घरात तर कोणीच आले नव्हते. शिवाय पैशाचे पाकिट स्वयंपाकघरात ठेवायची माझी जागा ठराविकच आहे. मी तेथे शोधले, आजुबाजूला शोधले, पण पैशांचे पाकिट कुठेच दिसत नव्हते. मी बाबांचे स्मरण केले. नकळत माझे हात बाबांच्या फोटोपुढे जोडले गेले. मी म्हटले, बाबा, तुम्हीच माझे पाकिट शोधून द्या. मुलाने शंका काढली, आई कावळा पाकिट घेऊन गेला असेल तर! मी पण भोळेपणाने स्वयंपाकघरातील खिडकीतून खाली बघू लागले. मुलाला म्हटले, बघ खाली जावून. तो खाली गेला बघायला. मी मनातून बाबांचा धावा करीत होते. मुलगा लगेच धावत धावत वर आला, तो काय आश्चर्य! त्याच्या हातात पाकिट पैसेसहित जसेच्या तसे होते. खाली १५/२० मुले फुटबॉल खेळत होती, तरी देखील ते कोणाला दिसले नाही. हीच बाबांची किमया. अशा माझ्या बाबांना कोटी कोटी प्रणाम!

अशीच बाबांची कृपा माझ्या कुटुंबावर व सर्व साईभक्तांवर राहो, हीच साईचरणी प्रार्थना.

---

# श्री बाबांच्या उदीचा चमत्कार

**— श्री. संजय पुंडलिक कुंभार**
शाहू उद्यान रोड, कोल्हापूर.

ऑगष्ट महिना जसा जवळ आला, तसा आम्हा सर्वांना आनंद वाटू लागला. केव्हा एकदा गणेश चतुर्थी येईल, असे आम्हाला वाटू लागले होते. कोल्हापूर म्हटले की, गणेश चतुर्थी फारच मोठी असायची, हे तर मला माहीतच होते. पण तरी सुद्धा या गणेश चतुर्थीस मला एक आगळाच आनंद वाटू लागला होता.

२२ ऑगष्ट रोजी गणेश चतुर्थी होती. ते साल मला काही आठवत नाही. पण तो दिवस उजाडला. आम्ही कुंभार म्हटले की, गणपती खरेदी करण्यासाठी आमच्या घरीही लोकांची गर्दी होऊ लागली होती. गर्दी जास्तच वाढत चालली होती. आम्ही जसजसे गणपती गिऱ्हाईकांसमोर ठेवत असू, तसे ते लवकर खरेदी केले जात होते. त्यामुळे तो एक वेगळाच आनंद वाटत होता. त्या आनंदातच आम्हीही आमच्या घरी गणपतीची पूजा-अर्चा करण्यात मग्न झालो होतो. घर कसे सर्व देवांनी भरुन गेले आहे, असेच वाटत होते.

गणपती बसल्यानंतर २६ तारखेला गौरीपूजन होते. गौरीपूजन म्हटले की, माझ्या आईची धावपळ सुरूच होते. गौरीसाठी छान साडी, दाग-दागिने यांची सर्व तयारी तिने केली होती. २६ तारखेचा तो गौरीपूजनाचा दिवस उजाडला. कोल्हापूरमध्ये गौरी घरी आणावयाची असेल त्या दिवशी सकाळी स्त्रिया, लहान मुली अगदी आनंदाने त्या गौरी घेवून वाजत गाजत पंचगंगा नदीकाठी जाऊन त्यांची पूजा-अर्चा करून परत ती गौरी वाजत गाजत घरी आणतात. माझ्या ताईने गौरी आणली होती. माझी आई आणि ताई गौरी पूजन करण्यात मग्न होत्या. घरातील इतर मंडळी बाजूलाच बसलेली होती. मी गणपतीसमोर सजावट करत होतो. आईने गौरीला साडी नेसवली, कपाळाला उठावदार असे हळद कुंकू लावले होते. गळ्यामध्ये दागिने व पायामध्ये जोडवी घातली होती. त्यामुळे गौरी फारच छान दिसू लागली होती. त्या नादात असतानाच आई एकदम बसल्या जागीच खाली पडली. मी तिला सावरत असताना सर्वांनीच तिच्याभोवती गर्दी केली. त्यातच आईचे हात, पाय सर्व ताठले होते. ती डोळे पांढरे करून पडली होती. काय करावे, हेच आम्हाला सुचेना. सर्वांना रडू आवरत नव्हते. डॉक्टरांना बोलावण्याच्या घाईतच वडील होते. त्याच वेळी मला बाबांनी बुद्धी दिली. मी देव्हाऱ्याजवळ जाऊन बाबांचा धावा करु लागलो व बाबांना विनवू लागलो, "बाबा, आता तुम्हीच आईला वाचवा" मी उदी घेऊन ती आईच्या सर्वांगाला लावली. प्रसाद म्हणून थोडीशी उदी तिच्या तोंडात घातली. जणू काही माझी हाक बाबांनी ऐकलीच होती. आई थोडी हालचाल करु लागली. इकडे तिकडे पाहू लागली आणि थोड्या वेळाने ती बोलूही लागली. त्यामुळे आम्हा सर्वांची भीती नाहीशी झाली. आईने व ताईनेच नंतर गौरी पूजन केले. आम्ही सर्वजण काहीही झाले तरी बाबांचाच धावा करतो व औषध म्हणून आम्ही बाबांची उदीच लावतो. घरातील अगदी सर्वजण बाबांची भक्ती १९७१ सालापासून करत आहोत.

# माझी काळजी साई तुला

– श्री. रमाकांत नारायण वेंगुर्लेकर
ताडदेव रोड, मुंबई.

गेल्या वर्षी गणपतीसाठी मी सावंतवाडीला गेलो होतो गणपती नंतर मी उसप गावी जाण्याचे ठरविले. सावंतवाडीहून उसपसाठी १०॥ वाजता गाडी होती. परंतु १०॥ वाजता गेल्यास संध्याकाळी लवकर परतणे शक्य नव्हते. तेव्हा कोणी सुचविले की, दोडामार्गपर्यंत जा. तेथून दुसरी एखादी एस्. टी., टेम्पो किंवा दुसरे एखादे वाहन मिळेल. त्याप्रमाणे मी सकाळी ८ वाजताच्या बसने दोडामार्गला आलो. तेथून एका

टेम्पोने भेडशीला आलो. रस्त्यावरील एका झोपडीवजा हॉटेलात चहा घेतला. पावसाला सुरूवात झाली होती. अर्धा तास झाला तरी बस नाही किंवा दुसरे वाहन नाही. तोपर्यंत पाऊस थांबला होता. हॉटेलवाला म्हणाला की, साहेब अर्ध्या तासात तुम्ही उसपला पोहचाल. म्हणून मी पायी निघालो. पण प्रत्यक्षात उसपला पोहोचेपर्यंत १॥-२ तास लागले. सुमारे ५ कि.मी. अंतर पायी तुडवले. गावातील बंधु-भगिनींना भेटून परत निघालो. १०॥ ची सकाळची बस आली नव्हती. पुन्हा पायी निघालो. थोड्या वेळाने जोरदार पाऊसाला सुरुवात झाली. ५ कि.मी. अंतर तुडवीत कसाबसा भेडशीला पोहचलो. हॉटेलात चहा घेतला. पुन्हा एक तास प्रतीक्षा केली तरी बस नाही, ट्रक, टेम्पो काही नाही. पावसात भिजून शरीर आंबून गेलं होतं. एकट्याने प्रवास करून मनाने पण थकलो होतो. एवढ्यात एक ट्रक आला. ड्रायव्हर ट्रक बिघडला आहे, असे बजावून सांगत असताना देखील ट्रकमध्ये बसलो. परंतु ट्रकने थोडे अंतर काटले आणि तो बंद पडला. पाठोपाठ एक बस आली. बसमधून दोडामार्गला आलो. या सगळ्या दगदगीनं डोकं दुखू लागलं. एका दुकानावर सोडा घेतला. संध्याकाळचे सहा-सव्वासहा वाजले होते. दुकानदाराकडे सहज चौकशी केली. तर त्याच्याकडून कळलं की, आठच्यापुढे सावंतवाडीकरिता गाडी येईल. मी हादरलोच. बससाठी पुन्हा २ तास वाट पाहण्याची मानसिक व शारीरिक क्षमता उरलीच नव्हती. तसेच २ तास बससाठी उभे राहून बसावयास जागा मिळणे देखील कठीण होते. माझ्या मनाची चलबिचल त्या दुकानदाराने ओळखली. त्याने मला सल्ला दिला की, तुम्ही ट्रकने जा. आता मात्र मी साईबाबांना कळवळून साद घातली. बाबांची मी मनोमन प्रार्थना केली की, बाबा मी पार थकलो आहे. कृपा करून लवकर एखादा ट्रक येऊ दे आणि बसच्या रांगेत उभा राहिलो. दहा मिनिटांतच एक ट्रक आला. मी हात दाखविला. पण ट्रक पुढे गेला. मी पुन्हा बसच्या रांगेत जाण्यासाठी मागे फिरलो. इतक्यात ट्रक थांबला. त्यातील एक उतारु माझ्याच दिशेनं आला व म्हणाला की, सावंतवाडीस जावयाचे असल्यास ट्रकमध्ये जागा आहे. मी आनंदाने धावत जाऊन ट्रकमध्ये बसलो. आता मला काळजी पडली की, ट्रकवाला आपल्याकडून अवाजवी पैसे घेणार नाही ना? पुन्हा बाबांची मनोमन प्रार्थना केली, कारण तोपर्यंत मी ट्रकने कधीच प्रवास केला नव्हता. बाबांच्या कृपेने त्याने वाजवी भाडे घेतले. प्रवास सुखरूप पार पडला. मी बाबांना मनोमन कोटी कोटी प्रणाम केले. घरी येऊन गरम पाण्याने आंघोळ केली, जेवण केले व बाबांचे स्मरण करत झोपी गेलो.

त्यानंतर तीन-चार दिवसांनी मी माझ्या सासरी - कारवारला - जाण्यास निघालो. मांडवी नदीवरील ब्रिज पडल्यामुळे प्रथम मला गोव्यास जावयाचे होते. मी गोव्याच्या गाडीत बसलो. गाडी दोडा-मार्गला आली. बस कंडक्टरने सांगितले की, गाडी लगेच निघणार. तरी, कृपया ज्यांना दोडामार्गलाच उतरावयाचे असेल त्यांनीच बसमधून खाली उतरावे. इतरांनी बसमध्येच बसून रहावे, असे सांगून कण्डक्टर व ड्रायव्हर खाली उतरले. मला वाटले की, हे दोघे चहा घेऊन येणार तेवढ्यात आपण

कोपऱ्यावरच्या दुकानातून लिमलेटच्या गोळ्या घेऊन येऊ. मी पळतच दुकानात शिरलो व लिमलेटच्या गोळ्या घेऊन बाहेर पडलो आणि बघतो तर काय, माझी गाडी सुटली होती. मी एक मिनिटभर ओरडत बसच्या मागे धावलो आणि हताश होऊन रस्त्याच्या मध्ये थबकलो. क्षणभरच बाबांची आठवण केली व बाबांना मनोमन साद घातली आणि काय आश्चर्य! माझ्या मागे एक ट्रक येऊन थबकला. एवढ्यात समोरच्या हॉटेलमधील गल्ल्यावरचा माणूस धावत बाहेर आला. त्याने ट्रकच्या मालकास कोंकणी भाषेत पटकन माझी परिस्थिती निवेदन करून ट्रकमध्ये घेण्यास विनंती केली व चेक पोस्टवर माझी बस गाठून देण्यास सांगितले. मी चटकन् ट्रकमध्ये बसलो. ट्रक एकदम नवीन होता. मालक सोबत असल्यामुळे तो ट्रक सावकाश चालवत असावा. माझा जीव मात्र खाली-वर होत होता. महाराष्ट्राचा चेक पोस्ट जवळ आला. आमची बस दिसली, पण ट्रक चेक-पोस्टपाशी पोहचण्यापूर्वीच बस सुटली. ट्रकचा मालक माझा चिंतातुर चेहरा पाहून म्हणाला की, गाडी आता गोव्याच्या चेकपोस्टला मिळेल. मिळाली नाही तर पुढे असनोड्याला नक्कीच गाठून देऊ. मी मनातल्या मनात साई-स्तोत्राचा पाठ करण्यास सुरुवात केली. गोव्याचा चेक पोस्ट जवळ आला. आमच्या बसपुढे दोन-तीन खाजगी वाहने उभी होती. मी ट्रक ड्रायव्हरला ट्रक जरा जोरात चालव अशी विनंती केली. खाजगी वाहने निघून गेली. आमची बस तेवढीच चेक-पोस्टला उभी होती. ट्रक ड्रायव्हरने ट्रक जोरात चालवला. ट्रक बसच्या मागे उभा राहता राहता मी ट्रकच्या मालकाला पैसे देऊ केले. पण त्याने ते स्वीकारले नाहीत व मला लवकर जाऊन बस पकडण्यास सांगितले. मी पटकन ट्रकमधून उतरलो व पळतच जाऊन उभ्या असलेल्या बसमध्ये चढून आपल्या जागेवर जाऊन बसलो व श्वास सोडला न सोडला तोच कण्डक्टर चेक-पोस्टवरील कार्यालयातून आला व बस चालू झाली. मी पुन्हा एकदा बाबांचे मनोमन आभार मानले. आणि मुख्य गोष्ट म्हणजे ज्या असनोड्याच्या मोठ्या स्टॉपवर बस बराच वेळ उभी राहते, असे तो ट्रकचा मालक सांगत होता, तेथे बस थांबलीच नाही, तर असनोड्याचे प्रवासी गावातच इतरत्र उतरवून बस लगेच गोव्यास गेली. साईबाबांना आपल्या भक्तांची सर्वतोपरी काळजी असते. त्यांना अनन्यभावे हाक मारताच बाबा आपल्या हाकेला निश्चितच धावून येतात. कोण्या एका साईवेड्या कवीने म्हटल्याप्रमाणे:

माझी काळजी साई तुला। माझी काळजी साई तुला।
तू तर माझ्या सांगाती। मग कसली चिंता मला॥

# श्रद्धा हीच भावी आयुष्याची गुरुकिल्ली

**– सौ. स्मिता घरत**
परेल, मुंबई.

माझी भावजयी काही दिवस आजारी होती. एवढी की, तिला ताकदच उरली नव्हती आणि एकदम अशक्त झाली. आणि तिला जेव्हा डॉक्टरांकडे तपासण्याकरिता नेली, तेव्हा डॉक्टरने एक्सरे, कॉर्डीयोग्राम काढून शेवटी निदान बांधले की, काळजाला भोकं पडली आहेत आणि तुम्हाला ऑपरेशन करावयास लागेल. ते ऑपरेशन पण फार महाग आहे. एवढे ऐकून आमच्या काळजाचे पाणीच झाले. नंतर आम्ही दुसऱ्या एका स्पेशालिस्टकडे तिला घेऊन गेलो. तत्पूर्वी आम्ही बाबांचा धावा चालूच ठेवला होता. त्यांना विनंती केली, हे ऑपरेशन टळू दे आणि औषधोपचाराने तब्बेत सुधारु दे. नंतर मागच्या स्पेशालिस्टकडील सगळे एक्सरे व रिपोर्ट मिळाले. त्याने सांगितले की, ऑपरेशन करण्याची काहीच गरज नाही, औषधाने रोग बरा होईल. तेव्हा आम्हाला एवढा आनंद झाला की खरोखर आमच्यावर आलेल्या प्रसंगाला त्या डॉक्टराच्या रुपाने प्रत्यक्ष बाबाच धावून आले. त्याने मोठ्या प्रसंगातून वाचविले. तसेच आम्हाला सगळ्यांना आनंदी करुन सोडले.

# अगाध ही श्री साईंची लीला

**– श्री. शरद बाबुराव राणे**
चिंचपोकळी (पूर्व), मुंबई.

वास्तविक पहाता मी पूर्वी देवधर्म, पूजा-अर्चा यांपासून थोडासा दूरच होतो. फक्त 'देखल्या देवा दंडवत' अशा तऱ्हेची माझी प्रवृत्ती होती. दोन वर्षांपूर्वी रात्री झोपेत मला एक स्वप्न पडले. स्वप्नामध्ये मला एका बाजूस श्रीगणेश व दुसऱ्या बाजूस श्री साईबाबा यांचे संलग्न असे दर्शन घडले.

योगायोगाने त्याच दरम्यान मला शिरडीस जाण्याचा मंगलयोग आला. तिथल्या वास्तू–वस्तुतल्या साक्षात् जीवन स्मृतीतील साई-तेजोवलयाने माझे नेत्र दिपून गेल्याने, माझ्या अंतःकरणातला तमस नाहीसा झाला. आयुष्यभर फकिरी जीवनात रमून जगाचे कल्याण केलेल्या बाबांच्या दिव्यत्वाची कल्पना येऊन मी कधी साईमय झालो, हे मला कळले देखील नाही.

बाबांनी आम्हाला आपल्या वरदहस्ताने कित्येक आर्थिक, मानसिक, अघटित व अकल्पित अशा संकटांतून अगदी अलगद बाहेर काढले आहे. मृत्यूच्या काटेरी मार्गावर जीवनाची हिरवळ पसरली आणि म्हणूनच त्या हिरवळीवरुन आज आम्ही बाबांपुढे नतमस्तक होऊन बिनधोक वाटचाल करीत आहोत.

१२ ऑगस्ट १९८७ ची आमच्या कुटुंबातील घटना. माझी धाकटी मुलगी कुसारिका ही शाळेत स्वातंत्र्यदिनाला करावयाच्या इंग्लीश भाषणाचे दिवसभर पाठांतर करीत होती. त्या रात्री तिचे डोके जास्त दुखू लागले, म्हणून तिने आम्हास न विचारता माहीत नसल्यामुळे चुकून मोठी मुलगी चि. माधुरी हिच्या फिटस् सारख्या आजारावर असलेल्या 'गार्डीनल' नावाच्या जालीम (विषकारक) गोळ्या दहा-बारा घेतल्या. तिची अशी समजूत होती की, जास्त गोळ्या घेतल्यास डोकेदुखी त्वरित थांबून पाठांतर करता येईल. त्या रात्री गोळ्यांमुळे ग्लानी आल्यामुळे ती व्यवस्थित जेवू सुद्धा शकली नाही, व गोळ्यांविषयी आम्हाला काही न सांगता झोपी गेली.

सकाळी सौभाग्यवती तिला उठविण्यास गेली असता तिचे डोळे सुजलेले होते. डोळ्याच्या खालील भाग काळा पडला होता. तोंडावाटे फेस येत होता. तिला नीट बोलता येत नव्हते. हातापायातील त्राण गेल्यामुळे तिला नीट उभे रहाता येत नव्हते. आम्ही घाबरलो. तिची अवस्था पाहून आम्हाला रडूच कोसळले. बाबांचे नामस्मरण करुन शिरडीहून आणलेली विभूती सौभाग्यवतीने तिला पाण्यातून प्यावयास दिली. दोन-तीन उलट्या झाल्या. डॉक्टर आल्यावर त्यांनी तिला तपासून रुग्णालयात नेण्यास सांगितले. केवळ बाबा तिच्याजवळ असल्यामुळेच (गळ्यात बाबांची छबी असलेले लॉकेट आहे) रात्री गोळ्या जास्त प्रमाणात खाल्यानंतर देखील अधिक विषबाधा न होता ती थोडीफार शुद्धीवर होती.

रुग्णालयात ॲडमिट केल्यावर तिथे देखील सौभाग्यवतीने तिला विभूती खावयास दिली. चार पाच उलट्या झाल्या. रक्ततपासणी व इतर तपासण्यांनंतर विषबाधा कमी कमी होत तिला नवे जीवन मिळून धोका टळल्याचे रुग्णालयातील बालरोगतज्ञांनी सांगून तिला डिस्चार्ज दिला. त्यावेळेस आम्हा उभयतांचे सारिकाच्या लॉकेटमधील बाबांच्या छबीकडे पाहून डोळे भरुन आले.

# साईलीला

**— रोहिणी आबाजी सावंत**
घाटकोपर (पूर्व), मुंबई.

१९८३ साली मला बाबांचा अनुभव आला. त्यावेळी मी माझी स्वतःची खोली भाड्याने देऊन माझ्या आईच्या घरी रहात होते. माझ्या पतीला रेल्वे अपघात होऊन ते सायन हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होते आणि त्यावेळी माझ्या खोलीतल्या भाडोत्र्याची मुदत संपत आली होती. मला दुसरं भाडोत्री मिळणे मुश्किल झाले होते. पण या संकटातून मला श्री साईमाउलीनी वाचविले व साईबाबांच्या रुपाने

मला एक भाडोत्री मिळाले. त्या व्यक्तीकडून मी असे कबूल करुन घेतले की, तो मला एक खोली वापरण्यास देईल, त्याने तसे मंजूर असल्याचे सांगून मला १३००० रु. अॅडव्हान्स म्हणून दिले. ते पैसे मी पहिल्या भाडोत्र्याला देऊन खोली स्वतःच्या ताब्यात घेतली. त्यावेळी मला व माझ्या कुटुंबियांना फारच आनंद झाला.

परंतु दोन दिवसांनी येऊन त्याच गृहस्थाने मला सांगितले की, त्याच्या खोलीचे काही जमणार नाही व त्याने अॅडव्हान्स म्हणून दिलेली १३००० रु. रक्कम परत मागितली. तेव्हा माझ्या समोर दुसरे संकट उभे राहिले. परंतु मला पूर्ण विश्वास होता की, जसे मला श्री साईंनी पहिल्या संकटातून वाचविले, तसेच याही संकटातून ते वाचवणारच, ही माझी खात्री होती. आणि याच विचारात गुंग असता मला रात्रीच झोप लागली आणि पहाटेच्या वेळी बाबा माझ्या स्वप्नात आले. तसे म्हणण्यापेक्षा मला बाबांनी दृष्टांत दिला, असेच म्हणणे योग्य ठरेल. कारण त्या रात्री मला श्री साईबाबांनी सांगितले की, त्या व्यक्तीला तू महिन्याला १००० रु. देते म्हणून सांग. दुसऱ्या दिवशी त्या माणसाला मी तसे सांगितले व साईबाबांच्या कृपेने मी त्या माणसाला १००० रु. असे देऊन कर्जमुक्त झाले. जसे श्री साईबाबा संकटात माझ्या पाठीशी धावून आले, तसेच त्यांचा आशीर्वाद आमच्या पाठीशी राहो, ही श्री साई चरणी प्रार्थना.

# बाबांची कृपा

— श्रीः अरुण माधव शिंदे
डोंबिवली (पूर्व), ठाणे.

मी रिझर्व बँकेत नोकरी करीत आहे. बँकेत सी.ए.आय.आय. बी. परीक्षा पास होणे, म्हणजे अभिमानाची गोष्ट वाटते. ह्या परीक्षेस I व II असे दोन भाग असतात. पैकी I मी लवकरात लवकर उत्तीर्ण झालो व भाग II च्या सहा विषयांपैकी माझे तीन विषय सुटले होते. उरलेले तीन विषय काही सुटत नव्हते. मी साईबाबांना अशी प्रार्थना केली की, मला प्रत्येक प्रयत्नाच्या वेळी कमीत कमी एक तरी विषय सुटावा. प्रार्थनेप्रमाणे यावर्षी माझे तीनपैकी दोन विषय सुटले आणि माझ्या मनाला अतीव आनंद झाला. हे सारे साईबाबांच्या कृपेमुळेच झाले.

# बोलावणे बाबांनी ऐकले

— सुजाता रा. वेर्णेकर
कारवार, कर्नाटक.

माझा माझ्या कुलदेवतेवर आणि बाबांवर फार विश्वास आहे. जेव्हा माझ्या बहिणीला साईंची लीला जाणवू लागली व अनेकांचे अनुभव वाचले, ऐकले, तेव्हापासून माझी साईबाबांवर श्रद्धा बसली. मी गावाहून मुंबईला आली, त्यावेळचा हा प्रकार. तो दिवस गुरुवारचा होता. माझा भाऊ १००–२०० ग्रॅमची सोन्याची पुडी घेऊन काही कामासाठी वहिनीच्या भावाकडे गेला होता. ती वेळ रात्रीची ७ ची होती. त्यांच्या घरुन येताना तो पेट्रोल भरुन घरी आला. घरी येऊन पाहातो तर पुडी गायब. शोधण्यासाठी म्हणून पेट्रोल पंपावर गेला. मी साईबाबांची प्रार्थना सुरु केली की, साईबाबा ती पुडी मिळू दे. मी मनात म्हटले की, साईबाबा प्रत्येकाला पावतात आणि जर का माझी हाक त्यांना ऐकू आली असेल, तर ती पुडी नक्कीच मिळेल. पण नाही. भाऊ परत घरी आला. आम्ही विचारल्यावर त्याने सांगितले, मी दोन्हीकडे म्हणजे पेट्रोल पंपावर आणि वहिनीच्या भावाकडे शोध घेतला. पण कुठेही पुडी सापडली नाही. मला खूप वाईट वाटले. मी सकाळी उठले. त्यागोष्टीला विसरण्याचा प्रयत्न केला. कारण मुंबईसारख्या गजबजलेल्या शहरात काही सांडल्यास सापडेल का? नंतर चमत्कार काय! वहिनीचा भाऊ पुडी घेऊन हजर. आम्ही त्याला कुठे सापडली विचारल्यास, तो म्हणाला, आताच मी तुमच्याकडे येताना माझं लक्ष पार्किंग केलेल्या तुमच्या गाडीवर गेलं आणि स्कुटरच्या पायाकडच्या ब्रेकला अडकून असलेली ही पुडी मिळाली. तेव्हा मला इतका आनंद झाला की, माझ्या तोंडून 'साईंची कृपा' असा शब्द सहजपणे उद्‌गारला गेला. आणि खरं सांगयचं म्हणजे, त्या दिवशी तर मोठा भाऊ म्हणजे अण्णा तीच गाडी घेऊन तीन-चार ठिकाणी जाऊन आला होता.

# विघ्नहर्ता साई

— श्री. किशोर मधुकर कदम
वडाळा, मुंबई.

माझी वहिणी सौ. सुरेखा गर्भवती होती. प्रसुतीच्या वेळी तिला काही त्रास होऊ नये, म्हणून मी बाबांची दररोज प्रार्थना करीत होतो. बाबांच्या कृपेने ४ डिसेंबर

१९८७ रोजी सुखरुप काहीही त्रास न होता सौ. सुरेखाला पुत्रप्राप्ती झाली. ४–५ दिवस व्यवस्थित गेले. काहीही त्रास झाला नाही. परंतु ५व्या दिवशी रात्री सौ. सुरेखाची तब्येत फारच बिघडली व तिला परत हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करावे लागले. आम्ही घरातले सर्वजण फारच घाबरून गेलो होतो. डॉक्टरांनी तिची गर्भाची पिशवी साफ करावी लागेल व त्यासाठी परत टाके घालावे लागतील, म्हणून सांगितले. मी सतत बाबांचा धावा करत होतो. मी सर्व भरोसा बाबांवर ठेवला. पुन्हा बाबा माझ्या हाकेला धावून आले व त्यांच्या कृपेची प्रचिती आली. २–३ दिवसांनी सौ. सुरेखाच्या तब्येतीला उतार पडला व फक्त औषधाने तिला बरे वाटले. टाके घालावे लागले नाहीत. बाबांच्या कृपेनेच हा भयंकर प्रसंग निभावून गेला.

---

# त्वमेव सर्वम् मम देव देव

– **सौ. प्रमिला द. आजगावकर**
गोरेगाव (पश्चिम),
मुंबई.

८४ सालचा एक अनुभव. नेहमीप्रमाणे मी श्रावण महिन्यात श्री. साईसच्चरित्र वाचायला घेतले. अर्धे अधिक वाचून होते, तोच एक दिवस अंग दुखून सपाटून ताप भरला. छातीत दुखू लागले. डोके भयंकर दुखू लागले. उलट्या सुरु झाल्या. एक्सरे, कार्डिओग्राम झाले. हार्टला सूज होती. सबब १०४॥ डिग्री ताप. छातीचे व नाडीचे ठोक अनियमित पडू लागले. डॉक्टरांनी सांगितले, कोणत्याही क्षणी हॉस्पिटलमध्ये न्यावे लागेल. सर्व जुन्या नव्या आजारांनी एकदम हल्ला केला होता. माझे वाचन बंद पडले. म्हटले, ४ ओळी तरी वाचीन, पण तेही अशक्य झाले. फार वाईट वाटले.

मी सतत तोंडाने सारखी साई साई सा–आई असा जप करत होते. परंतु सबब ४ दिवस व रात्री एकही संदेश येईना. सभोवती काळ्या आकृत्या दिसू लागल्या. त्या काळ रात्रीच होत्या. घरातील सर्व माणसे घाबरली होती. आता काही खरे नाही. कोणत्याही क्षणी मी काळाचा ग्रास होणार होते. पण माझी अतूट श्रद्धा होती, मला साई वाचवणारच . आणि पाचव्या दिवशी शब्द ऐकू आले, मी आलो, घाबरु नकोस. मी निश्चिंत झाले.

१५-२० दिवस पोटात अन्नाचा एक कणही गेला नव्हता. उलट्या सतत चालूच होत्या. सतत १२ दिवस १०४॥ डिग्री ताप होता. देह अस्थिपंजर झाला होता. उठून बसता पण येत नव्हते. तो मृत्यूयोग होता आणि तो श्रीसाईमुळेच टळला. थोडे बरे वाटल्यावर मी साईसच्चरित्र पुन्हा वाचले.

---

# अगाध साईलीला

**– श्री. जी. एस. पाटील**
बी. एस सी.
बँक इन्स्पेक्टर, बिलोली, नांदेड.

मी एक सहकारी बँक कर्मचारी असून दि. ९ जानेवारी १९७६ ला माझी नांदेड जिल्ह्यातील हदगांव येथे 'बँक क्लार्क' म्हणून सुरुवातीस नेमणूक झाली होती. येथे बँकेत नोकरीस असताना माझ्या घराजवळील शेजारी दरवर्षी श्रीक्षेत्र शिरडीस साईबाबांच्या दर्शनास जात असत. एकदा ते शिरडीला जात असताना त्यांनी मला सहज त्यांच्यासोबत शिरडीला येण्याचे सुचविले. त्यावेळी मी त्यांना म्हणालो, "माझ्या नोकरीत मला पदोन्नती होऊ दे. मग मी आपल्या बरोबर शिरडीला साईबाबांच्या दर्शनासाठी निश्चितच येईन." त्या दिवसापासून मी श्रीसाईंची मनोभावे प्रार्थना करण्यास सुरुवात केली. त्याप्रमाणे अवघ्या दोन-तीन महिन्याच्या कालावधीतच मला "बँक तपासणी अधिकारी" म्हणून बढती मिळाली. या प्रचितीचा अनुभव येताच माझ्या मनात श्रीसाईंच्या दर्शनासाठी आस्था निर्माण झाली. ठरल्याप्रमाणे मी शेजाऱ्यांसोबत दि: ७ जून ७९ ला प्रथमतः शिरडीला गेलो. तेथे श्रीसाईबाबांचे दर्शन होताच माझे मन अगदी तृप्त झाले.

माझी बदली हदगावहून नायगांव (बा.), ता. बिलोली, जि. नांदेड येथे दि. १६/७/७९ला झाली. माझे लग्न होऊन चार-पाच वर्षे झालेली होती. या कालावधीत माझ्या पत्नीस प्रसुती काळात अतिशय त्रास होत होता. अनेक प्रकारच्या औषधा/इंजेक्शनसाठी अतोनात पैसा व डॉक्टरी इलाज करून दोन वेळा त्रासाने प्रसुती होऊनही संतती (अपत्य) जिवंत राहू शकली नव्हती. या घटनेमुळे माझ्या पत्नीच्या मनावर अतिशय मानसिक ताण व शरीर प्रकृतीत अशक्तपणा झाला होता. नायगांव येथे आल्यानंतर तिसऱ्या प्रसुतीच्या कालावधीत माझ्या पत्नीने नित्य श्रीसाईबाबांचे नामस्मरण सुरू केले आणि काय आश्चर्य! या प्रसुतीच्या वेळी मात्र माझ्या पत्नीला नेहमीप्रमाणे डॉक्टरी इलाज न करता, औषधी गोळ्या न घेता, दि. ११/९/७९ ला मुलगा झाला. श्रीसाईबाबांच्या आशीर्वाद व कृपादृष्टीमुळे हा मुलगा झाला. म्हणून त्याचे नाव "साईनाथ" ठेवण्यात आले आहे. तो सध्या इयत्ता तिसरीत शिकत असून तो शिक्षणात अतिशय हुशार आहे.

# स्वीकारली भक्ती साईने

– श्री. गणेश बा. नाईक
पणजी, गोवा.

शुक्रवार, दि. २७-११-८७ रोजी संध्याकाळी ५ वाजता शिर्डीला श्री साईबाबांच्या समाधी मंदिरातील मूर्तीला मी हार घातला आणि बाबांना मन:पूर्वक प्रार्थना केली की, ''बाबा, हा माझा हार आपल्या गळ्यात निदान पाच मिनिटे तरी राहू द्या.'' समाधी नंतरही बाबा आपल्या भक्ताच्या मनातला हेतू किती तत्परतेने ओळखतात, ह्याची कसोटी घेण्यासाठी माझा हार बाबांच्या गळ्यात किती मिनिटांपर्यंत टिकून राहातो, हे पहाण्यासाठी समाधी मंदिरातील घंटेच्या खांबाजवळ बसून राहिलो.

साईभक्तांनी अर्पण केलेले हार बाबांच्या गळ्यात एक भटजी घालीत होता, तर दुसरा सेवेकरी ते काढीत होता. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे माझा मात्र हार बाबांच्या गळ्यात जसा चिकटूनच राहिला होता. बाबांची ही किमया बघून मी मनातल्या मनात आनंदीत झालो. मी बाबांकडे फक्त पांचच मिनिटे मागितली होती, पण बाबांनी तो माझा हार आपल्या गळ्यात चक्क अर्धातास ठेऊन घेतला. नंतर तो हार भटजीने बाबांच्या गळ्यातून काढून मूर्तिमागील प्रभावळीला लावून ठेवला. ह्या हाराचे भटजी आता काय करतो, हे पाहाण्यासाठी मी समाधी जवळच खिळून राहिलो. नंतर ६.४५ वाजता धुपारतीची वेळ झाल्याने मी इतर साईभक्तांबरोबर समाधी जवळच आरतीसाठी उभा राहिलो. ह्यावेळी भटजीने बाबांची फुलांनी इतस्ततः आच्छादलेली समाधी साफ केली आणि तिच्यावर चादर घातली.

सर्वव्यापी, सर्वज्ञानी, सर्वशक्तीमान श्री सांईबाबांनी मला आणखी एक सुखद धक्का दिला, तो म्हणजे भटजीने तो माझा प्रभावळीला लावून ठेवलेला हार एकुलता एक बाबांच्या समाधीवर धुपारतीसाठी वाहिला, आणि ह्या एकाच हाराने त्या दिवशी धुपारती पार पाडली. ह्या प्रसंगाने बाबांच्या दिव्य प्रेमाने मी भारावून गेलो आणि माझ्या डोळ्यातील आनंदाश्रुंना मी थोपवू शकलो नाही. माझा हार फक्त पाच रुपयांचा होता, तर इतरांचे दहा, पंधरा रुपयांचे असूनसुद्धा बाबांनी ते आपल्या गळ्यात एक मिनिटसुद्धा टिकवून घेतले नाही, उलट माझा हार धुपारतीच्या वेळी समाधीला घालून घेतला. सांगायचं म्हणजे, बाबा केवळ हयात असताना भक्ताच्या मनातील इच्छा ओळखत नसत, तर समाधीनंतरही कितीतरी पटीने कॉम्प्युटरच्या गतीने कितीतरी भक्तांच्या इच्छा आकांक्षा क्षणात ओळखून पुऱ्या करतात, ह्याचा आणखी एक दाखला मला मंगळवार दि. १-१२-८७ रोजी मिळाला. ह्या दिवशी शिर्डीहून गोव्याला जाण्याअगोदर मी साईबाबांना संपूर्ण झेंडुच्या फुलांचा मोठा हार घालायच ठरवलं. झेंडुचा हार बाबांच्या गळ्यात फारच सुरेख शोभून दिसतो, म्हणून झेंडूचा सुरेख हार घेऊन मी तो बाबांना अर्पण करायला गेलो. ह्यावेळी मी बाबांना मनातल्या मनात म्हटलं की, ''बाबा, मी आता

गोव्याला जात आहे, मला इतर भक्तांची जाणीव आहे, पण माझा हा सुंदर हार केवळ एकच मिनिट आपल्या गळ्यात राहू दे.'' माझा हार बाबांना घातल्यानंतर परत मी समाधी मंदिरासमोरील नंदीच्या मागे उभा राहिलो.

श्री साईबाबांना पांघरलेल्या गडद निळ्या रंगाच्या शालेवर पिवळ्या झेंडुंचा माझा तो हार फारच उठून दिसत होता. मी बाबांकडे फक्त एकच मिनिट मागितलं होतं, पण बाबांनी तो हार जवळ जवळ पंधरा मिनिटे आपल्या गळ्यात ठेऊन घेतला. ह्या हाराचा बाबांनी मला नंतर आश्चर्याचा गोड धक्का दिला. तो असा– माझा तो हार नंतर भटजीने दुसऱ्या एका सेवेकऱ्याकडे दिला आणि त्याला खुणविले. तो सेवेकरी काय करतो, हे बारकाईने पाहात राहिलो. तो सेवेकरी हार घेऊन सरळ समाधी मंदिरातील दालनात गेला (जिथे बाबांनी हाताळलेल्या वस्तु व साईंचा फोटो ठेवलेला आहे) आणि त्या दालनात ठेवलेल्या साईबाबांच्या फोटोला (ज्याच्या समोर गुरुवारच्या पालखीत ठेवायचा बाबांचा सटका व पादुका ठेवलेल्या आहेत) घातला. कुतुहलाने मी त्या सेवेकऱ्याला विचारले की 'हा हार बाबांच्या फोटोला किती वेळपर्यंत असेल', तर तो उत्तरला, 'उद्या सकाळी आठ वाजेपर्यंत असेल'. म्हणजे जवळ जवळ २४ तास. माझा आनंद गगनात मावेना. ह्या प्रकाराने मला कळून चुकलं की श्री साईबाबांनी माझी भक्ती पूर्णपणे स्वीकारली आहे. १९८७ मधील शिर्डीची माझी सतत चौथी भेट खरोखरच बाबांनी स्मरणीय करुन टाकली. साईबाबांचा निरोप घेऊन गोव्याला निघताना मी पुटपुटलो ''साईंचा झाला प्रसाद, आम्ही आता जातो गोव्यात.''

# उदीचा महिमा

– सौ. सुजाता सुधाकर कदम
कांदिवली (प.), मुंबई.

माझ्या लग्नापूर्वी मला बरे नव्हते. माझा घसा खूप दुखायचा. मी डॉक्टरकडे गेली. मला घटसर्प झाल्याचा संशय डॉक्टरांनी व्यक्त केला व ताबडतोब तपासणी करायला सांगितले. परंतु माझा माझ्या बाबांवर व बाबांच्या उदीवर पूर्ण विश्वास होता. मी एकसारखी पाण्यात उदी टाकून प्यायची.

संध्याकाळी आम्ही तपासणीकरिता गेलो. मनातून मी सारखा बाबांचा जप करीत होते व रिपोर्ट नॉर्मल येण्यासाठी प्रार्थना करीत होते. आणि खरोखरच माझा रिपोर्ट नॉर्मल आला. मला घटसर्प झाला नसल्याचे मला डॉक्टरांनी सांगितले. हे सर्व

बाबांच्या उदीमुळेच झाले. बाबांची उदी म्हणजे एक गुणकारी औषध आहे, ज्याने रोग्याला शंभरटक्के बरे वाटते.

या गुणकारी उदीमुळेच मला कायम होणारा सर्दीचा त्राससुद्धा बरा झाला आहे. मला सारखी सर्दी व्हायची. ख- औषधे केली, परंतु बाबांच्या उदीमुळेच मी त्या त्रासापासून मुक्त झाले.

# बाबांनी शब्द पाळला

**— श्री. नानासाहेब मल्हारी ढोबळे**

आंबेगाव, पुणे

आम्ही अवसरी बु।। येथे रहात होतो. त्यावेळेस संध्याकाळचे ९ वाजले होते. वार शुक्रवार. माघ पौर्णिमा दि. १३/२/१९८७. स्वयंपाक झालेला होता. बाबांची पूजा करून मी जेवायला बसलो. माझी पत्नी मिरचीची भजी तळत होती. भजी तळल्यानंतर तिने उकळलेल्या तेलाची कढई किचन टेबलवरून तेल थंड होण्यासाठी खाली गारव्यावर ठेवली. माझी ३ नंबर मुलगी, वय ३ वर्षे किचन टेबलला धरून उभी होती. पाठीमागेच तेलाची कढई होती. आमच्या कुणाच्याही लक्षात न येता मुलगी टेबल सोडून मागे वळली. पाठीमागे गरम तेलाची कढई असल्यामुळे तिचा उजवा पाय कढईत पडला. मुलीने आक्रोश केला. आम्ही सर्व घाबरलो. मी सर्व भार बाबांवर टाकला व मुलीला घेऊन बाबांच्या छबीजवळ (देव्हाऱ्याजवळ) गेलो. बाबांची उदी घेतली. मुलीला लावली. थोडी पिण्यास (पाण्यातून) दिली. पायावर चोळली. बाबांना विनंती केली की, बाबा माझ्या मुलीच्या पायाला थोडासा देखील फोड येऊ देऊ नका मी उद्या सकाळी आपल्या दर्शनाला येईन. दुसऱ्या दिवशी शनिवार. गुरूप्रतिपदा. गाणगापुर यात्रा.

आमचे सर्वांचे लक्ष मुलीच्या पायाकडे लागले होते. कसेतरी मी मुलीला माझ्याजवळ झोपविले. सकाळी ५।। वाजता उठलो व मुलीच्या पायाकडे पाहिले, तो काय आश्चर्य! माझ्या बाबांनी माझी विनंती ऐकली होती. मुलीच्या पायाला कुठलीही जखम किंवा फोड आलेला नव्हता.

# श्री साईबाबांची कृपा

– श्री. भारत रा. नगरकर
दहिसर (पश्चिम), मुंबई.

नऊ वर्षांपूर्वीची गोष्ट. मी त्यावेळी कॉलेज करुन एक साधीसुधी नोकरी सांभाळत होतो. घरची परिस्थिती त्यावेळी जरा बिकटच होती. लहान भाऊ-बहिण शिकत होते. त्यातच माझ्या वडिलांना हार्ट-अटॅक आला व त्यांना आम्ही हॉस्पिटलमध्ये दाखल केले. त्यामुळे कुठेतरी चांगली नोकरी करणे माझ्या दृष्टीने आवश्यक होते. मिळे ते काम करण्याची माझी तयारी होती. तसेच शिकायचीसुद्धा खूप इच्छा होती.

नोकरीच्या शोधात फिरत असता माझ्या आईच्या मैत्रिणीच्या यजमानांशी माझी भेट झाली. त्यावेळची एकूण परिस्थिती पाहून त्यांनी नोकरीसाठी माझ्याकडून अर्ज लिहून घेतला. सरकारी नोकरी होती व ती मला मिळावी, अशी माझी फार इच्छा होती. अर्ज दिल्यानंतर २-४ दिवसातच मी माझ्या मित्रांसह शिर्डी येथे सहलीला गेलो होतो. मी प्रथमच शिर्डीला जात होतो. माझे आई-वडील १९६६ साली शिर्डीला जाऊन आले होते. आईवडिलांनी पूज्य बाबांची महती आम्हा भावंडांना सांगितली होतीच. त्यामुळे पूज्य बाबांच्या दर्शनाची एक प्रकारची आंतरिक ओढ लागलीच होती. शिर्डी संस्थानात गेल्याबरोबर प्रथम मी पूज्य बाबांच्या समाधीचे दर्शन घेतले व नोकरी मिळण्यासाठी बाबांना सांकडे घालून आम्ही मुंबईला परतलो. तोपर्यंत माझ्या वडिलांची प्रकृती सुधारली होती.

शिर्डीहून आल्यानंतर २० दिवसांनी मला मुलाखतीसाठी बोलावण्यात आले. जाताना मनात साईबाबांचे नामस्मरण चालू होते. गळ्यात साईंचा ताईत होता. मला स्टेनोग्राफीचा कोणता अनुभव नव्हता परंतु मनात जबरदस्त साईश्रद्धा असल्याने हिंमत व धैर्य आले होते. शॉर्टहॅण्ड टायपिंगची परीक्षा गुरुवारीच, ११ डिसेंबरला झाली. त्यानंतर दुपारी मुलाखत झाली. मी त्यात उत्तीर्ण झालो व मला लगेच सोमवारी १५ डिसेंबर रोजी कामावर रुजू होण्यास सांगितले. माझ्या मनातील इच्छा पूज्य बाबांनीच पुरविली. माझे मन अतिशय आनंदाने भरुन आले. श्री बाबांच्या कृपेने आजतागायत माझी सरकारी नोकरी व्यवस्थित चालू आहे. त्यानंतर जवळ-जवळ ९ वर्षांनी सहकुटुंब शिर्डीला जाण्याचा योग आला व आम्ही कृतकृत्य झालो.

दुसरा प्रसंग असा की, माझ्या लहान मुलीला जन्मापासूनच शौचास होताना फार त्रास व्हायचा. अनेक घरगुती-डॉक्टरी उपाय केले, पण त्याचा काही एक उपयोग झाला नाही. शेवटी आम्ही बाबांना सांकडे घातले. त्यांची करुणा भाकली. आणि माझ्या परमपूज्य, करुणेचा सागर असणाऱ्या श्रीबाबांनी आमची हाक ऐकली, व लगेच दुसऱ्या दिवसांपासून तिच्या तब्येतीत फरक पडला व तिला कोणताही

त्रास न होता शौचास होऊ लागले. त्यावेळी आमचे डोळे आनंदाश्रूंनी भरुन आले. खरोखरच बाबांची लीला अगाध आहे.

# स्वामी तिन्ही जगाचा!
# साईविना भिकारी!

**— सौ. मंदाकिनी जनार्दन पाटकर**
परेल, मुंबई.

२० वर्षांपूर्वी माझी तिसरी मुलगी तीन वर्षांची असताना एक दिवस अचानक भरपूर तापाने आजारी झाली. तिला के.ई.एम्. हॉपिस्टलमध्ये ठेवावी लागली. दोन तीन दिवसांनी तिला एका पायाची हालचाल करता येईना, आणि तिला "पोलिओ" झाल्याचे डॉक्टरांनी निदान केले. अशा लुळ्या मुलीचे पुढील भवितव्य काय? अशा विचारांनी माझा जीव खचून गेला. बाबांच्या नावाने रोज उदी लावून डॉक्टर जे जे औषधोपचार सांगतील, त्याप्रमाणे केले. आतापर्यंत तिच्या पोलिओ झालेल्या पायावर गेल्या २० वर्षात चार वेळा हाजीअली येथील हॉस्पिटलमध्ये ऑपरेशन्स होऊन आता ती कॅलीपरशिवाय चालू शकते. सध्या ती एका कंपनीत "पंच ऑपरेटर" म्हणून काम करते. पोलिओमुळे लुळी झालेली मुलगी केवळ बाबांच्या आशीर्वादामुळेच सर्वथः स्वतःच्या पायावर उभी आहे.

सप्टेंबर ८२ मध्ये माझे पती (वय ६२ वर्षे) फुटपाथवरुन चालत असता मागून एका सायकलस्वार मुलाने धडक दिली. त्यांना अपघात होऊन त्यांच्या मांडीच्या हाडाला फ्रॅक्चर झाले. त्यात त्यांना मधुमेह आणि रक्तदाबाचे दुखणे असल्यामुळे ऑपरेशन करणे कठिण होते. माझी मुलगी वेस्टर्न रेल्वे हॉस्पिटलमध्ये सिस्टर असल्यामुळे तेथील डॉक्टरांच्या परिश्रमांना व बाबांच्या आशीर्वादामुळे यश लाभून ते पूर्ण बरे होऊन व्यवस्थित हिंडू फिरु लागले. त्यानंतर पुन्हा एप्रिलमध्ये त्यांना अचानक ताप आला म्हणून आमच्या फॅमिली डॉक्टरांनी त्यांना एक इंजेक्शन पूर्वी फ्रॅक्चर झालेल्या बाजूवरच दिले व तेथे एक मोठी गाठू होऊन ती फार दुखू लागली. तेथे ॲपसेस तयार झाले व नंतर तेथे एक छोटीसी शस्त्रक्रिया करुन त्यातून रक्तमिश्रित पू काढून त्या जखमेवर टाके घातले.

ऑपरेशनच्या २/३ दिवसांनी त्यांच्या पायाला व पोटाला सूज दिसू लागली आणि पोटाचा आकार वाढू लागला. त्यावर डॉक्टरांनी रक्तातील प्रोटीन लेवल कमी

झालेले आहे असे निदान केले व त्यांना असायटीस झाला, असे सांगितले. एका आठवड्यात साधारण दोन/तीन वेळा १ ते १॥ लिटर पाणी काढण्यात आले. नंतर लिव्हर स्कॅन व सोनोग्राफी करावयास सांगितले. परंतु त्यासाठी साधारण १ ते १॥ महिन्यांची अपॉईन्टमेन्ट यादी सर्व हॉपिस्टलमध्ये होती. तरी बाबांचे वेळोवेळी नाव घेऊन आम्ही त्यांना टाटा हॉस्पिटलमध्ये घेऊन गेलो. आम्हाला तेथे पोहचायला उशीर झाला आणि स्कॅनिंगचे काम बंद झाले होते. परंतु तेथील डॉक्टरांना विनंती करुन आमच्यासाठी नवीन औषध (डाय) तयार करुन त्याच दिवशी ते स्कॅनिंग करुन दिले. हे सर्व माझ्या बाबांमुळेच!!! स्कॅनिंग नंतर अनुमान निघाले की त्यांना सिन्हॉसिरा ऑफ लिव्हर नावाचा दुर्धर रोग झाला आहे. कधीही दारु-सिगारेट न पिणाऱ्या व्यक्तीला असा रोग ऐकून आम्ही सर्वस्वी हतबल झालो. डॉक्टरांच्या बोलण्यातही निराशा जाणवू लागली. मी साश्रूनयनांनी बाबांचा धावा करुन त्यांना साकडे घालत होते की, "बाबा आता माझ्या कुंकुवाचे रक्षण करणे हे तुमच्याच हातात आहे." बाबांची उदी अंगाला व पाण्यातून प्यायला देत असे. त्याचप्रमाणे सर्व डॉक्टरी उपायसुद्धा चालू होते. या कालावधीत बाबांनी अनेक लोकांच्या मदतीच्या रुपाने मला सहाय्य केले. साधारण एका महिन्याच्या औषधोपचाराने त्यांना साधारण बरे वाटू लागले. विशेष म्हणजे या संकटाच्या वेळी बाबांचा शिरडीचा प्रसाद आम्हाला हॉस्पिटलमध्ये वेळोवेळी अनेक साईभक्त आणून देत.

अशा या श्री साईबाबांच्या अगाध लीलेमुळेच माझे पती अशा दुर्धर आजारातून बरे होऊन पूर्ववत व्यवहार करीत आहेत.

# नित्य घ्या प्रचित अनुभवे

— **श्री. का. गो. जोशी**
वसमतनगर, परभणी.

'नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य । नित्य घ्या प्रचित अनुभवे' ह्या वचनाचा मला प्रत्यय आला. मी एका चांगल्या कंपनीमध्ये 'ड्रॉफ्ट्समन' म्हणून मुंबईस नोकरीला होतो. शिवाय माझे 'सोमय्या पॉलिटेक्निक, विद्याविहार'ला पार्ट-टाईम डी.एम.ई. चालू होते. परंतु मला मुंबईला खूपच एकटेएकटे वाटायचे, कारण आई-वडील गावीच रहात. शिवाय पूर्ण शिक्षण माझ्याच भागामध्ये झाल्यामुळे मी एकदा शिरडीस गेल्यानंतर बाबांकडे 'मला गावाच्या आसपास नोकरी मिळाली तर खूपच बरे होईल,' असे बोलून गेलो आणि काय आश्चर्य! त्यानंतर मला अवघ्या

सहा महिन्यातच आय.टी.आय. मध्ये 'निदेशक' (इन्स्ट्रक्टर) म्हणून वसमतला नोकरी लागली. येथूनही पत्राद्वारे डी.एम.ई. पूर्ण करता येते. ही शासकीय नोकरी, शिवाय माझ्या गावाच्या जवळच. त्यामुळे मला त्यावेळेस झालेला आनंद खरोखरच शब्दात व्यक्त करणे तरी शक्य नाही. वेळोवेळी छोटेमोठे असेच खूप अनुभव येतात.

# बाबांच्या कृपेने पास झाले

**— कु. निर्मला ह. मोरे**
अलिबाग, रायगड.

मी एप्रिल/ऑक्टोबर १९८६ या वर्षी एम.कॉम.च्या शेवटच्या परिक्षेस बसले होते. परंतु मी साईबाबांना विसरुनच गेले म्हणा ना! म्हटलं प्रत्येक छोटी छोटी गोष्ट काय साईबाबांना सांगायची, म्हणून मी म्हटलं जाऊ दे! साईबाबांना या परिक्षेच्या यशासाठी काडीमात्र त्रास द्यायचा नाही, कारण परिक्षेचे पेपर देखील चांगले गेले होते. पण काय नशीब असतं, जेव्हा माझ्या हातात माझा रिझल्ट पडला, तेव्हा रिझल्ट पाहून मला दु:खद धक्का बसला. म्हटलं, पेपर एवढे छान जाऊन देखील हे अपयश कसे? या गोष्टीवर मी फार विचार केला. नंतर समजून चुकले की, परीक्षा झाल्यानंतर याबाबत साईबाबांची आठवण करावयास हवी होती. झाले, नंतर .एप्रिल १९८७ मध्ये मी राहिलेला एक पेपर दिला, तो फार कठीण होता. वाटलं, आता देखील आपल्या पदरात अपयशच पडणार! पण लगेच मी जागे झाले. साईबाबांना माझ्या पेपरची सर्व महती सांगितली व म्हटलं, साईबाबा, तुम्ही मला फक्त एम. कॉमला पास करा, बस्स! आणि खरंच एप्रिल १९८७च्या परिक्षेचा निकाल मार्च १९८८ मध्ये लागला आणि रिझल्टचे पॅकेट हातात पडताच मी साईंचे नामस्मरण करून ते पॅकेट फोडले. आणि .काय आश्चर्य! माझाच माझ्यावर विश्वास बसला नाही. मी उच्च द्वितीय श्रेणीत एम.कॉम. परीक्षा पास झाले. रिझल्ट पहाताच माझ्या ,आनंदाला पारावार राहिला नाही.

# साई माझी माऊली हाकेला माझ्या धावली

– श्री मधुसूदन विठ्ठल सामंत
मराठी साहित्य प्राज्ञ,
म्हापण, सिंधुदुर्ग.

गेल्या दोन वर्षापूर्वी मी आमच्या राहत्या गावीच प्राथमिक शिक्षकाची नोकरी करत होतो. गावात असूनसुद्धा माझी विशेष सोय होती, असे मुळीच नाही. उलट फार गैरसोय होती. परन्तु असेल त्या परिस्थितीत हसत खेळत दिवस काढणारा आणि वारा येईल तशी पाठ फिरवणारा मी माणूस आहे. त्यामुळे मी अजात-शत्रू आहे.

नोकरी करीत असताना पोष्ट-ऑफिसमध्ये लोकांची सेव्हिंग बँकेची नवीन नवीन खाती उघडणे, सार्वजनिक वाचनालयाला उत्कृष्ट पुस्तकांची यादी तयार करुन देणे, कोणातरी संस्थेची पावती पुस्तके खपवणे इत्यादि कामे मी आवडीने विनामोबदला करीत असे.

आमचे गावचे तलाठी महा. कुर्ले यांचे आणि माझे संबंध गेल्या ७८ सालचे संपापासून अतिशय घनिष्ट आणि जिव्हाळ्याचे बनले गेले.

त्यांनी सहज केलेल्या विनंती वरुन मी आमच्या तेरावळे वाडीतील पाच सहा खातेदारांचा सरकारी शेतसारा खातेदारांकडून घेऊन चावडीत जमा करुन पावत्या घेतल्या आणि माझे तसेच निकडीचे काम निघाल्याने मी तालुक्याचे गावी जायला निघालो.

जाताना ओव्हर ऑयलिंगसाठी सायकल, इतर काही सामानाच्या दोन तीन पिशव्या आणि धाकटा मुलगा शैलेन्द्र बरोबर घेतला. एस.टी.मध्ये बसल्यावर हातातील हँडबॅग कोठे ठेवली तेच मला स्मरेना. बॅग गेल्याने माझे धाबे दणाणले. त्या बॅगेत सुमारे ७५ रुपये रोख आणि दस्ताच्या पावत्या होत्या. वाचनालयाची वाचनीय अशी २/३ .पुस्तके होती.

कदाचित ज्या ठिकाणी गाडीत बसलो, त्या ठिकाणी हातातील बॅग विस्मरणाने राहिली नसेल ना? ही शंका मनात आली आणि गाडी थांबवून उतरलो. उलट दिशेने धावत पळत सुमारे दोन-तीन मैल गाडी सुटली त्या जागी गेलो पण एस.टी.च्या शेडमध्ये कोणी प्रवासी नव्हता आणि माझी बॅगही नव्हती.

वाटेत जाता जाता मला परत तलाठी भेटले. त्यांना पिशवी आणि पावत्या हरवल्याचे सांगून मला परत डुप्लीकेट पावत्या मिळतील का? असे विचारले. ते म्हणाले, "पावत्या मिळतील. पण फार द्राविडी प्राणायाम करावे लागतील. आधी पावत्याची बॅग सापडते काय पाहा. न मिळाल्यास मग पुढे विचार करु."

संकटकाळी माणूस परमेश्वराचा धावा करतो. मी तरी त्याला अपवाद कसा असणार! मी एकसारखा साईनाथांचा मनातल्या मनात धावा करत होतो.

सर्वेश्वरा साईनाथा, माझ्या संकटकाळी धाव. माझ्या या हरवलेल्या वस्तु मला

परत मिळू दे. मला यावेळी तुझाच आधार आहे. जर माझी बॅग मला सापडली तर मी तुला अभिषेक करीन. मी मनापासून बाबांची मनोमन करुणा भाकत होतो.

तालुक्याला जाणाऱ्या मागच्या गाडीने अगदी विषण्ण मनाने गेलो. गाडीत सीटवर बसल्यावर समाधीवर बसलेल्या बाबांची मूर्ति नजरेसमोर आणून एकसारखा मनातल्या मनात "ॐ नमः साईनाथाय" या मंत्राचा जप चालू होता.

गाडीतून उतरताच माझा मुलगा शैलेन्द्र मला भेटला. माझी हरवलेली बॅग हातात घेऊन उभा होता. बॅग दिसताच मला अतिशय आनंद झाला. मी मुलाला विचारले, बॅग मिळाली कशी आणि कोठे?

तो म्हणाला "कोणी पानवाल्या मुसलमानाने (खायची पाने विकणाऱ्या) आपण होऊन माझ्या हाती पिशवी दिली."माझ्या सर्व वस्तू जशाच्या तशा त्या बॅगेत होत्या. सदर विस्मयकारक घटना पाहून मला अचंबा वाटला. माझ्यासाठीच बाबा एस्.टी.चे प्रवासी बनले नसतील ना, असे वाटून माझे डोळे पाणावले.

तो सारा दिवस बाबांची ही लीला माझ्या मनःचक्षु समोर तरळत होती.

# बाबांच्या उदीची किमया

**– सौ. सुगंधा ए. कुर्डेकर**
भाईंदर (पूर्व), ठाणे.

१५ जुलै १९८६ ला मला फार अस्वस्थ वाटत होते. तरी मी बाबांचे नाव घेतच दोन दिवस काढले. सतत बाबांचे नामस्मरण करीतच मी तिसऱ्या दिवशी डॉक्टरकडे गेले. डॉक्टरांनी मला कार्डीओग्राम काढण्यास सांगितले. हे ऐकताच मी फार घाबरले. मी आमच्या स्पेशालिस्ट डॉक्टरकडे गेले. डॉक्टर म्हटल्यावर पुन्हा सर्व तपासण्या आल्या. पुन्हा भीती. बाबांच्या कृपेने सर्व रिपोर्ट नॉर्मल आले. खरोखर माझे मनोरथ पूर्ण झाले.

दुसरा अनुभव म्हणजे, २६ मे ८७ ला आमच्या आईला श्वासोच्छवासाचा त्रास झाल्यामुळे हॉस्पिटलमध्ये ठेवावे लागले. त्यावेळी तिच्या शेजारी एक ७-८ वर्षांची मुलगी होती. तिला लिव्हरचा त्रास होता. ती काहीच खात पीत नव्हती. नुसती पडून रहायची. तिला पहाताच आम्हाला फार वाईट वाटले. त्यावेळी आमच्या जवळ बाबांची उदी होती. आम्ही तिला थोडी पाण्यातून पाजली व थोडी तिला लावली. तिला सांगितले, बघ आता तू बरी होशील. खरोखरच ती मुलगी दुसऱ्या दिवशी उठली व जेवली. तिसऱ्या दिवशी तर बरी होऊन घरी पण गेली. आहे की नाही बाबांच्या उदीची किंमया!

# श्री साईबाबा थोर तुमचे उपकार

– श्री. हरिश्चंद्र को. लोखंडे
हवेली, पुणे.

गेल्या दहा वर्षापासून आमचे कुटुंब साईबाबांची पूजा नित्यनियमाने करीत आहे. वर्षातून दोन वेळा बाबांच्या समाधीचे दर्शन घेण्याकरिता शिर्डीला जाण्याचा संकल्प मी केलेला आहे. श्री साईबाबांच्या कृपेने मला बरेच काही मिळालेले आहे. नुसत्या श्री साईंच्या नामस्मरणाने माझी अनेक संकटे दूर झालेली आहेत.

आमच्या घरामध्ये श्री साईबाबांची १४" X २०"च्या फोटोची तसबीर लावलेली आहे. आमच्या घरामध्ये एक अविस्मरणीय घटना घडली. दिनांक ११ ऑक्टोबर १९८७ची ही घटना आहे. तो दिवस रविवारचा होता. आमची बिल्डिंग उरुळी कांचन येथील महात्मा गांधी विद्यालया शेजारी आहे. माझ्या तीन महिन्याच्या मुलीचा "जावळ" काढण्याचा कार्यक्रम त्या दिवशी होता. त्या दिवशी दिवसभर सारखा पाऊस चालू होता. सायंकाळी सहा वाजल्यानंतर पावसाचा जोर वाढला. महाप्रलय होणार की काय? अशी भीती वाटत होती. आमच्या घरामागील ओढा पूर आल्यामुळे दुथडी भरुन वाहात होता. विजेचा अगदी सुळसुळाट चाललेला होता. वारा तर अजिबात थांबलेलाच होता. संपूर्ण गावची लाईट गेलेली होती. त्यावेळी विजेचा लखलखाट इतका होता की, लाईट गेल्यासारखे मुळी वाटतच नव्हते. बरोबर सायं. पावणेसात वाजता प्रचंड आवाज झाला. त्या आवाजामुळे आमच्या कुटुंबातील प्रत्येकाला वेगवेगळ्या प्रकारची प्रचिती आली. कुणाला थोबाडीत मारल्यासारखे वाटले, तर कुणाला पाठीवर आसुडाचे फटके मारल्यासारखे वाटले, तर कुणाला पाय खेचल्यासारखे वाटले .इ.इ. त्या आवाजाबरोबर हॉलीबॉलच्या चेंडूच्या आकाराचा भयंकर तेज असलेला लखलखता विजेचा लोळ आमच्या बिल्डिंगवर पडणार, इतक्यात कुठल्यातरी अज्ञात शक्तीने तो विजेचा गोळा हाताने दूर लोटल्यासारखा आम्हाला भास झाला, व आमच्या डोळ्यासमोरुन तो तेजस्वी लखलखता गोळा बिल्डिंगच्या बाजू बाजूने एखाद्या पराभव झालेल्या राजासारखा जाताना आम्ही पाहिला. नंतर तोच गोळा आमच्या बिल्डिंगपासून थोड्या दूर अंतरावर जमिनीवर आपटला. ही घटना घडल्याबरोबर मी माझ्या पत्नीला म्हणालो, हा दुसऱ्या, तिसऱ्या शक्तीचा परिणाम नसून साक्षात् श्री साईबाबांचाच शक्तीरुपी चमत्कार आहे. मी ताबडतोब बाबांच्या तसबीरीला उदबत्ती लावून बाबांच्या चरणी प्रणाम केला.

# श्रीसाईनी जीवन दिव्य केले

**अनुभव : श्री. लक्ष्मण रावंजी कदम**
खालापूर, रायगड.
शब्दांकन : श्री. विजय बाबुराव चव्हाण
खोपोली, रायगड.

'पंगु लंघयिसी गिरीम्' या वचनोक्तिची खरी प्रचिती आली आहे; ती आमच्या कारखान्यातील एक कामगार व माझे स्नेही श्री. कदम यांना! श्री. कदम हे तसे अशिक्षित व त्यांची आर्थिक परिस्थितीही नाजुकच, कारण प्रपंच मोठा आणि कमविणारे एकटेच. सुमारे ३ वर्षांपूर्वी त्यांचे मानसिक परिवर्तन झाले. गळ्यात तुळशीमाळ घातली व आयुष्याचे वळण बदलून पूर्ण शाकाहार व निर्व्यसनतेचे व्रत त्यांनी अंगिकारले.

हे सर्व करीत असतानाच एक वर्षापूर्वी श्री. कदम यांच्या जीवनात अचानक एक दुर्दैवी घटना घडली. ते नेहमीप्रमाणे कारखान्यात काम करीत असताना एक तारेचा तुकडा उडाला व क्षणात त्यांचा डावा डोळा पूर्ण निकामी झाला. नंतर ३-४ महिने दवाखान्यात उपचार करून शेवटी एक डोळा गमावून कामावर यावे लागले. या दरम्यान श्री. कदम यांनी वडवळ येथे नवीन घर बांधले. कारण जवळच्या गावातील त्यांचे जुने घर अपुरे पडू लागले होते. येथेही त्यांच्या मार्गात एक नवीन संकट उभे राहिले. नवीन घरात रहाणे त्यांना कठीण होऊ लागले. त्यांच्या कुटुंबातील मुलगा, सून वा पत्नी कोणीही येथे झोपले की, रात्री त्यांच्या स्वप्नात एक अज्ञात व्यक्ती येई व त्यांच्या तोंडात मारल्याचा त्याना भास होई आणि मग जाग येई, पण नंतर तेथे काहीच दिसत नसे. शेवटी श्री. कदम यांनी एकट्यानेच या नवीन घरात झोपण्याचा निश्चय केला. आणि आश्चर्य असे घडले की, त्यांना स्वप्नात साक्षात् श्रीसाईनाथ दिसले व त्यांच्या पायाजवळील जमिनीतून लाल रंगाची फुले बाहेर पडत असल्याचे श्री. कदम यांनी पाहिले.

नंतर हे स्वप्न त्यानी आपल्या ओळखीच्या काही लोकांना सांगितले. तसेच यानंतर श्री. कदम यांच्या भावूक मनात याठिकाणी श्रीसाईंचे छोटेसे मंदीर बांधून बाबांचे कायमचे वास्तव्य असावे, असा विचार आला. नेमके ह्याचवेळी साईकृपेने श्री. कदम यांना कारखान्याकडून डोळ्याची नुकसानभरपाई म्हणून सुमारे ३२ हजार रु. मिळाले. मग मात्र कसलाही विचार न करता त्यांनी लगेच साई मंदिर उभे केले. नंतर मुंबईला जाऊन माधवबागेतील मूर्तीकाराकडून सुमारे १॥। फूट उंचीची साडेतीन हजार रुपयांची साईमूर्ती विकत आणली. तसेच मंदिरासाठी एक टेपरेकॉर्डर व ॲम्प्लीफायरही आणला.

# श्री साईबाबांच्या हाराचा चमत्कार

– लीलाताई शं. गोलतकर
परळ, मुंबई.

शुक्रवारी २९ तारखेला गुरुपौर्णिमा होती. म्हणून माझ्याकडे गुरुवारी २८ तारखेपासूनच भक्तमंडळी साईबाबांच्या दर्शनाला येत होती. कारण दुसऱ्या दिवशी कुणाला यायला मिळालं असतं-नसतं म्हणून आणि मी तर बाबांना शिर्डीला निरोप पाठविला होता की, गुरुपौर्णिमेला माझ्याकडे या म्हणून बाबा तर माझ्याकडे साक्षात आहेतच. प्रश्नच नाही... पण वेडी माया ना!

आणि तसंच झालं... गुरुवारी एका साईभक्त मुलाने मोगरीच्या फुलांचा ताजा टपोरा जाड हार आणला. मी तो बाबांच्या मूर्तीच्या गळ्यात घातला आणि दुसऱ्या दिवशी सकाळी पहाते तर उजवी बाजू हाराची पार सुकलेली आणि डावी बाजू अगदी ताजी टवटवीत, जणू काय आताच घातल्यासारखी. मग माझ्या लक्षात आलं... बाबांना निरोप धाडला ना! त्याचा हा चमत्कार. आज गुरुपौर्णिमा आहे आणि बाबा माझे गुरु आहेत.

गुरुमाऊलीचा चमत्कार झाल्यावर त्याची लीला अगाध आहे. फक्त त्याचं आपण कौतुक करायचं. गुरुपौर्णिमा होती म्हणून ,त्यांची भक्त मंडळी त्यांच्या दर्शनाला येत होती. बाबा सर्वांचेच गुरु आहेत. नमस्कार करताना त्यांच्या हाराकडे त्यांचं लक्ष जायचं... मला म्हणायचे, ताई हे असं कसं हो, एक बाजू ताजी फुललेली? मी काय सांगणार त्यांना... साईईश्वराची लीला अगाध आहे... त्यातलीच ही एक आहे, दुसरं काय.. आपण फक्त पहायचं, दर्शन घ्यायचं, खोलात जायचं नाही. हा परमेश्वरी भक्तीमार्ग असाच आहे. प्रेमाचा आहे तो... फक्त आपलं प्रेम हवं असतं त्याला... दुसरं काही नको. तो भावाचा भुकेला आहे.भाव तोचि देव...आणि म्हणूनच ह्या सर्वशक्तिमान साईनाथांना माझे अनंत कोटी प्रणाम....

# हरवलेले सामान बाबांच्या कृपेने परत मिळाले

**– सौ. प्रमिला मधुकर वखारे**
बदलापूर, ठाणे.

२७ डिसेंबर १९८६ हा दिवस माझ्या आयुष्यात अविस्मरणीय आहे. या दिवशी ठाण्याला माझ्या भाचीचे लग्न होते. त्यादिवशीच गारांचा पाऊस पडला. आम्ही सर्व ठाण्याला लग्नाला गेलो होतो. लग्न आटोपून रात्री बदलापूरला परत येण्यासाठी ठाणे स्टेशनात आलो. गारांचा पाऊस पडल्याने कडाक्याची थंडी पडली होती. कर्जत गाडीत नेहमीच गर्दी असते.रात्री ८-४५ ला आम्ही कर्जत लोकल पकडली. खूप गर्दी असल्याने उभे राहूनच आम्हाला प्रवास करावा लागला. माझ्या हातातील पिशवी मी सामान ठेवण्याच्या जागी ठेवली. उल्हासनगरला आम्हाला बसायला जागा मिळाली. तिथेच एक भिकारी आमच्याजवळ थंडीत कुडकुडत बसला होता. त्याला कुठे जायचे म्हणून मी विचारले, पण तो काही बोलेना. गाडीतल्या माणसांनी त्याला शेंगदाणे वगैरे खायच्या वस्तू दिल्या. बिचारा तो ते सुध्दा घेईना व बोलतही नव्हता. मला त्याची दया आली. पाऊस पण पडतच होता. त्याला कुठे जायचे आहे? तो थंडीत झोपणार कुठे? याचाच विचार मी करीत होते. त्याला पाव चहासाठी मी पैसे दिले. तेव्हढ्यातच बदलापूर स्टेशन आले व घाईघाईत आम्ही स्टेशनवर उतरलो. गाडी सुटल्यानंतर आम्हाला आठवले की, आमची पिशवी आम्ही गाडीतच विसरलो आणि ब्रम्हाण्डच आठवलं! कारण त्यातच घराच्या चाव्या, गोदरेज कपाटाच्या चाव्या, माझी पर्स, पर्समध्ये दागिने, रोकड पैसे, पतीचा भारी चष्मा या सर्व वस्तू होत्या. आता घरी कसे जाणार? कुलुपाच्या चाव्या गाडीतच राहिल्या. मी बाबांचा धावा केला. आमची केविलवाणी परिस्थिती पाहून एका माणसाने बदलापूर स्टेशनात स्टेशनमास्तरांना या बद्दल सांगण्यास सांगितले. आम्ही लगेच स्टेशन मास्तरांच्या कार्यालयात गेलो. तिथे प्रवेश केल्याबरोबर समोरच परमपूज्य बाबांची मोठी तसबीर दिसली आणि मला धीर आला व मनात म्हटले की, बाबा माझ्या पाठीशी आहेत, ते मला निराश करणार नाहीत. मनोमन बाबांना नमस्कार करून म्हटले, बाबा आमची पिशवी परत मिळू दे! मी नारळ फोडीन व आपले उपकार जन्मभर विसरणार नाही. झालेली सर्व हकिगत माझ्या पतीने स्टेशनमास्तर श्री. भालेराव यांना सांगितली. त्या सद्‌गृहस्थांनी ताबडतोब कर्जत स्टेशनला फोन केला व आत्ताच बदलापूरहून सुटलेल्या गाडीत शेवटच्या फर्स्ट क्लासच्या मागील डब्यात एक गुलाबी रंगाची पिशवी विसरून राहिली आहे. तिच्यात अमुक अमुक सामान आहे. ती सापडल्यास परतीच्या लोकलने ती पिशवी कृपया घेऊन यावी. एका प्रवाशाच्या घराच्या चाव्याच त्यात असल्याने ते सर्व स्टेशनात थांबले आहेत. जातीने या पिशवीचा शोध करावा. स्टेशन मास्तरांनी आम्हाला फार सहकार्य दिले व १०॥ वाजता कर्जतहून येणाऱ्या लोकलसाठी थांबण्यास सांगितले. थांबणे भागच होते. मनात सारखा बाबांचा धावा चालू होताच.

बाबा ही आमची कसोटीची वेळ आहे. तुमच्यावर आम्हा सर्वांची नितांत श्रध्दा आहे. तुम्ही मला निराश करू नका व आमची पिशवी परत मिळवून द्या. माझा धावा चालू होता. परंतु नशीब नेहमीच साथ देते असे नाही. हरवलेले सामान सापडणे तसे कठीणच. दरम्यान कुणाची नजर आमच्या पिशवीवर गेली असेल व कर्जतला गाडी रिकामी झाल्यानंतर ती कुणीतरी उचलून नेणेही शक्य होतेच. मनात शंकेची पाल चुकचुकत होतीच. त्याबरोबरच बाबांवर असीम निष्ठा असल्याने आशा पण होती की, मला पिशवी परत मिळेल. पण मनाच्या दोलायमान स्थितीने माझा जीवच उडून गेला होता. पिशवी मिळाली नाही तर काय करायचे? एवढ्या रात्री गोदरेजचे कुलुप उघडायचे कसे? कपाटाच्या चाव्या नसल्याने कपाट उघडायचे कसे? दागिने मोत्यांचेच असल्याने त्याबद्दल मला विशेष वाटत नव्हते, पण चाव्या मात्र मिळायला हव्या होत्या. विचार करता करता १०॥ वाजले व परतीची कर्जतहून मुंबईला येणारी लोकल बदलापूर स्टेशनात आली. विचारांनी डोक्यात काहूर माजले होते. छाती धडधड करीत होती. गाडी स्टेशनात थांबली. केविलवाण्या नजरेने आम्ही आमची पिशवी या गाडीने येणार म्हणून आशेने बघत होतो. तेव्हढ्यात गाडीचे गार्ड आमचीच पिशवी स्टेशन मास्तरांकडे देण्यासाठी आले. आम्ही ती ओळखली आणि इतका आनंद झाला की, सांगायला शब्द नाहीत. बाबांच्या तसबिरीला मी मनोभावे नमस्कार केला तेव्हा आनंदाश्रू माझ्या डोळ्यात आले. क्षणभर विचारशक्तीच गेली. ह्या पिशवीत एकूण ८०० रूपयांचा ऐवज होता. स्टेशन मास्तरांना आम्ही आधीच काय काय वस्तु पिशवीत होत्या ते सांगितले होतेच. त्याप्रमाणे त्यांनी त्या तपासून बघितल्या व खात्री करून आमच्या स्वाधीन केल्या. बाबांच्या कृपेनेच मला माझी पिशवी परत मिळाली, हे निश्चित. कारण लोकलगाडीत आपण अतिशय सावध, दक्ष असताना सामान चोरीला जाते व माझी विसरलेली पिशवी मला परत मिळते हा चमत्कार नाही काय! त्या दिवशी माझ्या परमपूज्य बाबांनी भक्ताची लाज राखली व आम्ही सुखरूप सर्व चीजवस्तू जशाच्या तशा घेऊन घरी परत आलो. त्यातील फरसाण फक्त संपवले होते. आणि मला गाडीतील भिकाऱ्याची आठवण झाली. बिचारा भुकेला! तो भिकारीच या परिस्थितीस कारणीभूत झाला व बाबांच्या रूपाने त्याने आम्हास दृष्टान्त दिला.

# बाबांची प्रथम श्रेणी

— चारुलता केशव हेर्लेकर
ताराबाई पार्क, कोल्हापूर.

मी नियमितपणे श्री साईबाबांचे प्रार्थनाष्टक व प्रार्थना म्हणते. मी बारावीत पहिल्यापासून व्यवस्थित अभ्यास केला होता. पण परिक्षेच्यावेळी मला खूप मानसिक तणाव जाणवत होता. कारण मी इंग्लिश माध्यम घेतले होते व अभ्यासही तसा अवघडच होता. त्यातच मी परिक्षेच्यावेळी आजारी होते. पेपरला जाताना मी श्री साईबाबांना नमस्कार करुन व उदी लावून जात होते, श्री साईबाबांचे नाव घेऊन पेपर लिहीत होते. काही पेपरला मला वेळ मिळाला नाही, पण बाकी सगळे पेपर व्यवस्थित सुटले. निकालाच्या दिवशी काही सुचत नव्हतं. प्रथम श्रेणी मिळेल की नाही, असं सारखं वाटत होतं. शेवटी मी श्री साईबाबांच्या जवळ प्रार्थना केली की, मला प्रथम श्रेणी मिळू दे. मला ६१ टक्के गुण मिळाले. बारावी परिक्षेत मला श्री साईबाबांच्या कृपेनेच प्रथम श्रेणी मिळाली, यात अजिबात शंका नाही. माझे श्री साईबाबांना कोटी कोटी प्रणाम व त्यांच्यावरती माझी श्रद्धा अधिक दृढमूल व्हावी, हीच त्यांच्या चरणी प्रार्थना.

# श्री साईबाबा तारी त्याला कोण मारी?

—श्री. शाम वस्त
पोळी, गोवा.

१९५७ सालापासून आजपर्यंत श्री साईबाबांच्या शिरडी येथील समाधीचे दर्शन घेऊन मी माझ्या जीवनात सुखी झालो आहे. ज्या ज्या वेळी मी जी जी इच्छा धरली, ती ती श्री समर्थांनी आपल्या कृपाशीर्वादाने पूर्ण केलेली आहे. इतकेच नव्हे तर अनेक संकटांतून माझ्या समर्थानी मला आणि माझ्या कुटुंबियांना तारलेलं आहे. त्या साऱ्यांचा तपशील देणं, म्हणजे एक पुस्तकच होईल. तेव्हा नुकत्याच घडलेल्या प्रसंगाचे थोडक्यात श्रींच्या आशीर्वादाने प्रेरित होऊन मी हे वर्णन करीत आहे.

मे महिना म्हणजे शाळांना सुट्टी असते, त्यामुळे गोव्यात पर्यटकांची गर्दी फार. त्या गर्दीचा वाहतुकीवर परिणाम होतोच. गाड्या प्रवाशांनी गच्च भरलेल्या असतात. दुपारी १ ते ३ पर्यंत गर्दीचा ओघ कमी असतो म्हणून मी म्हापसा ते मडगाव गाडीत म्हापसा येथे बसमध्ये उजव्या बाजूच्या बैठकीवर बसलो. बस १.२० वाजता सुटली. दुपारची वेळ असल्याने मी थोड्याच वेळात पेंगायला लागलो. म्हापसपासून बस ३० कि.मी. अंतरावर आली असेल, मी झोपेतच होतो, सूर्याची तिरपी किरणे काचेतून माझ्या चेहऱ्यावर पडत होती, त्यामुळे माझ्या झोपेत खंड

पडत होता आणि मी पुन्हा पुन्हा जागा होत होतो. बस चालत होती. त्या बसमधील एका वृद्ध गृहस्थाने, जो डाव्या बाजूकडील बैठकीवर बसला होता, त्याने मला जागवले आणि म्हणाला, मी आता पुढच्या स्टॉपला उतरणार आहे. तू माझ्या जागेवर बस. मी त्या वृद्धाचे आभार मानले आणि त्याच्या जागेवर बसलो. इतक्यात पुढचा स्टॉप आल्यावर ते गृहस्थ खाली उतरले. बस पुन्हा सुरु झाली आणि वेगाने धावू लागली. वळणावरुन जराशी पुढे जाते न जाते तोच "खाल्ल"... करुन मोठा आवाज झाला आणि काचेचे दोन-तीन तुकडे माझ्या अंगावर पडले. प्रवाशांचा एकच आवाज झाला आणि बस लगेच थांबली. समोरुन येणाऱ्या बसच्या बॉडीचा उजवा भाग आदळला आणि मी अगोदर बसलेल्या जागेवरच्या खिडकीची काच तुटली होती. बस मधील सर्व प्रवासी माझ्याकडे सहानुभूतीच्या नजरेने पाहू लागले. मी तर स्तंभितच झालो होतो! लोक म्हणू लागले, तुझे दैव बलवत्तर म्हणून तू वाचलास! खरोखरच तुझ्या देवाने तुला वाचवला! माझी झोप तर केव्हाच पळाली होती. मी म्हाप साहून पेंगतच खिडकीच्या काचेवर डोकं टेकून इथपर्यंत आलो आणि नेमकं इथेच आल्यावर त्या वृद्ध गृहस्थाने मला आपली जागा दिली आणि आपण प्रवासी बनून निघन गेला. माझी खात्रीच झाली, ते माझे श्री साईबाबाच होते! प्रवासी बनून बसमध्ये चढले होते, आपल्या लेकराला वाचवण्यासाठी. माझ्या डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहिले. अंतःचक्षू समोर श्री साईबाबांना आठवून म्हणालो, बाबा, किती किती म्हणून संभाळशील तूं आपल्या भक्तांना! तू तारणारा असल्यावर तुझ्या भक्तांना कोण मारील? समस्त साईभक्तांनी श्री साईबाबांवर श्रद्धा ठेवावी, विश्वासाने श्री साईबाबांकडे पहावे, म्हणजे श्री साईबाबासुद्धा आपल्याकडे पाहतात आणि संकटात ते आपल्या लेकरांना सांभाळतात. याची प्रचिती म्हणजेच माझ्यावर आलेला वरील प्रसंग होयं!

# साई तूच एक आधार

**— श्रीमती सुशिलाबाई बाजीराव निंबाळकर**
भुदरगड, कोल्हापूर.

कुठल्याही माणसाने आपल्या जीवनात एखाद्या देवावर दाट श्रद्धा ठेवून सर्व भार त्यांचेवरच ठेवून आपले जीवन जगल्यास निश्चितच आपले जीवन सुखसमाधानाने जगता येते, आपल्या सर्व आशा आकांक्षा त्यांचे कृपेने पूर्ण होतात. मी एक पंचाहत्तर वर्षाची वृद्ध महिला श्रीसाईबाबांची भक्त आहे. आज पर्यंतच्या आयुष्यात मी श्री साईचरणीच गाढ श्रद्धा ठेवली आहे आणि संकटकाळी श्री साईनीच माझी संकटातून मुक्तता केली. माझ्या सर्व आशा आकांक्षा त्यांच्याच कृपेने पूर्ण झाल्यात, अशी माझी भावना आहे.

आपल्या आयुष्यात आपण एकदा काशीयात्रा करावी, अशी माझी खूप इच्छा होती, पण या वयात आणि येथून पुढे असा योग येईल, असे वाटत नव्हते. पण साईनाथांच्या कृपेने ता. २९ मे ८८ रोजी हा योग आला. एका खाजगी यात्रा कंपनीतून काशी त्रिस्थळी यात्रा पूर्ण करण्याचे भाग्य लाभले. सोबतीला गावातील दोन महिला व माझी मुलगीही होती. ता. १ जून ८८ ला अलाहाबादला पोहचल्यानंतर प्रवासाने माझ्या तब्बेतीस त्रास होऊ लागला. अलाहाबादहून प्रयागला गेल्या नंतर डिसेंट्रिचा खूपच त्रास वाढला व खूपच अशक्तपणा आला. प्रयागला धार्मिक विधी पूर्ण करावयाच्या होत्या. त्या पूर्ण होतील की नाही, याची काळजी वाटू लागली आणि मी नेहमीप्रमाणे "श्री साईबाबांचा" धावा केला. योगायोगाने प्रयाग येथे पुरोहितांच्या घरी थोडे घरगुती औषध मिळाले. त्याने तीन वाजेपर्यंत थोडा तब्बेतीस आराम वाटला आणि कशातरी सर्व धार्मिक विधी पूर्ण केल्या.

दुसरे दिवशी अयोध्याला जायचे होते पण मला रात्री खूपच त्रास होऊ लागला. अत्यंत अशक्तपणा जाणवू लागला. हात पाय गळाल्यासारखे वाटू लागले. पुढील प्रवास करण्यात काहीच त्राण उरला नाही. त्रास इतका वाढला कीं, आपले काही बरे वाईट येथेच होईल, असे वाटू लागले. आणि तसे झाले तर आपल्या बरोबर असणाऱ्या चाळीस जणांच्या यात्रेला व्यत्यय येईल, याची काळजी वाटू लागली. माझी ही अवस्था बघून माझी मुलगीही भांबावून गेली. रात्री ना डॉक्टर की ना औषध, अशा अवस्थेत फक्त एकच आधार होता, तो म्हणजे "श्री साईबाबांचा धावा" रात्री मी उदी प्रसाद घेऊन वारंवार रात्रभर साईंचा धावा करु लागले, "तुम्हीच मला आता फक्त आधार आहात. या संकटातून माझी मुक्तता करा व माझा पुढील यात्रा प्रवास सुखकर करा" अशी श्री साईचरणी मनोभावे प्रार्थना केली. रात्रभर मला झोप नव्हती तरी पण श्री साईबाबांची मूर्ती माझ्या उशाला बसून आहे, असा भास मात्र सतत होत होता. सकाळपर्यंत कोणी डॉक्टर भेटले नाहीत. आणि तशा अवस्थेत मी साईबाबांच्या वर श्रद्धा ठेवून अयोध्याच्या प्रवासाला निघाले. आश्चर्य असे की, वाटेत फैजापूर गावी आम्हाला एक डॉक्टर भेटले. त्यांना माझी तब्बेत दाखवली. त्याचवेळी डॉक्टरांच्या जवळ एक मळकट कपडे घातलेले एक अनोळखी म्हातारे गृहस्थ होते. त्यांनी अगदीच आस्थेने डॉक्टरांना विनंती केली, "डॉक्टर, या बाईंना एखादे चांगले औषध द्या, त्यांना अजून यात्रेचा खूप प्रवास करायचाय" डॉक्टरांनी तपासून औषध लिहून दिले. या नवीन गावात औषधाचे दुकान कुठे आहे वगैरेची माझ्या मुलीला व मला काहीच कल्पना नव्हती. लगेच ते म्हातारे गृहस्थ आपुलकीने म्हणाले, "घाबरू नका, चला मी दाखवतो तुम्हाला दुकान" असे म्हणून त्यांनी माझ्या मुलीला औषध दुकानापर्यंत नेवून दुकान दाखवले. मुलीने औषध आणले व औषध घेतल्यानंतर ताबडतोब मला आराम वाटू लागला. मात्र ते म्हातारे गृहस्थ मात्र कुठेच दिसत नव्हते. त्यानंतर प्रवासात

कुठेही कसलाही त्रास झाला नाही आणि आम्ही घरी सुखरूप परतलो. मनाला मात्र प्रश्न होता की, ओळख नसताना आपुलकीने, आत्मीयतेने माझ्या विषयी डॉक्टरांना विनंती करणारे, दुकान दाखवणारे, काळजी करणारे, ते म्हातारे गृहस्थ कोण होते. माझी खात्री आहे की, मी श्रद्धेने धावा केल्यानंतर भक्तांसाठी धावून आलेले ते साईबाबांच होते आणि म्हणून मी म्हणते–

जगण्यास मला साई तूच एक आधार
केवळ स्मरणाने तुझ्या काळही घेईल माघार!

# जो जो मज भजे ....

**– सौ. दिपा दत्तात्रेय गोखले**
महाड, रायगड.

साईबाबांच्या भक्तीचा मार्ग मला माझ्या भावामुळे मिळाला. त्याने साईबाबांची नवीन पोथी आणली, तेव्हा आम्ही पोथीचे पान उघडून बघितले तर काय आश्चर्य! पोथीच्या पहिल्याच पानावर एक टवटवीत चाफ्याचे फूल आम्हाला पहायला मिळाले. ज्यावेळी आमच्यावर संकटं आली, त्यावेळी साईबाबांनी त्या संकटांचे निवारण केले. माझी आई आजारी असताना साईबाबांनीच तीन वेळा तिला वाचवले आहे. मी एस. एस. सी. ला असताना केवळ साईकृपेनेच गणितात पास झाले.

माझ्या लग्नाला ४ वर्ष झाली तरी आम्हाला मूलबाळ झाले नव्हते. तेव्हा मी साईबाबांना म्हणाले की, मला तुमच्या कृपेने मुलगा होऊ द्या! त्याप्रमाणे मला मुलगा झाला. आता तो वर्षाचा आहे. साईबाबांची कृपादृष्टी माझ्यावर आहे, तशी सर्व भक्तांवर राहो ही त्या साईचरणी प्रार्थना.

नित्य मी जिवंत जाणा हेची सत्य ।
नित्य घ्या प्रचित्त अनुभवे ।

# जया मनी जैसा भाव

**– श्री. प्रकाश के. उपडे**
चांदिवली व्हिलेज, मुंबई.

दि. ३०/६/८७ रोजी मी ऑफिसच्या कामासाठी जात असता सोबत कंपनीच्या मालकांनी रद्द झालेली विमानाची तिकीटे वांद्रे येथील आमच्या एजंटकडे परत करायची होती. परंतु हाय? दैवगती मोठी विचित्रच होती. म्हणजे ज्या लिफाफ्यामध्ये ठेवलेली तिकीटे होती तो लिफाफाच गहाळ झाला. मी घाबरूनच गेलो. डोक्यात विचारांचे थैमान सुरू झाले. काहीच सुचेना!

डोके शांत ठेवून मी चांगल्या विचारांचा मागोवा घेत असता, चटकन श्री साईबाबांचे मनस्वी चिंतन व स्मरण करू लागलो.

मी ऑफिसमध्ये गेलो व घडलेल्या घटनेबद्दल सर्व सांगितले. त्यानंतर एजंटने थोडेसे धमकी देऊन सांगितल्यावर माझा धीरच खचला. परंतु मी धीर सोडला नव्हता. नंतर मी माझ्या ऑफिसमध्ये आल्यावर मॅनेजरला सांगितले. ते ऐकल्यानंतर त्यांचा राग अनावर झाला व त्यांनी या तिकिटांची किंमत १०,००० रु.ची रक्कम माझ्या मासिक पगारातून समान हप्त्याने वसूल केली जाईल, हे सांगताच, मी चरकलोच! काय करावे काहीच सुचेना... परंतु मी साईबाबांच्या नामस्मरणाचे चिंतनच करीत आलो.

शेवटी हरवलेली ही सर्व तिकीटे दुसऱ्या दिवशी म्हणजे श्री साईंचे दर्शन घेऊन आल्यानंतर शुक्रवारी, एजंटने ऑफिसमध्ये फोन करून तिकीटे टपालाने मिळाल्याचे सांगताच मला अतिशय आनंद झाला. यावरूनच मला कळून चुकले की, ईश्वरी साक्षात्कार फार मोठा आहे आणि तो चिरंतनच असावा!

सांगावयाचे तात्पर्य की, मी जे श्री साईबाबांचे नामस्मरण-चिंतन करीत राहिलो, त्याचेच हे मोठे यशस्वी फळ मला मिळाले, याचेच मला जास्त समाधान लाभले.

म्हणून मी श्रीसाईबाबांच्या चरणांवर डोके ठेवून एवढीच प्रार्थना करीन की,

तुमच्या चरणी लीन झालो
सकळ जनांची दुःखे दूर करा –
आशीर्वाद असावा आपुला
या दासासी तुमचा.

# उदी एक महान विभूती

– श्री. गुरुनाथ विष्णू पन्हाळकर
रंकाळावेस, कोल्हापूर.

तो ऑगस्ट १९८८ चा महिना होता. कोल्हापुरात पाऊस जोरदार पडत होता. अचानक एक दिवस माझे डोळे सुजले. थोड्या वेळाने ते लाल झाले. त्यामधून पाणी वाहू लागले. डोळ्यात थेंब घालून बघितले, तरी त्याचा उपयोग काही होईना! मी रोज, सकाळ-संध्याकाळ बाबांचे स्मरण करुन उदी घेतो. बाबांना मी त्यावेळी मनापासून प्रार्थना केली की, बाबा, लवकर डोळे बरे होऊ देत. दोन्ही डोळ्यांना उदी लावणे सुरु केले. डॉक्टरांचे औषध सुरु होते. परंतु डॉक्टरी इलाजापेक्षा माझा सर्व विश्वास डॉक्टर साईबाबांच्या उदी या औषधावर होता. उदी

लावलेल्या दिवसापासून माझ्या डोळ्यांची सूज पुष्कळच कमी झाली. जी आग होत होती, ती पण पुष्कळच बरी झाली. बाबांनी डोळे बरे केले.

मी इथे असे म्हणेन की, ज्याप्रमाणे शिर्डीत बाबांनी एका रोग्याचे डोळे बरे केले, त्याप्रमाणे बाबांनी कोल्हापुरात माझे डोळे उदी द्वारे बरे केले.

ज्यांची आहे बाबांच्यावर भक्ती
रक्षण त्यांचे बाबा करिती ॥
उदीमध्ये आहे गुढ शक्ति
सर्व रोग, यातना, संकटे पळून जाती, भस्म होती॥

# साईकृपा

**– शशीकला एन. नाईक**
कारवार, कर्नाटक.

शिरडीबाबांची लीला मी पुष्कळांच्या तोंडून ऐकली होती. दुसऱ्यांच्या तोंडून ऐकणे व आपल्या प्रत्यक्ष अनुभवास येणे निराळेच असते. माणसावर कठीण प्रसंग आल्यावर माणूस आपोआपच देवाचे पाय धरतो. मी गेली दहा वर्षे बाबांची भक्ती करीत आहे.

एकदा असे झाले, मी "बाबांची लीला" हे पुस्तक वाचत होते. तेव्हाच मी एक बाबांजवळ नवस केला, "बाबा माझ्या मुलीचे आजारपण नाहीसे करून माझ्या मनातली भीती नष्ट करा." खरंच सांगू, तिसऱ्याच दिवसापासून माझी भीती नाहीशी झाली व माझी मुलगी बरी झाली. बाबा माझ्या नवसाला पावले. बाबा म्हणजे भक्तांवर कृपा करणारे एक मूर्तिमंत देव आहेत. त्यांना शतशः प्रणाम.

# साईकृपेचा अनुभव

**– श्री. उल्हास पाडळकर**
श्रीरंग सोसायटी, ठाणे.

मी गेल्या वर्षी वाशीहून ठाणे येथे येत होतो. ठाण्याला मी जांभळी नाका बस स्टॉपवर उतरलो. समोरच काही तिकीट चेकर उभे होते. चेकरला तिकीट दाखविण्याच्या घाईगडबडीत माझे अंदाजे ५० रु. चे रेल्वे लायब्ररीचे एक पुस्तक तिथेच पडले. माझ्या ते घरी आल्यावर लक्षात आले. कर्मधर्मसंयोगाने त्याच वेळेस माझ्या आईने घरी साईलीला हे पुस्तक वाचण्यास आणले होते. पुस्तक हरविल्याचे सांगितल्यावर आईने म्हटले की, साईकृपेने पुस्तक परत मिळू दे! वडिलांना तसे सांगून मी लगेच घरून निघून साईबाबांची आळवणी करीत जांभळीनाका बस

स्टॉपवर पोहोचलो. तर काय आश्चर्य! तिकीट चेकर तिथेच उभे होते व त्यापैकी एकजण ते पुस्तक वाचत होता. मी त्याला ओळख पटवून पुस्तक परत मिळवले. साईबाबांची कृपा पाहून व भक्ताच्या हाकेला धावून जाणे पाहून माझे मन भारावून गेले.

श्री साईबाबांची कृपा सदैव पाठीशी राहो, हीच श्रीसाईचरणी प्रार्थना.

# दु:ख निर्मूलन

**— सौ. मानसी वि. रिसबूड**
माहिम, मुंबई.

साईबाबांचा सप्ताह एकदा केल्यापासून मला श्रीसाईबाबांच्या भक्तीचा छंदच लागला. लग्नाआधीपासून त्यांची एक प्रतिमा घरात आणून तिला दर गुरुवारी मी हार घालत असे. काही घरगुती अडचणींमुळे माझे लग्न होणे कठीण होते, पण साईबाबांना मी नेहमी एकच सांगायची की, तुमच्या कृपेने माझे सगळे व्यवस्थित होऊ दे. रिसबूडांकडून होकार आल्यावर बैठकीत जर त्यांनी जास्त मागितले, तर नकार द्यायचा असे ठरवून मी साईबाबांच्या फोटोला नमस्कार करून गेले. बैठकीत तर माझ्या पतीने काही मागितले नाहीच आणि खरोखरच साईबाबांना सांगितल्याप्रमाणे त्यांनी माझे लग्न अपेक्षेपेक्षा जास्त थाटात घडवून आणले. माझ्या लहान भावाला साईबाबांची अतिशय भक्ती. त्यानेसुद्धा न घाबरता सर्व जबाबदारी स्वत:च्या अंगावर घेऊन माझे लग्न करून दिले. ही साईबाबांचीच कृपा. लग्न झाल्यावरसुद्धा साईबाबांच्या भक्तीचे मला खूप अनुभव आले. बाबांनी मला काही कमी दिले नाही. कितीही मानसिक त्रास झाला की, मी साईबाबांच्या फोटोकडे पाच मिनिटे नुसती बघते की, दुसऱ्या दिवशी माझा त्रास कमी झालाच पाहिजे. लग्नानंतर एक वर्षाने मला दिवस राहिल्यावर माझ्या नाजूक प्रकृतीमुळे मला खूप भीती वाटत होती. तेव्हा डॉक्टरकडे जाताना मी साईबाबांना सांगून गेले की, मला मुलगा, मुलगी काहीही होऊ दे! पण व्यवस्थित होऊ दे. तब्बेत बारीक असूनसुद्धा मला कधीही त्रास झाला नाही. हॉस्पिटलमध्ये गेल्यापासून मी फक्त मनात "ॐ साईसमर्थ" असेच म्हणत होते. काहीही त्रास न होता एक छान मुलगी झाली. ती आता दोन वर्षाची आहे आणि अतिशय हुशार आहे. ही साईबाबांचीच कृपा. तिलासुद्धा साईबाबांचे खूप वेड आहे. आता दरवर्षी एकदा आम्ही शिरडीला जाऊन येतो. असे अनुभव सांगावे तेवढे थोडेच. श्री साईबाबा अशा प्रकारे दु:खात, संकटात असलेल्या आपल्या भक्तांना धीर देऊन त्यातून तारून नेतात.

# मला आलेला अनुभव

— श्री. प्रभाकर दत्तात्रय गोडबोले
ग्वालियर, म. प्र.

मी माझी पत्नी सौ. संपदा व मुलगी कु. वैभवी व मुलगा चि. विशाल असे चौघेजण माझ्या मेहुण्याच्या लग्नाकरिता भिलाई (जिला दुर्ग) ला गेलो होतो. तो डिसेंबरचा महिना होता. आमच्याकडे दर गुरुवारी बाबांची पूजा आरती अगदी नियमितपणे होत असते. मी जरी एखाद दोन दिवसांकरिता बाहेर गेलेला असेल तरी घरातील कोणीही त्यात खंड न पडू देता दर गुरुवारी आरती करतात. आम्ही भिलाईला गेलो त्याच्या तिसऱ्या दिवशी गुरुवार होता. माझ्या मनात चुणचुण लागली की आता बाबांचे दर्शन होण्याचा खंड पडेल. मी भिलाई शहरात प्रथमतःच गेल्यामुळे तेथील काहीही माहिती नव्हती. सकाळी आंघोळ वगैरे आटपून मी माझ्या पत्नीच्या मामाबरोबर रिक्षा करून बाहेर पडलो. आम्ही दोन मैलपर्यंत गेलो असू, तर माझी नजर सहज बाजूला पडली. पाहतो तर श्री बाबांचे भव्य मंदिर. मी तेथपर्यंत रिक्षा केली व आम्ही दोघे मंदिर परिसरात प्रवेश केला. बाबांची भव्य आनंदी मूर्ती पाहून मन प्रसन्न झाले. तेथील मंदिराची उत्तम व्यवस्था पाहून शिरडीच्या समाधी मंदिरात आपण उभे आहोत असे क्षणभर वाटले. योग असा की, तो दिवसही गुरुवारच होता. माझी इच्छा बाबांनी पूर्ण केली. मी लागलीच आपल्या पत्नी-मुलांस व माझ्या दोन मेहुण्यांना तेथे पाठवले.ते सर्व संध्याकाळी गेले तेव्हा मंदिरात सायंकाळची बाबांची आरती चालली होती. अशा प्रकारे आमचा गुरुवारचा खंड बाबांनी पडू दिला नाही. धन्य ते बाबा!

# जगद्‌गुरु साईनाथ

— सौ. अश्विनी अ. चिपकर
नायगांव, मुंबई.

बऱ्याच महिन्यांपासून माझ्या मुलीच्या दोन्ही डोळ्यांच्या पापण्यांवर आतल्या बाजूने गाठी आल्या होत्या व रोज त्या वाढतच चालल्या होत्या. त्यामुळे मला चिंता वाटत होती. गेल्या वर्षभरात माझ्याकडून "श्री साईसच्चरित" वाचले गेले नव्हते. चिंताग्रस्त होऊन मी त्यातील अध्याय ११ व अध्याय १५ वा नियमितपणे दिवसातून ३-३ वेळा वाचू लागले व ३-३ वेळा पाण्यातून उदी मलमाप्रमाणे गाठींवर लावू लागले. या उपायाने गाठी वाढायच्या थांबून कमी व्हायला लागल्या. उजव्या डोळ्यावरची गाठ नाहीशी झाली. डाव्या डोळ्यावर जरा कमी झाली होती. एके दिवशी मला बरे नव्हते म्हणून एका डॉक्टरकडे गेले असता तिच्याही डोळ्यावरील गाठ दाखविली. तेव्हा तिने डोळ्यात घालायला औषध दिले. घरी आल्यानंतर श्री

साईंचे नाव घेऊन २ दिवस ते औषध घातले असता गाठ आता संपूर्ण नाहीशी झाली आहे.

काही दिवसापूर्वी मी माहेरी राहायला गेले होते. त्या दिवशी सकाळी ७ च्या सुमारास मला उजव्या कानात काहीतरी.गेल्यासारखे वाटले. तो वार होता शनिवार. त्यानंतर मला डोक्याचा उजवा भागच बधिर झाल्यासारखा वाटू लागला. काय होते ते मंगळवारपर्यंत स्पष्ट सांगताही येत नव्हते. कशाबद्दल आत्मविश्वासच वाटेनासा झाला. चालण्यावर नियंत्रण नसल्यासारखे वाटू लागले. तेव्हा पासून साईनामाचा मंत्रघोष चालू झाला. जवळच्या डॉक्टरांकडून औषधही आणले. नंतर गुरुवार पर्यंत मला बरे वाटू लागले. कालपर्यंत मला एखादी गोष्ट व्यवस्थित आठवतही नव्हती पण आज म्हणजे गुरुवारी संपूर्णपणे बरे वाटू लागले आहे.

# आई माझी श्री साईमाऊली

– सौ. नलिनी माणिक डे
डोंबिवली (पूर्व),
ठाणे.

माझी आई, वय ६२, प्रकृतीने बरी, स्वभावाने शांत अशी बाई. संसार मोठ्या नेटाने पार पाडणारी. वर्षात १–२ महिने असे येतात की, ज्यावेळी आईचा मानसिक तोल पार ढासळलेला असतो. २–३ महिने गेल्यावर ती पूर्वीप्रमाणे सर्वसाधारण होते. डॉक्टर, ज्योतिषी वगैरे सर्व प्रकार करून झाले, पण दर वर्षी तिला बहुधा उन्हाळा आला की त्रास सुरु होतो. ती फारच असंबद्ध बडबड करु लागते. मात्र स्वतःची कामे करणे, ओळखी-पाळखीच्या लोकांकडे, नातेवाईकांकडे तिचे जाणे येणे सुरुच राहते. माहिम येथे माझी मावशी राहते. आई तिच्याकडे जावून तिथे दोन दिवस राहून पुन्हा डोंबिवलीला येण्यास निघाली असता माहिम ते डोंबिवली या प्रवासात कुठेतर भरकटली, ती डोंबिवलीस पोहचली नाही. भाऊ तिला आणावयास गेला असता असे कळले की, आई १० वाजता सकाळीच डोंबिवलीला घरी गेली. पण डोंबिवली येथे ती न आल्याने सर्वांचीच पाचावर धारण बसली. फक्त तिच्या हातात सोन्याच्या दोन बांगड्या होत्या, बाकी गळ्यात-कानात मात्र खोटेच दागिने होते.

सर्वत्र शोधाशोध केली. सर्व नातेवाईक, सर्व रुग्णालये, सर्व प्रकारच्या अपघाताच्या केसेस, पाहता पाहता १०–१५ दिवस होऊन गेले. टी.व्ही., वर्तमानपत्रांद्वारेही माहिती दिली. सर्वांच्याच मनात आईचे काही बरेवाईट झाले नाही ना! ही शंका. आईला सर्वत्र शोधत असता श्रीसाई दर्शनाची व बाबांनाच आपले दुःख सांगण्याची तीव्र इच्छा झाली. मी व माझे पती मुंबईसेंट्रल येथे पोहचलो. दुपारी २ वाजताची बस सुटण्यास ५ मिनिटे असाताना २ रिकाम्या जागेच्या सिटस्

सहज मिळाल्या. शिरडी येथे पोहचेपर्यंत रात्रीचे ९.३० – १० वाजले. समाधी मंदिर बंद होणार, बाबांचे दर्शन सकाळशिवाय होणार नाही, हे ठाऊक होते. शिरडीला पोहचल्यावर प्रथम मी समाधी मंदिरात गेले. बंद दरवाजासमोर जावून डोके टेकले. डोळ्यातून अश्रुधारा सुरुच होत्या, "बाबा कसंही करुन माझी आई मला परत मिळू द्या, जास्त काय सांगू" एवढी प्रार्थना करुन मी भोजनगृह बंद होईल म्हणून दोन घास खावे या उद्देशाने लवकरच भोजनगृहाकडे आले. तो कुठून तरी एक उंच सावळा फकीर "माई मुझे भूक लगी है। दो रोटी मुझे भी खिला दो", असे म्हणाला. माझ्या पतीने बाहेर बाकड्यावर बसलेल्या फकीरालाही जेवण देण्यास सांगितले. जेवण झाले व मी बाहेर आले तर तो फकीर म्हणाला, "बेटा तुम्हारी सारी इच्छा पूर्ण होगी!" त्याच्या चेहेऱ्याकडे पाहिले असता त्याच्या डोळ्यातील तेजस्वी चमक मला वेगळीच वाटली. मी काही न बोलता पुढे गेले.

दुसऱ्या दिवशी सकाळी दर्शन वगैरे आटपून "बाबा, येत्या गुरुवारच्या आत आईचा पत्ता लागू द्या. आईला घेऊनच आम्ही अभिषेक करायला येऊ" अशी प्रार्थना करुन जड अंत:करणाने आम्ही घरी आलो. सोमवार, मंगळवार असेच गेले, व बुधवारी रात्री एक वाजता घरी भावाचा निरोप आला, "आई मिळाली". ब्रह्मांड मिळाल्याचा आनंद त्या क्षणी मला झाला.

२१ दिवस काही तरी खावून पाणी पिवून आईने दिवस काढले. फारच अशक्तपणा आला होता. सोन्याच्या बांगड्या कुणीतरी जबरीने काढून घेतल्या होत्या. पायात चपला नाहीत, पायाला मार लागलेला, अशा विचित्र अवस्थेत आई मिळाली. रुग्णालयात औषधोपचार करुन आईला घरी आणले. धन्य श्री साईबाबा आणि धन्य त्यांची ती पवित्र शिरडी.

# श्री साईनाथांची प्रार्थना

– **श्री. मधुकर शा. सावंत**
मंगळवार पेठ, कोल्हापूर.

माझ्यावर दि. ३-७-१९८८ रविवार रोजी आलेला प्रसंग. मी सायंकाळी ६ वाजता रंकाळ्यावर फिरणेसाठी सायकल घेऊन निघालो. गंगावेश मार्गे जात असता श्री. कृष्णसरस्वती महाराज ह्यांच्या मठाजवळ एक बाई तोतया आंबे विकत बसलेली होती. तिच्या जवळ पाच ते सहा लोक आंबे विकत घेत होते. आपणही आंबे घ्यावे ह्या उद्देशाने जवळच सायकलला कुलुप न लावता सायकल उभी केली व आंबे घेऊ लागलो. पाच मिनिटांनी मागे पाहातो तो सायकल जागेवर नाही. मला तर धक्काच बसला, वेडापिसा झालो व पळत पळत इकडे तिकडे सायकल दिसते

का पाहू लागलो. तेथे असलेल्या सायकलवाल्याकडे चौकशी केली, तसेच पळत पळत रंकाळा स्टँडवर गेलो, पण कोठेच सायकल पहावयास मिळाली नाही. तेथे असलेल्या श्री साई मंदिरात बाहेरुनच बाबांना मनोभावे प्रार्थना केली व सांगितले, "माझी सायकल हरवली आहे. ज्या कोणी नेली असेल त्याने परत जागेवर आणून लावावी, अशी बुद्धी त्यास द्या. पुन्हा पळत पळत त्या जागेवर येऊन थांबलो. मनात बाबांचा धावा चालू होताच माझे डोळे जाणाऱ्या येणाऱ्या सायकलींकडे लागले होते. १० मिनिटांनंतर एक इसम त्या सायकलवाल्या जवळ आला व त्यास सांगू लागला, मी सायकल नेलेली आहे, कोणाची आहे. त्याने माझेकडे बोट केले. मला सायकल मिळाल्याचा आनंद झाला. तो इसम माझी माफी मागू लागला. माझे अंग बहरुन आले. माझी प्रार्थना बाबानी ऐकली व आपले अस्तित्व दाखविले.

## ही तर साईची किमया

**– सौ. नीता देशपांडे**
बालाघाट, म. प्र.

माझा साडेतीन वर्षाचा मुलगा रोजच्या प्रमाणे १० वाजता सकाळी शाळेत जाण्याकरिता तयार झाला व रिक्शाची वाट पहात दाराशी उभा राहिला. मी आत काम करीत होते. ५--१० मिनिटांतच रिक्शावाल्याने आवाज दिला. म्हणून मी बाहेर आले, पण तेथे मुलगा न दिसल्याने थोडी घाबरले. मला असे वाटले की, एखादे वेळेस आत किंवा अंगणात वगैरे असेल. म्हणून मी त्याला सगळीकडे शोधले. पण तो कुठेच नव्हता. तो सहसा आमच्या कम्पाउन्डचे दार उघडून बाहेर जात नाही. त्यामुळे मी खूप घाबरले. आमच्याकडची नोकर माणसं वेगवेगळ्या दिशेला त्याला शोधण्यास धावली. पण तो कुठेच सापडला नाही. मी अगदी हताश होऊन गेले. व बाबांच्या नावाचा धावा करण्यास सुरवात केली. आणि अगदी ५ मिनिटांच्या आतच माझा मुलगा सुखरुप येत असताना मला दिसला. विशेष म्हणजे तो ज्या दिशेने येत होता, त्या बाजूला मी स्वतः जाऊन आले होते, पण तेव्हा तो तेथे नव्हता.

तो कुठे होता व कसा परत आला, हे फक्त बाबांनाच माहीत. आम्ही हेच मानतो की बाबांच्या कृपेनेच तो सुखरुप परत घरी आला.

# साई कृपा

– श्री. दत्ताराम म. कोरगांवकर
विलेपार्ले (पूर्व), मुंबई.

तो गुरुवारचा दिवस होता. मी ऑफिसमधून घरी जाण्यास निघालो होतो, तेवढ्यात अचानक ध्यानी मनी नसताना माझा धाकटा मुलगा कु. प्रदिपचा फोन आला की, त्याच्या हातून ३,६००/– रुपये जास्त दिले गेले. तो त्याच्या ऑफिसमध्ये कॅशियर असल्यामुळे संध्याकाळी हिशोब जमला पाहिजे, म्हणून तेवढे रुपये त्यादिवशी भरले पाहिजे होते. मी फार घाबरलो होतो, आयत्यावेळी पैसे कसे भरणार? मी तासाभरातच प्रदिपच्या ऑफिसमध्ये गेलो. तो नवखा असल्यामुळे घाबरला होता. परंतु मी व ऑफिसमधील इतरांनी त्याला धीर दिला व त्याच्याकडून दुसऱ्या दिवशी ३,६००/– रुपये भरू असे लिहून दिले. घरी येतेवेळी आम्ही दोघे नाराजच होतो. त्यावेळी गणपतीचा सण होता. घरी जातेवेळी आम्ही पार्ल्यातील साईबाबांच्या मंदिरात गेलो व अश्रूनयनांनी बाबांची आराधना केली, आणि जड अंतःकरणांनी घरी परतलो. कोणालाही जास्त गेलेले पैसे तो परत करत नाही व त्याला द्यावयाचे असल्यास त्याचवेळी तो परत करतो, त्यामुळे पैसे परत मिळण्याची शक्यता नाही, ह्या विचारात आम्ही होतो.

रातोरात पैशाची जमवाजमव करुन दुसऱ्या दिवशी आम्ही पैसे भरले. ज्याचा संशय येत होता, त्याच्याकडे चौकशी केली, परंतु त्याने नाकबुल केले. ऑफिसमधील लोक सांगत होते की, आतापर्यंत कॅशियरकडून जास्त गेलेले पैसे कोणीही परत केलेले नाहीत, त्याचप्रमाणे तुम्हालाही ते मिळणे शक्य नाही. आम्ही तरीही धीर सोडला नाही. प्रदिपचा गणपती व साईवर फार विश्वास आहे. आम्ही ज्या माणसाचा संशय येत होता, त्या माणसाच्या ऑफिसमध्ये जाऊन प्रयत्न चालू ठेवले होते. ''प्रयत्नांती परमेश्वर'' शेवटी साईला दया आली व गुरुवारी गेलेले पैसे शेवटी सहाव्या दिवशी मंगळवारी त्या संशयी व्यक्तीच्या ऑफिसच्या मॅनेजरने आम्हाला परत केले व त्या संशयित व्यक्तीला शिक्षा केली. ''धन्य धन्य साई माऊली.''

माझा थोरला मुलगा कु. औदुंबर तिसरे वर्ष एल्.एल्.बी. ला बसला होता. त्याला एका विषयात २८ मार्क मिळाले म्हणून तो त्यावेळी परिक्षेत पास होऊ शकला नाही. त्याची इच्छा एल्.एल्.एम्.ला जाण्याची होती. परंतु एल्.एल्.एम्.ला प्रवेश मिळविण्यासाठी तिसरे वर्ष एल्.एल्.बी.ला एकाचवेळी सर्व विषयात पास होऊन कमीत कमी दुसरा वर्ग मिळविणे आवश्यक असते. तो स्वतः व आम्ही सर्व नाराज होतो, कारण आपल्या हातात काहीच नसते.

परंतु एक दिवस, तो गुरुवारचा दिवस होता, त्याचा एक मित्र आमच्याकडे आला व म्हणाला की, मी १२ वीच्या परिक्षेत नापास झालो होतो व पेपर फेरतपासणीसाठी पाठविले, नंतर त्या विषयात मी पास झालो. मी औदुंबरला एल्.एल्.बी.चा पेपर फेर तपासणीसाठी पाठविण्याबाबत सांगितले. परंतु तो काही त्यासाठी तयार होईना, कारण त्याला पेपर कठीणच गेला होता. मी औदुंबरला सांगितले की पैसे माझे, मेहनत माझी, तू फक्त होकार दे. ह्याप्रमाणे आम्ही पेपर फेरतपासणीसाठी पाठविला. मध्यंतरी दोन महिने मुंबई विद्यापीठाकडून आम्हाला फार त्रास झाला, परंतु दोन महिन्यानंतर आम्हाला कळले की, तो पास झाला. २८ मार्कांच्या ऐवजी त्याला ५७ मार्क मिळाले होते. ही सर्व साईचीच कृपा.

आपली मेहनत व साईची कृपा असल्यास कुठलीही गोष्ट साध्य होणे अशक्य नाही. "धन्य धन्य ती साई माऊली".

# मुलगी बरी झाली

**– सौ. कांता विजयकुमार ओलेकर**
राजारामपुरी, कोल्हापूर.

माझी मोठी मुलगी शितल मे महिन्याच्या सुट्टीनंतर आमच्या बरोबर कोल्हापूरला न येता आजी-आजोबांच्या जवळ सांगलीस राहिली होती. शाळा सुरु होण्यास अजून ८ ते १० दिवस होते. दिनांक ३ जूनला आम्ही चतुर्थीचा उपवास सोडून झोपी गेलो, पण सकाळी ७ वाजता सांगलीहून माझ्या दीराचा फोन आला व शितलला ॲडमिट केले आहे, तुम्ही ताबडतोब या, असे त्यांनी सांगितले. आम्हा नवरा-बायकोचे तर हातपाय गळल्यासारखे झाले. एकाकी असे कसे झाले असेल, या विचाराने आम्हाला काही सुचेनासे झाले. कारण तिला झटके येऊन एक हात व एक पाय हलवता येत नव्हता. शिवाय तिला बोलताही येत नव्हते. मी देवासमोर गेले, बाबांची उदी घेतली, तिच्या दिशेने फुंकली व बाबांना साकडे घातले की, मी तिथे पोहचेपर्यंत माझ्या मुलीला आराम पडू दे. एस्.टी. मध्ये बाबांच्याच नावाचा जप करत होते. आम्ही एस्.टी.तून उतरताच हॉस्पिटलमध्ये गेलो. तिला सलाईन लावले होते व तिला झोपही लागलेली होती. पण काय आश्चर्य! आम्ही जावून ५ ते १० मिनिटे होतात तोपर्यंत तिला जाग आली. तिने आम्हा सर्वांच्याकडे पाहिले, हाता-पायांचीही हालचाल केली व तुम्ही कधी आलात, असे ती बोलली सुद्धा. आम्हाला खूप आनंद झाला. आम्ही बाबांची प्रार्थना करुन मनोमन त्यांचे आभार मानले. बाबांचे आशीर्वाद व कृपा म्हणूनच माझी मुलगी लवकर बरी झाली. दुसऱ्याच दिवशी डॉक्टरांनी तिला डिसचार्ज दिला.


# शिरडी माझे माहेर

– सौ. माया सावंत
कुर्ला (पूर्व), मुंबई.

"श्री साई", ह्या शब्दानेच माझे मन किती सुखावते म्हणून सांगू! माहेरी जाताना जशी सासुरवाशीण सुखावतेना, अगदी तसाच शिरडीला जाताना माहेरी जाण्याचा आनंद मला मिळतो. आपली सारी दु:ख, व्याधी, पिडा, विवंचना दूर करणारे, आपल्याला संकटांतून मुक्त करणारे माझे परमपुज्य श्री बाबा, त्यांच्या विषयी किती म्हणून लिहू! लिहिता लिहिता शब्द कोषागरातील शब्द संपतील, लेखणी झरझर झिजून थकून जाईल, पण बाबांची महती संपणार नाही. उमललेले फुल देवाच्या चरणी किंवा मस्तकी जाऊन त्याची सेवा करते. तेच जर कोमेजलेले असेल तर ते निर्माल्यांत जाते. त्या फुलाप्रमाणे आपले मानवी जीवन आहे. आपल्या शरीरात जो पर्यंत ताकद आहे, तो पर्यंत आपण झेपेल तेवढी इश्वराची सेवा केली पाहिजे. नाहीतर जीवनाच्या शेवटी अन्य काहीच साधन नाही म्हणून मुखी नामस्मरण! असं व्हायला नको. तेव्हा वेळ संपलेली असते. हृदयाच्या घड्यामध्ये जर भक्तीचा झरा असेल, तर तो घडा भक्ती रसाने नक्कीच भरेल. कुणाचे चांगले करता आले नाही निदान कुणाचे वाईट तरी करू नये.

श्री साईबाबांची इच्छा असल्या शिवाय आपल्या लेखणीतून त्यांच्या विषयीची अमृतधारा वाहू शकत नाही. आज पर्यंत जे जे निर्माण झाले, मग ते सजीव असो वा निर्जीव! शेवटी सगळे नाशवंत आहे. मला श्री बाबांनी अक्षरश: मृत्युच्या सापळ्यातून बाहेर काढले. म्हणून आज मी हे लिहू शकले. मला हृदय विकाराचा झटका आला. मी सायन रुग्णालयात दोनदा कार्डीओग्राम काढले. तेथून मला के.इ.एम्.ला पाठविले. जाताना मी पूर्ण अंगाला श्रीं ची उदी लावली, प्राशन केली व त्यांच्या पुढे उभी राहून प्रार्थना केली की, बाबा, आज पर्यंत तुम्ही एवढे चमत्कार दाखविलेत, मग ह्या तुमच्या लाडक्या लेकीसाठी हा एक चमत्कार दाखवा. डॉक्टरांनी तपासणी नंतर चांगला रिपोर्ट दिला. त्या वेळचा आनंद काय वर्णावा? तो आनंद साईभक्तच जाणू शकेल.

अशी ही माझी साई माऊली तिचे मी किती गोडवे गाऊं! तुकाराम महाराजांनी म्हटले आहे, "सुख पाहता जवा पाडे, दु:ख पर्वता एवढे", मी श्री बाबांना सांगते कितीही दु:खाचे डोंगर कोसळले, तरी ते सहन करण्याचे बळ द्या, मनाला शांती द्या, धैर्य द्या. श्री बाबा आपले पर्वता एवढे दु:ख सुद्धा जवा एवढे करतात, पण आपली त्यांच्यावर नितांत श्रद्धा पाहिजे. श्री साईनाथ महाराजांना वंदन करुन त्यांच्या चरणी हे पहिले पुष्प अर्पण करते.



# साईसमर्थ

– सौ. सुषमा सदाशिव वझे
नेहरु नगर, कोल्हापूर.

आम्ही पणजीला रहात होतो तेव्हाची गोष्ट. आमची घरमालकीण साईभक्त आहे. तिच्याकडे साईलीलेची पुस्तके यायची. असेच एके दिवशी मी दुपारी त्यांच्याकडे 'श्री साईलीला' मासिक वाचत होते. अनेक जणांना बाबांचे आलेले अनुभव वाचून मनात श्रद्धा निर्माण होत होती. ते वाचता वाचता मनात आशेचा किरण निर्माण झाला, कारण त्यावेळी माझे पती बँकेच्या ऑफीसर्सच्या लेखी परीक्षेला मुंबईला जाऊन आले होते. तशी परीक्षा अवघड. मनात म्हणाले की, हे लेखी परीक्षा व मुलाखती दोन्ही परीक्षा पास होतील, तर शिर्डीस श्री साईचरणी भेटून येवू, आणि नवल म्हणजे श्री बाबांच्या कृपेने हे पहिल्या खेपेतच उत्तीर्ण झाले व आम्ही शिर्डीला जावून आलो.

आम्ही शिर्डीला गेलो त्यादिवशी रामनवमी होती. तेथे होत असलेल्या रामनवमी उत्सवाची काहीच माहिती नव्हती. परंतु श्री कृपेने लवकर दर्शन मिळाले. नंतर स्टॅण्डवर नाशिकला जाण्यासाठी उभे राहिले. एप्रिल महिना असल्यामुळे गाडीला बरीच गर्दी होती व भावाचे लग्न असल्यामुळे आम्हाला कोणत्याही परिस्थितीत कोल्हापूरला यायचे होते. एवढ्यात एका अनोळखी व्यक्तीने आम्हाला शिर्डी-कल्याण गाडीची दोन रिझर्वेशन्स आणून दिली. श्री साईबाबांची कृपा दुसरे काय? म्हणून आम्ही प्रथम नाशिक व तेथून पुढे कोल्हापूरला यावे असे ठरविले. नाशिक स्टॅण्डवरही गर्दी होती. सोबत लहान मुलगी असल्याने खूप काळजी वाटत होती. मनातून श्री साईबाबांना प्रार्थना करत होतो की, गाडी मिळावी. तेवढ्यात सटाणा-कोल्हापूर गाडी आली. रिझर्वेशन्स असल्यामुळे पुण्यापर्यंत उभ्याने जावे व पुढे दुसऱ्या गाडीने जावे, असा विचार करत असतानाच एक सद्‌गृहस्थ आले व म्हणाले 'माझेकडे कोल्हापूरपर्यंतची दोन तिकिटे आहेत. आपणांस हवी आहेत काय? आम्ही आश्चर्यचकित झालो व श्री बाबांचे नाव घेत कोल्हापूरला आलो.

त्यानंतर असे बरेच अनुभव आले. संकटकाळी श्रीबाबांचा धावा करताच ते त्यांच्या भक्ताला कधीही निराश करत नाहीत. अशीच श्री बाबांची कृपादृष्टी आमच्यावर व त्यांच्या असंख्य भक्तांवर राहू दे, ही बाबांचरणी प्रार्थना.

# साईराम

– **श्री. मिलिंद वसंत वैऊडे**
अंधेरी (प.), मुंबई.

मी साईबाबांचा भक्त होऊन आज तीन-चार वर्षे झाली असतील. तेव्हा मी प्रथम वर्ष बी.कॉम.ला होतो. त्यावर्षी आमच्या कॉलेजने एफ.वाय.बी.कॉमचा फक्त २ % निकाल लावला. बाकी सगळ्यांना फेरपरिक्षेचा बडगा दाखविला. मला इकॉनॉमिक्स मध्ये री-एक्झाम द्यावी लागली. ते मला सर्वस्वी कठीण होते, कारण इकॉनॉमिक्स हा विषय मला अत्यंत कठीण जात होता. मला समजेना की काय करावे ते! दादर टी.टी.ला स्टेशनला लागूनच एक साईमंदीर आहे, त्या वाटेवरच कॉलेज असल्यामुळे अनायासे दर्शन घडत असे. असाच मी निकाल घेऊन साईबाबांना डोळ्यात पाणी आणून आळवत होतो की, मला ह्या वर्षी पास करा, मी शिर्डीला येईन. त्यापूर्वी मी कधीही शिर्डीला गेलो नव्हतो. आश्चर्य म्हणजे, मी त्यावर्षी पास झालो. माझ्या पुढचा व मागचा नंबर नापास होते. त्यावेळी मला साईबाबांची प्रचिती आली. त्यानंतर मी कॅटरींगची परीक्षा पास झालो. हीदेखील बाबांचीच कृपा! बी.कॉम.च्या शेवटच्या वर्षाला असताना मी एकदम निर्णय घेतला की, आपल्याला काही कारकुनी जमणार नाही. म्हणून मी एकदम वेगळे क्षेत्र पत्करलं, चित्रपट व्यवसाय व त्यातील एक शाखा म्हणजे फील्म-एडिटिंग म्हणजे संकलन. एक वर्ष उमेदवारी करुन हल्लीच मी यशस्वीरित्या उत्तीर्ण झालो व असोसिएशन ऑफ फिल्म्स एडिटिंगचा सन्माननीय सभासद झालो. त्यावर्षी मी टी.वाय.बी.कॉम. नापास झालो. डोळ्यापुढे सर्व अंधार होता. आता काय करायचं! पण बाबांच्या मनात काही वेगळंच होतं, याची मला आता प्रचिती आली. त्यावेळी बाबांना दोष दिला होता. पण ती माझी चूक होती व नंतर मी मनाला समजावलं की, सर्व होतेय ते साई इच्छेनेच होते. तेव्हा जे होईल ते शांतपणे पहात रहावे व ह्यावेळी मला गोरेगावचे साईभक्त पू. दिघेकाका यांचे अमूल्य मार्गदर्शन लाभले व आता 'संकलक' म्हणजे फिल्म एडिटर झाल्यावर बाबांच्या लीलेचा चमत्कार मला दिसला.

असाच एक दिवाळीतील अनुभव. आमच्या घरात पूजेचे फार प्रस्थ आहे. आमचे वडील पूजा अगदी साग्रसंगीत करणार. म्हणजे रांगोळीची अक्षरं, अक्षदा, कापूर, आरती इ. त्यामुळे प्रत्येक देवाला गंध लावल्यावर अक्षदा म्हणून तांदूळ लावतात व ते तांदूळ खायला चिमण्या-कबुतरं खिडकीतून आत येतात. वडील आपली गुरुची सोन्याची अंगठी देव्हाऱ्यात ठेवीत. दिवाळी तोंडावर होती व एका रविवारी सकाळी पाहिलं तर देव्हाऱ्यात अंगठी नव्हती. आम्हाला वाटलं कबुतराने कुठे तरी टाकली असावी, म्हणून आम्ही सर्व शोधलं. पण अंगठी काय मिळेना. मग मी डोळ्यात पाणी आणून बाबांची करुणा भाकली की, अंगठी मिळू दे! मी शिर्डीला येऊन शाल चढवीन, असं बोलून गप्प बसून राहिलो. तेव्हढ्यात कामवाल्या बाई आल्या.

त्यांना सूचना दिली की, झाडू कराल तेव्हा अंगठी बघा मिळतेय का! आणि काय सांगू साईभक्तांनो, त्या बाईला पलंगाखाली कुठेतरी अंगठी मिळाली व प्रामाणिकपणे तिने ती आमच्या सुपूर्द केली व माझ्या डोळ्यात आनंदाश्रू उभे राहिले.

एकदा मी चंद्रपूर जिल्ह्यात आदिवासींच्या भागात भटकायला गेलो होतो. सोबत माझे मित्र अरविंदसर होते व आम्ही वाटाड्या म्हणून एका आदिवासी मराठी जाणणाऱ्या तरुणाला बरोबर घेतले होते. असेच आम्ही जंगल तुडवीत होतो, कारण तिकडे अस्वलांचा फार त्रास. आम्हाला बाबा आमटे यांच्या मुलाने म्हणजे प्रकाशने सांगितले की, अस्वला पासून सावध असा. आणि जंगल तुडवायचे म्हणजे पायीच, कारण तिथे प्रवासाची कोणतीच साधनं उपलब्ध नव्हती. मी मनात साईनाम जपत मार्गक्रमण करीत होतो व वारंवार गळ्यातील साईलॉकेटला हात लावीत होतो. तेवढ्यात मला त्या आदिवी मुलाने ढकललं व पुढे धडपडलो. तेव्हा त्याने सांगितले की, सूर्यकांड (Flying Snake) च्या तडाख्यातून वाचलास. हा साप ह्या झाडावरुन त्या झाडावर उडत असतो. कोणी माणूस दिसला की, बरोबर टाळूवर दंश करतो. दंश झालेला माणूस तिथल्या तिथे गप्पागार होतो. आता त्या आदिवासीला बुद्धी देणारे, त्याची नजर नेमकी त्या सापावर टाकणारे माझे परमपूज्य बाबाच होते, याची मला मनोमन खात्री झाली व डोळे पाणावले.

मी नुकताच एडिटर झालो होतो. हो! एक सांगायचे राहूनच गेले. ज्या दिवशी माझी परीक्षा होती, तो गुरुवार होता. नवरंग लॅबच्या खोलीमधे माझी परीक्षा होती. त्याच्या बाहेर बाबांचा समाधी फोटो होता. गुरुवार हा माझ्या उपवासाचा दिवस असतो. त्यावेळी मला एक चित्रपट मिळत होता व दूरदर्शनला पण जायचं होतं, व्हिडीयो एडिटिंगसाठी. तर मी बाबांच्यापुढे मनोभावे चिठ्ठ्या टाकल्या व आज्ञा विचारली, तर दूरदर्शनला जायची आज्ञा मिळाली. मी सिनेमासाठी गेलो नाही आणि आश्चर्य म्हणजे, दूरदर्शनला माझे स्नेही गोरखनाथ कडू यांनी मला श्री. दत्ता सावंत यांची ओळख करुन दिली, ते तिकडे ज्येष्ठ संकलक आहेत. त्यांनी मला एका आठवड्याने यायला सांगितले, आणि माझे काम झाले. मला कडू म्हणाले, ह्या सर्व योगायोगाच्या गोष्टी आहेत, कारण त्यादिवशी सावंत यांचा मूडही चांगला होता. कारण दूरदर्शनमध्ये नेहमी तणावाचं वातावरण असते. मी मनात म्हणालो, ही सर्व बाबांची लीला.

# श्रीसाईबाबांचा कृपाप्रसाद

**— श्री. शं. ग. सारंगधर**
कांदिवली (पश्चिम), मुंबई.

१९५२ साली मी प्रथमच शिरडीला गेलो. त्या वेळी पाहिलेली शिरडी आजच्या शिरडीहून वेगळी वाटली होती. त्या शिरडीचं नातं श्रीबाबा हयात असतानाच्या शिरडीशी जवळचं वाटत होतं.

दिक्षित वाड्यावरून लेंडी बागेस जाताना पाया खालचा रस्ता याद देई, ती सकाळी सकाळीच श्रीबाबांना लेंडी-बागेत जाण्यासाठीचा रस्ता झाडून साफ करणाऱ्या त्या राधाकृष्णाआईची. त्यांच्याबद्दल सर्वजण आदराने बोलताना ऐकले. त्या अकाली म्हणजे वयाच्या ३५ व्या वर्षी निधन पावल्या. पण शिरडीतील आपल्या ८/९ वर्षांच्या वास्तव्यात त्यांनी अनेकांना प्रेरणा देऊन त्यांच्याकडून शिरडीचा हळूहळू कायापालट करून घेतला.

श्रीबाबांनी मठ स्थापन केला नाही, गादी निर्माण केली नाही, पंथ वा शिष्य परंपराही सुरू केली नाही. तरीही आपल्या कीर्ती-परिमळाने असंख्य भक्तांना विना प्रचार त्यांनी आपल्याकडे ओढून आणले. सर्व भारतभर किंबहुना जगभर पसरलेला श्रीबाबांचा भक्तपरिवार याची साक्ष देतो.

भक्तांना उपदेश करण्याची श्रीबाबांची पध्दत अगदी आगळी वेगळी होती. त्यात विद्वत्तेचे अवडंबर नसे, वा भक्ताच्या डोक्यावरून वाहून जाणारी जडता नसे. सारा उपदेश गोष्टीरूपाने आणि बोलीभाषेतून व्हायचा की ऐकणारा 'हा तर आपल्याच आयुष्यातला प्रसंग' हे जाणून चकित होई किंवा खजिल होई व आपले वर्तन सुधारी.

अशा असंख्य गोष्टी शिरडीत अनेकांकडून ऐकल्यावर मी प्रभावित झालो. धन्य ते शिरडीचे जन की ज्यांच्याशी श्रीबाबा बोलले, हसले, वेळी भांडलेही! शिरडीकरांच्या सुखदु:खाशी श्रीबाबा इतके समरस झाले होते की, प्रसंगी त्यांची दु:खे ते आपल्यावर ओढून घेत पण आपल्या भक्ताला दु:खाचा वारा लागू देत नसत!

या सर्व आठवणी मला वरचेवर शिरडीला ओढून नेत. पण दिवसेंदिवस शिरडीकडे भक्तांचा लोंढा वाढू लागला. पूर्वीची मर्यादित निवासस्थानं अपुरी पडू लागल्याने त्यांच्यासाठी नवीन इमारती उभ्या झाल्या. हॉटेल्स, खानावळींची संख्या पण वाढली.

वयोमानाप्रमाणे व वृध्दत्वामुळे तसेच शिरडीतल्या वाढत्या गर्दीमुळे शिरडीला जाणे जमेनासे झाले. त्यातच १९८० साली झालेल्या अपघाताने हालचालींवर बंधने आली. तीव्र इच्छा असूनही जाणे होत नाही. म्हणून घरातल्याच देवघरातील श्रीबाबांच्या प्रतिमेची पूजा करून प्रार्थना करतो. माझी आळवणी व्यर्थ जात नाही. श्रीबाबा अदृश्यपणे पाठीशी राहून संकटापासून सदैव आमचे रक्षण करतात, मागणं

पदरात टाकतात याची वारंवार प्रचिती येते. अलिकडेच आलेले दोन अनुभव याची साक्ष पटवितात.

माझ्या बेडरूमला लागूनच रस्त्याच्या बाजूला बाल्कनी आहे. रात्री मच्छरदाणी बांधताना माझ्या गादीवरील जादा उश्या (एकूण चार) व इतर पांघरूण बाल्कनीतल्या खुर्चीवर ठेवतो. त्या दिवशी पाऊस होता म्हणून खुर्ची बेडरूममध्ये घेतली होती. नेहमीप्रमाणे उश्या, पांघरूणं त्यावरच होती. झोप येईपर्यंत फोल्डींग चेअरवर वाचत बसण्याची मला सवय आहे. पण त्या रात्री फोल्डींग चेअरऐवजी खुर्ची पुढे तेवढ्याच उंचीचं स्टूल ठेवून त्यावर वाचत बसलो. वाचता वाचता सहज मागे उश्यांना टेकलो मात्र. खुर्चीला मागे टेकू नसल्याने उश्यासह खुर्ची आणि स्टुलासह मी खाली कोसळलो. मोठा आवाज ऐकून घरातली मंडळी धावून आली व मला उठवलं. थोडा मुका मार बसण्यावरच निभावलं.

ओघाला आलं म्हणून असाच आणखी एक प्रसंग आठवला, तो सांगतो. कपाटावरील बॅगमधून पुस्तक काढण्यासाठी उभे राहाण्याकरिता पायाखाली स्टुलावर स्टुल ठेवले होते. पुस्तक काढण्याच्या नादात पाया खाली स्टुलावर स्टुल आहे, हे विसरलो. थोड्या वेड्या-वाकड्या हालचालीत वरचे स्टुल घसरून स्टुलासह मी खाली कोसळलो. पण यावेळीही मी सहीसलामत बचावलो.

या दोन्ही घटना ज्या बेडरूममध्ये घडल्या, तेथे आमचे देवघर आहे. या देवघरातील देव्हाऱ्यात श्रीसाईबाबांची द्वारकामाईतील मूर्ती आहे. श्रीबाबांनीच मला दुर्घटनेपासून वाचवलं, असं म्हटलं तर वावगं ठरेल का? नाही तर घसरून पडल्याने पाय अथवा हात फ्रॅक्चर झाल्याचे (विशेषत: वृध्दापकाळी) आपण नेहमी ऐकतो. म्हणून अदृश्यपणे श्रीबाबाच वेळोवेळी संकटात माझ्या पाठीशी राहून माझं रक्षण करीत असतात, याचे अशा प्रसंगाने मला प्रत्यंतर येते.

आता माझ्या प्रार्थनेप्रमाणे माझे मनोरथ पूर्ण केल्याचा हा एक ताजा अनुभव:

माझा धाकटा नातू मार्च ८७ च्या शालान्त एस्.एस्.सी. परिक्षेला बसला होता. शालेय जीवनात ५/६वी इयत्तेपासूनच्या अभ्यासातील त्याच्या प्रगतीवरून गुरूजनांची त्याच्यावर मोठी मदार होती. त्याने परिक्षेकरिता मेहनत पण खूप केली. कुठल्याही खाजगी क्लासला तो जात नव्हता. पण गुरूजनांच्या मार्गदर्शनाखाली त्याने तयारी केली. त्याच्या कष्टाला श्रीबाबांनी सुयश द्यावं म्हणून रोज पूजा करताना मी प्रार्थना करून श्रीबाबांपाशी मागणं मागत असे की, त्याला गुणवत्ता यादी (Merit List)मध्ये पास करावे. श्रीबाबांनी माझ्या प्रार्थनेप्रमाणे त्याला गुणवत्ता यादीत २० व्या क्रमांकावर पास करून माझे मनोरथ पूर्ण केले. त्याच्या गुरूजनांना व मित्रांना इतका आनंद झाला की, त्यांनी त्या दिवशी शाळेत फटाके वाजवून दिवाळी साजरी केली. कारण त्याच्या ह्या यशाने त्याच्या शाळेला हे यश प्रथमच प्राप्त झाले.

श्रीसाईबाबांचा असाच कृपा-प्रसाद सर्व भक्तांना लाभो, हीच त्यांच्या चरणी प्रार्थना आणि एवढेच श्रीबाबांपाशी मागणे!

# साई तुमच्या दर्शनाची वाट मी पहाते

– सौ. अर्चना पाटकर
बोरीवली (प.), मुंबई.

ते १९८३ चे साल होते. ऑगष्ट महिना होता. माझे वडील तापाने आजारी होते. आमच्या घरात आम्ही सर्वच साईभक्त असल्याने पदोपदी त्यांचे स्मरण करीत असू. अशाच एका रात्री १ वाजता वडील बाथरुममध्ये गेले. ताप अंगात होताच. पण त्यांना काही कळण्यापूर्वीच ते बाथरुममध्येच धाडकन पडले. आम्ही सर्व झोपेतून उठलो. नशीब बलवत्तर होते आणि साईची छाया पाठीशी होती म्हणून वडील वाचले. बाथरुमला कडी लावली नव्हती. थंडीने वात भरला असल्याने त्यांना भोवळ आली. जर दरवाजाला कडी लावली असती, तर बाबा आम्हाला मिळालेच नसते. डॉक्टरांना बोलविले. डॉक्टरांनी सांगितले की, अटॅक आहे, हॉपिस्टलमध्ये ॲडमिट करा. पण माझ्या आईचा विश्वासच बसेना. श्री साईंच्या विभूतीने आणि स्मरणाने बाबांचा ताप आणि वातासारखा तो प्रकार कोठच्या कोठे नाहीसा झाला. साईच्या विभूतीने वडिलांना गुण मिळवून दिला.

दुसरा अनुभव तर नुसता अनुभव नसून कृतीत परीक्षा घेण्यासाठी आलेले माझे साईबाबाच होते. बाबा कुणाच्याही रुपाने७ दर्शन देतात हे माझ्या आजी, आईचे बोल मला प्रत्यक्षात बाबा दर्शन देऊन गेल्यावर समजले, अन् आजपर्यंत मी वाट पहात आहे ती दर्शनाची.

माझे लग्न १९ एप्रिल १९८७ मध्ये झाले. माहेरी जसे साईच्या नामस्मरणाचे आम्ही गुण गातो, तद्वत माझे सासर मला मिळाले. माझे सासु-सासरे, घरातील सर्वच साईंची महती गाणारेच मला मिळाले. त्यामुळे माझा आनंद द्विगुणीत झाला. लग्न झाल्यावर आम्ही प्रथम शिर्डीला जाण्याचे ठरविले, पण योग हा असा असतो की, ठरविलेली आम्ही मुहूर्तमेढ माझ्या काही कारणाने साधता आली नाही. माझ्या पतीने मला धीर दिला, आज नाही तर उद्या आपण शिर्डीला जायचेच. माझे सासुसासरे सर्वच आम्ही गेले सहा महिने ठरवित आहोत, पण साईबाबांच्या मनात असेल तर ना!

मी पोष्ट खात्यात नोकरी करते. साहजिक काऊंटर असल्याने जनता संपर्क येतो. डिसेंबर १९८७ ची गोष्ट. वार गुरुवार होता. सकाळी १० वाजता एक ११/१२ वर्षाचा मुलगा कफनी घालून, धुपारती घेऊन माझ्या काऊंटर जवळ आला. इतर काऊंटरचे लोक त्याला म्हणाले, ए लडके, ए तो पोष्ट ऑफीस है, कोई घर नहीं है! पण तो जागचा हालेना. मी त्यास २५ पैसे दिले. तो मला एवढेच म्हणाला, "तुम क्या सोचती हो, साईनाम भजो, दर्शन मिलेगा।" माझ्या डोक्यात उशिरा प्रकाश पडला. नंतर मात्र मी हतबल झाले. स्वप्न दृष्यात त्याच वेषातला तो बालक दुसरा तिसरा कुणी नसून माझे साईबाबाच होते.

# साईकृपेचे यश

– कु. प्रसन्न विलास सातपुते
चिंचपोकळी (पूर्व), मुंबई.

गेल्या वर्षीची, म्हणजे फेब्रुवारीच्या १९८७ची गोष्ट. माझी एस.एस.सी. बोर्डाची परीक्षा मार्च १९८७ मध्ये होती. परंतु फेब्रुवारी ४/५ तारखेपासूनच मला ताप व जुलाब होऊ लागले. सतत १० दिवस डॉक्टरांचे औषध घेऊनही गुण येईना. त्यातच भरीस भर म्हणून की काय, कधी पोट दुखे, तर कधी पाय लचके. असे रोज नवनवीन आजार उद्‌भवत होते. परिक्षेला तर एकच महिना उरला होता. इतर मुले रात्री जागून अभ्यास करीत होती. पण दिवसाचा देखील मला अभ्यास होत नव्हता. माझा सारा दिवस बिछान्यावर पडूनच जात होता, इतका मी अशक्त झालो होतो. डॉक्टरांनी औषधाचा गुण येत नाही, हे पाहून संडास-लघवी तपासून घेण्यास सांगितले. त्यांनी त्या संदर्भात एका डॉक्टरालाही चिठ्ठी दिली. ती घेऊन आम्ही घरी आलो. त्याचवेळी मला आठवलं की, आईच्या शाळेतील (माझी आई प्राथमिक शाळेत शिक्षिका आहे) एका बाईंचे पती वैद्य आहेत. ते कावीळीवर फक्त डोळे पाहून निदान करतात. तो तरी उपाय करुन पहावा, असा माझा विचार मी आईस बोलून दाखवला व त्याप्रमाणे मी दुसऱ्या दिवशी त्या वैद्यांकडे जाऊन आलो. त्यांनी लगेच सांगितले की, 'याला कावीळ झाली आहे'. त्यानुसार त्यांनी आठ दिवसांचे औषध दिले. दररोज पहाटे ४ वाजता उठून मी ते औषध पित असे, औषधात उदी टाकून, ती वाटी साईंच्या पवित्र चरणाला लावून.

आणि काय चमत्कार! साईभक्तांनो, औषधाचे ३ ते ४ डोस घेतल्यावरच मला बरे वाटू लागले. अशक्तपणा होता, पण तरीही साईबाबांचे नाव घेऊन मी अभ्यासाला सुरुवात केली. १९ मार्चला परीक्षा व संपूर्ण फेब्रुवारी महिना माझा बिछान्यात पडून गेलेला. अगदी बिकट अवस्था. त्यामुळे माझा सर्व अभ्यास १ मार्च ते १९ मार्च या १९ दिवसांतच झाला होता. माझे आईवडील पार घाबरुन गेले होते. परीक्षा १९ मार्चला सुरु झाली. अशक्तपणामुळे मला जागरण झेपत नव्हते. आई सतत बाबांचा धावा करत होती. साईबाबांवरील अढळ श्रद्धेमुळे मी निश्चिंत होतो. परंतु मला ७०% गुण तरी मिळू देत, असे त्यांना विनवत होतो. अखेर परीक्षा संपली. एप्रिल, मे व जून सुरु झाला. निकालाची तारीख जसजशी जवळ येऊ लागली, तसतसा धीर खचू लागला. बोर्डाची परीक्षा परिक्षक फार कडक पेपर्स तपासतात, हे मी मित्रांकडून ऐकले होते. त्यामुळे सतत बाबांचे नामस्मरण सुरू केले. सुट्टीत देखील मी साईचरित्राची पारायणे करत होतो.

अखेर निकालाचा दिवस उगवला. सकाळी ११ वाजता आई, बाबा व मी निकाल आणण्यास निघालो. शाळेत पोचलो, तर माझे अनेक वर्गमित्र अपेक्षेपेक्षा खूपच कमी मार्क मिळाल्याने दुःखी झाले होते. ते पाहून माझे पाय तर गळूनच गेले. मला तर ६० टक्के गुण मिळण्याची देखील आशा नव्हती. ऑफिसमधून वडिलांनी

माझा रिझल्ट आणला. मी देवाचं नाव घेऊन एकदा किती टक्के मिळालेत, ते पाहिलं. तर तेथे ७५.४२% असे लिहिले होते. १९ दिवसांच्या अभ्यासात साईबाबांनी मला डीस्टिंगशन मिळवून द्यावे ह्या घटनेवर माझा तर विश्वासच बसेना. शाळेतून माझा २० वा नंबर आला होता. काही दिवसांनी माझा शाळेतून तसेच अन्य २-३ ठिकाणांहून सत्कार करण्यात आला. पण माझा सत्कार हा त्यावेळी माझा नसून माझ्या साईमाऊलीचाच होता. कारण त्याच माऊलीने मला ७५% गुण मिळवून देऊन माझे पुढचे जीवन शैक्षणिकदृष्ट्या सुलभ करुन दिले.

# अगाध श्रीसाईंचा महिमा

**– सौ. शामा कर्णिक**
अंधेरी (प.), मुंबई.

बाबांच्या अद्‌भुत लीलेचा अनुभव आला आहे, आमच्याकडे येणाऱ्या एका सद्‌गृहस्थांना. आज त्यांचे वय ७० आहे. पण ४० वयाच्या तरुणाला लाजवेल, इतका त्यांचा उत्साह व शरीरसंपदा निरोगी आहे. हा अनुभव त्यांच्याच शब्दांत देत आहे.

ते साल होते १९४५. त्यावेळी मी टाटामध्ये नोकरीला होतो. ४५ साली जो बॉम्बस्फोट झाला, त्यात माझ्या अंगावर लहानमोठ्या १३-१४ जखमा झाल्या. त्या बऱ्या व्हायला ६-७ महिने लागले. २-३ महिने हॉस्पिटलमध्ये काढले. त्या स्फोटाच्या जबरदस्त, कानठळ्या बसणाऱ्या आवाजाने, माझ्या कानावर आघात झाला व मी एका कानाने बहिरा झालो. इतकेच नव्हे तर थोडा बुद्धीभ्रंश पण झाला. म्हणजे काही काही गोष्टी, मला आठवेनाशाच झाल्या. त्याचा परिणाम म्हणजे माझी नोकरीच गेली. अशी दोन वर्षे गेली. मी अत्यंत निराश झालो व घरातील बाबांच्या फोटोपुढे उभा राहून मी विनंती करत असे की, "बाबा, काही करुन मला नीट स्मृती येऊ द्या, बुद्धी नीट काम करु द्या. मी शिर्डीला आपल्या दरबारात येईन व दर्शन घेइन." माझ्या प्रार्थनेला फळ आले व मला एका प्रायव्हेट कंपनीत नोकरी लागली.

पण प्रायव्हेट कंपनी म्हणजे हुकमांची ताबेदारी. मालक व मॅनेजर मोठे खडूस होते. मालक तर रविवारी पण बंगल्यावर बोलावून काम सांगायचा. त्यामुळे मला ३ वर्षात एकही दिवस रजा घेता आली नाही. नोकरी जाण्याच्या धास्तीने मी निमूट त्यांच्या आज्ञा पाळत होतो. घरात "बाबांची स्तवनमंजिरी" रोज वेळात वेळ काढून वाचत होतो. पण मनाला शांती नव्हतीच. सतत कष्टांनी शरीर व मन थकत होते. पण सांगणार कोणाला? तशात चमत्कार झाला. जुन्या मॅनेजरवर कसला तरी आरोप आला व त्याला काढून, दुसरा नवीन मॅनेजर आला. त्याने तर पहिल्याच

दिवशी मस्टर पाहून मला केबिनमध्ये बोलावले व म्हटलं, मि. वैद्य, तुम्ही ३ वर्षांत एकही रजा घेतली नाहीत, आश्चर्य आहे. मी प्रांजलपणे सर्व हकिकत निवेदन केली. त्याला माझी बहुतेक दया आली असावी. त्यांनी सागितले, "हे पहा, मी तुम्हाला १५ दिवस रजा देतो. घरी जा व विश्रांती घ्या." माझा तर कानावर विश्वासच बसेना. पहिल्याच दिवशी मॅनेजर, सहानुभूतीने १५ दिवस रजा देतो, हे उदाहरणच विरळा. घरी जाऊन "श्री बाबांच्या" फोटो पुढे उभा राहून म्हटले, "बाबा, उद्याच मी शिर्डीला येतो." पण कसले काय न् फाटक्यात पाय.

दुसरे दिवशी सकाळीच उठून फक्त चहा पिऊन गाडीचे रिझर्व्हेशन करुन आलो व विश्रांती घेतो, तोच कोणीतरी दार ठोठावले. शिर्डीचे तिकिट हातात असल्यामुळे, मनात आनंद दाटला होता व त्याच आवेशात उठून दार उघडले. दारात ऑफिसचा शिपाई उभा. म्हणाला,"शेठने आताच्या आता बंगल्यावर बोलावले आहे. जरुरीचे काम आहे." मी त्याला सांगितले "मी रजेवर आहे व रात्रीच्या गाडीने शिर्डीला जात आहे." तिकिट पण दाखवले, पण तो हुकमाचा ताबेदार. त्याच्याबरोबर जावेच लागले. बंगल्यावर मालकाने सांगितले, आताच्या आता अंबरनाथला जा. एक अर्जंट माझेच काम आहे. अमक्या अमक्याला जावून भेट. मी कळवळून सांगितले की, मी रात्रीच्या गाडीने शिर्डीला जाणार आहे. तिकीट पण दाखवले व सांगितले की, त्या कामामुळे माझी गाडी पण चुकण्याची शक्यता होती. पण त्या खडूस माणसाला पाझर फुटला नाही. उलट, त्यांनी काय करावे भक्तजनहो? माझे तिकिट घेऊन फाडून टाकले. अक्षरशः ४-५ तुकडे केले. ते बघून माझे तर अवसानच गेले. हातापायांतील शक्ती नष्ट झाली. मला तो मालक म्हणाला, "आज काम करा, उद्या शिर्डीला जा." खरं आहे, जो सोशिक असतो, त्याच्या डोक्यावर जास्तच ओझं देतात, हा न्यायच आहे जगाच. मी तसाच मनाशी चडफडत अंबरनाथला गेलो. फक्त सकाळच्या चहावरच होतो. ते काम केलं व घरी मालाडला गेलो तेव्हा रात्रीचे ९॥ वाजून गेले होते. आईला सर्व हकिकत सांगितली. निराशाने जेवलो व "बाबांच्या" फोटोकडे बघत आरामखुर्चीत बसलो. रात्रीचे ११ वाजत होते. दाराची कडी एकदम जोरजोरात कोणीतरी वाजवली. जड पावलांनी उठलो. दार उघडले, तर वावटळीसारखा मित्र, माधव घरात शिरला. म्हणाला, "आई मोटारीत बसली आहे माझी. तुला बोलवत आहे. बाहेर चल." मी अचंब्याने उठलो व बाहेर गेलो, तो खरेच, बाहेर कोरी अँबॅसेडर गाडी उभी व त्यात ह्याची आई बसलेली. मला म्हणाली, "चंद्रा, तुझ्या वाचेने मला ही गाडी मिळाली. तू चल लवकर व आपण पहाटे शिर्डीला जावयास निघायचे आहे." मग मला आठवले. अर्थात त्यांनी सांगितल्यावर की मी त्यांना महाराष्ट्र राज्य लॉटरीचे तिकिट घेण्यास सांगितले होते व म्हटले होते की, तुम्हाला पहिले बक्षिस मिळून तुम्ही गाडी घेणारच." त्याचा त्यांना पूर्ण पडताळा आला व पहिले बक्षिसे लागून, त्यांनी गाडी घेतली व माझ्यासह त्यांना शिर्डीला जायचे होते. मी धावतच घरात गेलो व "बाबांपुढे" उभा राहून, गहिंवरुन म्हणालो, "बाबा, धन्य तुमची लीला."

मघाशी "बाबांपुढे" बसलो असताना नेत्री अश्रू होते, ते वैफल्याचे, नैराश्येचे. आताही अश्रू होते, पण ते होते, अत्यानंदाचे, चैतन्याचे, हर्षाचे.

त्यांच्याच बरोबर, त्या डौलदार गाडीतून, पहाटे "श्रीबाबांनी" मला मानाने काहीच त्रास न होता शिर्डीला नेलं, हे सांगणं नलगे. ही त्यांचीच महान कृपा. मी ज्यावेळी जाणार होतो, त्याच दिवशी, त्याच वेळेला शिर्डीला गेलो. "बाबांनी" माझी मनिषा पूर्ण केली.

# ही बाबांचीच कृपा

**— सौ. राधिका मोरे**
कोलबाड (प.), ठाणे.

माझी आई धार्मिक वृत्तीची असल्यामुळे लहानपणापासून माझा ओढा बाबांकडे होता. आई अधूनमधून शिर्डीला जात असे, पण आम्हाला कधी योग आला नाही.

वयाच्या दहाव्या_ अकराव्या वर्षीच आईवडिलांना आम्ही पारखे झालो. तेव्हापासून बाबांनी आमच्यावर मायेची पाखर घातली.

साधारण ७४/७५ साली माझ्या मोठ्या भावाची ३ वर्षाची मुलगी आजारी पडली. तिच्या मांडीवर एक गाठ आली होती. ती नंतर मोठी होत गेली. तिला आत्यंतिक वेदना होऊ लागल्यामुळे आम्ही तिला आलटून पालटून मांडीवर घेऊन शांत करण्याचा प्रयत्न करीत होतो. डॉक्टरांनी ऑपरेशन करावे लागेल असे सांगितल्यामुळे आम्ही सर्वजण घाबरुन गेलो. मी बाबांना प्रार्थना केली की विना ऑपरेशन ही बरी झाली तर तिला मी तुमच्या पायाशी घेऊन येईन. आणि काय आश्चर्य! एक दोन दिवसांत ती गाठ आपोआप फुटली. आणि तिला एकदम [illegible] लागले.

# मुलीचे लग्न जुळले

**— सौ. प्रमिला लक्ष्मीकांत पालेकर**
डोंबिवली (प.), ठाणे.

माझी मोठी मुलगी चि. सुचिता हिच्या लग्नासाठी आम्ही जवळ-जवळ १० वर्षे सतत प्रयत्न करीत होतो, पण कोणत्या ना कोणत्या कारणाने लग्न जुळत नव्हते. घरची व बाहेरची सगळी माणसे आम्हाला टोचून बोलत होती, पण काय करणार? देवाजे जे काही करायचे, ते सगळे केले. पण व्यर्थ! शेवटी आमच्या शेजारी राहणाऱ्या श्री. विवेक धुरी या नावाच्या मुलाने मला 'श्री साईसत्‌चरित' पुस्तक वाचावयास आणून दिले, व सात दिवसांत तुम्हाला चांगला अनुभव येईल, असे सांगितले. शेवटचा हा एक प्रयत्न करुन पाहू, असे म्हणून मी ८–१–१९८७ रोजी

साईबाबांना मन:पूर्वक साकडे घातले, "माझ्या मुलीला चांगला मुलगा व घराणे मिळू दे! ह्या सात दिवसात मला चांगला अनुभव येऊ दे! लग्नात कोणत्याही प्रकारे विघ्न न येता व मुलाने, त्याच्या कडच्या मंडळीने सोन्या, पैशांची काही मागणी न करता लग्न थोडक्यात व साधेपणाने होऊ दे!"अशी मी बाबांकडे मागणी घातली. त्याप्रमाणे साईबाबांनी माझी हाक ऐकली. सात दिवसाच्या आत साईकृपेने माझ्या मुलीचे लग्न ठरले आणि कोणत्याही गोष्टीची अडचण न येता माझ्या मनाप्रमाणे मुलीचं लग्न एप्रिल २५–४–१९८७ रोजी झाले. ती सासरी चांगली सुखात नांदते आहे.

# साईलीला अगाध आहे

**– सौ. सुशिलाबाई गांवकर**
कारवार, कर्नाटक

श्री साईबाबांबद्दल मला पूर्वी एवढी श्रद्धा किंवा निष्ठा नव्हती. पण अलिकडेच माझ्या जीवनात काही घटना घडल्या की, साहजिकच श्री साईबाबांबद्दल मला मोठीच श्रद्धा व भक्ती वाटू लागली. ते दोन प्रसंग मी इथे उद्‌धृत करीत आहे. पहिला प्रसंग असा की, माझ्या मुलीला मासिक पाळीच्या वेळी फार त्रास व्हायचा. अनेक डॉक्टरांचे औषधोपचार केले पण काही गुण येईना. एक दिवस कोणीतरी एका साईभक्ताने मला श्री साईची उदी दिली आणि सांगितले की, मासिक पाळीच्या वेळी ही उदी मुलीच्या कपाळाला लावा. मी ती उदी मुलीच्या कपाळाला लावली आणि खरोखरच मोठा चमत्कार झाला. माझ्या मुलीला होणारा त्रास हळूहळू कमी झाला. एवढा की, आता तिला तो त्रास अजिबात होत नाही. ती त्यातून पूर्ण सुधारली आहे.

दुसरा आणखी एक प्रसंगी म्हणजे, याच माझ्या मुलीला असाच शौचाच्या वेळी त्रास होऊ लागला. कधी कधी जुलाब होऊन रक्तस्त्राव होऊ लागला. शौचाच्या वेळी जळजळ होऊ लागली. मी अनेक डॉक्टरांचे औषध उपचार केले, पण काही उतार पडेना. शेवटी साईबाबांची उदी तिच्या कपाळी लावली. दररोज हा क्रम चालू ठेवला आणि काय आश्चर्य तिला होणारा त्रास कमी झाला. आता माझी मुलगी ठीक आहे. सांगायचे म्हणजे या बाबांच्या उदीमुळे माझ्या मुलीला जणु नवजीवन प्राप्त झाले. साहजिकच बाबांवरची माझी श्रद्धा आणि भक्ती दिवसेंदिवस वाढत आहे. बाबाचे नामस्मरण व त्यांची उदी लावून घेणे, असा माझा आता नेहमीचा कार्यक्रम आहे. त्यात मला अपार आनंद आणि सुखप्राप्ती होते. ज्या दोन प्रसंगामुळे मला जी अनुभूती झाली, त्यामुळे बाबा संकटी धावून येतात, हे मात्र मनोमन पटले. त्यांच्या नामस्मरणाने जे सुख लाभले, ते केवळ अपूर्व आहे.

# बाबांच्या श्रद्धा-सबुरीची ही कथा

– श्री. भगवान वेलजी शेट
आर्. सी. एफ्. कॉलनी,
अलिबाग.

आर्. सी. एफ्. कॉलनी वेश्वी ए-१२ या इमारतीत आम्ही उभयता व चि. प्रवीण भगवानशेट असे तिघेजण राहातो. मी अलिबाग येथे व्यापारी जमाखर्च लिहिण्याचे काम आज ११ ते १२ वर्षे करतो. माझी अलिबाग येथे श्री. मोघे खाणावळवाले यांचे माडीवर खोली आहे. तसेच चि. प्रवीण यास आर्. सी. एफ्. येथे नोकरी असल्याने त्याचे खोलीत आम्ही सर्वजण राहातो. मी रोज सकाळी स्नानसंध्या व घरातील किरकोळ कामे आटोपून सायकलीने सुमारे साडेआठ ते नऊ वाजता खोलीवर येतो. त्याप्रमाणे मी ता. १८-८-८७ रोजी सकाळी घरातील सर्व कामे आटोपून निघालो. पाऊस व वारा फारच जोरात होता. मी माझे काम आटोपून नेहमीप्रमाणे १२ वाजून १० मिनिटांनी घरी जाण्यास निघालो. पाऊस व वारा जोरातच होता. मी सायकलीवरून आमच्या खोलीकडे कंपनीच्या गेटमधून व्यवस्थित आलो. पण गेटपासून आतमधल्या कॉर्नरवर आल्यावर पाऊस व जोराचा वारा असल्यामुळे मी सदर कॉर्नरवर जोरात दगडावर आपटलो, तो इतका जोरात पडलो की, माझी छत्री एका बाजूला व मी दगडावर व माझे अंगावर सायकल. मी पडल्यावर माझ्या नाकातोंडातून अन्न व पाणी बाहेर पडले. त्यामुळे मी १-२ मिनिटे तेथेच पडून होतो. गवत पण फारचे वाढलेले होते. मात्र मला त्यावेळी संकटातून वाचविणारा कोणीही नव्हता. माझा श्री साईबाबांवर विश्वास होता. माझे तोंडातून श्री बाबांचे एकसारखे अखंड नाम चालू होते व ८ ते १० वर्षे मी शिरडीमध्ये श्री बाबांच्या दर्शनासाठी अधूनमधून जात होतो. असो, मी पडल्यानंतर माझे मागे एक कंपनीतील सायकलस्वार येत होता. त्याने मला झुलुकसे पाहिले व सायकल थांबवून तो माझेजवळ आला. छत्री मिटून मला उठविले व माझी सायकल सारखी करून माझे हातात दिली व तो चालू लागला. मी बाबांचे नाव घेऊनच उठलो. पोट व कंबर यांस जबर मुका मार लागल्यामुळे मला हालता येत नव्हते. त्यामुळे मी कंपनीची बस १२-३० वाजता येते, तिची वाट पहात होतो. बसला मी हात केला पण ती थांबली नाही. मी साईबाबांचे नाव घेऊन सायकलीवर कसाबसा बसून ३-४ मिनिटात घरी गेलो. मी पावसाने साफ भिजून गेलो होतो व माझ्या वेदना फारच होत होत्या. मी घरी खोलीत गेलो. माझा मुलगा जेवावयाला बसला होता व तो त्याच्या आईला, आज बाबा कॉर्नरवर सायकल धरून उभे होते व पावसाने साफ भिजून गेले होते, असे म्हणत होता. मला लागले आहे किंवा मी पडलो आहे, ते त्याला काहीच माहिती नव्हते. मी खोलीवर जाताच मला माझ्या माणसांनी विचारले. मी सर्व हकीगत सांगितली. लगेच गरम पाणी घेऊन आंघोळ केली. माझा मंगळवारचा उपवास होता. मी श्री बाबांना व

श्री अंबाजी मातेला नमस्कार केला व जेवण्यास बसलो. जेवण आटोपल्यावर माझे अंग व पाठ जास्त दुखत होती. पत्नीने माझे अंगास व्हिक्स व आयोडेक्स लावून मॉलिश केले. पण फारच त्रास झाला, पोट फुगले व अंगपण जास्त दुखू लागले. त्यामुळे मुलाने डॉ. दोर्षीकडे स्कूटरवरून मला नेले. तिकडे इंजेक्शन व औषधे घेतल्यावर सुमारे एक तास बरे वाटले, पण पोट जास्त फुगले. म्हणून मुलाने आर. सी. एफ्.चे हॉस्पिटलमध्ये नेले. पण माझे नशीबच खोटे. कारण दोन्ही डॉक्टर हजर नव्हते. माझा नाईलाज झाला. मला जास्तच त्रास होत होता म्हणून तेथील बाल-तज्ज्ञ डॉक्टर यांना दाखवून औषध व गोळ्या घेतल्या व मला मॉलिश केले,पण मला मुळीच आराम पडला नाही. पोट पण जास्त दुखत होते. मी ती रात्र कशीतरी घालवली. मला लघवी व शौचास होणे बंद झाले व गॅसचा त्रास होत असल्याने पोट फारच फुगले. त्या वेदनांनी मी ओरडू लागलो. सकाळी ८ वाजता परत हॉस्पिटलमध्ये गेलो, पण दुर्दैवाने डॉक्टर रजेवर गेल्यामुळे मी सिस्टरला माझी तब्येत दाखविली. त्यांनी शौचास होण्यास औषध दिले व गॅसवर गोळ्या दिल्या, पण मला जास्तच त्रास होऊ लागला. मी जेथे पडलो होतो, त्या ठिकाणी माझे अंगावरून नारळ उतरून नेऊन फोडला. पण काहीच इलाज नाही, दुखणे जास्त वाढू लागले. मी कंटाळून गेलो. रात्र कशीतरी घालविली व सकाळी उठून श्री बाबांना नमस्कार करून आंघोळ उरकून पूजा केली. नेहमीप्रमाणे पूजा झाल्यावर मी बाबांना हात जोडून नमस्कार केला व त्यांना सांगितले, "बाबा, तुमचेशिवाय मला कोणाचा आधार नाही. तरी आपण दया करा आणि मला वाचवा", अशी विनवणी केली व सांगितले की, जर मला बरे वाटले तर त्वरित आजच मी शिरडी येथे येऊन आपले दर्शन घेईन, पण मला वाचवा, अशी कळकळीने बाबांना विनंती केली व हॉस्पिटलमध्ये १० वाजता गेलो. डॉक्टर आलेले नव्हते. सिस्टरने तपासले व मला एनिमा घेण्यास सांगितले. मी त्वरित एनिमा घेतला. त्यामुळे मला बरे वाटले व शौचासही व्यवस्थित झाले व पोटपण नेहमीसारखे चांगले झाले. मी बाबांना सांगितल्याप्रमाणे हॉस्पिटलमधून घरी गेल्यावर जेवलो व शिरडी येथे त्वरित निघालो.

# प्रचिती व भक्ती

-. श्री. प्रल्हाद सखाराम माळी
कर्वेनगर, पुणे.

ज्याप्रमाणे स्वामी विवेकानंदांनी काही तरी चमत्कृती पाहिल्याशिवाय परमपूज्य रामकृष्ण परमहंसांचे शिष्यत्व पत्करले नाही, त्याप्रमाणे माझे मन सुद्धा अत्यंत चिकित्सक व चमत्काराशिवाय नमस्कार नाही, अशा मनाच्या धारणेचे आहे.

परंतु शिर्डीतील श्रद्धा व सबुरी या मंत्राचा बोध घेण्यास माझे मन तयार आहे. संकट काळात बाबांच्यावर श्रद्धा ठेऊन बराच काळ व्यतीत केला. सबुरी ठेवली. आता माझ्या नित्यजीवनात मी सर्व साईमय झालो आहे. प्रत्येक क्षेत्रात मला साईबाबा दिसतात. आपले काम करताना, प्रवास करताना, जागे असताना, झोपताना सर्व ठायी बाबाच दिसतात, नव्हे प्रत्येक घटना बरी, वाईट, इतकेच नव्हे जीवनाचा श्वासोच्छवास, अगदी यावेळी बाबांच्या संगतीत आहे.

कधीही सहसा चिकित्सेशिवाय मी बाबांच्यावर इतका विश्वास का ठेऊ लागलो? याला अनेक प्रचिती आहेत. ३६५ दिवसांचे तास, घटका, पळा कोण कशाला मोजत बसतो? तद्वत बाबांचे कृपा छायेने सर्व जीवन चालत असल्याने कितीही घटना सांगितल्या तरी त्या अपुऱ्या पडणार आहेत. त्यातील अगदी मोजक्या सांगत आहे.

ऑक्टोबर १९८६ चा महिना होता. सांगली जिल्ह्यातील गावी गेलो होतो. दिवस सुगीचे होते. शेती हिरवीगार असायला हवी होती परंतु पावसा अभावी पिके पिवळी पडायला लागली होती. कोमेजून माना टाकून पडलेली होती. ऑक्टोबरचे दुपारचे २.३० ते ३ वाजण्याचे ऊन होते. माझी परत पुण्याला येण्याची तयारी चालू होती. परंतु गावाकडील सर्व शेतकऱ्यांच्या परिस्थितीची ही अवकळा पाहून मन फार उदास झाले होते. मनाला वाटू लागले की, ह्या परिस्थितीला पावसाच्या संकटाला सरकार तरी काय करणार? शास्त्र (सायन्स) सुद्धा अपुरे पडते. याचा तारण करता फक्त एकच परमेश्वर आहे! त्यांचेशिवाय अन्य कोणी नाही. बाबांच्याजवळ-आपण पावसाचा हट्ट धरावा, असे मनात आले. परंतु एक मन सांगू लागलं, अरे वेड्या, आभाळाला ठिगळ नाही. कुठे पांढरा ढग दिसत नाही. आणि केवळ तुला परत जाताना खूप खिन्न वाटतंय म्हणून म्हणा किंवा गावावरुन समाधानाने परतावसं वाटतंय यासाठी तू बाबांच्याकडे असला हट्ट करायला तुझ्या भक्तीची ऐवढी काय पात्रता आहे?

दुसरं मन सांगू लागलं, माझ्या पात्र-अपात्रतेचा प्रश्न नको, पण शेतकऱ्यांच्या आभाळाकडे लागलेल्या माना खाली पिकाकडे वळाव्यात आणि पिके तृप्त होऊन परत उभी राहावीत, हे पाहिले तर मी समाधानाने गाडीला बसेन.

असा विचार करुन मी आमचे शिरगांव गावावरुन पुढील पाच मैलावरच्या ताकारी गावात आलो. आणि आश्चर्य म्हणजे मला ढग जमलेले दिसले. मन हर्षून गेले. दुसरी पुढची गाडी मिळेपर्यंत पाऊस बरसायला लागला. नुसता नव्हे थयथय नाचत राप् राप् पाऊस आला. माझ्या नेत्रांतून आनंदाचा पाऊस पडू लागला. पण माझ्या डोळ्यात कसले पाणी म्हणून कुणी विचारले तर काय सांगू? आणि विचारल्यावरुन मी त्याला बाबांच्या करणीची महत्ती सांगितली तर मला वेडा म्हंणतील. मी पर्वा केली नाही. कुणी विचारले तर जरुर सांगेन, एस्.टी. गाडी आली, मला स्टँडींगला जागा मिळाली. बाबांनी माझा अकल्पित पाऊस पाडण्याचा हट्ट पुरा केला, या आनंदाच्या घुटक्या घेत घेत मी पुण्याला परत आलो.

दुसरी गोष्ट ही एकच व शेवटची. जुलै १९८७ ला मी विशाळगड येथे प्रवासी रजा घेऊन हजरत मलीक रहिमान मिरासाहेब बाबांचा दर्गा आहे, त्यांचे दर्शनाला जायचे ठरविले. तिकडे खूप पाऊस असतो. गाड्या शेवटपर्यंत जात नाहीत. सर्व अडचणी ऐकूनही मी व माझे मित्र श्री. शिंदे यांनी तिकडे जायचा निश्चय पक्का केला. आम्हाला भाड्याने एका डॉक्टरांची जीप मिळाली. कोल्हापूर, मालगावच्या पुढे भयानक पाऊस, लालभडक पाण्याने ओढे नाले तुडुंब वाहत होते. एका रस्त्यावरच्या नाल्यातून जीप घालावी तर पाण्याच्या फोर्सने गाडी पलटायची भीती, न घालावी तर रिव्हर्स गाडी उलट्या चढणीवर किती मागे घेणार व जंगलात कोठे थांबणार? बाबांचे नाव घेऊन पाण्यात जीप गाडी घालण्यास सांगितले. अनेक अडचणींना तोंड देत बायका-मुलांना घेऊन रात्री ९ वाजता आम्ही गडावर पोहोचलो.

मी आम्ही दर्ग्यात पोहचलो पण मला तिथे त्या दिवशी अपुरी डीम लाईट, धो ऽ धो ऽऽ वाऱ्यासह पाऊस, लाकडाच्या चुली हे वातावरण पाहून बाबांच्या हयातीमधील शिर्डीच वाटू लागली. पहाटे चार वाजता उठून तेथे नळाला पाणी नसल्याने एका झऱ्यातील पाण्यानेच सर्व व्यवहार पार पाडायचे होते. तो झरा आमच्यापैकी दोघांनाच माहीत होता. सर्वांना झरा दाखववावा म्हणून मी प्रात:विधी, आंघोळ करावी म्हणून झऱ्याकडे चाललो. जाताना मला एक बेगडीचा लाल कागद दिसला. चांगला चमकत होता. परंतु मी फारसे लक्ष दिले नाही. मी झऱ्याकडे असताना मात्र सारखे लक्ष त्या बेगडी कागदाकडे होते. तसतसा तो कागद जास्त चमकू लागला. माझी उत्सुकता वाढू लागली. मला जाणीव सारखी होती की, आपण हजरत मलीक रहिमान मीरासाहेब यांचे दर्शनाला आलो आहोत. परंतु नेहमीच्या सवयीने बाबांचे स्तोत्र तोंडाने म्हणत होतो. मनी मात्र मीरासाहेब होते. परत झऱ्याकडून दर्ग्याकडे जाताना तो बेगडी कागद आपल्या खिशात घालून घेऊन जायचा व रात्री परत असाच चमकतो का? हे पहायचे, असा निश्चय केला. जसजसा कागदाचे जवळ येत होतो, तसतसा तो अधिक चमकत होता. अगदी जवळ जाऊन आता तो कागद उचलून हातात घ्यायचा, म्हणून हात पुढे केला तर तो विस्तव होता. माझा विश्वास

बसेना म्हणून अगदी जवळ मान खाली करून पाहिले, तर लाल भडक विस्तव आढळला. मला प्रश्न पडला की, इतक्या धो धो पावसात, वाऱ्यात आणि इतक्या लांब विस्तव कसा आला? आणि इतका वेळ पावसात फुलून कसा राहिला? सुरुवातीला तर तो कागद वाटत होता.

माझ्या स्नेह्यांना ही हकिगत सांगितली. म्हणून आम्ही परत त्या ठिकाणी आलो, तर बेगडेचा कागदही नाही व विस्तवसुद्धा नाही. आणि विस्तव होता तर विझून त्याचा कोळसा तरी राहायला हवा होता. परंतु काहीच नाही. मित्रांनी एकच सांगितले की, तुम्हाला (मलीक रहिमान साहेबांनी) विशाळगड बाबांनी दर्शन दिले. तुम्ही भाग्यवान आहात परंतु माझ्या तोंडी तर साईबाबांचे "समर्थ गुरु साईनाथ पुरवी मनोवासना" हे स्तोत्र चालू होते. मग बाबांनी मला मलीक रहिमान साहेब यांच्या दर्ग्यांत दर्शन द्यावे किंवा माझ्या तोंडी साईबाबांचे स्तोत्र चालू असताना मीरा साहेबांनी दर्शन द्यावे. एकूण एकच. माझ्या मनात प्रसन्नतेची शांतता पसरली व मी जाणून घेतले की, हजरत मलीक रहिमान मीरासाहेब व साईबाबा एकच आहेत. या दोन्ही देवतांचा एकच मानव धर्म आहे. माझ्या देव्हाऱ्यात साईबाबा, गणपती, इतर सर्व व हजरत मलिक रहिमान मीरासाहेब यांची तस्वीर एकत्र ठेऊन मी नित्य पूजा करतो आहे. बाबांनी मला व आपणा सर्वांना एकच अनुभव देऊन सांगितले आहे की, "सबका मालीक एक है।"

# भक्तांची कृपाळू साईमाऊली

— **श्री. धनंजय रामकृष्ण कुलकर्णी**
कोरेगांव, सातारा.

५ मे १९८८ चा गुरुवार. संकष्टी चतुर्थी. हा दिवस मला आजही आठवतो. श्री सद्गुरु साईनाथांच्या भेटीला सातारा जिल्ह्यातील कोरेगाव या गावातून सायकलने एकटाच निघालो. एकटाच कसा— श्री साईंचं नाव बरोबर होतं. त्यांच्या नामस्मरणात प्रवास सुरु झाला. पहिला मुक्काम फलटणला केला. तेथून दुसरे दिवशी सकाळी बारामती मार्गे भिगवण, पुणे-सोलापूर हायवेनं रावणगाव-खडकी येथे मुक्काम. तेथे साईनाम गातगात विश्रांती घेतली. तिसरे दिवशी दौंड, काष्टी, श्रीगोंदा येथे मुक्काम केला. तेथील श्री तुकाराम महाराजांच्या काळात ज्या मुस्लिम सांधूंनी श्री तुकाराम महाराज यांचे किर्तन चालू असता सर्व श्रोतृवर्ग कीर्तनात तल्लीन होऊन नाचत होता त्यावेळी मंडपास अचानक आग लागली असता या मुस्लिम साधू मोहम्मद यांनी श्रीगोंद्यात बसून ती आग विझवली, त्यांच्या तुर्बतीचं दर्शन घेतलं आणि दुसरे दिवशी पुढील प्रवासाला सुरुवात केली. घारगांव, पारगांव, कोळगाव ओलांडून पुढे गेलो व सायकल पंक्चर झाली. श्री साईंचे

नामस्मरण करीत पायी तीन एक मैल प्रवास केला. पुढे एका खेडेगावात पंक्चर काढला. थोडा आहार केला व सरळ नगरला गेलो. नगरमध्ये फिरलो, परंतु मुक्कामाला जागाच मिळेना. रात्रीचे साडे आठ वाजले होते. मग वैतागून बसलो, श्री सद्गुरुंची आठवण करत. याच जागी बसून रात्र घालवायचा निर्धार केला. तेवढ्यात एकजण आला व म्हणाला, भाऊ ऊसाचा ताजा रस आणू का? त्याला म्हणालो, बाबारे, मला येथे रात्र कोठे काढावी, हा विचार पडलाय अन् तू रस आणून काय करतोस? मग त्यानं मला विचारलं, कोठून आला? कुठे निघाला? मी त्याला माझी सर्व परिस्थिती समजावून सांगितली. श्री साईबाबांच्या दर्शनाला निघालाय म्हटल्याबरोबर तो म्हणाला, ह्या परमेश्वरानं निर्माण केलेली ही धरतीमाता आपणाला मांडीवर घ्यायला तयार असताना कसला विचार करतोस? आम्ही या भागात जेवढे ऊसाच्या रसाचा धंदा करतो, ते सर्वजण त्या आयुर्वेदिक अर्कशाला व हॉस्पिटलच्या समोर असलेल्या मोकळ्या मैदानावर झोपतो. त्यांच्यात तू एका रात्रीकरिता आलास म्हणून काय फरक पडणार आहे? चल, नसती काळजी करु नकोस.

मग त्याच्या म्हणण्याप्रमाणं त्या मैदानावर रात्री १० वाजता जाऊन झोपलो. सकाळी लवकर उठून आंघोळ आटोपून सायकल प्रवास सुरु झाला. नगरवरुन जाता जाता श्री क्षेत्र शनि शिंगणापूर केले. दुसरे दिवशी तेथून राहूरी ते शिर्डी असा प्रवास केला. श्री साईनाथांच्या कृपेमुळे शारीरिक, मानसिक इ. कोणताही त्रास जाणवला नाही. तेथे पोहोचल्यावर आंघोळ आटोपून श्री साईंचं दर्शन व्यवस्थितपणे घेतलं.

दोन, तीन दिवसात परत फिरण्याचा विचार होता. पण तिथं एका दुकानदाराच्या दुकानात "श्री साईसच्चरित्र" हा ग्रंथ दिसला. लगेच मनाशी विचार केला की, काहीनाही साईनाथांच्या द्वारकामाईत बसून आपण पारायण करायचं. झालं, त्या दुकानदाराच्या दारात सायकल लावली. पिशव्या त्याच्या दुकानात ठेवल्या व त्या दुकानदाराला म्हणालो, मला द्वारकामाईत बसून पारायण करायचं आहे. तरी कृपया आपण श्रींची पोथी मला वाचायला देता काय? तो दुकानदार लगेच उठला व श्रींची दाभोळकर लिखित पोथी घेऊन मला म्हणाला, जा भाऊ कर जा पारायण. तेव्हा माझा आनंद गगनात मावेनासा झाला. श्री साईमाऊली आपल्या भक्तांचे कसे लाड पुरविते, याचा प्रत्यय आला. पारायणाला सुरवात झाली. व्यवस्थितपणे पारायण पूर्ण झाले. मग एका गुरुवारी सायंकाळी श्रींची पूजा करुन शुक्रवारी सकाळी पहाटेची आरती आटोपून श्रींना साष्टांग नमस्कार घालून त्यांची परवानगी घेऊन परतीच्या प्रवासाला सुरुवात केली.

असा कोरेगाव-शिरडी हा प्रवास करण्यासाठी श्री सद्गुरु साईनाथ माझ्या हृदयाच्या सिंहासनावर विराजमान होऊन भक्तीच्या महाली नेण्यासाठी मार्गदर्शन करीत होते. रस्त्यात सायकल एकदाच पंक्चर सोडली तर उन्हाचा किंवा

चोराचिलटांचा अजिबात त्रास होऊ न देणारी ही आपणा सर्वांची साईमाऊली खरोखर आपल्या भक्तांचं संरक्षण करते व त्याला येणाऱ्या संकटांतून वाचवून त्याला सतत आनंदी ठेवते. अशा या कृपाळू, कनवाळू श्री साईमाऊलीस माझे कोटी कोटी प्रणाम.

# श्रद्धा निर्मिली चित्ती, उदी लाभली हाती!

– श्री. गंगाधर गायकवाड
सनई वादक
म्युझिक कॉलेजच्या मागे, बडोदा ३९० ००१.

माझ्याच मनातील श्रद्धा एवढी प्रचंड शक्तिशाली असू शकते, ह्याची माझ्या मनाला त्या दिवशी कल्पना आली. केवळ साईकृपा! तो अद्‌भुत चमत्कार एक वस्तुस्थिती होती, आणि मला पूर्णपणे समजलं की, खरोखर बहुतांशी मानव हा कस्तुरीमृगासारखा वावरत असतो. आपल्यातीलच आपल्याच शक्तिची आपल्यालाच कल्पना नसते आणि परिणामी आपणच खोट्या सुखामागे धाव घेतो. आपण असंख्य जण भौतिक सुखामागे धाव घेतो, आणि आपल्यापैकी अनेकांना उशीरा का होईना, पण आपण मृगजळामागे धाव घेतली ह्याची खात्री पटते. परंतु खात्री पटलेले भाग्यवानही पुन्हा त्याच मृगजळामागे धाऊ लागलो तर ह्याला जबाबदार कोण? विस्तवानं भाजल्यावर पुन्हा लहानमूल सुद्धा विस्तव हातात घेईल का?

साई चमत्कार घडला शिरडीच्या साईमंदिरी, आणि श्रद्धा दृढावली माझ्या हृदय-मंदिरी! शिरडीत पाऊल ठेवताच प्रवासातील कसाही थकवा नकळत उतरतोच, हा प्रत्येक भक्ताचा, प्रत्येक वेळी, प्रत्यक्षात येणारा अनुभव मलाही आला. नव चैतन्यच अंगी आल्यागत झालं. मोठ्या प्रसन्नतेनं मी सारी शिरडी फिरलो. सांसारिक ताप, विवंचना कुठेतरी दूर दूर निघून गेल्या होत्या. मनातील प्रत्येक दालनात आनंदाखेरीज काहीच नव्हतं. सारं कसं शांत शांत वाटत होतं. परंतु न कळत कुठून एक विचार आला आणि माझी ती शांती हिरावून घेतल्यागत झालं. मला उदी हवी होती. श्रीबाबांची संजीवनी समान उदी मी सर्वत्र शोधली. पण तेव्हा मला उदी काही मिळाली नाही. भक्तांसाठी संस्थानकडून उदीपात्र भरुन ठेवतात, हेही मला त्यावेळी माहीत नव्हतं. मी श्रीबाबांच्या मूर्तीकडे पाहिलं, निकट गेलो, समाधीच्या चौथऱ्यापाशी उभा राहिलो. बाबांशी दृष्टादृष्ट होताच अष्ट सात्विक भाव दाटून आले. पण उदीसाठी हळहळत असलेले माझं एक मन मलाही न कळत बाबांशी हितगुज करु लागलं. मन म्हणालं, "बाबा! सर्वस्व देणारा तूं! तुझ्याद्वारी

साधी उदीही न मिळावी मला?" श्रीबाबांचे मन भरुन, डोळे भरुन दर्शन घेऊन दोन्ही हात जमिनीला टेकले आणि साष्टांग दंडवत घातला!... आणि मिटल्या डोळ्यानच आता उठतोय तोच माझ्या उजव्या हाताखाली उदी निर्माण झाली! माझ्या वाचक भक्त बांधवांनो! ती उदीपुडी मी हात ठेवले तेव्हा नव्हती. सर्वांच्याच सर्वच ईच्छा पूर्ण करणाऱ्या साईनं माझी ईच्छा पहा कशी पूर्ण केली?

श्रद्धेचे तेल, सबुरीची वात आणि मनाचा दीप – साक्षात साईकृपा ज्योतीनं प्रज्वलित केला गेला. अज्ञान तिमीर दूर होऊन ज्ञान प्रकाशात सारं सारं दिसूं लागलं, कळूं लागलं!

ती उदी–भस्म–राख मी माझ्या हस्तातळी पहात होतो... आणि ती उदी बरचसं मला सांगत होती... "मी उदी, ह्या नश्वर संसाराचे प्रतिक! तुला निक्षून सांगते, हा सारा दिसणारा संसार नश्वर आहे. प्रत्येक नवी वस्तू जुनी होते आणि कालांतराने नष्टही होते. मग घरदार असो, मजबूत खडकाचा किल्ला असो वा आप्त स्वकीयजन असो. म्हणून ह्यांच्या मोहात पडू नको. संसारात रहा, पण आसक्तीत राहूं नको. तुझ्या शरीराची आणि सर्वस्वाची ही अशी माझ्या सारखी राख होणार आहे. ह्या राखेत बघ तू काही क्षणापूर्वी मन गुंतवलं होतं आणि तुझ्यातील ती दिव्य प्रसन्नता, शांती नष्ट झाली होती. तू तुझ्या मनाला कुठे जाऊ देणं, ते तुझं तुझ्याच हातात आहे. मी, श्रीसाईची उदी साईच्याच आदेशाने मूकवाणीनं आज तुला त्याच्या समक्ष सांगत आहे. बाह्य परिस्थितीशी एकरूप होऊन आंतरिक प्रसन्नता घालवू नको."

# मागे जे जे त्यास ते ते लाभे

**– सौ. रेखा भा. माहीमकर**
अंधेरी (पश्चिम), मुंबई.

आजचे हे चढाओढीचे जीवन. शिक्षणातील गुणांची जीवघेणी स्पर्धा विद्यार्थ्यांनाच नव्हे तर पालकांनाही भेडसावीत आहे. जणू आजचा विद्यार्थी ९० टक्के गुण मिळवू शकला नाही तर तो जगण्याच्या लायकीचाच नाही! असा भ्रम निर्माण झाला असल्याने सुशिक्षित समाजात १०वीच्यां परिक्षेला बसणाऱ्या मुलांकडे ह्याच दृष्टीकोनातून पाहिले जाते.

अशा परिस्थितीत माझी मुलगी शालेय जीवनात ५० टक्के सुद्धा गुण न मिळविणारी पण एकही वर्ष फुकट न जाता १४ व्या वर्षी १० वीच्या वर्षाला आली नि आमची उभयतांची झोप उडाली. त्यात जवळच्याच नातेवाईकांची मुलेही तिच्याबरोबर होती. ती मात्र नेहमीसारखीच शांत होती. कधीही सुरुवातीपासून अभ्यासाचे पुस्तक न उघडणारी. पण यंदा मात्र बाबांच्या कृपेने तिने सुरुवातीपासून नियमितपणे २-३ तास अभ्यास करायला सुरुवात केली. आम्ही वारंवार बाबांना ती

अभ्यासाला लागू दे, म्हणून विनवीत असू.

परिक्षेचा दिवस उजाडला. नोकरीतील अडचणींमुळे आम्ही दोघांनी आळीपाळीने रजा घेतली. तिला सेंटरवर सोडून आल्यावर आम्ही साईस्तवनमंजरी वाचून पुरी करीत होतो. आम्हाला मन:शांती मिळाली. तिलाही पेपरस् बरे गेले. खरोखरच ६८ टक्के गुणांनी ती पास झाली.

तिने वाणिज्य शाखेत प्रवेश घेतला. ११वीला तर तिला ७१ टक्के गुण मिळाले. कॉलेजात ६वी आली. आता तिला अभ्यासाची गोडी लागली आहेच. शिवाय ती आपल्या छोट्या भावाला गणित, विज्ञान यासारख्या विषयात मार्गदर्शन करते.

खरचं आहे की नाही बाबांची अगाध लीला! असे हे बाबा आपल्या बालकांना वळणावर आणतात. त्यांच्यात अमोघ बदल करतात. फक्त बाबांवर विश्वास ठेवा. जो मजलागी अनन्य शरण । विश्वासयुक्त करी मभ्दजन ॥ माझे चिंतन माझे स्मरण तयांचे उद्धरण ब्रीद माझे ॥

# नामस्मरणाचे फळ

– सौ. निर्मला राजे
राजारामपुरी ७वी गल्ली,
कोल्हापूर.

पुढील अनुभव म्हणजे एक प्रकारची बाबांच्या भक्तीची पावतीच आहे. जसे आपण रोप लावायचे ठरवले तर प्रथम खड्डा खणतो, त्यात माती, खत वगैरे घालून रोप लावतो व जसजशी त्याची आपण चांगल्या तऱ्हेने मशागत करतो, तसे आपल्याला योग्य निगराणीमुळे चांगल्या डेरेदार झाडात रुपांतर झालेले पाहण्यास मिळते. तद्वत आपणाला प्रचिती येणे, म्हणजे नियमित योग्य प्रकारे केलेल्या नामस्मरण व भक्तीभावाने केलेली बाबांची सेवा व त्यामुळे प्राप्त झालेले फळ. माझा असा अनुभव आहे की बाबा आपले सदैव पाठीराखे असतात.

आजचा निवेदन करत असलेला अनुभव म्हणजे बाबा आपल्या संकटसमयी किती खंबिरतेने आपल्या पाठी उभे राहतात, याची पूर्ण जाणीवच. काही महिन्यांपूर्वी माझे यजमान मुंबईला गेले होते. परत येताना त्यांना प्रवासात थोडीशी कणकण वाटली. इकडे आल्यानंतर त्यांना खूप ताप चढला. मी त्यांना आमच्या नेहमीच्या डॉक्टरकडे नेऊन त्यांना औषधे दिली, परंतु ताप उतरला नाही, अशक्तपणा वाढतच चालला होता. मी त्यांना नंतर आमच्या ओळखीच्या जुन्या डॉक्टरना दाखवायचे ठरविले. डॉक्टर दवाखान्यात भेटू न शकल्याने त्यांच्या घरी फोन केला असता असे कळले की, डॉक्टर स्वत: आजारी असून दवाखान्यात येणार नाहीत. यानंतर डॉक्टर घरी भेटू शकतील का, अशी विचारणा केली असता, ते आज

कोणालाही तपासू शकणार नाहीत, असे कळले. त्यामुळे माझ्या मनाची फारच ओढाताण झाली. आता काय करावे, हे मला काही सुचेना. माझा आपला बाबांचा धावा चाललाच होता. ज्या डॉक्टरनी सुरवातीस तपासणी केली होती, त्यांच्या सल्ल्यानुसार रक्त तपासणी करुन अहवाल मिळवला.तो पाहिल्यानंतर त्यांनी मला चिठ्ठी देऊन त्यांच्या ओळखीच्या एका विशेष तज्ञाकडे तपासण्यासाठी जाण्यास सांगितले. मी ताबडतोब त्यांना घेऊन त्यांच्याकडे गेले. ते तज्ञ डॉक्टर म्हणजे खरोखर एक कनवाळू व्यक्ती आहे. त्यांनी त्यांची सखोल तपासणी केली व योग्य औषधउपचार सुचविले. मी ज्यावेळी त्यांना घेऊन त्यांच्याकडे गेले होते, त्यावेळी त्यांनी मला जो धीर व प्रेमाची वागणूक दिली, ती मी व हे काही विसरणार नाही. कारण आजाराच्यावेळी पेशंट बरोबर त्याला घेऊन येणाऱ्या व्यक्तीची मानसिक अवस्था फार कठीण असते. कारण एकतर पेशंटला धीर देणे व आपल्या दु:खाला मुरड घालणे, हे दोन्ही सारखे करावयाचे असते.

अगदी योग्यवेळी डॉक्टरची सर्व औषधे ह्यांना लागू पडली. अन्यथा माझ्यावर फार बाका प्रसंग आला होता. कारण ह्यांचा ताप फार विकोपाला गेला होता. एक आठवड्याच्या आत ह्यांना मोठ्या दुखण्यातून सोडवले. ही एक बाबांची कृपाच झाली. योगायोग असा की, हे तज्ञ डॉक्टर अगदी निस्सीम साईभक्त आहेत. लगेच त्यांनी मला टेबलाचा खण उघडून दाखविला, तर त्यात श्री बाबांचा फोटो व उदी होती.

त्यांनी त्यावेळी मला मावशी म्हणून केव्हाही त्यांच्याकडून रक्तदाब तपासण्यास येण्यास अधिकारवाणीने सांगितले. हे त्यांचे शब्द मला लाख मोलाचे वाटले. मी त्यांना श्री बाबांची लहानशी फ्रेम दिली आहे. ती त्यांनी त्यांच्या टेबलवर ठेवली आहे. ह्या डॉक्टरकडे जाण्याची मला प्रेरणा बाबांच्या नामस्मरणाच्या जोरावरच मिळाली आहे. मोठ्या संकटातून त्यांनी मला वाचवले. ही सर्व बाबांच्या नामस्मरणाची किमया आहे.

# तुझ्या इशाऱ्याने साई...

– **श्री. विजय द. हजारे** एम.ए.
बोरीवली (पूर्व), मुंबई.

काही महिन्यापूर्वीची गोष्ट. त्यावेळी गुरुपौर्णिमेला उत्सवासाठी शिर्डीला जाण्यासाठी जीव तळमळत होता. पण बाबांची इच्छा नव्हती, मी तिथे उत्सवासाठी जावे म्हणून! म्हणूनच जाण्याचे निश्चित ठरवूनही जाता आले नाही. त्यानंतर दसऱ्यालाही तसेच घडले. वास्तविक "जेथे मी जाईन तिथेची तूं उभा... माझ्यासंगे सदा साई पटविशी जगा" अशी माझी अनुभूती असूनदेखील समाधी मंदिरातील बाबांच्या मूर्तीला – त्या मनमोहक सगुणरुपाला डोळे भरुन पाहण्याची, चावडी, द्वारकामाई, लेंडीबाग या पवित्रस्थानी बसून, गुरुस्थानासमोर ध्यानमग्न होऊन

बाबांची आराधना करण्याची आंतरिक कळकळीची इच्छा काही स्वस्थ बसू देईना. पण काहींना काही अडचण आणून बाबा काही बोलवून घेईनात. अशा विमनस्क अवस्थेत असताना ऑफिसमध्ये 'प्रमोशन'ची अफवा उठली. मी तर माझ्या सहकाऱ्यांना आधीच सांगून टाकलं होतं की, 'माझा बिग बॉस' शिरडीला आहे. त्याची इच्छा असेल तर इथे 'त्यांना' प्रमोशन, द्यावेच लागेल मला!''... अचानक उद्या 'इंटरव्ह्यू' आहे असे सांगण्यात आले. पाहिले तर ''तो उद्या'' म्हणजे गुरुवार होता. म्हणजे माझा वार, ''माझ्या साईगुरुंचा वार...'' त्यामुळे आत्मविश्वास वाढला. रात्री घरी आलो तर अचानक आमच्या लोणावळ्याच्या साईमाता ति. आक्काई ऑन्टी घरी आलेल्या. त्या घरी राहिलेल्या असताना दुसऱ्या दिवशी सकाळी – गुरुवारी ऑफिसला जाणे जीवावर आले. पण त्या दोघी स्वत:हूनच म्हणाल्या... ''इंटरव्ह्यू आहे तर जाच तू... तुला नक्कीच यश येईल...'' जणू काही बाबाच त्यांच्या तोंडून आशीर्वाद देते झाले. मग काय 'इंटरव्ह्यू' अपेक्षेपेक्षा उत्कृष्ट झाला आणि आठ दिवसातच म्हणजे पुढच्या गुरुवारीच धनत्रयोदशीचा दिवस होता तो – 'सेक्शन हेड'चे प्रमोशन मिळाल्याचे लेटर हाती पडले. मग दिवाळीचे चार दिवस गेल्यानंतर अचानक पुन्हा शिर्डीला जाण्याचे वेध लागले. एका शुक्रवारी एस.टी.चे बुकींग वगैरे नसताना ''एम.आय.डी.सी.''च्या गाडीने (जिथे फक्त ''टू ॲन्ड फ्रो'' म्हणजे जाऊन येऊनच बुकींग असते) अचानक बाबांनी मला शिर्डीला बोलविले जणू आणि चारपाच दिवस ठेवून घेतले. जसे काही ''तुला मी 'प्रमोशन' दिल्यावरच तू तुझ्या ह्या 'बिग बॉस'ला भेटायला शिर्डीला ये'' असेच त्यांना सांगायचे होते. तेथेही साईंनी त्यांची लीला नाटकी चमत्कृतिची किमया दाखवलीच. दोन-तीन साईबंधूंसमवेत मला खोली मिळाली, ती 'साईप्रसाद'मधे, पहिल्या मजल्यावरच, जेथे 'साईप्रसाद'ची भिंतीवर कोरलेली अक्षरे आहेत त्याच्या वरती १० की ११ नंबरची खोली! दुसऱ्या दिवशी रात्री आमच्या कांदेवाडीतील (देवीच्या चाळीतील) बालमैत्रिण 'रमा' तिच्या मुलाबाळांसहित, बहिणींभावोजींसहित तिथे भेटली. तिला खोली मिळाली नाही म्हणून आमच्याच खोलीत त्या पाचसहा मंडळींना घेतले. तिसऱ्या दिवशी त्या मंडळींना सकाळी नाशिकला जायचे होते, म्हणून पहाटेच ती लोकं उठली. मलाही जाग आली. काकडआरतीला जाण्यासाठी मी तयार झालो. उशाखालून रुमाल पाकीट वगैरे काढले तर रुमालात आदल्या रात्री रमाताईंच्या मुलाने दिलेला पेरु न खाताच मी उशाशी ठेवलेला चेपून चेंदामेंदा झालेला आढळला. कुणाला काही न बोलता मी तो गॅलरीतून खाली टिचकीने उडवून फेकला. नंतर मुखमार्जनविधी उरकून कपडे केले. पाकीट पैसे घेतले. पाहतो तो हातातील सोन्याची आंगठी – साईबाबांची छबी असलेली अर्ध्या तोळ्याची आंगठी गायब! गादी, उशा, चादरी झाडून सारे शोधले. रमाताईला सांगितले तर ती आणि तिच्या बहिणीही घाबरल्या कारण त्यांची लहानमुले होती. कदाचित त्यांच्यावर आळ येईल की काय अशी विनाकारण भीती त्यांना वाटली. सर्वांनी मिळून सारी खोली

धुंडाळली. सर्व सामान, बॅग्ज पडताळून सर्व काही तपासले. मी त्यांना शब्द दिला, "घाबरु नका, साईंची इच्छा असेल तर आंगठी मिळेल..." आणि मी बाबांचे स्मरण केले. रात्रीपासून त्या क्षणापर्यंतचा कार्यक्रम आठवला. पटकन काय वाटलं कुणास ठाऊक, त्या मुलांपैकी एका अकरा-बारा वर्षाच्या मुलाला गॅलरीत नेलं. गॅलरीच्या पुढे छोटीशी छप्परवजा चौकट होती. तेथे पाहिले तर फेकलेला चेपलेला पेरु दिसला. त्या मुलाला हाताला धरुन तेथे उतरविले, आणि तो पेरुचा लगदा उचलून घेतला. मुलाला वर घेतले आणि पेरुचा लगदा चाचपला. तो त्याच्या आत खालच्या अंगाला ती आंगठी रुतून बसलेली! सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला आणि माझ्यावरील साईकृपेची प्रचिती आली. गॅलरीच्या बाहेर छोटी भिंतीची चौकट नसती तर? पेरु खाली कुठे पडला असता अथवा कुणा पक्ष्याने... कावळ्या-चिमणीने वा कुत्र्यामांजराने खाऊन टाकला असता तर... त्याहीपेक्षा रात्री आंगठ्या, पैसे, घड्याळ, पेरु-प्रसाद उशाशी एकत्र ठेवल्याचे आठवलेच नसते तर... तर आंगठी मिळणे शक्यच नव्हते.

"तुझ्या इशाऱ्याने साई, विश्वाचा हा रथ हाले.
तुझ्या नामे बाबा साई, श्वासोच्छवास माझा चाले."

# नित्य मी जिवंत जाणा हेची सत्य
# नित्य घ्या प्रचिती अनुभवे

**– श्री. द्वारकानाथ धों. मातोंडकर**
परेल, मुंबई.

श्री साईबाबांना समाधीस्त होऊन ७० वर्षे झाली परंतु त्यांच्या भक्तांना अजूनही बरेच अनुभव येत आहेत. 'दिव्यत्वाची जेथे प्रचिती तेथे कर माझे जुळती' असे म्हटले आहे ते उगाच नाही. मला पण श्री साईबाबांचे बरेच अनुभव आलेले आहेत. परंतु अलिकडचे माझे दोन अनुभव येथ देत आहे.

श्री साईबाबा आपल्याकडे येणाऱ्या भक्तांना सांगायचे की पहिले आपले कुलदैवत संभाळा आणि मग माझ्याकडे या. मी दर दोन वर्षांनी एकदा माझ्या कोकणातील आरोंदा या गावी जातो व कुलदैवत तसेच ग्रामदेवतेची ओटी भरतो. २९ एप्रिल १९८८ रोजी मी माझ्या पत्नी व मुलासोबत गावी जाण्यासाठी परेल बस स्टँडवर गेलो. संध्याकाळी ४॥ वाजता आमची बस सुटली. मी नित्यनेमात असल्यामुळे संध्याकाळी ६॥ वाजता बसमध्येच आरती व स्तोत्र वाचण्यास सुरुवात केली. आरती सुरुवात केल्यावर धुपाचा सारखा घमघमाट यायला लागला आणि तो आरती संपेपर्यंत तसाच चालू होता. मी कळून चुकलो की, श्री साईबाबांनी आपली बसमधेही उपस्थिती असल्याचे दाखवून दिले.

दुसरा अनुभव म्हणजे दि. ४ मे रोजी मी सहकुटुंब सकाळी ११ वाजता आमच्या आरोंदा गावाहून माझे साडूचे गावी गेलो होतो. कुठच्याही परिस्थितीत आम्हाला संध्याकाळपर्यंत आमच्या गावी परत यावयाचे होते. कारण माझा नित्यनेम असा आहे की, दिवसातून एकवेळ तरी श्री साईबाबांना जेवण दाखवून जेवावे. म्हणून आम्ही साडूच्या घरुन संध्याकाळी ५॥ वाजता वेंगुर्ला-रेडी ही बस पकडली. रेडीहून आम्हाला पुन्हा आमच्या आरोंदा ह्या गावी जाण्यासाठी बस पकडावयाची होती. परंतु तिथे आल्यावर आम्हास कळले की आता रेडी-आरोंदा बस नाही. आम्ही रेडीस पोहोचलो त्यावेळी संध्याकाळचे ६-४५ वाजले होते. तेथीलच हॉटेलमधील एका व्यक्तीने आम्हास सांगितले की इथून अर्ध्या तासाच्या अंतरावर कुडाळ आरोंदा बस येते. परंतु एवढे अंतर चालत जाणे आम्हास शक्य नव्हते. तेवढ्यातच एक गृहस्थ भेटले ते म्हणाले, समोरच श्री तेंडुलकर नावाचे गृहस्थ रहातात त्यांच्या रिक्शामध्ये बसा आणि जा. परंतु त्यांच्या घरी गेल्यावर आम्हाला कळले की श्री. तेंडुलकर रिक्शा घेऊन गोव्यास गेले आहेत. एकंदरीत आमची कसोटीच चालली होती. आम्ही श्री साईबाबांच्या नामाचा जप करीत होतो.

असाच जप चालू होता आणि एक जीप आली. त्यामध्ये दोन माणसे होती. आम्ही त्यांना हात दाखवून जीप उभी केली व आमची कथा सांगितली व ज्या ठिकाणी बस येणार होती, त्याठिकाणी आम्हाला पोहोचविण्याची विनंती केली. परंतु त्याने आम्हाला असे सांगितले की रात्रीच्या वेळी अशा निर्जन ठिकाणी बस न आल्यास तुम्हाला काळोखात रहावे लागेल. त्यापेक्षा मी तुम्हास शिरोड्याला नेऊन सोडतो म्हणजे निदान तिथून तुम्हास रिक्शा मिळेल. आम्ही कबूल केल्यावर त्याने आम्हास शिरोड्यास नेऊन सोडले. तर माझे साडू त्याठिकाणी श्री साईकृपेने हजरच होते. वास्तविक त्यांचे गाव तिथून किती तरी लांब होते. ते म्हणाले, तुम्ही परत इकडे कसे आलात?

शिरोडा एस्.टी. स्थानकावर आल्यावर आम्ही विचारणा केली तर तिच बस ८॥ वाजता येणार असे कळले. तत्पूर्वी आम्ही रिक्शावाल्यास एस.टी. बस न आल्यास आम्हास आरोंदा येथे नेशील का? म्हणून विचारले, तर त्याने होय म्हणून सांगितले. रात्रौ ठीक ८॥ वाजता बस आली आणि आम्ही बसमध्ये बसलो. तोपर्यंत रिक्शावाला तिथेच होता. आमची बस सुटल्यावर तो गेला. आम्ही रात्रौ ९॥ वाजता आमच्या गावी पोहोचलो. पूजाअर्चा केली. श्री बाबांना नैवेद्य दाखवला व जेवून झोपी गेलो. अशा तऱ्हेने श्री साईबाबांनी आमची इच्छा पूर्ण केली. श्री साईबाबा भक्तांच्या हाकेला धावून येतात हेच खरे.

# बाबांचा एक चमत्कार : भक्तांना आवाहन

– श्री. वि. द. चिंदरकर
संचालक– महात्मा गांधी विद्या मंदीर,
बांद्रे (पूर्व), मुंबई

बाबांच्या काळातील श्री साटम महाराज हे नाथपंथी सिद्धपुरुष! या दोन्ही संतांच्या वृत्तीत विलक्षण साधर्म्य होते. या दोघांची रहाणी, त्यांचा पेहराव अत्यन्त साधा होता. सामान्याहून सामान्य असे ते राहिले. त्यांच्याकडे पाहिले की असे वाटते, ते स्वतःसाठी नव्हतेच मुळी! येशू ख्रिस्ता प्रमाणे जनतेचे अश्रु पुसण्यासाठी ते धावले. ज्याच्या त्याच्या धर्माविषयी, ज्याला त्याला स्वतःच्या वागणुकीतून त्यांनी जागृत केले. मानवामध्ये देव आणि धर्म या विषयी श्रद्धा निर्माण केली.

श्री साईबाबा व श्री साटम महाराज ही दोन स्वरुपे (एक शिर्डीत व दुसरे सावंतवाडी (दानोली) येथे प्रकट झाले.) असली तरी ती एका ओंकाराचीच, लोककल्याण करण्यासाठी निर्माण झालेली रुपे होती. ती एकच होती! व या दोहोंच्या वागणुकीत दुजाभाव नव्हता.

अस्थिर व चंचल मनाचे भक्त इकडून तिकडे असे नाना ठिकाणी फिरतात. ज्यांची एका जागी श्रद्धा नाही व मन स्थिर नाही, अशा व्यक्तीला, कोण मनःशान्ती देणार? अशाच वृत्तीचा साईबाबांकडे जाणारा एक भक्त, एकदा साटम महाराजांकडे गेला. महाराजानी तो नमस्कार करायला येताच अंतर्ज्ञानाने जाणले आणि ते त्याला म्हणाले– "एकावरी तुझा नाही दृढ भाव । पावे कोण कैसा तुज लागी?" बाबारे तू शिर्डीला ताबडतोब जा! तेच तुझे गुरु आहेत! पूज्य बाबा देखील अशाच पद्धतीने वागत असत. या दोन्ही संतांस एक प्रकारची टेलिपथी होती. त्यांनी देह ठेवले तरी आजही ते आहेत! ते आहेत!! वर्तमान काळातही हे आहेत!!! ते कोणा ना कोणाकडून कार्य करुन घेतात! आणि एकमेकांच्या कार्याला पुरकही होतात अगदी अलिकडेच घडलेला साईबाबांचा एक चमत्कार सांगताना माझे एक मित्र मला म्हणाले,

श्री समर्थ साटम महाराज भक्त मंडळ या नावाची एक संस्था मुंबईत आहे. ती रजिस्टर आहे. तसेच आयकर मुक्त आहे. या संस्थेने श्री साटम महाराज यांच्या समाधी स्थान (दानोली-सावंतवाडी, जिल्हा–सिंधुदुर्ग) येथे जावून अनेक चांगल्या गोष्टी केल्या. समाधी मंदिराची सुधारणा, महाराजांचा भव्य पुतळा इ. या कार्याला जनतेने, तसेच अनेक संत आणि संस्थानांनी आर्थिक मदत केली.

या ठिकाणी भक्त निवासाची सोय नाही. ती सोय व्हावी म्हणून श्री. सुखी यानी पाऊण एकर जमीन दिली. आता त्या जागी भक्त-निवास बांधले जात आहे पाऊसाळ्या पर्यन्त हे काम पूर्ण होऊन इथे येणाऱ्या यात्रिकांची सोय होईल

या कामासाठी जमलेल्या पैशांचा हिशेब करताना ७६ हजार रुपये पासबुकात जास्त दिसू लागले. ज्या बँकेत साईबाबांचा निधी जमा होत असे, त्याच बँकेत (बँक ऑफ महाराष्ट्र, दादर शाखा) साटम महाराजांचेही खाते होते. परंतु श्री साटम महाराजांच्या खात्यावर बाबांच्या खात्याचे पैसे कधीच जमा झाले नव्हते. महाराजांचे भक्त निवासाचे काम सुरु करताच इतर संताबरोबर बाबांनीही ही रक्कम दिली होती. बाबा प्रत्यक्ष देहरुपाने असताना अशा कार्याला, मंदिरांना ते स्वत: अगोदर मदत करीत असत. बाबांचा हा चमत्कारच होता. आपण दोन नाही हे त्यांनी भक्तांना दाखवून दिले होते.

ही रक्कम कायदेशीर पद्धतीने आल्याशिवाय श्री साटम महाराज ट्रस्टला स्वीकारता येणे शक्य नसल्याने ती बँकेच्या नजरेला आणण्यात आली व परत करण्यात आली. या संबंधी अधिक चौकशी करताना, श्री समर्थ साटम महाराज भक्त मंडळ, मुंबईचे खजिनदार श्री. द. शं. केरकर यांना भेटलो. ते म्हणाले, "ह्या घडीला आम्हाला दोन लाख रुपयांची जरुरी आहे. भक्त-निवासाचे अर्धे अधिक काम आता पूर्ण झाले आहे. साईभक्तांनी या चमत्कारामागे बाबांची इच्छा असावी या विचाराने प्रेरित होऊन वरील मदत दोन लाख जर त्वरित पाठविली तर काम पूर्ण करायला आम्हाला जास्त कष्ट पडणार नाहीत व **भक्तनिवासाच्या मध्यवर्ती सभागृहात बाबांचा हा चमत्कार व ही मदत आम्ही नोंद करू शकू, असे घडावे असे आम्हाला वाटते.** घडलेली गोष्ट ही साधी गोष्ट नव्हती! तो चमत्कारच होता! बाबांची – श्री साटम महाराज स्थानात चाललेल्या कार्यासंबंधी काय इच्छा असावी हा प्रत्येकाने विचार करायचा प्रश्न आहे व निर्णय घ्यायचा आहे."

# ही तर साईनाथांचीच लीला

**– सौ. विभावरी ज. राणे**
अंधेरी (पूर्व), मुंबई.

दिवाळी म्हटली म्हणजे जिकडे तिकडे आनंदी वातावरण, पण माझ्या घरी मात्र जरा काळजीचेच वातावरण होते. कारण माझ्या वडिलांची तब्बेत अचानक बिघडली. हा अनुभव आहे ऑक्टोबर १९८६ मधील. कृष्णाजी दाजी सावंत उर्फ

बाबा मास्तर यांना लघवीचा त्रास होऊ लागला व त्यांचे पोट फुगू लागले. गोळ्या औषध वगैरे घेऊन त्यांना तात्पुरते बरे वाटायचे, पण त्रास हा व्हायचाच.

वडिलांना बरं नाही, हे ऐकून माझातर धीरच सुटला. तो दिवस गुरुवारचा होता. नेहमीप्रमाणे मी घरातील देवांच्या फोटोंना संध्याकाळची आरती केली व प्रसाद दाखवला आणि साष्टांग नमस्कार करुन साईबाबांच्या फोटोला सांगितले की, "बाबा! माझ्या वडिलांना बरे करा! या माझ्या संसारात मला खूपच मदत केलीत, पुष्कळ वेळा माझ्या संकटांना धाऊन आलात, ती या उदी रुपाने, आता ही उदी मी माझ्या वडिलांना देत आहे. त्याची मला प्रचिती दाखवलीच पाहिजे. आणि माझे वडील याच्यातून चांगले व्हावेत. असे बोलून साईनाथांच्या पोथीवर डोके टेकून डोळ्यातील अश्रूंबरोबर अंतःकरणापासून हाक मारली आणि रात्री आठ वाजता साईबाबांची उदी घेऊन अंधेरी वरुन भांडुपला आलो. तिथे सर्व भावंडे आलेली होतीच. मी सर्वांच्या पुढ्यात साईंची उदी पाण्यातून वडिलांना प्यायला दिली. कपाळाला व पोटाला लावली. माझ्या माहेरची मंडळी पण साईभक्त आहेतच.

दुसऱ्या दिवशी शुक्रवारी सर्वांच्या विचाराने आबांना बॉम्बे हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करण्यात आले. बॉम्बे हॉस्पिटलमध्ये प्रवेश करतेवेळी साईबाबांची उदी घेऊनच प्रवेश केला आणि खरंच माझ्या वडिलांचे डॉक्टर साईबाबाच झाले. डॉक्टरांच्या सर्वांगीण तपासणीनंतर ॲडमीट केल्यापासून सातव्या दिवशी ऑपरेशन करायचे ठरले. तो दिवस होता गुरुवार. वय वर्षे ७०च्या पुढेच असल्यामुळे आम्ही भावंडे, पाहुणे मंडळी घाबरुनच गेलो होतो. कारण या वयात ऑपरेशन म्हणजे...

उदीची पुडी वडिलांच्या उशी खाली ठेवलीच होती. सर्वांचा भार साईनाथांवरच होता.

ऑपरेशनच्या वेळी त्यांना दोन बाटल्या रक्त द्यावे लागले. गुरुवारी सकाळी १० वाजता डॉक्टरनी ऑपरेशन करायला घेतले आणि अडीज वाजता दुपारी ऑपरेशन पूर्ण झाले. वयाच्या दृष्टीने असे अवघड ऑपरेशन म्हणजे वडिलांना त्रास झालाच. ऑपरेशन रुम मधून वडिलांना कॉटवर आणून ठेवण्यात आले. संध्याकाळी चार वाजता मी वडिलांच्या कपाळाला उदी लावली. त्यावेळी रुग्णालयातील नर्सने पाहिले आणि म्हणाली "क्या भगवान की उदी है, लगावो". मला खूपच बरं वाटलं आणि नर्सच्या रुपाने साईबाबाच माझ्याशी बोलत आहेत, असा मला भास झाला.

शुक्रवारी रात्री वडिलांची तब्बेत पुन्हा बिघडली. ग्लूकोजमुळे अंगात थंडी उत्पन्न झाली व ताप भरला. अंगात थंडी एवढी होती की, चार माणसांनी दाबून धरले, तरी ते संपूर्ण वरच्यावर उचलत होते. आम्ही सर्वजण अगदी घाबरुन गेलो. डॉक्टर लोक आपल्या लवाजम्यासह उपचार करत होते. उदीच्या रुपाने साईबाबा अदृश्यरित्या बसूनच होते. हळूहळू आबांच्या तब्येतीत फरक पडत होता. हॉस्पिटलमध्ये आम्हाला कशाचीच उणीव भासत नव्हती. डॉक्टर जी जी औषधे लिहून देत होते, ती सर्व औषधे किंवा इतर काही वस्तू हव्या असतील, त्या आम्हाला

मिळत होत्याच. कुठेच कसलीच अडचण भासत नव्हती. उदीरुपी साईबाबा आणि डॉक्टरी उपचार व्यवस्थित चालू होते. हळूहळू वडिलांची तब्येत सुधारली आणि ३५ दिवसांनी आमचे वडील - आबा मास्तर चांगले होऊन घरी आले. त्यांच्या उशी खालची पुडी रुग्णालयातून घरी येतेवेळी घरी घेऊन आलो.

साईभक्तांनो, साईंच्या लीला लिहितेवेळी लेखणी पुढेपुढे सरकते. मी म्हणते, "ती साई इच्छाच आहे."

# श्री साईबाबांनी इच्छा पूर्ण केली

– श्री. दिलीप शंकरराव लांडे
स. अध्यापक, गजानन महाराज विद्यामंदिर,
टाकळी, अकोला.

"जरी हे शरीर गेलो मी टाकून ।
तरी मी धावेन भक्तांसाठी ॥"

ह्या सद्गुरु साईमाऊलीच्या वचनाचा अनुभव आम्हाला क्षणोक्षणी येतो. आपल्या मनातील एखादी इच्छा कृपाळू साईमाऊली जवळ प्रदर्शित केली तर माझी कृपाळू साईमाऊली ती पूर्ण केल्याशिवाय रहात नाही. परन्तु त्याचबरोबर बाबा आमची "श्रद्धा आणि सबुरी" तपासून बघतात. कृपावंत बाबांनी माझी अशीच इच्छा कशी पूर्ण केली, त्यांच्या कृपेचा हा अनुभव.

माझी पत्नी सौ. विजया हिची प्रकृती प्रथमच गर्भपात झाल्यानंतर अतिशय खालावली. बाळंतपण म्हणजे जणू तिच्या प्राणावरचे संकट. अशात 'बाबाकृपे' दुसऱ्यांदा मुलगी झाली. त्यावेळी खूपच त्रास झाला. परन्तु 'बाबांकृपे' सर्व व्यवस्थित पार पडले. ती मुलगी वाचली. आज ती पाच वर्षांची आहे. बाबांकृपे ती अनेक व्याधीतून वाचली आहे. त्या नंतरच्या गरोदरपणात सौ. चा प्राण जायचा पण बाबांकृपे तिचे प्राण वाचले व झालेले अपत्य (कन्या) मात्र दगावले. त्यानंतर मात्र डॉक्टरांनी सांगितले की, पुढचे बाळंतपण म्हणजे सौ.चे प्राण गमावणेच. त्यामुळे त्यांची अतिशय काळजी घेणे आवश्यक आहे. डॉक्टरांनी सांगितल्या नंतर मात्र मन एकदम उदास झाले. आता संतती-योग नाही, अशीच मनाशी कल्पना करू लागलो. मनात 'पुत्रप्राप्तीची' अनिवार इच्छा होती. बाबांची मनोमन प्रार्थना करीत होतो. "बाबा पुत्रप्राप्तीची अनिवार इच्छा आहे, ती आपण पूर्ण करावी व पत्नीचे आरोग्यही चांगले रहावे व कोणत्याच प्रकारचा त्रास होऊ नये". बाबांनी आमची प्रार्थना ऐकली. सौ.ला दिवस गेले, परन्तु काळजी होती तिच्या प्रकृतीची. आम्ही दोघे उभयता बाबांची मनोमन प्रार्थना करीत होतो, "बाबा सर्व व्यवस्थित पार पडू द्या. बाबांनी आमची प्रार्थना ऐकली. आम्हाला दि. ८-११-८७ ला 'पुत्ररत्न' प्राप्त

झाले, तेही कोणत्याच प्रकारचा त्रास न होता. मी आनंदाच्या भरात बाबांचे फोटोचे दर्शन किती वेळ घेतले हे मी सांगूच शकत नाही. आज बाबांच्या कृपे आमचा संसार आनंदात चालू आहे. त्यांच्या कृपेशिवाय हे शक्य नाही.

बाबांच्या कृपे माझा धाकट बंधू चि. प्रदिप लांडे ह्याला प्राध्यापकाची नोकरीसुद्धा मिळाली. कोणत्याच प्रकारचा वशिला वगैरे नव्हता, होते फक्त बाबांचे आशीर्वाद.

मी माझ्या मुलाचे नाव 'दत्तात्रेय' ठेवले असून त्याच्या प्रकृतीत जराही बिघाड झाला तर आम्ही 'बाबांची' उदी त्याला लावतो. बाबांकृपे त्याचा आजार दूर पळून जातो.

बाबांच्या चरणी एवढीच प्रार्थना, ''बाबा, आम्हा लेकरांवर आपले कृपाछत्र असू द्यावे''. शिवाय ''बाबा, आपल्या कृपेवरुन सानंद राहो सदा मन, सर्वदा घडो साईस्मरण, तैसेची संगत साईभक्तांची''.

## ''पुनर्जन्म'' नव्हे – जीवनदान

– **श्री. विनय जी. निरखे**
कांम्प्युटर सेक्शन,
एम.पी. इले. बोर्ड,
रामपूर , जबलपूर.

आमचे बापूसाहेब (वडील) शिरडी साईबाबांचे निस्सीम भक्त आहेत. अनेक वर्षांपासून ते साईभक्त परिवाराचे एक घटकच मानले गेले आहेत. आणि तोच वारसा संस्काराने आमचे वाट्यास आलाय. त्यामुळेच की काय आम्ही उभयता व दोन मुलं एका महा संकटातून नव्हे काळाच्या दाढेतून परत आलोत.

ही वार्ता आईवडिलांना लिहून का होईना कशी कळवावी ह्या विचाराने मनस्व होतो. कारण सौ. आई आजारी व बापू फार भाविक-- पण हिचे वडील आमची वार्ता कळून दुसऱ्या गाडीने आले. त्यांचेबरोबर हे आईबापूंना पत्र दिले...

तीर्थस्वरुप सौ. आईबापू यांसी अनेक नम्र आम्हा उभयतांचा नमस्कार विनंती बापू की हे धाडलेले पत्र शांतपणे वाचून घाबरुन जाऊ नये. सौ. आईस समजाऊन देणे. ती आजारी म्हणून.

तुम्ही सांगितल्याप्रमाणे नोकरी लागली त्या दिवसापासून व विशेषतः लग्न होताच आम्ही उभयतांनी श्री साईसत्यनारायण दर पौर्णिमेस करणे सुरू केले होते. त्या साईसत्यनारायण पूजा प्रसाद घेण्याने एका महान संकटातून वाचलो. मी नव्हे, तर तुमची सून व नात-नातू पण! नव्हे आमचा ''पुनर्जन्मच'' झालाय! वाचा तर... दि. ३ जानेवारी १९८८, रविवार पौर्णिमा होती. ओव्हरटाईम नव्हता. राहत

त्या वाड्यातील मंडळी, मुलं एका पिकनिकला त्या दिवशी जाणार होते. मुलांनी हट्ट केला व त्यांचे आईने दुजोरा दिला.

मी 'हो' म्हटले, पण लौकर उठून पौर्णिमा सत्यनारायणपूजन व प्रसाद घेऊन चल! आणि घडलेही तसेच. भल्या पहाटे उठून सर्व मनोभावे पूजन प्रसाद घेतला व पिकनिक खुशीत घराबाहेर आलो.

पिकनिक स्पॉटची ठरलेली जागा बदलून मित्रांच्या मुलांच्या हौशीसाठी जबलपूर नागपूर रोडवरील "बरगीबांध" पहावे असे ठरले. १० ते १५ मंडळी बायामुले एका ट्रकमध्ये बसून जाणार होते. तो दाराशी तयारच होता. आपापल्यापरीने सर्व घाईने ट्रकमध्ये चढले व सोईप्रमाणे बसले. सौभाग्यवती थोड्या आंत इतर बायांसह स्वयंपाक भांड्यांपाशी बसली. मी व दोन मुलं जागा नव्हती म्हणून मागील बाजूचे शेवटी बाकावर बसलो.

सारंग, ड्रायव्हरपाशी केबीनमध्ये बसू द्या त्यांना, म्हणत होता. मी नाही म्हटले. मुलगी शिल्पाला आईपेक्षा माझे जवळ चिटकून बसणे आवडले. ट्रक सुरू होऊन आपल्या वेगात चालू झाला. आम्ही मंडळी गाणे, चुटकुले, हंसीमजाक करीत पुढच्या गोष्टी आखत होतो. वाटेत बरगी पर्वतीचा घाट येतो, त्या ठिकाणी ट्रक ड्रायव्हरने एक शार्पटर्न घेतला. त्यामुळे माणसं -मुली एकमेकांवर आदळली आणि हसत-हसत सावरुन बसत नाही तोच ... ट्रकने परत तसाच शॉर्ट टर्न... पण इतक्यात... अरे, अरे. ये क्या, सम्हालो भाई ड्रायव्हर... बचाओ ओ सामने झाड है... कसले काय? ट्रकने दोन पलट्या खाल्या व समोर घाटाच्या काठाला धडक मारून शेजारच्या झाडावर आदळत आडवा झाला. केबीनची मंडळी... काय झाले त्यांचे कुणास भान. बायांचे रडणे, मुलांची ओरड व बसल्या मंडळींचे पोटात धस्स झाले. त्यातच शेवटच्या बाकावरचा मी, लोकांचे अंगावर आडवा फेकला गेलो. तसंच सारंग माझ्या अंगाला चिपकलेला ओरडत होता, बाबा, बाबा माझा पाय फसला आहे हो! मी घाबरून पाहिले, तो पाय गायब! मग दिसला त्याचा पाय लोकांचे पायाखाली अडकला होता... अरे पण शिल्पा? आपली शिल्पा कुठे बाबा?

...दूरवरुन हाक आली, बाबा, अहो बाबा! मी ही पहा. इथं उभी आहे. या इकडे मला कुणीतरी झेललं. या टेकड्यांवर व खाली उभं केलंय त्यांनी... कुणी? फ्रॉक झटकत शिल्पा म्हणाली, ते पहा ते... जात आहेत. कोण, कुठाय... देवा साईंनी ट्रकमधून उडालेल्या शिल्पाला अलगद फुलासारखे झेलले! पण आई कुठाय? थांबा इथं बाळांनो. आम्ही बघतो. आम्ही ट्रकमध्ये डोकावले मात्र, एक साथ गोंधळ रडणे. निघण्याचा प्रयत्न. बायामंडळी बाकाच्या-भांड्यांच्यामध्ये अडकली होती. मुलांची आई दिसली. तोंडावर रक्ताचे ओघळ. रक्तबंबाळ! तिचा पहिला प्रश्न, मुलं कुठे? कसे? घाबरु नको, ठीक. पण दुसरी हाक, काका, मला वाचवा. मी इकडे अडकले. अनिताचा आवाज! एक बाई ओरडली, भाईसाब, पहले हमें उठावं, बाहर निकालो. भांडी, बाक बाजूला करत सौभाग्यवतीने तशाही स्थितीत चार बायांना

बाहेर आणण्यास मदत केली व इतरांसह खाली उतरली. आईला पाहून मुलं रडू लागली. केबीनमधील ड्रायव्हर कुठं होता? त्या केबीनमधील बसलेल्या जोडप्यांपैकी पत्नीला नाक व जबड्यावर फार मार पडला. अचेत होत्या. पण त्याच मार्गाने दोन तीन मोटारींनी आम्हास मदत केली. जखमी लोकांना जबलपूरच्या हॉस्पिटलमध्ये धाडले. दुसऱ्या गाडीत इतर ४/६ जणांना व मागील मेटल डोअरमध्ये मी पत्नी मुलासह ७/८ जणांना घेऊन दवाखान्यात आलो. रविवार... पण ज्युनिअर डॉक्टरांनी मदत केली. सौभाग्यवतीचे तोंड धुतले. भांड्याचा काठ कपाळाला खोच मारुन गेला. चार टाक्यावर निभावले. तिने तशाही स्थितीत जखमी बायांना मदत केली. रिक्षाने आपापल्या घरी धाडले. पुष्कळांच्या झोळ्या, पिशव्या पत्नी मुलासह रिक्षाने घरी आणल्या. रिक्षावाल्याने पैसे नाही घेतले. त्याने एक फोटो मागितला. उद्या द्या म्हणाला. घरात शिरताच सौभाग्यवती भरलेल्या डोळ्यांनी समोर मांडलेल्या साईसत्यनारायणापुढे नतमस्तक झाली. आम्ही सर्वांनी मनोभावे तिचे अनुसरण केले.

बापूसाहेब नक्कीच तुम्ही पत्र वाचू शकत नसाल! आईला सांगा, आम्ही लौकर भेटायला येऊ. पण अक्षरशः काळ आला होता हो बापू, पण रक्षण केलं त्या दया घनाने, साईनाथाने! हे सारे तुमचे, आईचे उपकार, आशीर्वाद! धाकटी शिल्पा काय म्हणाली, सांगू? ती म्हणाली, आबा नेतात तशी उदीपुडी मीसुद्धा फ्रॉकचे खिशात लपवून नेली म्हणून आबांच्या साईंनी मला झेलून घेतले. तोच सारंग म्हणतो, हीं पहा माझ्या खिशातही मी प्रसाद पुडी लोकांना देण्यास ठेवली होती.

तुमच्या सुनबाईला राहवले नाही. ती म्हणाली... आपल्या साईपूजन पौर्णिमा पोथी प्रसादानेच आपणा चौघांना जीवदान मिळाले व लोकांनाही प्रसाद वाटला म्हणून त्यांचेही जीवावरचे संकट हातापायावर निभावले. बापूसाहेब माझी इच्छा आहे, हे सत्य घडलेले संकट निवारण भाविक श्रद्धेसाठी साईलीलेत धाडावे. प्रयत्न करतो.

अशावेळी तुम्ही जी ११ साईवचने दिलीत त्यातील सौ. आईने वारंवार सुचवलेली ओळ आज अशा प्रसंगी माझे नजरसमोर येते. ती...

जो जो मज भजे जैशा भावे ।  
तैसा तैसा पावे मी ही त्यासी ॥७॥

बापू, आई तुमचे नम्र– विनय, सौ. स्मिता.

## शिरडी वृत्त

# सप्टेंबर ८८

या महिन्यात साईबाबांच्या दर्शनासाठी श्री साईभक्तांची गर्दी नेहमी प्रमाणे होती.
डी कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली, ती खालील प्रमाणे.

**र्तन :** १) ह.भ.प. मधुकर गणेश सूर्यवंशी, संस्थान पुजारी-गवई, कीर्तनकार, प्रवचनकार यांची कीर्तने एकादशी व महत्वाच्या दिवशी झाली.
२) ह.भ.प. लक्ष्मण महाराज वाकचौरे, शिरडी.

**वचन :** १) ह.भ.प. सुमंत महाराज ओतुरकर, ओतुर.

**न, गायन, वादन इ. :–**

१) श्री. नवनाथ रंगनाथ आव्हाड, शिरडी २) श्री. काशीनाथ महाराज भालेराव, त्र्यंबकेश्वर ३) श्री. साई सूरज बाबा, जनवलपुर–बिहार ४) सौ. सुवर्णा रमन, कलकत्ता ५) डॉ. बी. जी. पंड्या, अहमदाबाद ६) श्री. महेंद्रभाई क. देव, अहमदाबाद ७) कु. अरुणकुमारी, पाणीपाल ८) श्री. प्रसन्ना ए. बट्ट, पुत्तुर ९) श्री. बी. राम ट १०) श्री. सोमेश्वर भजनी मंडळ, सोनगाव, बारामती ११) सौ. मीना संगम, ळा १२) श्री. शिवाजी बळवंत शिदोडकर, पुणे १३) श्री. अरुण महादेव धिकारी, ग्वाल्हेर.

**कुळ अष्टमी कार्यक्रम :–**

सालाबाद प्रमाणे याही वर्षी गोकुळ अष्टमी कार्यक्रम दि. २ व ३-९-८८ असा २ स थाटाने साजरा करण्यात आला. शुक्रवारी दि. २-९-८८ रोजी रात्रौ १० ते कृष्ण जन्म आख्यान कीर्तन संस्थान पुजारी, गवई श्री. म. ग. सूर्यवंशी यांनी केले. वाजता कृष्ण जन्म झाल्यावर शेजारती झाली.

शनिवार दि. ३-९-८८ रोजी सकाळी १०.३० ते १२.०० काला कीर्तन ल्यावर दहीहंडी कार्यक्रम झाला. नंतर १२.३० वाजता माध्यान्ह आरती झाली. त्री ९.१५ ते ११.०० श्रींच्या रथाची मिरवणुक गावातून परत आल्यानंतर शेजारती झाली.

# शिरडी वृत्त

## सप्टेंबर ८८

या महिन्यात साईबाबांच्या दर्शनासाठी श्री साईभक्तांची गर्दी नेहमी प्रमाणे होती. काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली, ती खालील प्रमाणे.

**कीर्तन :** १) ह.भ.प. मधुकर गणेश सूर्यवंशी, संस्थान पुजारी-गवई, कीर्तनकार, प्रवचनकार यांची कीर्तने एकादशी व महत्वाच्या दिवशी झाली.
२) ह.भ.प. लक्ष्मण महाराज वाकचौरे, शिरडी.

**प्रवचन :** १) ह.भ.प. सुमंत महाराज ओतुरकर, ओतुर.

**भजन, गायन, वादन इ. :–**

१) श्री. नवनाथ रंगनाथ आव्हाड, शिरडी २) श्री. काशीनाथ महाराज भालेराव, त्र्यंबकेश्वर ३) श्री. साई सूरज बाबा, जनवलपुर–बिहार ४) सौ. सुवर्णा रमन, कलकत्ता ५) डॉ. बी. जी. पंड्या, अहमदाबाद ६) श्री. महेंद्रभाई क. देव, अहमदाबाद ७) कु. अरुणकुमारी, पाणीपाल ८) श्री. प्रसन्ना ए. बट्ट, पुत्तुर ९) श्री. बी. राम बट्ट १०) श्री. सोमेश्वर भजनी मंडळ, सोनगाव, बारामती ११) सौ. मीना संगम, वडाळा १२) श्री. शिवाजी बळवंत शिदोडकर, पुणे १३) श्री. अरुण महादेव धर्माधिकारी, ग्वाल्हेर.

**गोकुळ अष्टमी कार्यक्रम :–**

सालाबाद प्रमाणे याही वर्षी गोकुळ अष्टमी कार्यक्रम दि. २ व ३-९-८८ असा २ दिवस थाटाने साजरा करण्यात आला. शुक्रवारी दि. २-९-८८ रोजी रात्रौ १० ते १२ कृष्णजन्म आख्यान कीर्तन संस्थान पुजारी, गवई श्री. म. ग. सूर्यवंशी यांनी केले. १२ वाजता कृष्ण जन्म झाल्यावर शेजारती झाली.

शनिवार दि. ३-९-८८ रोजी सकाळी १०.३० ते १२.०० काला कीर्तन झाल्यावर दहीहंडी कार्यक्रम झाला. नंतर १२.३० वाजता माध्यान्ह आरती झाली. रात्रौ ९.१५ ते ११.०० श्रींच्या रथाची मिरवणुक गावातून परत आल्यानंतर शेजारती झाली.

# डॉ. महिंद्रकुमार भाटे यांचे निधन



साईलीलाच्या कवयित्री सौ. चंद्राबेन भाटे व मुंबईतील एक प्रसिद्ध साईभक्त डॉ. विठ्ठलदास के. भाटे यांचे एकमेव चिरंजीव डॉ. महेंद्रकुमार, एम.बी.बी.एस., डी.सी.एच्.इ.सी.एफ.एमजी. यांचे बुधवार दिनांक ३१-८-८८ रोजी दुपारी ४.३० वा. हृदयविकाराचा तीव्र झटका येऊन वयाच्या अवघ्या ३४व्या वर्षी घरीच देहावसान झाले. ते आगामी 'एम.... (मुलांचे विकार) परीक्षेला बसणार ... शीव येथील लो. टिळक रुग्णालयाशी ... व्यवसायाने संबंधित होते. संगीताचा त्यांना षौक होता व बासरी ते उत्कृष्ट वाजवीत असत. ते अविवाहित होते.

दरवर्षी डॉ. भाटे कुटुंबिय मंडळी दिवाळीचे पाचही दिवस अखंडपणे न चुकता शिरडीस बाबांच्या सेवाकार्य व दर्शनलाभ नाम-जपासाठी येत असत. त्यांचा ह उपक्रम सतत नेमाने ३४ वर्षे होता.

डॉ. महिंद्रकुमार यांच्या पश्चात् त्यांचे वृद्ध डॉक्टर वडील, मातोश्री, बहिण कु. कृष्णा व असंख्य डॉ. मित्र मंडळींचा परिवार आहे.

### श्री. सरोदे यांचे निधन

साईलीलाच्या एक जुन्या लेखिका व कवयित्री शांताताई सरोदे यांचे पती श्री. अंबाजीराव यांचे सोमवार ता. २२-८-८८ रोजी सकाळी ९.४५ वा. दादर ये... निधन झाले.

### श्री. शांताराम खडके यांचे निधन

चेंबूरचे साईभक्त श्री. जी. आर. खडके यांचे बंधु श्री. शांताराम रामकृष्ण खड... उर्फ बापू यांचे सोमवार ता. २६-९-८८ रोजी वृद्धापकाळामुळे अंधेरी येथे निधन झाले. त्यांनी साक्षात् श्री साईंचे अनेकदा दर्शन घेतले होते.

### श्री. जोग यांचे निधन

श्री साईलीलाच्या लेखिका कुसुमताई जोग यांचे पती श्री. बाळकृष्ण पांडुरंग जोग यांचे गिरगाव, आंग्रेवाडी येथे वृद्धापकाळामुळे निधन झाले. ते ८४ वर्षांचे होते.

श्री साईमहाराज सर्व मृतात्म्यांना चिरशांती व सद्गती देवोत.

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी
## श्री साईबाबा संस्थान प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. क्र. | पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकींग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्‌चरित | मराठी | ३१-०० | ९-०५ |
| २. | –,,– | इंग्रजी | १४-५० | ६-५० |
| ३. | –,,– | हिंदी | – | – |
| ४. | –,,– | गुजराथी | १९-०० | ६-५० |
| ५. | –,,– | कन्नड | १३-५० | ८-०० |
| ६. | –,,– | तेलगु | १८-०० | ८-०० |
| ७. | –,,– | तामीळ | – | – |
| ८. | –,,– | सिंधी | २२-०० | ७-५० |
| ९. | श्री साई सत्‌चरित पोथी | गुजराथी | ३१-०० | १०-५० |
| १०. | श्री साई लिलामृत | मराठी | – | – |
| ११. | –,,– | हिंदी | – | – |
| १२. | –,,– | गुजराथी | ६-६५ | ४-०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | – | – |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | ०-६५ | ३-५० |
| १५. | –,,– | हिंदी | १-०० | ३-५० |
| १६. | –,,– | गुजराथी | ०-९० | ३-५० |
| १७. | सगुणोपासना (आरती) | मराठी | ०-७० | ३-५० |
| १८. | –,,– | हिंदी | १-२५ | ३-५० |
| १९. | –,,– | गुजराथी | ०-८० | ३-५० |
| २०. | –,,– | तेलगु | २-५० | ५-५० |
| २१. | –,,– | सिंधी | १-२५ | ३-५० |
| २२. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | १-८५ | ३-५० |
| २३. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | ४-८० | ५-५० |
| २४. | मुलांचे साईबाबा | मराठी | – | – |
| २५. | –,,– | इंग्रजी | १-६५ | ३-५० |
| २६. | –,,– | हिंदी | – | – |
| ७. | –,,– | गुजराथी | १-६५ | ३-५० |
| ८. | –,,– | तेलगु | – | – |
| ९. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | ०-८० | ३-५० |
| ०. | मार्गदर्शिका (शिर्डी गाईड) | मराठी | – | – |
| १. | –,,– | इंग्रजी | – | – |
| २. | –,,– | गुजराथी | १-५० | ३-५० |
| ३. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ७-२५ | ४-०० |
| ४. | साईबाबा ऑफ शिर्डी (भरुचा) | इंग्रजी | ६-५० | ४-०० |
| ५. | साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) | इंग्रजी | ३-०० | ४-०० |
| ६. | अष्टोत्तर शत नामावली | मराठी | १-०० | ३-५० |
| ७. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | १५-२५ | ४-५० |